म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0018128

रवीन्द्र केळेकर

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रमांक........................ वि: ........................
............................ नोंद दि ........................

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना :—** खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक प॰
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी
जादा वर्गणी भरावी लागेल.

27 JUL 1975

[क्र. मा. प.]

# जपान जसा दिसला

# जपान जसा दिसला

REFBK-0018128

रवीन्द्र केळेकर

ग्रंथसंग्रहालय ठाणे
9892

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

प्रकाशक : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणे ३०
मुद्रक : प्रभाकर सिद्ध, साधना प्रेस, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ३०
जपान जसा दिसला ©सर्व हक्क सुरक्षित, प्रकाशन क्रमांक ५६१
प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९७०; **किंमत सहा रुपये**

स्व. बाबांच्या पवित्र स्मृतीला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६५२९२ दि: ३०-१-७५
वर्ग ... नोंद दि ... ३१-७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८१२८
संदर्भ शाखा

# पुरस्कार

माझ्या पिढीने जपानचे नाव अगदी पहिल्याप्रथम ऐकले ते १८९४ साली. त्या वेळी मी नऊ वर्षांचा होतो. जपानने चीनच्या साम्राज्याविरुद्ध युद्ध केले. पहिल्याच सपाट्याला चीनची तीन जहाजे उडविली, आणि युद्धात मोठा विजय मिळवला असे समाचार कानी पडले.

त्या वेळी इतिहास–भूगोलाचे ज्ञानदेखील मला विशेष नव्हते. केवळ शब्दच कानांत पडले आणि स्मरणात कुठे तरी उमटले.

त्यानंतर जपानचे नाव वाजतगाजत कानांवर येऊन थडकले ते १९०४-१९०५ च्या सुमाराला. त्या वेळी जपानने जगातल्या दुसऱ्या एका बलाढ्य साम्राज्याशी–झारच्या रशियाशी युद्ध मांडले होते. त्या वेळी मी नुकताच कॉलेजात प्रवेश केला होता. ठेंगण्या जपान्यांनी बलाढ्य धिप्पाड रशियन कॉझकना कसे हरविले, पोर्ट आर्थरचा

किल्ला निकराने लढवून कसा सर केला, मुकडेनची लढाई कशी लढली गेली, आणि सुशिमाच्या सामुद्रधुनीत एका लढाईत रशियाचे विख्यात बाल्टिक आरमार समुद्राच्या तळाला कसे पोचवले याची वर्णने वाचताना आमची छाती फुलून येई. एका एशियायी राष्ट्राने युरोपियनांचा पराभव केला या एका गोष्टीने सबंध एशिया खंडात नवचैतन्य नांदू लागले आणि जपानी राष्ट्राकडे सबंध आशियाचे नेतृत्व जणू आपोआप पोहोचले. तेव्हापासून भारताच्या हृदयात जपानसंबंधाने आदर आणि आत्मीयता नांदत आहे.

जपान म्हणजे अशियातील प्राचीन परंपरेतले एका कोपऱ्यावरचे राष्ट्र. अगदी कोपऱ्यावर पडलेले असल्यामुळे चेंगीझखान, कुब्लाईखान, तैमूरलंग यांसारख्यांच्या आक्रमणापासून वाचून उरलेले. येथील संस्कृती म्हणजे स्थानदेवता, जलदेवता, पर्वत-देवता वगैरे देव-देवींची पूजा करणारी; पितरांना देवता मानणारी आणि राजातदेखील ईश्वरी अंश उतरलेला असतो असे समजून चालणारी.

जपान म्हणजे चार प्रचंड बेटांना वेढून असलेल्या शेकडो बेटांचा देश. नौका-नयनावाचून यांना जगणेच शक्य नाही. लहानमोठ्या जमीनदारांनी आपापसांत बसून राजा व्हावे, प्रधानांनी राज्यसत्ता बळकावून बसावे, सोयीस्कर जागी शहरे वसवावी आणि जीवन-विकास करत राहावे अशा सोप्या आदर्शाचे हे राष्ट्र.

या राष्ट्रात बौद्ध धर्माने चौदाशे वर्षांपूर्वी प्रवेश केला. तसे पाहिले तर नाव घेण्याजोगी सांस्कृतिक तत्त्वे जपानमध्ये बाहेरूनच आली. चिनी भाषा, तेथील शब्द-मूलक लिपी, कुन्फू ( कॉन्फूशियस )ची समाजव्यवस्था अथवा सामाजिक स्मृती वगैरे गोष्टींचा प्रभाव जपानवर पडलाच होता. त्यात महायान बौद्ध धर्म नेपाळ व बिहारमधून हिमालय ओलांडून तिबेटवरून चीन, मंगोलिया, कोरिया असा सांस्कृतिक प्रवास करीत विशाल आणि समृद्ध होत जपानात पोहोचला. मूळ शिन्तो धर्मावर बौद्ध धर्मांचे हे प्रभावशाली कलम राष्ट्राला रुचले आणि मानवले. आज जिला आपण जपानी संस्कृती म्हणतो तिच्या पायात मूळचा शिन्तो धर्म, चीनमधील कॉन्फूशियसचे सामाजिक आदर्श, महायानी बौद्ध धर्म आणि या सर्वांतून उत्पन्न झालेली झेन अथवा ध्यानमार्गी जीवनसाधना, या सर्वांचे एक रसायन आहे. या रसायनातूनच जपानी प्राणाला अद्भुत पोषण मिळालेले आहे.

पुढे सोळाव्या शतकात युरोपमधून भारतात ख्रिस्ती धर्म घेऊन आलेला सेंट फ्रँसिस झेवियर जपानला पोहोचला. भोळ्या जपानी लोकांना वाटले की, बुद्ध भगवानांच्या जन्मभूमीतून धर्माचे लोण घेऊन हा कोणी सत्पुरुष आला आहे. त्यांनी झेवियरचे हार्दिक स्वागत केले; पण पुढे त्यांना कळून चुकले की, हा माणूस आणि त्याचा धर्म भारतातील

नसून सुदूर पश्चिमेकडील आहे आणि या लोकांच्या हाडांत शुद्ध धर्म नसून मतलबी राजकारण आहे. तेव्हा लोक चिडले, आणि त्यांनी या धर्माचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. पण हा धर्म तेथे नामशेष होऊ शकला नाही.

वेटात राहणाऱ्या लोकांना सहज सुचणारी गोष्ट जपान्यांनी अजमावून पाहिली. बाहेरच्या लोकांनी आपल्या देशात येऊ नये, आपल्या लोकांनी बाहेर जाऊ नये, असे कडक नियम त्यांनी केले. हे नियम गोऱ्या महत्त्वाकांक्षी व्यापाऱ्यांना कसे सहन व्हावेत? त्यांनी 'मान या न मान मैं तेरा मेहमान' या न्यायाने 'जपानचे दरवाजे व्यापाराला (आणि धर्मप्रसारालाही) खुले केले. जबरदस्तापुढे काही चालू शकत नाही असे पाहून जपान किंकर्तव्यमूढ झाले. पण जपानी संस्कृतीचा प्राण निराश किंवा हताश मुळीच होऊ शकला नाही. जपानी तरुणांनी युरोपात जाऊन तेथील विद्या ग्रहण केली आणि आपल्या राष्ट्राला पाश्चात्त्य वळण लावण्याचे ठरवले. त्यांनी आपल्या संस्कृतीत आमूलाग्र क्रांती केली.

महायुद्धात विजय मिळाल्यानंतर जगभर आपला प्रभाव पसरण्याची करामत कोणतेही राष्ट्र करून दाखवू शकते. पण अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राच्या हातून चेंगरून टाकणारा पराभव अनुभवल्यानंतरदेखील जपान क्षीणप्राण झाले नाही. उलट बघता बघता त्याने आपले मानाचे जागतिक स्थान परत मिळवले आहे. हीच गोष्ट सिद्ध करते की, जपानमध्ये स्वतःचा असा एक अदम्य प्राण आहे, जो सर्व प्रकारची अनुकरणे जिरवूनदेखील स्वत्व कायम टिकवू शकतो आणि आत्मविश्वासाने विकास आणि प्रगती साधू शकतो.

मी नुकताच जेव्हा जपानला पाचव्या खेपेला गेलो तेव्हा 'आपला देश आता अमेरिकन संस्कृतीच्या आहारी गेला आहे.' असे म्हणणाऱ्या जपानी लोकांना हेच सांगितले की, शंभर वर्षांपूर्वी मेइजी क्रांती करणाऱ्या लोकांच्या प्रतिनिधींनी दुःखी होऊन मानण्याचे कारण नाही की, जपानमध्ये आता जपानत्व उरले नाही. उलट तुमच्या ध्यानात हे कसे येत नाही की,— लोकोत्तर विजय आणि तितकाच प्राणघेणा पराजय— दोहोंच्या अनुभवाने तावूनसुलाखून निघालेले आणि अनुभवाने प्रौढ दशेला पोहोचलेले तुमचे राष्ट्र आणि तुमची संस्कृती आता नवा विक्रम करून दाखवणार आहे. भूतकालातील पुरुषार्थ हे असली भांडवल खरे, पण पुरुषार्थी प्रजा हे भांडवल वाढवीत वाढवीत भविष्यकालाकडे प्रयाण करीत असते. संस्कृती ही सांभाळून ठेवण्याची वस्तू नसून वाढवून समर्थ आणि समृद्ध करण्याची ईश्वरी प्रेरणा आहे.

जोपर्यंत भारतात स्वराज्य आले नव्हते तोवर विदेश-यात्रा करण्याची मला

हिंमतच होत नव्हती. देश स्वतंत्र नाही अशा स्थितीत परदेशात जाऊन काय तोंड दाखवावे अशीच लाज वाटत असे. स्वराज्य झाल्याबरोबर मात्र याचे उट्टे काढून चारी खंडांची यात्रा केली. त्यात १९५४ साली प्रथम जपानात गेलो चौदा दिवसांसाठी. मुहूर्त इतका उत्तम होता की जपानी राष्ट्राची द्योतक 'साकुरा' फुले फुलली नव्हती. फक्त कळ्या डोकावून पाहात होत्या. चौदा दिवसांत सबंध जपान अक्षरशः फुलून निघाला. त्या वेळी अर्धे जपान पाहून घेतले. पुन्हा १९५७ साली दुसऱ्यांदा तेथे गेलो. जपान सगळाच देश सुंदर. प्रकृतिमातेचा लाडका आणि प्राकृतिक सौंदर्याची कदर करणाऱ्या रसिक जपान्यांचा. पाहावे तेथे सौंदर्याचे वैभव पसरलेले. पहाड, वने, उपवने, सरोवरे, ज्वालामुखी, उष्ण झरे आणि समुद्रकिनारा – सगळयांची आपापसांत चढाओढ लागलेली. चिमुकल्या देशातील आटोपशीर नद्या त्यांना भारतीय नद्यांची भव्यता कुठून यायची? पण त्याही पहाडाचे पाणी पशुपक्ष्यांना आणि माणसांना पाजून समुद्राला पोहोचविण्याचे काम इमाने इतबारे करणाऱ्या आणि या सर्वांकडून दीक्षा घेऊन मानवी जीवन सुशोभित करणारी जपानी संस्कृती. अशा या देशात उत्तरेकडील होक्कायदोचे उच्छृंखल सृष्टिसौंदर्य विशेष बहारीचे. ते सर्व दुसऱ्या यात्रेत डोळाभर पाहून घेतले. त्या लोकांना माझा लळा अधिक लागला की त्यांचा मला हे सांगणे कठीण आहे. भाषेची अडचण असूनदेखील आमच्या हृदयाची गट्टी जमली आणि आतापर्यंत मी पाचदा तेथे हिंडून आलो.

दोन-तीन वेळा जपानला जाऊन आल्यावर त्याचे वर्णन मी गुजरातीत लिहून काढले. पुस्तकाला नाव दिले 'उगमणो देश' म्हणजे 'सूर्योदयाचा देश.' या पुस्तकात आशिया खंडाच्या गुरुस्थानी असलेल्या या चिमुकल्या प्राणवान राष्ट्राची संपूर्ण माहिती देण्याचा उद्देश नव्हताच. आपण गोडी लावावी म्हणजे आपसूक लोक तेथे जाऊन येतील आणि जाऊन आले म्हणजे प्रवासवृत्तान्त लिहिल्यावाचून राहणार नाहीत ही माझी खात्री.

आणि झालेही असेच. ज्याप्रमाणे माझा 'हिमालयाचा प्रवास' हे पुस्तक घेऊन असंख्य तरुण-तरुणी हिमालयाच्या शिखरांचे आणि तेथील आपल्या भावंडांचे दर्शन घेऊन आली, त्याचप्रमाणे अनेक लोक सूर्योदयाच्या देशाविषयी मी लिहिलेले चार शब्द वाचून जपानची यात्रा करून आले.

त्यांच्यापैकी प्रस्तुत पुस्तक लिहिणारे माझे तरुण मित्र श्री. रवीन्द्र केळेकर हे एक आहेत. त्यांना व मला एकाच वेळी जपानला जाण्याची संधी मिळाली. त्यांची पहिली खेप आणि माझी चौथी. ते नव्या डोळ्यांनी पाहणार आणि मी तीन वेळा

पाहून माणसाळलेल्या किंवा तृप्त डोळ्यांनी पाहणार. माझे सर्व साथी म्हणू लागले की, या खेपेला आपण सर्वांनी महिनाभर ऐसपैस जपान-यात्रा केली आहे. तेव्हा तुम्ही एक नवे पुस्तक लिहिले पाहिजे. मी रवीन्द्र केळेकरांना म्हटले, " स्वये गतवयस्क मी, सरस वीर तू रे नवा " तेव्हा तुम्हीच आपले यात्रावर्णन लिहिले पाहिजे. हो ना आणि टाळाटाळी करता करता त्यांनी प्रवास-वर्णन लिहून काढले. जपानच्या सौंदर्याने, नावीन्याने, आतिथ्याने आणि तेजस्वितेने ते असे भारले गेले की त्यांना डोळ्यांनी पाहिलेले, कानांनी ऐकलेले आणि उत्साही मनाने चिंतून परिपक्व केलेले लिहिल्या-वाचून गत्यंतरच उरले नाही. जपान पाहून जो आनंद किंवा विस्मय वाटला, जी धन्यता वाटली, ती त्यांनी मुक्तकंठाने व्यक्त केली आहे. एका समृद्धशाली देशाचे आपण भाट-चारण होत आहोत अशी शंका मनात न आणता जे जसे दिसले, आवडले ते तसे त्यांनी उत्साहपूर्ण भाषेत व्यक्त केले आहे. जपान पाहून ते भारावून गेले हे यथायोग्य; पण त्यांचे हे वर्णन वाचून मी भारावून गेलो हे विशेष; आणि म्हणूनच वाचकांना सांगायला प्रवृत्त झालो आहे की, हे पुस्तक तुम्ही अवश्य वाचा. तुम्हीही भारावून जाल पण मग लेखकाला धन्यवाद देऊन स्वस्थ बसू नका. जपानला जाऊन आलेच पाहिजे असा निश्चय करा.

जपान हे एक प्राणोपासक राष्ट्र आहे. या राष्ट्राने आपली मौलिकता सर्वप्रथम कलेतून अजमावून पाहिली. चित्रकला असो किंवा गृहनिर्माण-कला असो, घराच्या आसपास बगीचा बनवायचा असो किंवा सबंध समाजरचना सुरळीत आणि सुवासिक करायची असो, जपानी लोक आपली कलात्मकता पूर्णपणे अमलात आणतात. त्यात सर्व प्रकारच्या सुखसोयी असतील, नीटनेटकेपणा असेल, व्यवस्था असेल. पण सर्वांत मुख्य वस्तू म्हणजे कलात्मक साधेपणा, मोकळेपणा, औचित्य आणि आंतरिक प्राणाच्या साक्षात्कारामधून उत्पन्न होणारा समृद्ध संयम हा त्यात असायचाच.

दुसरी गोष्ट म्हणजे, हे राष्ट्र एकोप्याने नवीन नवीन प्रयोग करण्यासाठी नेहमी तयार आणि तत्पर असते. ते बौद्धिक चर्चेपेक्षा अनुभवाच्या कसोटीलाच अधिक महत्त्व देते. एका बाजूने पाहता सामाजिक बाबतीत हे राष्ट्र परंपरेला अत्यंत महत्त्व देते आणि दुसऱ्या बाजूने पाहता परिवर्तन अपरिहार्य आहे एवढे पटले तर ते एकोप्याने अमलात आणण्याची या लोकांची नेहमी तयारी असते.

बोलायचे थोडे, करायचे अधिक, या नियमाला अनुसरून जपानने आपले धोरण चालवलेले दिसते. म्हणूनच विजयाने शेफारून न जाता या राष्ट्राने अखंड प्रगती चालू ठेवली आहे.

जपानपासून घेण्याजोगे पुष्कळ आहे, असे लिहिणारे आता थकून गेले आहेत. इंग्लंडकडून घेण्यासारखे थोडेथोडके नव्हते. आपण घेण्यासारखे किती घेतले आणि न घेण्यासारखे किती आपल्यात शिरले आहे, याचा जर हिशोब काढला तर म्हणावे लागते की, दिवसरात्र आजन्म निरीक्षण–परीक्षण करूनदेखील कोणत्याही राष्ट्राला इतरांकडून सहजासहजी घेता येत नसते. “स्वभावो दूरतिक्रमः” एका इंग्रजाने भारतातील लोकांविषयी लिहून ठेवले आहे की, पृथ्वीराजाच्या काळापासून हे लोक नवीन काही शिकले नाहीत आणि जुने काही विसरले नाहीत. जपानचे यौवन, जपानचा उत्साही प्राण, जपानचा सामाजिक एकोपा आणि अनुभवाने शहाणे होण्याची जपानी प्रयोगपरायणता या गोष्टी जर आपण घेऊ शकलो तर आपले कोटकल्याण होईल. पण प्रश्न एवढाच आहे की, या गोष्टी आपण आत्मसात करू शकू काय? त्या आपल्याला पचतील काय?

कसेही असो; नवजीवन, नवसर्जन आणि नवप्रस्थान या शब्दांनी ज्या युगाचा प्रारंभ झाला आहे, त्या युगाच्या स्वागतासाठी जपानयात्रेचे हे पुस्तक सर्व प्रकारे स्वागतार्ह झाले आहे. देशी भाषेत प्रवासवर्णने कमीच. त्या दृष्टीनेदेखील या पुस्तकाने मराठी साहित्यात एक अभिनंदनीय भर घातली आहे. लेखक जेव्हा उत्तर जपानातील होक्कायदो बेटाची यात्रा करून येतील तेव्हा त्यांना असेच दुसरे पुस्तक लिहावे लागणार म्हणून या पुस्तकाचे स्वागत करून मराठी वाचकांनी लेखकाला दुसरे प्रवासवर्णन लिहिण्याला प्रेरित करावे, हीच एका जुन्या अनुभवी प्रवाशाची शिफारस आहे.

मुंबई
२५-६-६८


काका कालेलकर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | तयारी | १ |
| २. | जपानच्या वाटेवर | ९ |
| ३. | प्रथम-दर्शन | १४ |
| ४. | युरोप? नव्हे, जपानच | १८ |
| ५. | यासुकुनी | २३ |
| ६. | आतामी | २९ |
| ७. | एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व | ३७ |
| ८. | फुजीसानचे प्रथम दर्शन | ४३ |
| ९. | कृष्ण सरोवर 'आशी' | ४८ |
| १०. | पर्वतराज फुजीच्या पाठीवर | ५४ |

| | | |
|---|---|---|
| ११. | गंधर्व-प्रदेशातली फेरी | ६१ |
| १२. | एक जपानी छंद | ६८ |
| १३. | हृदये जोडण्याचा मार्ग | ७३ |
| १४. | जपानचे सुंदर हृदय | ७८ |
| १५. | एका धाग्याने विणला गेलेला देश | ८२ |
| १६. | नाण्याची दुसरी बाजू | ८८ |
| १७. | काही स्वभाव-वैशिष्ट्ये | ९३ |
| १८. | घरांच्या बागा | ९७ |
| १९. | अस्वाद-व्रती लोक | १०३ |
| २०. | कुवलय समुद्रातून | १०७ |

| | | |
|---|---|---|
| २१. | आसो ज्वालामुखीच्या सान्निध्यात | ११२ |
| २२. | वेप्पू | ११८ |
| २३. | शिकोकू बेटात | १२६ |
| २४. | गेयशा | १३० |
| २५. | ' बायको असावी जपानी ' | १३६ |
| २६. | भव्यतेचे माहेर – निक्को | १४१ |
| २७. | कामाकुरा | १५० |
| २८ | क्योतो | १५७ |
| २९. | सत्त्वशील गतिमान संस्कृती | १६८ |
| ३०. | सायोनारा | १७४ |



: १ :

# तयारी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ....
२.१८१ १४७६

**यात्री आमि ओरे**
**पारबे ना केउ राखते आमाय धरे**

— रवीन्द्रनाथ

मी जपानच्या प्रवासाला निघालो होतो. भारताबाहेरचा हा माझा पहिलाच प्रवास होता. प्रवासाची सर्व तयारी झाली होती. पासपोर्ट मिळाला होता. ‘ व्हिझा ’ही मिळाला होता. फक्त एक ‘ पी फॉर्म ’ मिळायचा बाकी होता. तो मिळविल्याशिवाय निघणे शक्य नव्हते. कित्येक दिवस त्याची वाट पाहून मी कंटाळलो आणि शेवटी चिडून एके दिवशी मुंबईला रिझर्व बँकेच्या संबंधित अधिकाऱ्याला भेटायला गेलो. त्याने मला पहिलाच प्रश्न विचारला —

“ केळेकर तुमचा धंदा काय ? आणि जपानला जाण्याचा तुमचा उद्देश काय ? ”

प्रश्न ऐकताच क्षणभर मी गोंधळलो. हा प्रश्न मला अनपेक्षित होता. काय उत्तर द्यावे हे सुचेना. वाटले, विचारावे— ‘ प्रवासाला उद्देशाची आवश्यकता असते काय ? रहावत नाही तेव्हा पाय चला चला म्हणायला लागतात आणि आपण घराबाहेर पडतो.

प्रवासाचा मुख्य उद्देश देशदर्शन हाच असतो. मी भारतात पुष्कळ हिंडलो आहे. अजून भारताबाहेर गेलो नाही. आता थोडासा बाहेरच्या देशांचा प्रवास करून बघावा असे वाटू लागले आहे. जपानचे आमंत्रण आले आहे. आलेली संधी दवडण्याइतका मी मूर्ख थोडाच आहे ! '

पण मी खरा गोंधळलो होतो त्याच्या प्रश्नाच्या पहिल्या भागाचे उत्तर देताना. माझा धंदा काय ? मी स्वतःलाच हा प्रश्न विचारला. थोड्याच दिवसांमागे एका बैठकीत माझ्या एका मित्राने माझी ओळख करून देताना म्हटले होते— ' केळेकरांचा मुख्य धंदा प्रस्थापित सत्तेच्या विरुद्ध भांडत रहाणे हा आहे. मग ही सत्ता विदेशी असो किंवा स्वदेशी. गोव्यावर पोर्तुगीजांची सत्ता होती त्या वेळी त्यांचा हा धंदा चालत होता. पोर्तुगीज गेले आणि सत्तेवर स्वदेशी लोक आले. तरीही त्यांचा तो धंदा चालू आहे. नव्या सत्ताधीशांच्या विरुद्ध काही ना काही करीत रहाणे हे त्यांचे व्रत अजून चालूच आहे. '

माझ्या मित्राने केलेले माझ्या धंद्याचे हे वर्णन काही अंशी खरे असले तरीही या कार्याला माझा ' धंदा ' कसे म्हणता येईल ? तेव्हा मला वाटले, आपला धंदा मुख्यतः लेखन-वाचन हाच आहे असे सांगून टाकावे.

" शेवटी काहीच न सुचल्यामुळे ज्या धंद्याचे नाव उच्चारताच त्याचा काही एक अर्थबोध होत नाही पण हा धंदा करणारा इसम सर्वसामान्य लोकांपेक्षा काही तरी विशेष काम करीत असतो असे मानले जाते आणि ज्या धंद्यात संतांपासून लबाडांपर्यंत सर्वांची सारखीच लुडबुड चाललेली असते तोच माझा मुख्य धंदा आहे असे सांगण्याचे मी ठरविले आणि मी त्याला उत्तर दिले—" मी सोशल वर्कर आहे. "

' सोशल वर्क ' म्हणजे नेमके काय करतो असे त्याने विचारले तर माझी पुन्हा तारांबळ उडेल या भीतीने मी आतापर्यंत कुठे कुठे काम केले याचा अगोदरच थोडक्यात पाढा वाचून दाखविला. मी म्हणालो :

" गोव्याचा मी एक नम्र स्वातंत्र्य-सैनिक आहे. काही वर्षे मी वर्ध्याला होतो. तेथे गांधीजींच्या काही प्रमुख सहकाऱ्यांच्या सहवासाचे भाग्य मला लाभले. त्यांच्या सान्निध्यात राहून मी गांधी-विचार-प्रणालीचा यथामती अभ्यास केला. दिल्लीच्या गांधी-स्मारक संग्रहालयात मी ग्रंथपाल म्हणून काम केले आहे. गांधीजींच्या काही पुस्तकांचेही मी संपादन केले आहे. आज वीस वर्षे होत आली. गांधीजींचे एक जुने प्रमुख सहकारी आचार्य काकासाहेब कालेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली मी काम करीत असतो "... इत्यादी.

तो म्हणाला, " तुम्ही मला हे सर्व लिहून देऊ शकता काय ? "

मी म्हटले, " अवश्य. "

त्याच्याचकडून कागद मागून घेतला आणि त्याच्या केबिनच्या बाहेर बसून मी हा वृत्तांत लिहायला लागलो. योगायोगाने त्याच वेळी एअर-इन्डियाचे एक अधिकारी व माझे गोमंतकीय मित्र श्री. चंद्रकांत नागवेकर तेथे हजर झाले. मी काही तरी लिहीत बसलो आहे हे पाहून ते माझ्याजवळ आले व विचारू लागले—

" हे काय लिहितो आहेस ? "

मी म्हटले, " आत्मकथा. "

" कशासाठी ? "

" मला काय ठाऊक ! यांनी लिहून दे म्हटले आहे म्हणून लिहायला बसलो आहे. "

त्यांनी कपाळावर हात मारला व ते म्हणाले–

" याचा अर्थ तुला ' पी ' फॉर्म मिळणार नाही असा आहे. "

मी विचारले—" का ? "

ते म्हणाले, ' पी ' फॉर्म देण्याचे त्यांच्या मनात असते तर तू तुझी ' बॅक-ग्राउंड ' सांगितल्यावर त्यांनी तो लगेच देऊन टाकला असता. आता ज्या अर्थी तुला ' आत्मकथा ' लिहायला सांगितले आहे त्या अर्थी ते स्वतः जबाबदारी घेऊ इच्छित नाहीत. तुझी ' आत्मकथा ' आता दिल्लीला जाईल. तिथले लोक ती वाचतील आणि ' पी ' फॉर्म द्यायचा की नाही ते ते ठरवतील. "

झाले ! माझ्या उत्साहावर विरजण पडले.

जपानला जाण्याचा बेत केल्यापासून एक ना दोन, नाना प्रकारच्या अडचणी आतापर्यंत आल्या होत्या. त्या सर्व माझ्या डोळयांसमोर उभ्या राहिल्या.

माझ्यासारख्या एका मध्यमवर्गीय कार्यकर्त्याने जपानसारख्या एका दूरच्या देशाचा प्रवास करण्याचा संकल्प करणे म्हणजे एक प्रकारचे धाष्टर्यच म्हटले पाहिजे. पण अनेक वर्षे राजकारण ' करून ' मी थोडा कंटाळलो. त्यामुळे काही दिवस दूर कुठे तरी जावे, अत्यंत वेगळ्या अशा वातावरणात काही दिवस राहून यावे अशी एक अनिवार इच्छा मनात उद्‌भवली. भारतात मी यथा-संधी मनसोक्त हिंडलो आहे. नावीन्य किंवा उत्सुकता ज्याच्याविषयी वाढावी असा एकही भारतीय प्रदेश डोळयांसमोर उभा राहू शकला नाही तेव्हा सहज जगाच्या नकाशावरून डोळे फिरू लागले.

युरोप-अमेरिकेला माझे काही मित्र व नातेवाईक आहेत. त्यांच्यापैकी एखाद्याला मी माझी इच्छा कळविली असती तर त्यांच्याकडून आमंत्रण आलेही असते.

पण मला विलक्षण आकर्षण जपानचे होते. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी आमच्या कुटुंबातले एक गृहस्थ जपान बघून आले होते. त्या वेळी त्यांच्या तोंडून ज्या गोष्टी

ऐकल्या होत्या त्या माझ्या बालमनाला अरबी भाषेतील सुरस कथांपेक्षाही अद्भुतरम्य वाटल्या होत्या. तेव्हापासून जपानची जी ओढ उत्पन्न झाली ती आजतागायत कायम होती. पुढे जगाचा भूगोल व इतिहास शिकावा लागला तेव्हा जपानने माझे लक्ष अधिक वेधून घेतले. प्रशांत महासागरामध्ये धनुष्यासारखा ताणलेला हा चिमुकला देश जगातल्या इतर देशांपेक्षा निराळ्या प्रकारचा आहे अशी माहिती मिळताच 'आयुष्यात एकदा तरी हा देश बघितलाच पाहिजे' असे मनाने घेतले. युरोपची विद्या अल्पावधीत आत्मसात करून आधुनिक बनलेला व पुन्हा त्या विद्येचा युरोपच्या विरुद्धच उपयोग करण्याची हिंमत करणारा आशिया खंडातला हा पहिलाच देश आहे याची जाणीव होताच एक आशियायी या नात्याने माझी छाती जरा फुलूनही आली होती. स्वतःच्या सत्त्वाला बाधा येऊ न देता संपूर्णतः कायाकल्प करून बदललेला हा देश द्वितीय महा-युद्धात बेचिराख झाला तरीही फिनिक्स पक्ष्यासारखा पुन्हा जिवंत झाला. एवढेच नव्हे तर औद्योगिक दृष्ट्या जगातला तिसरा-चौथा देश म्हणून अल्पावधीत पुढे आला याची जाणीव होताच भारताच्या नवनिर्माणाची स्वप्ने पाहणारा माझ्यातला देशभक्त जागा झाला आणि या देशाची शक्ती कुठे आहे हे जाणून घेण्याची माझी उत्कंठा वाढली.

पोर्तुगीज राजवटीच्या अखेरच्या दिवसांत जपानशी गोव्याचे व्यापारी संबंध पुष्कळ वाढले. इतकेच नव्हे तर गोवाही जवळ जवळ जपानचीच एक बाजारपेठ होऊन बसली होती. या संबंधामुळे माझे अनेक गोमंतकीय मित्र जपानला जाऊन येऊ लागले. त्या सर्वांच्या तोंडून जपानची स्तुती नित्य ऐकू येऊ लागली.

दुसऱ्या बाजूने काकासाहेब कालेलकरांचाही जपानशी घनिष्ठ संबंध येऊ लागला व तो उत्तरोत्तर वाढत गेला. कित्येक जपानी तरुण दिल्लीला त्यांच्याकडे राहून हिन्दी भाषा व भारतीय संस्कृती यांचा अभ्यास करू लागले. काकासाहेबांचे एक अंतेवासी श्री. नरेश मंत्री जपानला जाऊन जपानी भाषा व जपानी संस्कृती यांच्या अभ्यासात दंग झाले. या सर्वांशी माझा अत्यंत निकटचा संबंध होता. काही जपानी तरुण आमच्या-कडे गोव्याला राहूनही गेले होते.

या सर्व कारणांमुळे विदेशाच्या प्रवासाची इच्छा उद्भवताच माझे डोळे सर्वप्रथम जपानवरच खिळले. मी नरेश मंत्रींना पत्र लिहून विचारले, "येऊ का?"

माझी जपान बघण्याची उत्कंठा पाहून काकासाहेबांनीही तिथल्या आपल्या मित्रांना तसे लिहून कळविले.

पंधरा-वीस दिवसांच्या आत माझ्या हातात जपानचे आमंत्रण आले. त्यात मी जपानमध्ये गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर व्याख्याने देण्याच्या तयारीने यावे, असे सुच-विण्यात आले होते. मी ताबडतोब तयारीला लागलो. कसे जायचे, केव्हा जायचे, कोणत्या प्रकारचे कपडे घ्यायचे वगैरे चौकशा सुरू केल्या.

इतक्यात माझ्या राजकीय क्षेत्रातल्या सहकाऱ्यांना गोव्याच्या स्वदेशी सरकाराविरुद्धच सत्याग्रह करण्याचे सुचले ! मी पुन्हा एकदा राजकारणाच्या जाळ्यात अडकलो गेलो आणि माझी जपानच्या प्रवासाची संधी हुकली !

जनमत-कौल येऊन गोव्याच्या राजकीय भवितव्याच्या प्रश्नाचा सोक्ष-मोक्ष लागेपर्यंत मी एकाग्रतेने राजकारणच केले. जनमत-कौलात विजय मिळाल्याबरोबर आपल्या राजकीय जीवनातले एक पर्व संपले असे वाटायला लागले. तेव्हा आता जपानला जाऊन यावे या जुन्या संकल्पाने पुन्हा उचल खाल्ली. मी भीत भीत मंत्रींना पत्र लिहिले– " आता तुम्ही सांगाल तेव्हा यायला मी तयार आहे. केव्हा येऊ, कळवा. "

लगेच उत्तर आले– " यंदा जुलैमध्ये न चुकता या. "

माझे सुदैव म्हणून जुलैमध्ये काकासाहेबांचाही जपानला जाण्याचा कार्यक्रम ठरला. ते यापूर्वी तेथे तीनदा जाऊन आले होते. मला हा योग चुकवायचा नव्हता. मी काकासाहेब तेथे असतानाच जपानला पोहोचण्याचे नक्की केले.

पण जायचे कसे ? मला आमंत्रण पाठविणारी संस्था– निप्पोन झान म्योहोजी– माझा तिथला सर्व खर्च करणार होती. एवढेच नव्हे तर मला बहुतेक संपूर्ण जपान दाखविणार होती. हा खर्च किती होईल याची मला कल्पना होती. माझ्यासाठी इतका भरमसाठ खर्च करायला तयार असलेल्या या संस्थेवरचे ओझे कमी करता आले तर करावे या हेतूने जाण्या-येण्याचा प्रवासखर्च मी स्वतः करावा असे ठरविले.

पण हा एवढा खर्चदेखील मला झेपण्यासारखा नव्हता. म्हणून मी एक उपाय शोधून काढला. गोव्याची खनिज संपत्ती घेऊन काही मालवाहू बोटी नित्यनेमाने मुरगाव बंदरावरून जपानला जात असतात. अशा एखाद्या मालवाहू बोटीतून हा प्रवास करावा असे मी ठरविले. बोटीचा कप्तान एक-दोन प्रवासी आपले पाहुणे म्हणून आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतो हे मला ठाऊक होते. गोव्याच्या खाणमालकांपैकी एखाद्याला हे सांगितले तर तो ही सोय मला सहज उपलब्ध करून देईल अशा समजुतीत मी होतो.

पण हे प्रकरण तितके सोपे नव्हते. ज्या बोटीवरून जायचे त्या कंपनीची लेखी परवानगी आणा, ती मुंबईच्या डायरेक्टर जनरल ऑफ शिपिंग यांना दाखवा, नंतर मुरगावच्या बंदराधिकाऱ्यांची परवानगी मिळवा– या साऱ्या भानगडी अत्यंत गुंतागुंतीच्या असल्याचे मला आढळून आले. शिवाय नेमके याच वेळी, काही दिवसांपूर्वी, आपला एक देशबांधव असाच जपानला गेला असताना त्याने आपल्या ' साहेबी ' स्वभावधर्माला अनुसरून बोटीवरच्या खलाशांना सतावले होते. परिणाम– मालवाहू बोटीतून प्रवासी – विशेषतः हिन्दुस्तानी प्रवासी – आला तर त्या बोटीवर बहिष्कार घालण्याचा

निर्णय जपानच्या गोदी-कामगारांच्या युनियनने घेतला ! अपराध दुसऱ्याचा पण शिक्षा मला भोगावी लागत होती.

पण मी असा सहजासहजी हार खाणारा नव्हतो. चौकशी करून मी मुंबईहून नित्य-नियमित जाणाऱ्या प्रवासी बोटीने जाण्याचे ठरविले. केवळ अडीच हजार रुपयांचा प्रश्न होता. मी एवढी रक्कम जमवून ठेवली. अशा पद्धतीने प्रवासाला निघण्यामागे माझा दुसराही एक हेतू होता. या बोटी जपानला पोहोचेपर्यंत वाटेत कोलंबो, सिंगापूर, मनीला, हाँगकाँग वगैरे बंदरे करतात व प्रत्येक बंदरावर एक-दोन दिवस थांबत असतात. त्यामुळे अनायासे आपल्याला कित्येक आशियायी देशांचे दर्शन घडू शकते. मला ते घ्यावेसे वाटले.

पण नेमके याच वेळी इजिप्तच्या नासेरना जगाच्या नकाशावरून इस्राएल देशच नष्ट करण्याची बुद्धी झाली. परिणाम– सुएज कालवा बंद झाला !

ज्या देशाला भूगोलानेच हिन्दी महासागर आपलासा करण्याचा आदेश दिला आहे त्या देशाकडे आशियायी देशांत प्रवाशांची ने-आण करणाऱ्या बोटीदेखील नाहीत हे ऐकून माझ्यातला राष्ट्रवादी दुखावला. भारतीय बंदरावरून जपानला फक्त एकाच कंपनीच्या बोटी जातात. ती कंपनी आहे फ्रेंच. या कंपनीची ‘ वियतनाम ’ नावाची बोट फ्रान्सच्या मार्सेय् बंदरावरून निघायची होती. तिच्यात मी माझी जागा राखून ठेवली होती. पण अरब – इस्राएल युद्धामुळे तिचे आगमन अनिश्चित झाले. हे ऐकल्या-बरोबर मी मुंबईला जाऊन ठाण मांडून बसलो आणि ‘ बोट मार्सेयहून निघाली का ? केव्हा निघणार ? मुंबईला केव्हा पोहोचणार ? आदी चौकशा अधीरतेने करायला लागलो. एके दिवशी बातमी आली की बोट मार्सेयहून निघाली आहे. पण ती सुएज कालव्या-मधून न येता आफ्रिकेला वळसा घालून वास्को-डा-गामाच्या मार्गाने येणार आहे आणि कोलंबो बंदर करून सरळ पुढे जाणार आहे. सारांश, मुंबईला बोट येणार नाही.

“ आता काय करायचे ? ”

“ तुम्ही येथून विमानाने कोलंबोला जा आणि तेथे ‘ चान्स ’ घ्या. ” मला उत्तर मिळाले.

कोलंबोला जाऊन ‘ चान्स ’ घेण्याची व तो मिळाला नाही तर परत येण्याची माझी तयारी नव्हती. आता माझ्यासमोर दोनच मार्ग होते– एक तर जपानला जाण्याचा बेतच रद्द करायचा ( म्हणजे जपानचे आमंत्रण पुढेदेखील कधी येऊ नये अशी सोय करून ठेवायची ) किंवा जवळजवळ सहा हजार रुपये कर्ज काढून विमानाने जायचे. माझ्या डोळ्यांपुढे अंधार पसरला. निराश होऊन मी गुणगुणू लागलो :

I was not ever thus, nor prayed that
Thou shouldest lead me on
I loved to choose and see my path
But now lead Thou me on.

मनुष्य जेव्हा सर्व प्रयत्न करून थकतो तेव्हा त्याच्या मदतीला कुठून ना कुठून कुणाचा तरी हात येतो आणि माझा तर असा अनुभव आहे की, जो संकल्प उत्कट असतो तो केव्हा ना केव्हा तरी पार पडतोच पडतो. याही खेपेला असेच झाले. माझे काही हितचिंतक माझी अडचण समजताच माझ्या मागे उभे राहिले आणि त्यांनी माझा जपानचा विमानप्रवास सुलभ करून दिला. मी चिंतामुक्त झालो आणि म्हणू लागलो–

आता मला कोण अडविणार ?

काकासाहेब १७ जुलैला दिल्लीहून निघणार होते. मी त्यांना कळविले, 'मी तुमच्याच विमानातून येईन.' माझ्या ट्रॅव्हल-एजंटला पण मी सूचना देऊन ठेवली की, १७ जुलैला दिल्लीहून निघणाऱ्या एअर-इंडियाच्या विमानामध्ये माझी जागा राखून ठेवा. १७ जुलैला अजून एका महिन्याचा अवकाश होता. मी मुंबईहून गोव्याला परतलो.

पण आयत्या वेळी या 'पी' फॉर्मसाठी सर्व काही अडून राहिले ! आता मी जपानला जाऊ शकेन की नाही याचीच मला शंका वाटायला लागली. काकासाहेब माझी वाट पाहून पाहून थकले व निघून गेले. मी रिझर्व बँकमध्ये बसल्या बसल्या विचार करू लागलो– आता काय करायचे ? नागवेकर समोर उभे होते. मी त्यांना शरण गेलो.

मी म्हणालो—" Now lead thou me on "

नागवेकर म्हणाले–' आता एकच उपाय आहे. दिल्लीला हलवून जागे केले पाहिजे !'


सूचना मिळताच मी दिल्लीवर तारांचा भडिमार सुरू केला. श्री मोरारजीभाई देसाईपासून माझ्या सामान्य मित्रांपर्यंत सर्व ओळखीच्यांना मी तारा केल्या– 'पी' फॉर्मसाठी अडून राहिलो आहे, काही तरी करा.

मुंबईलाही अनेक मित्रांना भेटलो. त्यांनाही त्यांच्या दिल्लीच्या मित्रांना कळवायला सांगितले. कुणाला 'टेलेक्स' करायला लावले, कुणाला 'ट्रंक-कॉल' केले. माझे मित्र श्री. द्वा. भ. कर्णिक रिझर्व बँकेच्या डेप्युटी गव्हर्नराशी बोलून आले. 'पी' फॉर्म मिळावा म्हणून मी जी खटपट केली आहे– तेवढी रिझर्व बँकेमध्ये नोकरी मिळविण्यासाठी केली असती तर एव्हाना मी कदाचित त्या बँकेचा गव्हर्नरच बनलो असतो !

कुठला वशिला लागला, कुणास ठाऊक ! दुसऱ्या दिवशी अठरा जुलैला बातमी आली– 'पी' फॉर्म तयार झाला आहे. नागवेकर लगेच रिझर्व बँकेमध्ये गेले आणि तो घेऊन आले.

आणि दुसऱ्याच दिवशी सकाळी— म्हणजे १९ जुलै १९६७ या दिवशी— आमची स्वारी एअर-इंडियाच्या विमानाने जपानला रवाना होण्यासाठी पहाटेला मुंबईच्या सांताक्रूझ विमानतळावर येऊन दाखल झाली.

भारत सरकारने मला फक्त त्रेसष्ट रुपयांचे परकी चलन– म्हणजे तीन पौंड– नेण्याची परवानगी दिली होती. खिशात दोनशे-तीनशे रुपये असल्याशिवाय मी अजून गोव्याहून मुंबईच्या प्रवासाला देखील निघालो नव्हतो. आज जपानसारख्या अत्यंत दूरच्या देशाच्या तब्बल दोन महिन्यांच्या प्रवासाला मी फक्त त्रेसष्ट रुपये घेऊन निघालो होतो!



: २ :

# जपानच्या वाटेवर

पावसाळ्याचे दिवस होते. मुंबईत धुवाधार पाऊस पडत होता. सकाळी सात वाजता विमान निघणार होते. साडेसात वाजायला आले तरीही पाऊस ओसरण्याची लक्षणे दिसत नव्हती. तो जसजसा जोर करू लागला तसतसा मी अस्वस्थ होऊ लागलो. शेवटी पावणे आठच्या सुमाराला पावसाचा जोर कमी झाल्यासारखा वाटला आणि तेवढीच संधी साधून एअर-इंडियावाल्यांनी आम्हा प्रवाशांना एका बसमध्ये बसवून तत्परतेने आपल्या विमानाकडे नेले. आठच्या सुमाराला विमानाने अंतराळावर झेप घेतली. पण ते इतका खर्रर खर्रर आवाज काढू लागले की मला 'हे कोसळणार तर नाही ना?' अशी भीती वाटायला लागली. मी थोडासा गांगरलो. इतक्यात समोर नजर गेली. तेथे विमानातला एक कर्मचारी विमान कोसळले तर 'लाइफ जॅकेट' कसे वापरावे हे दाखवीत होता. 'आग लागो तुझ्या प्रात्यक्षिकाला' असे मनात पुटपुटून मी खिडकीतून बाहेर बघू लागलो. पावसाळी ढगाखाली खालची सारी जमीन लपली होती. समोर, खाली सगळीकडे ढगच ढग; दुसरे काहीच दिसत नव्हते. त्या क्षीरसागरात एक भला मोठा ढग आमच्या दिशेने सरकत येत असलेला मी पाहिला आणि त्याच्याजवळ पोचताच आमचे विमान मधेच कोसळल्यागत झाले. इतक्यात

एक आवाज कानी पडला – ‘ आज हवा बिघडलेली असल्यामुळे सर्वांनी आपापल्या खुर्चींचे पट्टे बांधावे. ’ मी पट्टे बांधले आणि इतर प्रवाशांकडे पाहिले. ते जणू स्मशान-यात्रेला आल्यासारखे गंभीर चेहरे करून बसले होते. कोण कोणाशी बोलत नव्हता. फक्त एअर-हॉस्टेसचा प्रसन्न चेहराच काय तो धीर देत होता.

मुंबईपासून जपानची राजधानी टोकियो विमानाच्या मार्गाने केवळ बारा-तेरा तासांच्या अंतरावर आहे. वाटेत अर्ध्या अर्ध्या तासासाठी विमान कलकत्ता, बँगकॉक व हाँगकाँग या तीन ठिकाणीच उतरते. विमानात सर्व प्रकारच्या सुखसोयी असतात; निजायचे असेल तर अगदी आरामाने निजता येते. पण जो उत्साही प्रवासी असतो तो सुखसोयींसाठी प्रवास करीत नसतो. त्याला बघायचे असते. निरनिराळे अनुभव घ्यायचे असतात. विमानाच्या प्रवासात आपली दृष्टी मोठा विस्तार सामावू शकते. पण जमिनीवरून केलेल्या प्रवासात या बहुरत्ना वसुंधरेच्या बारकाव्याचे जे दर्शन आपल्याला होत असते ते मात्र या प्रवासात घडत नसते. खालून एकामागून एक देश जात आहेत. पण ते आपण ‘ पाहू ’ शकत नाही याची एक प्रकारची चुटपुट मनाला सारखी लागून राहते. नकाशावर एखादा देश बघितला म्हणून तो जसा पाहिल्यासारखा वाटत नाही तसाच अनुभव विमानातून खाली एखादा देश जेव्हा आपल्याला दिसतो तेव्हा येतो.

आमचे विमान तासाला एक हजार किलोमीटरच्या वेगाने धावत होते. मला खिडकीजवळ जागा मिळाली होती. कलकत्त्यानंतर वातावरण साफ झाले होते. मी कुतूहलाने खिडकीतून खाली बघू लागलो. समोर विशाल बंगाल पसरलेला होता. एवढा मोठा एक प्रदेश मी एका दृष्टीत सामावू शकलो याची धन्यता अनुभवतो न अनुभवतो तो अनेक मुखांनी सागराला येऊन भेटणाऱ्या गंगेचे आगळे दर्शन घडले. मी ते हृदयात टिपून घेत होतो तो विमान पुढे गेले. अनुभव टिपण्याचा माझा वेग आणि विमानाचा वेग यांचा मेळ जुळत नाही हे पाहून मी खिन्न झालो. भारताचा भू-भाग अदृश्य होता– क्षणीच मला एक गोष्ट कळून चुकली की, मी या प्रवासात संबंध आग्नेय आशियावरून उडणार असलो तरी हा भू–भाग ‘ पाहिल्या ’ची धन्यता काही मला अनुभवायला मिळायची नाही. विमानातून प्रवास करण्याऐवजी आसामला जाऊन मणिपूरवरून इंफाळमार्गे ब्रह्मदेशात प्रवेश केला असता आणि रेल्वे, बस, ट्रक जे काय मिळेल त्या वाहनाचे साहाय्य घेऊन ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर, सयाम, काम्बोडिया वगैरे देश बघत बघत कोरियावरून जपानला गेलो असतो तर तेथे पोहोचायला चार-सहा महिन्यांचा अवधी अवश्य लागला असता. पण अनुभवाने मी किती समृद्ध होऊ शकलो असतो ! अनेक गोष्टी मला पहावयाला मिळाल्या असत्या. किती तरी लोकांच्या गाठी-भेटी झाल्या असत्या आणि या प्रवासातून परतल्यानंतर मला मार्को-पोलो, इब्न-

बतूता किंवा ह्यु-येन-त्सांग यांच्याप्रमाणे आपल्या प्रवासाचे नानाविध अनुभव लोकांना कथन करता आले असते. दळणवळणाची साधने वाढल्यापासून आपण सर्व समय-दरिद्री झालो आहोत. त्यामुळे अशा प्रकारचा प्रवास करायला आजकालच्या लोकांना वेळही नसतो नि उत्साहही नसतो. पण जग वाटेल त्या दिशेने जावो, आपण आयुष्यात एकदा तरी असा प्रवास केलाच पाहिजे असा संकल्प मी तारुण्यात प्रवेश करतानाच केला होता. त्याची मला येथे आठवण झाली आणि या संधीचा मी त्या दृष्टीने फायदा घेतला नाही याचा मला आता पश्चात्ताप व्हायला लागला.

काही चुकू नये एवढ्याचसाठी खिडकीतून बाहेर बघू लागलो. पण मन न दिसणाऱ्या गोष्टीत गुंतले. ब्रह्मदेश पार केल्यावर बँगकॉकचा विमानतळ आला आणि माझ्या विचारांनी एक निराळी दिशा घेतली. तिथे मला पीत-चीवरधारी काही बौद्ध भिक्षू दिसले. मी म्हटले– आपल्यापेक्षा आपले पूर्वज किती पुरुषार्थी होते ! आजच्या-सारखी दळणवळणाची साधने नव्हती त्या वेळी ते अफाट समुद्रावरून व दुर्गम अशा गिरिकंदरातून वाट काढीत येथपर्यंत आले. इतकेच नव्हे तर येथे येऊन आपल्या संस्कृतीचा ते प्रसारही करू शकले. बँगकॉकहून काही मैलांच्या अंतरावर काम्बोज किंवा काम्बोडियामध्ये गेलो असता तेथे आंकोरधाम व आंकोरवाट या नावांची जी दोन प्रचंड मंदिरे पहावयास मिळतात ती याची साक्ष देतात. जपानहून परततेवेळी येथे उतरून ही दोन्ही मंदिरे पाहून घेण्याचा मी संकल्प केला होता. भारतीय संस्कृती येथे आल्यावर तिच्यावर इथल्या स्थानिक संस्कृतीने कोणते संस्कार केले आणि तिला कोणते रूप दिले हे मला विशेषतः जाणून घ्यायचे होते. पण आशियाच्या या भागाचा भूतकालइतकाच वर्तमानकालही अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा नाही काय? त्याची मला कितीशी माहिती आहे? आपण स्वतंत्र झाल्यापासून आंतरराष्ट्रीय प्रभावाच्या आपल्या कक्षा रुंदावल्या आहेत आणि आज आशिया खंडाचे भवितव्य या भागात घडविले जात आहे. त्याचे परिणाम आपल्या देशावर खास होणार आहेत. पण याची जाणीव आपल्यापैकी कितीशा लोकांना आहे? आशियातील देशांविषयीच्या आमच्या उदासीनतेची मला प्रकर्षाने जाणीव झाली आणि मी थोडा दुःखी झालो.

बँककॉक सोडल्यानंतर आम्हांला दुपारचे जेवण देण्यात आले. खालून एकामागून एक देश जात होते. लाओस गेला, विएतनाम गेले, हां हां म्हणता प्रशान्त महासागरा-वरून विमान उडू लागले. मधून मधून भूमीचा एखादा भाग दिसायचा बाकी सर्वत्र पाणीच पाणी. त्या दृश्याच्या एकच एकपणामुळे असेल, मी पेंगू लागलो व लवकरच गाढ झोपी गेलो.

जेव्हा मला जाग आली तेव्हा संध्याकाळ झाली होती. मी सूर्यास्ताची शोभा न्याहाळायला खिडकीतून बाहेर बघितले. खाली असंख्य बेटे दिसायला लागली. हाँगकाँग

आले की काय? होय, हाँगकाँग आले होते. मी एअर-हॉस्टेसजवळ माकावची विचारपूस केली. ती कॅप्टनला विचारायला गेली. पोर्तुगीज साम्राज्याचा माजी नागरिक म्हणून माझ्या मनात आकाशातून का होईना, पण माकावचे दर्शन होत असेल तर करून घ्यावे अशी इच्छा उत्पन्न झाली होती. एअर-हॉस्टेस कॅप्टनला विचारून येईपर्यंत विमान हाँगकाँगच्या विमानतळावर उतरले. त्यामुळे माकाव बघायची माझी इच्छा अतृप्तच राहिली.

हाँगकाँग हे अति पूर्वेकडील एक खुले बंदर. इतर ठिकाणी महाग मिळणाऱ्या वस्तू येथे अतिशय स्वस्त असतात हे सर्वसामान्य लोकांना या बंदराचे एक आकर्षण आहे. शिवाय ही एक विलास-नगरी आहे. एक-दोन वर्षांपूर्वी मी 'द वर्ल्ड ऑफ सूझी वाँग' ही कादंबरी वाचली होती. तिच्यावरून या विलासनगरीची मी थोडी कल्पना केली होती. पण या नगरीच्या समाजजीवनाचे जवळून निरीक्षण करण्याची माझी इच्छा होती. गोवा मुक्त होऊन भारतात सामील झाल्यानंतर गोवा एक खुले बंदर म्हणून ठेवा अशी भारत सरकारकडे काही लोकांनी मागणी केली होती. ती मागणी मान्य केली असती तर गोव्याने कोणते रूप धारण केले असते हे मला येथे उतरून बघायचे होते. पण माझा या बाजूला येण्याचा बेत ठरला त्याच वेळी चीनची दृष्टी हाँगकाँगवर खिळली आणि तेव्हापासून येथे दंगली सुरू झाल्या आणि यामुळे एअर-इंडियाचे विमान जपानला जाताना वाटेत हाँगकाँगला रात्रीचे आराम करीत असे, ते गेल्या दोन दिवसांपासून येथे केवळ अर्धा तास थांबून सरळ टोकियोला जाऊ लागले होते. त्यामुळे येथे येऊनसुद्धा माझ्या माहितीत एवढीच भर पडली की, हाँगकाँगचा विमानतळ एका खंडस्थ भूमीवर काउलून नावाच्या ठिकाणी असून सुझी वाँगची प्रख्यात विलासनगरी येथून जरा दूर एका बेटावर वसली आहे.

हाँगकाँग सोडल्यानंतर बाहेर अंधार पसरला. तासांच्या दृष्टीने हिशेब केला असता आता दुपारचे साडेचार वाजायला हवे होते. पण येथे रात्रीचे आठ वाजले होते! पूर्वेकडील देशांत सूर्योदय लवकर होत असतो म्हणून जेव्हा आपण पूर्वेला जातो तेव्हा घड्याळाचे काटे आपल्याला पुढे सरकवावे लागतात, हे शास्त्र मी शाळेत शिकलो होतो. तरीही माझ्या आयुष्यातले साडेतीन तास कुठे गडप झाले हे काही माझ्या लक्षात येईना.

अचानक मला पंधरा वर्षांपूर्वीच्या एका प्रसंगाची आठवण झाली. मी त्या वेळी वर्ध्याला काकावाडीत राहात होतो. शेजारी महिलाश्रम होता. तेथे विनोबा काही दिवसांसाठी येऊन राहिले होते. मी त्यांच्या संध्याकाळच्या प्रार्थनेला रोज जात असे. एके दिवशी संध्याकाळच्या प्रार्थनेत एका मुलीने 'जागिये रघुनाथ कुंवर पंछी बन बोले' हे भजन म्हटले. पहाटे म्हणायचे हे भजन सायंप्रार्थनेत म्हटलेले पाहून त्या मुलीला

विनोबाजी दोष देतील असे मला वाटले होते. पण प्रार्थना संपली आणि प्रवचन सुरू झाले– " या मुलीने हे भजन या वेळी म्हणायला नको होते, असे मी म्हणेन अशी तुमची कल्पना असेल. पण मला हे भजन या वेळी ऐकताना एक निराळाच आनंद वाटायला लागला. ईश्वराच्या दृष्टीने पाहता या क्षणी जगाच्या पाठीवर कुठे ना कुठे पहाट झालेलीच असेल ... ..."

या आठवणीने मला हसू आले. मी स्वतःशीच हसत आहे हे एअर-हॉस्टेसच्या नजरेतून सुटले नाही. ती रात्रीचे जेवण घेऊन आली होती. मला विचारायला लागली, ' हसायला काय झालं ? '

' सहज...एक जुनी गोष्ट आठवली ' मी उत्तर दिले.

जेवण संपल्यानंतर एअर-हॉस्टेसने सरळ माझ्याजवळ येऊन विचारले–' केळेकर आपण गोव्याचे का ? '

मला आश्चर्याचा धक्काच बसला. मी उत्तर दिले, ' होय. पण आपल्याला कसे कळले ? '

' मघाशी आपण माकाव कुठे आहे हे विचारले ना ? तेव्हाच मला वाटले, हे गृहस्थ गोव्याचे असले पाहिजेत. मी अनेकदा या बाजूने जाते पण मला अजूनपर्यंत माकाव कुठे आहे हे कुणी विचारले नव्हते. मी प्रवाशांच्या यादीत तुमचे नाव पाहून घेतले आणि विचार केला, विचारून बघावे. '

मला क्षणभर वाटले ही देखील गोव्याचीच असली पाहिजे. मी विचारले, ' आपण पण गोव्याच्याच का ? '

' होय. मी कळंगूटची. '

आमच्यामध्ये आता एक नवीन नाते निर्माण झाले होते. इंग्रजी सोडून लगेच आम्ही कोकणीतून बोलायला लागलो. थोड्याच वेळात आम्ही कोण, कुठले सारे एकमेकांना कळून चुकले. आमच्या गप्पा टोकिओ येईपर्यंत चालल्या.



## : ३ : प्रथम-दर्शन

रात्रीचे बारा वाजायला काही मिनिटे बाकी होती. अचानक आवाज कानी पडला— 'खाली टोकियो दिसत असून थोड्या वेळाने आपण हानेदा विमानतळावर उतरणार आहोत.' मी लगबगीने बाहेर पाहिले. नियॉनच्या नाना रंगांच्या असंख्य दिव्यांनी टोकियो अगदी झगमगत होते. मी जपानला खरोखर पोहोचलो या जाणिवेने माझा आनंद ओसंडून येऊ लागला.

शिरस्त्याप्रमाणे विमान टोकियो शहरावर एक गिरकी घेऊन खाली उतरले. एअर-हॉस्टेसचा निरोप घेऊन मी उतरलो. चालत चालत पासपोर्ट ऑफिसरजवळ गेलो. त्याने माझे कागदपत्र पाहिले आणि मला कस्टमकडे जायला सांगितले. माझी सूटकेस अजून आली नव्हती. म्हणून मी कस्टमजवळ तिची वाट बघत उभा राहिलो. समोर झाकलेल्या विहिरीसारखे काही तरी होते. तिचे झाकण गोल गोल फिरत होते. ही काय भानगड आहे हे पाहण्यात मी दंग होतो. इतक्यात त्या झाकणावरच माझी सूटकेस येऊन थडकली. या विहिरीच्या पोटातील स्वयंचलित जिन्यावरून ती आली होती.

कस्टमवाल्याने सूटकेस उघडायलादेखील न लावता तिच्यावरून खडू ओढला आणि जणू मी त्याच्या देशात येऊन त्याच्यावर फार मोठा उपकार केला आहे या

भावनेने त्याने मला वाकून अभिवादन केले. जपानी आतिथ्याचा प्रथम-परिचय मला येथेच घडला.

बाहेर श्री. नरेश मंत्री माझी वाट पहात उभे होते. ते चार वर्षांपूर्वी येथे येऊन राहिल्यापासून आम्ही एकमेकांना भेटलो नव्हतो. वर्ध्याला आम्ही चार-पाच वर्षे एकत्र राहिलो होतो. हिमालयाची यात्रादेखील आम्ही एकत्रच केली होती. त्यांना पाहून मला अतिशय आनंद झाला. त्यांच्याबरोबर दिल्लीचे श्री. शरद पंड्याही आले होते. काकासाहेबांसमवेत ते दोन दिवसांपूर्वी जपानमध्ये येऊन दाखल झाले होते. साता समुद्रापलीकडील इतक्या दूरच्या स्थानी माझ्या स्वागताला आलेली ही घरची मंडळी पाहून विज्ञान युगात जग केवढे लहान झाले आहे याची मला त्या क्षणी सुखद जाणीव झाली.

मला जपानयात्रेचे आमंत्रण दिलेल्या ‘ निप्पोन ज्ञान म्योहोजी ’ या संस्थेचे एक आधारस्तंभ श्री. तोकुओसान मासुई आपली गाडी घेऊन आले होते. नरेश मंत्रींनी त्यांची ओळख करून दिली तेव्हा मी हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. त्यांनी मला हात दिला खरा. पण ते जपानी पद्धतीने लगेच वाकले. मीही वाकलो. मला वाकलेला पाहून ते पुन्हा वाकले. मलाही आणखी एकदा वाकावे लागले. शेवटी एकदाचा पुनःपुन्हा वाकण्याचा हा जपानी विधी पुरा झाला आणि आम्ही त्यांच्या गाडीत बसून रवाना झालो.

एवढ्या रात्रीदेखील टोकियो झोपले नव्हते. दुकाने बंद होती, पण दिव्यांची आरास चालूच होती. गाड्यांची वर्दळही एकसारखी चालू होती. नरेशचे व माझे बोलणे चालू असतानाच मधून मधून तोकुओसान टोकियोच्या वैशिष्ट्यांकडे माझे लक्ष वेधीत होते. “ हा टॉवर दिसतोय ना, त्याला तोक्यो टॉवर म्हणतात. हा पॅरिसच्या ॲफेल टॉवरपेक्षा उंच आहे... ” “ हे दोन-दोन मजली रस्ते ऑलिम्पिकच्या वेळी बांधण्यात आले होते... ” “ हे जगातले सर्वांत मोठे शहर आहे. विस्ताराने नि लोकसंख्येच्या दृष्टीनेही तोक्योची लोकसंख्या आज एक कोटीच्या आसपास गेली आहे. ”

मी लक्षपूर्वक सारे बघत होतो. टोकियोचे पूर्वीचे नाव येदो होते हे मला ठाऊक होते. शंभर वर्षांपूर्वी जपानची राजधानी येथे हलविण्यात आली. तेव्हापासून याला टोकियो हे नाव पडले. त्या पूर्वीच्या राजधानीचे नाव कियोटो होते. तेच उलटे करून नव्या राजधानीला टोकियो हे नाव ठेवण्यात आले. कियोटो म्हणजे पश्चिमेकडील राजधानी आणि टोकियो म्हणजे पूर्वेकडील राजधानी, असा या नावांचा अर्थ आहे. पण टोकियोला आपण टोकियो म्हणतो तो जपानी उच्चार नाही. जपानी भाषेत ट, ठ, ड, ढ ही व्यंजनेच नाहीत. टोकियोला ‘ तोक्यो ’ म्हटले पाहिजे हे मला प्रथमच येथे कळले.

तोकुओसान यांचे इंग्रजी जरा कच्चे होते. तरीही ते देत असलेली माहिती मी लक्षपूर्वक ऐकून घेत होतो. पण दुसऱ्या महायुद्धात हे शहर जवळ जवळ बेचिराख झाले होते या गोष्टीवर मात्र माझा विश्वास काही केल्या बसत नव्हता.

अर्ध्या तासाने आमची गाडी एका भव्य इमारतीसमोर येऊन उभी राहिली. मी खाली उतरून पाहिले. ते ' सान-बांचो ' नावाचे एक हॉटेल होते. माझी व्यवस्था एका हॉटेलात केलेली पाहून मी जरा चकित झालो.


जपानला येण्याचे ठरविले तेव्हाच ' निप्पोन झान म्योहोजी ' या संस्थेच्या सर-चिटणिसांना मी स्पष्ट लिहून कळविले होते की, मी जपानमध्ये हॉटेलात राहू इच्छित नाही. तेथे राहून देशाचा परिचय होत नसतो. माझ्या देशात जे विदेशी येऊन जातात ते हॉटेलमध्ये राहतात. त्यांना ताजमहाल दिसतो, अजंठा, वेरूळ सगळे दिसते. फक्त भारत तेवढा दिसत नसतो. मला जपानचे तसले दर्शन घ्यायचे नाही. मला जपानी जीवन बघायचे आहे, अनुभवायचे आहे. त्यासाठी माझी राहण्याची व्यवस्था हॉटेल-मध्ये न करता एखाद्या जपानी कुटुंबात करावी. दोन भिन्न जगांतली माणसे एकत्र राहिली म्हणजे दोघांनाही थोडी अडचण होत असते. पण त्याला इलाज नसतो. एखादा देश नीट समजून घ्यायचा झाला तर अशा प्रकारची अडचण सहन केली पाहिजे. नरेश मंत्रींना माझी ही इच्छा ठाऊक होती. पण ते म्हणाले, " काकासाहेबांची व्यवस्था येथेच करण्यात आली आहे. तुमची व त्यांची वेगवेगळी व्यवस्था केली तर या लोकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. तेव्हा तुम्ही सध्या येथेच रहा. काकासाहेब तीन आठवड्यांनंतर भारताला परतले म्हणजे मग तुमची व्यवस्था तुमच्या इच्छेप्रमाणे करण्यात येईल. तुम्ही तर येथे दोन महिने राहणार आहात ना ? "

हा खुलासा ऐकल्यानंतर मला ही व्यवस्था मान्य करणे भागच होते. मी आत शिरलो. पाहतो तर काकासाहेबांबरोबर आलेल्या सरोजबेन नानावटी माझी वाट पहात तेथे जागत बसल्या आहेत. त्यांनी माझे स्वागत केले आणि मला पाचव्या मजल्यावरील माझ्या खोलीपर्यंत पोहचवून त्या गेल्या.

खोलीत पाय ठेवल्याबरोबर मला अगदी प्रसन्न वाटले. खोली युरोपियन पद्धतीची होती. एवढ्या रात्रीदेखील टेबलावरील फुलदाणीत टवटवीत फुले ठेवली होती. भिंतीवर जपानच्या पर्वतराज फुजीचे सुंदर चित्र होते. खोली वातानुकूलित होती. कॉटजवळ सपाता ठेवल्या होत्या. त्यांच्या तोंडावर कागदाची एक पट्टी लावली होती. त्याच्यावर disinfected असे छापले होते. टेबलावर पाणी पिण्याचे दोन ग्लास होते. त्यांच्यावरही ही पट्टी होती. मी बाथरूममध्ये डोकावून पाहिले. वॉश बसीन, कमोड सर्वांवर ही पट्टी चिकटवलेली होती.

मी सामान व्यवस्थित ठेवून दिले आणि कपडे बदलून कॉटवर अंग टाकले. मी आता झोपण्याची तयारी करीत होतो इतक्यात टेलिफोनची घंटी वाजली. मी ‘ रिसीव्हर ’ उचलला. एक गोड व आर्जवी आवाज ऐकू आला — ‘ मोश् मोशी. ’ ‘ मोश् मोशी ’ ही काय भानगड आहे हे माझ्या लक्षात येईना आणि एवढ्या अपरात्री मला फोन करणारी ही मुलगी कोण आहे याचीही कल्पना होईना. मी थोडासा गोंधळलो. तरीही ‘ हॅलो ’ म्हटले... ती मुलगी काही तरी किलबिल्ली आणि इतक्यात काकासाहेबांचा आवाज कानी पडला— “ रवीन्द्र का ? सुस्वागतम् मी काका ” काकासाहेब जागे झाले होते. प्रवास कसा काय झाला वगैरे सर्व आस्थेने त्यांनी विचारून घेतले आणि ‘ उद्या सकाळी आपण भेटू. आता आराम करा. ’ असे सांगून त्यांनी रिसीव्हर खाली ठेवला.

पण मला झोप कसची येते ! दोन अडीच वाजेपर्यंत मी जागाच होतो. जपानला पोहोचल्याचा मला एवढा आनंद झाला होता की, त्यापासून मला वंचित करण्याची शक्ती साक्षात् निद्रादेवीपाशीसुद्धा नव्हती !



## : ४ : युरोप? नव्हे, जपानच

एक गोष्ट मला मान्य करावी लागेल ती ही की मी प्रथम-दर्शनीच तोक्योच्या प्रेमात पडलो. मला त्याचा चेहरा अतिशय आवडला. इतके नीटनेटके व सुसंस्कृत शहर मी यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. एवढे मोठे शहर इतके साफ ठेवणे कसे शक्य आहे याचे मला आकलनच होऊ शकले नाही. स्वच्छतेचा जो आदर्श मी हॉटेलमध्ये पाहिला होता तसाच जवळजवळ साऱ्या शहरामध्ये मला दिसला. दुकानांत खाण्या-पिण्याचे सर्व जिन्नस, फळे, भाजीपाला, दूध, मासे, अंडी सर्व काही चांगले, स्वच्छ ठेवलेले मला आढळून आले. रस्त्यांत कुठेच कागदाचा एक तुकडादेखील पडलेला दिसत नव्हता. हे लोक सिगरेट ओढून शेवटी त्याची थोटके कुठे टाकतात हे माझ्या लक्षातच आले नाही. फाटलेले, मळलेले कपडे वापरलेला एकदेखील माणूस उभ्या शहरात मला आढळला नाही. इतकेच नव्हे तर माझ्यावर अतिशयोक्तीचा आरोप येईल ही भीती पत्करूनही मला म्हणावेसे वाटते की रडवा, सुतकी चेहऱ्याचा माणूस शोधूनही मला सापडला नाही. ही सारी प्रजा हसणारी आहे अशीच माझ्या मनावर या शहराने छाप पाडली. रस्त्यावर मोटारी इतक्या भरवेगाने धावत होत्या, पण हॉर्न कुठेच ऐकू येत नव्हता. भिंतीवर एखादा पोस्टर दिसावा! छेः असले शहर भारतात

कुठेच नाही. तुलनाच करायची झाली तर असे म्हणता येईल की, हे शहर युरोपच्या कुठल्याही सुसंस्कृत शहराशी स्पर्धा करू शकेल इतके टापटिपीचे आहे.

आम्ही तोक्योच्या उएनो पार्कच्या परिसरात दुसऱ्या दिवशी मनसोक्त हिंडलो आणि एका भूमिगत रेल्वेने आओयामाला जाण्यासाठी निघालो. वाटेत एके ठिकाणी तोकुओसान आम्हांला एक ' डिपार्टमेन्टल स्टोअर ' दाखवायला घेऊन गेले. मी तर तो पाहून एखाद्या गावंढळासारखा स्तंभित झालो. अनेक वस्तू जेथे मिळू शकतात अशी मोठमोठी दुकाने आपल्या देशात मी पाहिली होती. पण हा ' डिपार्टमेन्टल स्टोअर ' म्हणजे कल्पना करता यायची नाही असे एक निराळेच प्रकरण होते. शेकडो मोठी दुकाने एकत्र केली तरी ती याच्या पासंगाला पुरणार नाहीत एवढा प्रचंड हा स्टोअर होता. फक्त विमाने, मोटारी, जहाजे, आगगाड्या असल्या मोठ्या वस्तू सोडल्या तर जपानात निर्माण होणाऱ्या बाकीच्या साऱ्या वस्तू येथे मिळत होत्या. येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, जपानात निर्माण होत नाही अशी वस्तू सापडायची नाही. मालाची ही विपुलता पाहून मला तर हा देश दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झाला होता वगैरे गोष्टी कपोलकल्पित वाटू लागल्या. अखंडपणे चढणाऱ्या–उतरणाऱ्या स्वयंचलित जिन्यावरून चढून-उतरून सहा मजल्यांचा हा स्टोअर आम्ही बघून घेतला. प्रत्येक वस्तू पाहण्याजोगी होती. इतकेच नव्हे तर उचलून नेण्याजोगीही वाटत होती. बरे झाले, माझ्याकडे पैसे नव्हते. नाही तर कफल्लक होऊनच परतलो असतो. माझी गोष्ट सोडाच. पण समजा, एखादा कुबेर जरी तेथे गेला असता तर तो आपली सारी संपत्ती खर्च करूनही ब्याच गोष्टी घ्यायच्या राहिल्या याची चुटपुट लागून परतला असता, इतकी विविधता येथे पाहावयाला मिळाली.

सकाळी उयेनो पार्कजवळ असलेल्या संग्रहालयामध्ये आम्ही प्राचीन जपानचे दर्शन घेतले. हे राष्ट्रीय संग्रहालय आहे. दोन मोठ्या इमारतींत जवळजवळ पंचवीस शो-रूम्स असून जपानचा इतिहास व संस्कृती यांच्याशी संलग्न अशा अक्षरशः हजारो वस्तू येथे ठेवण्यात आल्या आहेत. आता दुपारी या डिपार्टमेन्टल स्टोअरमध्ये अर्वाचीन जपान बघायला मिळाले. शरद पंड्यांना तर या डिपार्टमेन्टल स्टोअर्सनी इतके वेड लावले की पुढे पुढे ते दुसरा कार्यक्रम नसला म्हणजे दिवसभर असल्या स्टोअर्समध्ये घालवू लागले. ( तोक्योमध्ये असले अठरा-वीस डिपार्टमेन्टल स्टोअर्स आहेत. ) इतकेच नव्हे तर स्टोअर्सच्या नादी लागून त्यांनी क्योतो, नारा यांसारख्या संस्कारधामांवरदेखील पाणी सोडले. जपानमध्ये येऊन तुम्ही क्योतो, नारा यांसारखी स्थळे पाहिली नाहीत तर जग तुम्हांला काय म्हणेल वगैरे मी त्यांना परोपरीने समजावून सांगितले. पण छे, ते जरा-

देखील विचलित झाले नाहीत. ते एकच उत्तर द्यायचे— ‘ ती प्राचीन मंदिरे आणि त्या बागा पाहून काय करायचे आहे ? मला अर्वाचीन जपानचे हे दर्शनच अधिक प्रिय आहे.’

पहिल्या दिवशी संध्याकाळपर्यंतच्या परिभ्रमणानंतर अचानक माझ्या लक्षात एक गोष्ट आली : या शहराला जे एक आगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे त्याचे सारे श्रेय जपानी मुलींकडे जाते. कुठेही जा, मुलींचेच ‘ राज्य ’. हॉटेलमधील परिचारिका मुली, चहापानगृहे चालवितात मुली, दुकाने चालवितात मुली. डिपार्टमेन्टल स्टोअर्समध्येही मुलीच. पुरुषवर्ग एक तर कारकुनी करीत असेल किंवा कारखान्यात काम करीत असेल. जेथे शारीरिक-श्रम फारसे करावे लागत नाहीत आणि बुद्धीला विशेष ताण द्यावा लागत नाही तेथे पुरुषवर्ग आढळायचा नाही. ते क्षेत्र मुलींचेच. या मुली नसत्या तर तोक्योच्या जीवनात सौंदर्य प्रतीत झाले नसते.

जपानी मुली तशा काही सुंदर म्हणता यायच्या नाहीत. सौंदर्याचे आपले जे आदर्श ठरलेले आहेत त्यांत जपानी मुली बसत नाहीत. बसकी नाके, बारीक डोळे, वर आलेले गाल आणि ठेंगणी शरीरयष्टी यांतून माझ्या दृष्टीने सौंदर्य निर्माण होणे शक्य नाही. निदान माझ्या डोळ्यांना तरी ते दिसले नाही. तरीही जपानी मुलींनी माझे लक्ष चटकन ओढून घेतले. याचे कारण म्हणजे त्यांच्या वागण्यात दिसून येणारा गोडवा. त्या एकसारख्या हसत असतात आणि आपल्या सभोवतालचे वातावरण प्रसन्न ठेवीत असतात. आधुनिक युगातला मोकळेपणा आणि स्त्रीजीवनाला सौंदर्य प्राप्त करून देणारा लाजरेपणा यांचा इतका सुंदर समन्वय इतरत्र क्वचितच आढळत असावा.

का कुणास ठाऊक, मला या जपानी मुली चिमण्यांसारख्या वाटल्या. त्या बोलतात तेव्हा चिमण्यांप्रमाणेच किलबिलतात आणि चालतात तेव्हाही चिमण्यांसारख्याच चालतात. त्यांच्या चेहऱ्यावर जशी एकप्रकारची निर्व्याजता तरळते तसा त्यांच्या चालीत एकप्रकारचा बुजरेपणाही दिसून येतो.

‘ किमोनो ’ हा जपानी स्त्रियांचा खास पोशाख आहे. मला तर तो आपल्या साडी-इतकाच सुन्दर वाटतो. या पोशाखात जपानी स्त्रीचे सारे शालीन सौंदर्य खुलून दिसते. किमोनोतली स्त्री जेव्हा चालते तेव्हा तिच्यात एकप्रकारचे मार्दव तरळू लागते. पण दुर्दैवाने हा पोशाख आता इतिहासजमा होऊ लागला असावा किंवा खास प्रसंगीच तो वापरला जात असावा. आज तो फारसा कुठे दिसत नाही. सामान्यपणे आज जपानी स्त्रियांची वेशभूषा युरोपियन वळणावर गेलेली दिसते. केशभूषाही त्याच वळणावर गेली आहे. जुन्या पद्धतीची वेशभूषा व केशभूषा म्हणे फक्त गेयशा मुलींनीच काय ती

सुरक्षित ठेवली आहे. विपुल केसांच्या जपानी स्त्रिया जेव्हा दिसतात तेव्हा ते केस कृत्रिम असतात. अलीकडच्या या आठ-दहा वर्षांच्या काळात जपानमध्ये केशभूषेचे खास तज्ज्ञही निर्माण झाले आहेत आणि त्यांचा धंदाही जोराने फोफावत आहे. प्रत्येक आठ-दहा दुकानांनंतर ' ब्यूटी सलून ' हा आढळायचाच.

जपानी स्त्रियांच्या युरोपियन वेशभूषेमुळे तोक्योत फिरत असताना आपण एखाद्या युरोपियन शहरामध्ये फिरत आहोत असा प्रथम-दर्शनी भास होतो. पण लगेच आपले लक्ष त्यांच्या शिष्टाचारांकडे जाते आणि आपण म्हणतो—नाही, हे युरोप नाही, हे जपानच आहे. या लोकांनी येथे प्रति-युरोप उभे केले खरे; पण त्याचे अंतरंग युरोपियन होऊ शकले नाही. नव्हे, त्यांनी ते होऊ दिलेले नाही.


जपानचे शिष्टाचार खास जपानी आहेत. उदाहरणार्थ, अभिवादन करताना दोन जपानी पुरुष एकमेकांशी कधी हस्तांदोलन करायचे नाहीत. स्त्री-पुरुष तर कधीच हस्तांदोलन करायचे नाहीत. फार कशाला, युरोप-अमेरिकेत राहून आलेले दोन जपानीदेखील म्हणे कधी हस्तांदोलन करीत नाहीत. अभिवादनाची त्यांची पद्धत म्हणजे कमरेपासून वाकणे हीच होय. वीस किंवा तीस डिग्री वाकून दोन सेकंद तसेच रहावयाचे ही अभिवादनाची सामान्य पद्धत आहे. व्यक्ती अतिपरिचयाची असली किंवा आपल्यापेक्षा वयाने अथवा दर्जाने छोटी असली तर पंधरा डिग्रीच वाकायचे व सेकंदभर तसे रहायचे, आणि आपल्यापेक्षा वयाने किंवा दर्जाने श्रेष्ठ असली तरी पुनःपुन्हा वाकायचे. पण वाकायचे खरेच. मी तर काही बड्या आसामींनादेखील सामान्य ड्रायव्हरांसमोर वाकताना पाहिले आहे. हा शिष्टाचार मनाला ओढ लावणारा आहे.

' साइकेइरेई ' नावाची अभिवादनाची त्यांची आणखी एक पद्धत आहे. ती शिन्तो किंवा बुद्ध-मंदिर, अथवा राष्ट्रीय झेंडा, सम्राट किंवा अतिशय पूज्य व्यक्ती यांच्यापुढे पहावयास मिळते. हिच्यात अभिवादन करणारा साष्टांग प्रणिपात करीत असतो.

जपानी जीवनाचा माझा परिचय जसजसा वाढत गेला तसतसा त्यांच्या शिष्टाचारांच्या अनेक लकबी माझ्या लक्षात आल्या. बसायचे कसे, चालायचे कसे, वळायचे कसे, इतकेच नव्हे तर चहाचा कप हातात कसा धरायचा व तो ओठांना कसा लावायचा— असल्या बारिकसारीक गोष्टींतदेखील शिष्टाचारांचे अतिशय दक्षतेने पालन केले जाते हे माझ्या अवलोकनात आले आणि मी अगदी स्तिमित होऊन गेलो.

असे सांगतात की, जपानी शिष्टाचारांचे आदर्श प्रथम राजघराण्यात घडविले गेले व तेच आठव्या शतकाच्या आसपास साऱ्या राष्ट्रापुढे ठेवण्यात आले. जपानचा राष्ट्रीय धर्म जो शिन्तो त्याचे संस्कार शिष्टाचारांच्या या नियमावर होते. पुढे चीनमधून बौद्ध

धर्म येथे आला व त्याच्याबरोबर कोन्फूशियसचे नीतिशास्त्रही आले. या दोन्ही आदर्शांचा ठसा शिष्टाचारांच्या नियमांवर उठणे स्वाभाविक होते. बाराव्या शतकाच्या सुमाराला शिष्टाचार हे एक ' शास्त्र ' बनले व या शास्त्राचे तज्ज्ञ येथे निर्माण झाले. आपल्याकडे संगीताची जशी ' घराणी ' निर्माण झाली तशी त्या वेळी येथे शिष्टाचारांची घराणी निर्माण झाली. पुढे एकोणिसाव्या शतकात जपानची द्वारे युरोप-अमेरिकेच्या लोकांसाठी खुली झाली. तोपर्यंत जपान बंदिस्त जीवन जगत होते. या स्थित्यंतरामुळे जपानच्या जीवनात प्रचंड उलथापालथ झाली. अशा वेळी शिष्टाचाराचे जुने नियम टिकणे शक्य नव्हते. ते हळूहळू तुटू लागले. वेळीच नवीन नियम घडविले गेले नाहीत तर जपानच्या सामाजिक जीवनात पोकळी निर्माण होईल व अराजक माजेल, याची चिंता त्या वेळच्या समाजधुरीणांना झाली. त्यांनी तातडतोब तज्ज्ञांची एक समिती नियुक्त केली आणि या समितीने नव्या काळाला अनुरूप असे नवे नियम घडविले व ते राष्ट्रापुढे ठेवले. अगदी अलीकडच्या काळात, म्हणजे सन १९४३ मध्ये, जपानच्या सरकारने शिष्टाचारांच्या प्रश्नावर पुन्हा विचार करण्यासाठी व आवश्यक अशा सुधारणा सुचविण्यासाठी तज्ज्ञांची एक नवी समिती नियुक्त केली होती. या समितीने जे नियम पक्के केले तेच आज जपानात चालू आहेत. येथे लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, ज्या काळात या समितीची नियुक्ती करण्यात आली, तेव्हा जपान जीवन-मरणाच्या लढाईत गुंतले होते. अशा वेळी-देखील ते शिष्टाचारांच्या प्रश्नावर गंभीरतेने विचार करायला वेळ काढू शकले ही एकच गोष्ट जपानच्या जीवनात शिष्टाचारांना केवढे मोठे स्थान आहे हे सिद्ध करावयास पुरेशी आहे.



## : ५ : यासुकुनी

आमच्या ' सानबांचो ' हॉटेलमधून बाहेर पडलो आणि डाव्या बाजूने चालायला लागलो म्हणजे थोड्या वेळाने कुदान नावाच्या तोक्योच्या एका प्रमुख भागाचा मुख्य रस्ता लागतो. रस्त्याच्या पलीकडे एक मोठी बाग आहे. या बागेला यासुकुनी असे नाव आहे, व त्यात राष्ट्रासाठी प्राणार्पण केलेल्यांचे स्मारक उभारण्यात आले आहे.

मी प्रथमच जेव्हा या बाजूला आलो तेव्हा माझे लक्ष त्या बागेचे जे प्रवेशद्वार आहे त्याच्याकडे गेले. सिमेंट-कॉंक्रीटचे दोन प्रचंड स्तंभ व वरच्या बाजूला आडव्या घातलेल्या दोन प्रचंड तुळया एवढेच त्याचे स्थापत्य होते. पण ते आतल्या वृक्षराजीशी असे काही मिसळून गेले होते की ते मानव-निर्मित आहे असे वाटत नव्हते. मी या दृश्याने मोहित झालो आणि माझे पाय आपोआप त्या दिशेने चालायला लागले. तोपर्यंत या बागेचे नावही मला ठाऊक नव्हते व आत काय आहे हेही कुणी मला सांगितले नव्हते. पण आतल्या वृक्षराजीची मोहिनी माझ्यावर पडली होती आणि तेवढेच प्रलोभन मला पुरेसे होते. पण त्या दिवशी दुसरा काही तरी कार्यक्रम ठरला होता. त्यामुळे बागेत जाऊन बसण्याचा स्वच्छंद मला परवडण्याजोगा नव्हता. मला माझी इच्छा तशीच थोपवून धरावी लागली.

दुसऱ्या दिवशी मैजी विश्वविद्यालयातील एक प्राध्यापिका श्रीमती कावाकामी मला आपल्या विश्वविद्यालयात न्यायला आल्या होत्या. आम्ही टॅक्सी शोधत शोधत सानबांचो हॉटेलपासून येथपर्यंत चालत आलो. समोरच्या बागेवर दृष्टी पडताच बागेत जाण्याची माझी इच्छा पुन्हा जागी झाली. लगेच मी श्रीमती कावाकामींना विचारले, 'आपल्या हाती काही वेळ शिल्लक आहे काय?'

'का?'

'जरा त्या बागेत काय आहे ते बघून येऊ.'

'म्हणजे? तुम्हांला ही बाग अजून कुणी दाखविलीच नाही? चला तर मी दाखविते.'

आम्ही रस्ता ओलांडला आणि त्या दोन-खांबी प्रवेशद्वारातून आत शिरलो. आत पाऊल ठेवताच डाव्या बाजूला उभ्या असलेल्या एका पुतळ्याने आमचे स्वागत केले. श्रीमती कावाकामी त्या पुतळ्याकडे बोट दाखवून म्हणाल्या— 'हा याजिरो शिनागावा यांचा पुतळा आहे.'

मला काय? मला याजिरो शिनागावा आणि शिनिरो याजिगावा सारखेच होते. मी मनात म्हटले— असेल कुणी तरी. आपल्या देशात जळी-स्थळी अगदी मामुली पुढाऱ्यांचेदेखील पुतळे दिसत नाहीत काय? आपण थोडेच सर्व पुतळ्यांपुढे उभे राहतो! एखादी असाधारण अशी कलाकृती असली तर गोष्ट निराळी, पण हा पुतळा काही तसा दिसत नाही! आणि मी चालायला लागलो. समोरची गूढ–प्रशांत वृक्षराजी बोलवीत असताना मानवनिर्मित एका सामान्य पुतळ्यासमोर उभे राहणे मला शक्यही नव्हते.

याजिरो शिनागावा या नावाच्या उच्चाराने माझ्यात विशेष असा कोणताच भाव उत्पन्न होऊ शकला नाही हे श्रीमती कावाकामींनी ओळखले, आणि त्या म्हणाल्या— याजिरो शिनागावा हा मेइजी काळातला एक मोठा राजपुरुष होऊ गेला.

'मेइजीकाळ' हे शब्द कानी पडताच माझे पाय थबकले. मी मागे वळलो, आणि पुतळ्यासमोर येऊन उभा राहिलो. मैजीकाळ हा जपानच्या इतिहासातला एक विलक्षण क्रांतिकारी असा काळ होऊन गेला, एवढी मला माहिती होती. इतकेच नव्हे तर असा एक काळ आपल्या देशातही यावा अशी एक अदम्य इच्छा माझ्या हृदयात उदयाला आली होती. ती एकाएकी येथे जागृत झाली. स्वातंत्र्योत्तर काळातील भारताची सामाजिक, सांस्कृतिक दुर्दशा पाहून ज्या लोकांना उबग आला आहे, पण जे निराश न होता अजूनही एका मोठ्या क्रांतीची स्वप्ने पहात आहेत, त्यांना

ग्रंथ संग्रहालय,
क्रमांक ... दि ...
... ता ... क्रि ...

जपानच्या इतिहासातल्या या मेजीकाळापासून बरीचशी प्रेरणा मिळू शकते असे माझे मत बनले आहे. रशियातल्या क्रांतीपासून प्रभावित झालेले आणि क्रांतीचा तो आदर्श समोर ठेवून कार्यरत झालेले काही लोक आपल्याकडे आहेत. पण ही क्रांती आपला आदर्श बनू नये. आपल्याला एका अशा क्रांतीची आवश्यकता आहे की जी आपल्या जीवनात प्रचंड उलथापालथ करील पण भारताचे वैशिष्ट्य नष्ट करणार नाही. साप जशी आपली जीर्ण, पुरातन कात सहज सोडून देतो पण स्वतःला नष्ट करीत नाही तशी सहज लीलेने घडवून आणलेली क्रांती आपल्याला हवी असेल तर जपानच्या इतिहासातील ही मेजी क्रांती अभ्यसनीय आहे.

पण मला हे समजावून सांगताना थोडेसे विषयांतर करावे लागेल.

जपानचा जो युरोपशी सर्वप्रथम संबंध आला तो आमच्या गोव्याच्या भूमीत. (हे मला भेटलेल्या जपानी लोकांनादेखील ठाऊक नव्हते.) जपानमधील सात्सुमा नावाच्या एका शहरातला हान्शिरो नावाचा एक इसम जपानमधून पळून गेला होता. त्याने काही तरी गुन्हा केला होता. त्याला सरकार पकडू पहात असावे. तो थेट गोव्याला येऊन पोहोचला. ही सोळाव्या शतकातली गोष्ट आहे. गोव्यात त्या वेळी सेंट फ्रॅन्सिस झेवियर ख्रिस्ती धर्माचा प्रसार करीत होता. हान्शिरो त्याला भेटला आणि त्याने झेवियरकडून ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली. तेव्हापासून तो पॉल हान्शिरो या नावाने ओळखला जाऊ लागला. त्यानेच झेवियरला जपानची माहिती दिली. दुसऱ्याच वर्षी झेवियर जपानला जाण्यासाठी बरोबर काही जेझुईत मिशनऱ्यांना घेऊन निघाला. पॉल हा वाटाड्या म्हणून होताच. जपानी लोकांनी झेवियरचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे चांगले स्वागत केले. ते ज्या अर्थी हिंदुस्थानातून आले होते त्या अर्थी ते बौद्ध-धर्माची एक परिशुद्ध आवृत्ती येथे घेऊन आले असावेत अशी त्यांची समजूत झाली. झेवियरच्या मागे ख्रिस्तीधर्म व युरोपियन संस्कृती अशा दोन जबरदस्त शक्ती उभ्या आहेत याची बिचाऱ्यांना कल्पनाही नव्हती. त्यांनी झेवियरला धर्मप्रसार करण्याची परवानगी दिली. झेवियरलाही हे लोक आवडले असावेत. कारण त्याने पोर्तुगालच्या राजाला जपानविषयक जो अहवाल सादर केला होता त्यात 'आतापर्यंत भेटलेल्या लोकांत हे लोक सर्वांत चांगले आहेत' असा त्यांचा गौरव केला आहे.

पुढे जेझुईत पाद्री आपल्या शिरस्त्याप्रमाणे स्थानिक भाषा शिकले आणि त्या भाषेतून त्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार आरंभला. त्यांना अनेक अनुयायी मिळाले. प्रारंभी त्यात अनुचित असे काही आहे असे कुणालाच वाटले नाही. पुढे हे लोक पंचमस्तंभीय बनू लागले आहेत अशी शंका येऊ लागली. अर्थात हा धोका जपानला परवडण्याजोगा नव्हता. त्यांनी लगेच परकी मिशनऱ्यांना देशाबाहेर हाकलून लावले.

इतकेच नव्हे तर यापुढे कुठलाही परकी इसम या भूमीवर पाय ठेवणार नाही अशी खबरदारी घेतली. बाहेरच्या लोकांना आत येऊ द्यायचे नाही आणि आतल्या लोकांना बाहेर जाऊ द्यायचे नाही, अशा स्थितीत जपान त्यानंतर अडीचशे वर्षे राहिला.

जगापासून अलित म्हणजे अगदीच अलिप्त अशा स्थितीत असतानाच एक दिवशी अमेरिकन नाविक-दलाचा एक अधिकारी कोमोडोर पॅरी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा एक खलिता घेऊन जपानात आला. खलिता अगदी साधा होता. त्यात अमेरिकेला व्यापारासाठी जपानचे दरवाजे मोकळे करण्यात यावेत एवढीच मागणी होती. पण या मागणीमागे एक प्रकारची धमकी होती. ती जपानने बरोबर हेरली. शिवाय उत्तर न्यायला मी बरोबर एका वर्षानंतर पुन्हा येथे येईन असे सांगून पॅरी गेला होता. त्या त्याच्या वागणुकीतही एक प्रकारचे शक्तीचे प्रदर्शन होते. जपानने आपल्यापुढील संकट ओळखले. जपानमध्ये त्या वेळी 'शोगून'-शाही चालत होती. 'शोगून'-शाही म्हणजे महाराष्ट्रातल्या पेशवाईसारखी एक राजवट होती. शिवाय शोगूनची एक उपाधी "सेइ-ताई-शोगून" (म्हणजे विदेशी बर्बरांना पिटाळून लावणारा सेनापती) अशी होती. आता प्रश्न पडला, अमेरिकेसाठी जपानचे दरवाजे खुले केले तर शोगूनच्या पदवीला अर्थ राहात नाही. म्हणजे पर्यायाने शोगूनशाही कोलमडून पडते. बरे, अमेरिकेला प्रतिबंध केला तर एका ज़बरदस्त राष्ट्राचे शत्रुत्व ओढवून घेतल्या-सारखे होते. कोमोडोर पॅरीची जहाजे जपानच्या किनाऱ्याला लागली तेव्हाच त्यांनी जपानच्या मनात एक प्रकारची भीती उत्पन्न केली होती. जपानी लोकांनी असली जहाजे यापूर्वी पाहिलीही नव्हती. अशा परिस्थितीत जपान हादरून गेले. त्याला अमेरिकेसाठी दरवाजे खुले करणे भाग पडले. अमेरिकेच्या मागोमाग इंग्रज, फ्रेंच रशियन आले. अर्थात शोगूनशाही ताबडतोब कोलमडून पडणे साहजिकच होते. तिची जागा ज्या वर्गाने घेतली त्याच्यापुढे दोन मार्ग होते : आहे त्या अल्पसंतुष्ट स्थितीत राहून विदेशी लोकांना जपान गिळंकृत करू द्यायचा हा एक, अथवा अल्पावधीत जगातल्या पुढारलेल्या राष्ट्रांइतके स्वतःला समर्थ करून घेणे हा दुसरा. त्याने दुसरा मार्ग पसंत केला. जपानने आपला चेहराच बदलून टाकण्याचा निश्चय केला. शेकडो जपानी तरुण निरनिराळ्या देशांत जाऊन निरनिराळ्या विद्या शिकून आले आणि एका पिढीच्या आत त्यांनी जपानचा संपूर्ण कायापालट करून टाकला. गुलामगिरीचा धोका निर्माण झाला असताना संपूर्ण राष्ट्राचा योजनाबद्ध कायापालट करण्याच्या या प्रयोगाचा जपानी जीवनावर प्रचंड परिणाम झाला. सारी उलथापालथ झाली आणि जपान जे अत्यंत मागासलेले जुनाट असे राष्ट्र होते ते एक अत्यंत समर्थ अद्यतन राष्ट्र म्हणून अल्पावधीत जगापुढे आले. प्रजाकीय पुरुषार्थाचे असले उदाहरण मानवजातीच्या इतिहासात इतरत्र कुठेच आढळायचे नाही. केमालपाशांचा तुर्कस्थानचे आधुनिकीकरण

करण्याचा प्रयोगदेखील जपानच्या या प्रयोगापुढे क्षुल्लक स्वरूपाचा आहे. हे मन्वंतर ज्या काळी घडले तो काळ म्हणजेच मेइजी काळ. 'मेइजी' याचा अर्थ जागृत, डोळस असा आहे. क्रांती ही नेहमीच आंधळी असते अशी आपली समजूत आहे. क्रांती डोळसही असू शकते हे जपानने आपल्याला दाखवून दिले आहे. या काळातील जपानच्या तरुण नेत्यांनी ज्या दूरदृष्टीने काम केले ती दृष्टी माझ्या मते महत्त्वाची आहे. त्यांची प्रवृत्ती डोळस होती म्हणूनच जपानचा संपूर्ण कायापालट झाला, आणि इतके असूनही जपान जपानच राहिले. एक वृद्ध समाज कायाकल्प करून संकल्पपूर्वक पुन्हा तरुण कसा होऊ शकतो याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

मी त्या पुतळ्यापुढे थोडा वेळ उभा राहिलो. मघाशी जो मला केवळ दगडाचा पुतळा वाटला होता तो आता एकाएकी चैतन्यमय वाटू लागला. याजिरोच्या ओठांत मला आता निश्चय तरळत असलेला दिसू लागला. श्रीमती कावाकामींनी माझे लक्ष जवळ असलेल्या दगडी कंदिलाकडे वेधले नसते तर मी आणखी थोडा वेळ त्या पुतळ्यासमोर उभा राहिलो असतो. त्या पुतळ्यामध्ये तसे भान हरपण्याजोगे काही नव्हते, आणि याजिरो हाही मेइजीकाळातला काही एकमेव पुढारी नव्हता. पण तो त्या काळाचा प्रतिनिधी होता. त्यामुळे त्याच्याकडे पाहताना माझ्या हृदयात तरंग उठत होते. त्याने जी कालवाकालव होत होती ती मला आणखी थोडा वेळ अनुभवायची होती.

माझ्यातला क्रांतिकारक अनुकरणप्रिय नाही. जगात आतापर्यंत जेवढ्या क्रांत्या होऊन गेल्या त्या जिच्यापुढे फिक्या पडतील अशी एक जबरदस्त मानवी क्रांती आपल्या देशात व्हावी आणि त्या क्रांतीचा एक पाईक म्हणून काम करण्याची संधी मला लाभावी अशी एक महत्त्वाकांक्षा, माझ्या मर्यादा मला ठाऊक असूनदेखील मी मनात बाळगली आहे. या माझ्या महत्त्वाकांक्षेला उजाळा देण्यासाठी मला एखादे निमित्त लागते. ते येथे या पुतळ्याच्या रूपाने लाभले होते.

आम्ही पुढे चालायला लागलो. श्रीमती कावाकामींनी ज्या दगडी कंदिलाकडे माझे लक्ष वेधले होते तसल्या कंदिलाच्या कितीतरी रांगा मला येथे दिसल्या. पण त्या जवळच्या छोट्या-मोठ्या झाडीत अगदी मिसळून गेल्या होत्या. ही बाग हा एक साधा पार्क नसून एक शिन्तो समाधिस्थल आहे हे आता माझ्या लक्षात आले. समोरच समाधीची जागा दिसत होती. ती एखाद्या मंदिरासारखी वाटत होती. त्याच्या छप्पराचा कोपरा जरा वाकविलेला होता. बाकी त्याच्या स्थापत्यात कोणतीच सजावट नव्हती. समाधीची बांधणी संपूर्णतः लाकडाची व कमालीची साधी होती. सभोवतालच्या निसर्गाशी एकरूप होऊन जाणे हेच जणू या बांधणीचे वैशिष्ट्य आहे असे वाटत होते. एकंदर वातावरण निसर्गपूजेला अनुरूप असेच होते. याला जो साधेपणा आलेला दिसत

होता तो सहज नसून प्रयत्नपूर्वक आणण्यात आला असावा असे वाटत होते. आजू-बाजूच्या वृक्षांनी याला चांगली साथ दिली होती.


शिन्तो लोकांनी दगडाच्या समाध्या कधी बांधल्या नाहीत. मंदिर व समाधी यांतही ते फरक करत नसावेत. शिन्तोमत हा निसर्गपूजेचाच एक प्रकार आहे. त्यात पूर्वजपूजाही आली. त्यामुळे मंदिर व समाधी त्यांच्या मते एकच आहेत. शिन्तोचे खरे मंदिर म्हणजे स्वतः निसर्गच होय.

आम्ही समाधीकडे गेलो. बाहेर कोपऱ्यात स्वच्छ पाण्याने हात व तोंड धुतले. शिन्तो समाधि-मंदिरात जाताना अगोदर स्वच्छ व्हावे लागते. समाधि-मंदिरात पुजारी सोडून कोणालाच प्रवेश नसावा. कारण सर्वच लोक एका विशिष्ट अंतरावर उभे राहात असलेले दिसले. आत मूर्ती नव्हती. फक्त एक गोल आरसा होता. अनेक लोक येत आणि टाळया वाजवून देवांना बोलवीत. नंतर साइकेइरेई पद्धतीने वाकून नमस्कार करीत आणि पुनः टाळया वाजवून देवांना जायला सांगत. मला हा प्रकार मोठा मनोरंजक वाटला.

देवाच्या भेटीसाठी लोकांनी अनेक गोष्टी आणल्या होत्या. त्यांत तांदूळ, पीठ, कडधान्य, भाजीपाला इतकेच नव्हे तर मासे व दारूच्या बाटल्याही होत्या. यात विशेष म्हणजे यांतला कोणताही पदार्थ शिजविलेला नव्हता. लोक या भेटीच्या वस्तू तेथे ठेवीत आणि देवांना टाळया वाजवून परत जायला सांगितले म्हणजे त्या उचलून परत घरी नेत.

आश्चर्य म्हणजे मला तेथे फुले कुणी भेटीसाठी आणलेली दिसली नाहीत. बौद्धा-पासून स्वतःचा वेगळेपणा दर्शविण्यासाठीच म्हणे फुले येथे आणली जात नाहीत. कदाचित शिन्तोमत हा निसर्गपूजेचाच एक प्रकार असल्यामुळे झाडावरची फुले तोडणे त्यांना आवडतही नसावे.

शिन्तो हा एक धर्म आहे असे मी मानीत होतो. पुढे लक्षात आले की तो एक नुसता संस्कार आहे. जपानच्या मानसात याची पाळेमुळे चांगली खोल रुजलेली आहेत. जपानी माणूस धर्माने बौद्ध असो, ख्रिस्ती असो, कुणीही असो, तो शिन्तो असतोच असतो. निसर्गातली जी जी वस्तू आपल्या हृदयात भक्तिभाव उत्पन्न करते– मग ती वृक्ष असो, पर्वत, नदी, आकाश, समुद्र, सूर्य, किंवा एखादी मोठी व्यक्ती असो– ती ईश्वराची विभूती आहे, तिच्यापुढे आपण नतमस्तक झाले पाहिजे, हे या संस्काराचे मूळ आहे. जपानच्या साऱ्या सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक जीवनात या संस्काराचा धागा गुंफलेला आहे. त्यामुळेच जपान हे एक 'राष्ट्र' बनलेले आहे. जपानची परंपरा, जपानचा स्वभाव सारे काही शिन्तोमतानेच घडविले आहे. आपण सारे एक आहोत ही भावना जी जपानी लोकांमध्ये दिसून येते ती या शिन्तो संस्कारामुळेच होय. जपानी राष्ट्रवादाचा जनकही तोच आहे.



## : ६ : आतामी

तोक्योतील किती तरी प्रेक्षणीय स्थळे अजून बघायचीच होती. फार कशाला, तोक्योला पोहोचल्याबरोबर पहिल्याच रात्री ज्या एका स्थळाकडे सर्व विदेशी प्रवाशांचे पाय आपोआप चालायला लागतात ते जगप्रसिद्ध गिंझादेखील अजून मी पाहिले नव्हते. तेथे जाण्यास मला सवडही झाली नव्हती. याचे मुख्य कारण म्हणजे, मी काकासाहेबांबरोबर होतो. त्यांना भेटावयाला निरनिराळ्या क्षेत्रांतील अनेक जपानी विद्वान आमच्या हॉटेलमध्ये येत. त्यांच्या काकासाहेबांशी ज्या चर्चा चालत त्या ऐकत असताना ही दारात वाहणारी गंगा सोडून पाणी भरायला मी दुसरीकडे कशाला जाऊ असे मला वाटे; आणि दिवसातला बराचसा वेळ मी तेथेच राहात असे. तेथे बसल्या बसल्या जपानी जीवनाच्या विविध अंगांची जी माहिती मला अनायासे मिळत असे ती प्रेक्षणीय स्थळांच्या दर्शनाइतकीच आकर्षक असे.

दोन दिवस तोक्योत राहून मी जे काही पाहिले त्याच्यापेक्षा जास्त ऐकले आणि जपान माझ्या मनश्चक्षूंपुढे एक आकार घेऊ लागले.

दुसऱ्या दिवशी रात्री सूचना मिळाली–'उद्या आपल्याला तोक्यो सोडायचे आहे. सकाळी नऊ वाजेपर्यंत सामान बांधून तयार रहा.'

तोक्यो सोडून कुठे जायचे आहे हे कळले नव्हते. चौकशी केली तेव्हा हाकोनेला काही दिवसांसाठी जायचे ठरले आहे असे समजले. हाकोने कुठेसे आहे आणि तेथे काय आहे? उत्तर मिळाले की, हे फुजी पर्वताच्या परिसरातले एक अत्यंत रमणीय स्थान आहे. मला एवढे प्रलोभन पुरेसे होते. मी अधिक चौकशा करायला गेलो नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊच्या सुमाराला काही मोटारी आमच्या हॉटेलच्या समोर येऊन उभ्या राहिल्या. होरिउचीसान नावाचे एक बौद्ध भिक्षू आम्हांला न्यायला आले होते. येथील सान्तोकू नावाच्या एका सुपर मार्केटचे ते अगदी अलीकडेपर्यंत अध्यक्ष होते. दोन वर्षांपूर्वी सगळा व्याप सोडून ते बौद्ध भिक्षू बनले होते. त्यांच्याबरोबर आणखीही काही मंडळी होती.

बरोबर साडेनऊला आमच्या मोटारी तोक्योच्या रस्त्यावरून भरधांव सुटल्या. तासाभराने मोठमोठ्या इमारती मागे पडल्या आणि चौकटीचौकटीच्या तावदानांची बैठी लाकडी घरे असलेले गाव जवळ येऊ लागले.

आम्ही शहराच्या बाहेर पडलो होतो. पण गाड्यांची गर्दी काही कमी झाली नव्हती. उलट, आज तोक्योमधील साऱ्या गाड्या या दिशेने चालल्या आहेत असे वाटत होते. ही गाड्यांची प्रचंड मिरवणूक कुठे व कशाला चालली आहे, समजत नव्हते. कुणाला तरी विचारावे असे मनात आले. पण कुणाला विचारणार? माझ्या गाडीत सुगियामासान नावाचे एक गृहस्थ होते. पण आमच्यामध्ये हृदयाची भाषा सोडून दुसरे माध्यम नव्हते. बाहेर वनश्रीने नटलेले एखादे सुंदर दृश्य दिसले म्हणजे ते बोटांनी दर्शवीत आणि 'लुक ब्युतिफुल' म्हणून माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने बघत. मी 'व्हेरी ब्यूटिफुल' असे म्हटले म्हणजे अभिमानाने मान हालवत आणि मी जपानला हे प्रशस्तिपत्र देऊन जणू व्यक्तिशः त्यांच्यावर मोठा अनुग्रह केला आहे असे समजून 'थँक्यू' म्हणत; यापलीकडे आमची मजल जात नव्हती. आपल्याला जपानी भाषा येऊ नये ही केवढी खेदाची गोष्ट! मी बाहेर दृष्टी खिळवून बसलो आणि ज्याप्रमाणे सूर्योदय किंवा सूर्यास्त पाहताना आपण हे काय आहे, याचा अर्थ काय आहे असे कधी विचारीत नसतो, त्या वृत्तीने ती दृश्ये पाहू लागलो.

गावांमागून गाव जाऊ लागले, किती तरी बाजारपेठा आल्या नि गेल्या. मोटारी एकसारख्या धावत होत्या. पण कुणी कुणाला मागे टाकू पाहात नव्हता. बाहेर लोक विड्या फुंकत निरुद्योगी बसलेले आहेत, जाणाऱ्या-येणाऱ्यांची टवाळी चालली आहे,

रस्त्यावर मुले खेळत आहेत, कुत्री किंवा गुरे आडवी येत आहेत, एखादी वेडी किंवा वेडा मध्ये नाचत आहे, आणि लोक त्याच्या सभोवताली उभे राहून मौज बघत आहेत ही दृश्ये सामान्यतः आपल्या देशात मोटारीच्या प्रवासात सगळीकडे पाहावयास मिळतात, तसले एकही दृश्य येथे दिसत नव्हते. तोक्योमध्ये जशी स्वच्छता पाहावयास मिळाली होती तशीच ती येथेही होती. कुठेच घाण दिसत नव्हती. कचरा नाही, कागदाचा कपटा दिसत नाही; डोळ्यांना खुपणारे असे काही नाही.

अकराच्या सुमाराला अचानक आमच्या गाड्यांचा वेग कमी झाला, व त्या मुख्य रस्ता सोडून उजव्या बाजूला वळल्या.. आम्ही चिगासाकीला पोहोचलो होतो. जपानमधील अत्यंत सुंदर अशा एका समुद्रकिनाऱ्यावर वसलेले हे एक छोटेसे गाव आहे. ‘ पॅसिफिक ’ नावाच्या एका प्रशस्त हॉटेलसमोर आम्ही उतरलो आणि तळ-मजल्यावर असलेल्या ‘ रेस्तोरां ’मध्ये जाऊन बसलो. रस्त्याच्या पलीकडे प्रशान्त महा-सागर उसळत होता. तर येथे रेस्तोरांच्या बाजूला असलेल्या ‘ स्वीमिंग पूल ’मध्ये काही जपानी तरुणी मजेत पोहोत होत्या.

तासभर तेथे राहून आम्ही पुढची वाट क्रमू लागलो. चिगासाकीनंतरचा पुढचा सारा रस्ता समुद्रकिनाऱ्याच्या बाजूने जात होता. वाटेत कित्येक ठिकाणी शेकडो जपानी स्त्री-पुरुष रंगीबेरंगी छत्र्या फुलवून किनाऱ्यावरील रेतीत उघडे बसलेले दिसत होते. दुसरे तितकेच समुद्रात स्नानानंद लुटत होते. कित्येक ठिकाणी शाळकरी मुला-मुलींचे थवे आले होते. काहींच्या अंगावर रबरी नळ्या लटकावलेल्या होत्या आणि त्यांच्या शिक्षिका त्यांना समुद्रात पोहण्यास शिकवीत होत्या. प्रत्येक जपानी मुलाला पोहता आलेच पाहिजे, असा या देशाचा आग्रह आहे. पोहोणे हा अभ्यासक्रमातला एक विषय आहे. असा आग्रह आपल्या देशातील समुद्रकिनाऱ्यावरील लोकांना धरावासा कधीच का वाटला नाही याचे विषादयुक्त मनाने मी उत्तर शोधू लागलो.

इतक्यात समोरच्या देखाव्याकडे दृष्टी गेली. आम्ही टेकडीवरून खाली उतरत होतो, आणि मुंबईच्या वाळकेश्वरवरून उतरताना चौपाटीचे जसे दृश्य दिसते तसा एक लहानसा देखावा इथे दिसला. अर्धवर्तुळाकार समुद्रकिनारा व तिन्ही बाजूंस लहान-मोठी घरे असलेल्या टेकड्या असे हे छोटेसे शहर पाहून मी या खेपेला आमच्या गाडीत बसलेल्या नरेश मंत्रींना विचारले, ‘ हे कोणते शहर आले ? ’

‘ आतामी ’

‘ आतामी ! ’ मला आश्चर्य वाटले. ‘ वाटेत आपल्याला आतामी लागणार आहे याची कल्पना आतापर्यंत मला कुणीच कशी करून दिली नाही ! आता आपण येथे थांबणार आहेत की असेच पुढे जाणार आहोत ! ’

'आजचा दिवस आपण येथे थांबणार आहोत.' मंत्री म्हणाले.

आतामी या नावाच्या उच्चाराबरोबर मी खुशीत आलो आहे हे पाहून शरद पंड्या विचारू लागले, 'आतामीला विशेष बघण्याजोगे काय आहे?'

'अरे, जपानमधील मधुचन्द्राचे हे प्रसिद्ध स्थान आहे.'

जपानच्या प्रवासाला निघण्यापूर्वी जपानच्या ज्या काही स्थलांची मी वर्णने वाचली होती त्यांत आतामीचेही एक होते. मधुचन्द्रासाठी जाण्यास योग्य अशा या देशात मधुचन्द्राचे एक खास स्थान म्हणून आतामीची ख्याती मी ऐकली होती. आता माझ्या लक्षात आले – तोक्योहून मोटारींची जी मोठी मिरवणूक निघाली होती ती येथे येण्यासाठीच निघाली होती. आज शनिवार आहे, आणि शनिवार व रविवार हे खास आतामीचे दिवस आहेत. ज्यांच्या अंगात तरुण रक्त सळसळत आहे ते तोक्योमधील स्त्री-पुरुष दोन दिवस चैन करण्यासाठी येथे आले आहेत.

बाजाराला वळसा घालून आमच्या मोटारी एका टेकडीवरील फुजिया नावाच्या एका हॉटेलसमोर येऊन उभ्या राहिल्या. हॉटेलमध्ये किमोनोधारी परिचारिकांनी आमचे स्वागत केले आणि आम्ही आमच्या खोलीत गेलो.

मला मिळालेल्या खोलीचा अर्धा भाग पाश्चात्त्य पद्धतीचा होता. म्हणजे तेथे कॉट, टेबल, खुर्च्या होत्या, पण राहिलेला अर्धा भाग फर्निचर नसलेला जपानी पद्धतीचा होता. या लहानशा भागात एका कोपऱ्यात कोनाड्यासारखा एक भाग होता. मी आतामीला आलो आहे या जाणिवेने अगोदरच आनंदित झालो होतो. त्यात या भागात सजवून ठेवलेल्या इकेबानाने—खास नियमांना अनुसरून सजविलेल्या पुष्पपात्राने—भर टाकली.

पुष्परचना ही एक जपानची विशिष्ट कला आहे. बौद्धधर्माबरोबर ज्या काही कला येथे विकसित झाल्या, त्यांतली पुष्परचनेची कला ही एक आहे. सर्वसामान्यपणे प्रत्येक जपानी मुलीला ही कला अवगत असते; नव्हे, अवगत करून घ्यावी लागते. अन्यथा तिचे शिक्षण पुरे होत नसते. आजाऱ्यांना धीर देणारे आणि थकलेल्यांना उत्साह प्रदान करणारे अशी फुलाची येथे प्रतिष्ठा आहे. जन्माला आलेले मूल जितके महत्त्वाचे असते, तितकेच महत्त्व मानवी जीवनात फुलाला असते, असे जपानी लोकांचे मत आहे. जीवनाच्या धकाधकीत विश्वावरील आपली श्रद्धा उडाली असेल तर फूल आपला आकार, रंग, सुगंध याने ती पुन्हा टवटवीत करील या श्रद्धेने पुष्परचनेच्या कलेचा– इकेबानाचा– येथे विकास झाला. या कलेची येथे काही 'घराणी'ही आहेत.

झाडावरची फुले तोडून पुष्पपात्रात सजवून ठेवली म्हणून 'इकेबाना' होत नसतो. इकेबानासाठी फुले विशिष्ट पद्धतीने तोडावी लागतात व ती पुष्पपात्रात सजवितानाही एका विशिष्ट पद्धतीने सजवावी लागतात. स्वर्ग, मनुष्य व पृथ्वी– शीन, सोये, ताई– या तिन्ही गोष्टी सजावटीत दिसल्या पाहिजेत हा इकेबानाचा मुख्य सिद्धान्त आहे. त्यासाठी एकाच जातीच्या फुलांच्या फांद्या तीन निरनिराळ्या पद्धतींनी तोडून सजविल्या जातात किंवा तीन निरनिराळ्या जातींच्या फांद्या तोडल्या जातात. या लोकांनी फूल या शब्दाची व्याख्या बरीच व्यापक केली आहे. फुलांत पानांचा, काटक्यांचा व गवताचादेखील समावेश होतो. एका जपानी सुभाषितात तर स्वर्ग व पृथ्वी यांना-देखील फूल म्हटले आहे. तसेच माणसाच्या हृदयालाही.

पुष्पपात्रात फुलांची संख्या तीन, पाच, सात किंवा नऊ अशी विषम असते. दोन, चार, सहा ही सम संख्या इकेबानात अशुभ मानली गेली आहे.

या कलेच्या नियमांना धरून जेव्हा पुष्पपात्र सजविले जाते, तेव्हा त्यातले फूल हे शोभेचे रहात नाही. ते एक आपल्याला वेगळी प्रेरणा देऊ लागते, आणि मग तुफान व वारा यांची पर्वा न करता फुलणाऱ्या फुलाशी आपले हृदय एकतानता साधते. इकेबानाचा मुख्य उद्देश मानवी हृदयाची फुलाशी एकतानता साधणे हाच आहे.

जपानच्या माझ्या प्रवासात मी हे पुष्पपात्र–इकेबानाच्या नियमांना धरून सजविलेले पुष्पपात्र–लोकांच्या दिवाणखान्यातच केवळ पाहिले असे नाही. जपानी पद्धतीच्या साध्या दिवाणखान्यात ते जसे शोभून दिसते तसेच इतरत्र अनेक ठिकाणी ते आपले लक्ष वेधते. कधी एखाद्या भिंतीवर ते टांगलेले दिसते तर कधी एखाद्या टेबलावर ते दिसते. बसमध्ये व आगबोटीतही मी हे पुष्पपात्र पाहिले आहे. फार कशाला, एकीकडे तर मी ते संडासातदेखील ठेवलेले पाहिले !

प्रसन्न मनःस्थितीत मी व्हरांड्यात एका खुर्चीवर जाऊन बसलो. येथून सारे आतामी एका दृष्टिक्षेपात दिसत होते. एका सुंदर खोऱ्यात ते वसलेले असून त्याच्या तिन्ही बाजूंस हिरव्यागार टेकड्या आहेत आणि चौथ्या बाजूला वरच्या अनंत आकाशाशी स्पर्धा करणारा निळा प्रशान्त महासागर पहुडलेला आहे. समोरच्या डोंगर-माथ्यावर एक जुना राजवाडा दिसत होता आणि त्याच्या पलीकडे निचिरेन-पंथी बौद्धांनी बांधलेला भव्य शान्ति-स्तूप शहराचे शिरोभूषण भासत होता. असे म्हणतात, प्राचीन काळी या ठिकाणी एक जिवंत ज्वालामुखी धगधगत होता. आज तो शान्त पडला आहे. त्याच्या द्रोणाचा– Crater– चा अर्धा भाग समुद्राच्या पोटात गडप

झाला आहे आणि अर्धा भाग हिरव्या टेकड्यांच्या रूपाने दिसत आहे. ज्वालामुखीचे अवशेष म्हणून येथे काही गरम पाण्याचे झरे आहेत. हा सारा दृश्यभाग सृष्टिसौंदर्याने इतका नटलेला आहे की येथे एके काळी ज्वालामुखी धगधगत होता या गोष्टीवर आपला विश्वास बसत नाही. आतामीची आतापर्यंत मी जी वर्णने वाचली होती ती सर्व त्याच्या प्रत्यक्ष दर्शनापुढे मला फिकी वाटू लागली.

आज मला वाटते की, आतामीचे एवढेच दर्शन घेऊन आम्ही सरळ पुढे गेलो असतो तर माझ्या मनात आतामीच्या मधुर स्मृतीच तेवढ्या राहिल्या असत्या. पण सूर्य अस्ताला गेला आणि आतामीचे जे नैसर्गिक सौंदर्य होते ते अंधारात गडप झाले. रात्रीच्या कृत्रिम प्रकाशाच्या उत्सवात त्याचे एक निराळे रूप समोर उभे राहिले. आम्ही रात्रीचे जेवण पुरे करून सहलीसाठी बाहेर पडलो. हॉटेलमध्ये प्रत्येकाच्या कॉटवर ‘युकाता’ नावाचा खास जपानी पोशाख ठेवण्यात आला होता. आम्ही आमचा पोशाख काढून ठेवला आणि पायघोळ झग्यासारखा हा ‘युकाता’ चढवून बाहेर पडलो. हॉटेलच्या दरवाजासमोर आम्ही चपलाही काढून ठेवल्या आणि खडावा-सारख्या ‘गेता’ वापरून निघालो. आतामीला आलेले सारे स्त्री-पुरुष आमच्याप्रमाणे आपापल्या हॉटेलचे युकाता चढवून बाहेर पडले होते. त्यामुळे सबंध शहर फुलपाखरांनी फुलून गेल्यासारखे दिसत होते. माणसामाणसांमधील बाह्य भेदांना या युकातांनी छेद दिला होता. युकातांतील या माणसांना नावे नव्हती, गाव नव्हता, दर्जा नव्हता. स्त्री व पुरुष एवढा फरक सोडला तर प्रत्येकाने आपापली सारी वैशिष्ट्ये हॉटेलच्या खोलीत गुंडाळून ठेवली होती. गेतांच्या खटक् खटक् आवाजात आतामीने जणू एक पतंग-नृत्य चालविले आहे असे वाटत होते.

रस्त्याकाठच्या दीपमाळा, प्रत्येक दुकानापुढील कागदी कंदिलांच्या रांगा, आणि वर टांगलेली दिव्यांची तोरणे यांची शोभा पाहात आम्ही बाजारात फिरू लागलो. आम्हांला घ्यायचे काहीच नव्हते. नुसते बघायचेच होते. या निरपेक्ष सहलीत प्रत्येक दोन-तीन दुकानांपुढे ‘पाचिंको’ म्हणून पाटी लावलेले दुकान आढळू लागले. या दुकानांत माणसांची ही गर्दी दिसायची. कुतूहलवश आम्हीही पाचिंकोच्या एका दुकानात शिरलो, पण तेथे काय पाहतो! कथलाच्या गोळ्या उडवून नशिबाची परीक्षा पाहण्याचा प्रत्येकाचा खेळ चालला आहे! यंत्राची कळी दाबायची आणि गोळ्या उडवायच्या. या खेळात तिथला प्रत्येक इसम बेहोष झाला होता. जणू नशिबाचा सोक्षमोक्ष आज लावलाच पाहिजे अशा कैफात प्रत्येकजण होता.

आम्ही पुढे गेलो तेथे दुसऱ्या प्रकारचा खेळ चालत असलेला दिसला. फरक एवढाच की, येथे कथलाच्या गोळ्यांऐवजी बुचाच्या बंदुकी घेऊन समोर वर्तुळाकार फिरणाऱ्या स्टॅंडवरची वस्तू स्थानभ्रष्ट करण्यात प्रत्येकजण गुंग होता.

जपानी लोकांना आपल्या नशिबावर तुटून पडलेले पाहून मी उदास झालो. नशिबाची परीक्षा पाहावयास जीवनात किती तरी क्षेत्रे आहेत. जपानी लोकांनी त्यांतली कित्येक व्यापलीही आहेत. मग येथे ही क्षुद्र चढाओढ का? जुगाराचा एक स्वतंत्र कैफ असतो, कबूल. पण जुगारात खेळणाऱ्याला पैशांची प्राप्ती होण्याची संभावना असते म्हणून तो खेळत असतो. येथे तसला काही प्रकार नव्हता. येथे प्राप्ती झाली तर सिगारेटच्या एखाद्या पाकिटाची व्हायची. पण त्यासाठी तासन् तास खेळत बसायचे? माझ्या लक्षात काही हे येईना. जपानी जीवन कुठे तरी दबलेले असले पाहिजे. त्याशिवाय या खेळाला अर्थ नाही. ते कुठे दबलेले असेल? कशामुळे दबले असेल? या प्रश्नांचे उत्तर शोधण्यात मी मग्न झालो.

उदास अंतःकरणाने फिरत फिरत आम्ही समुद्र-किनाऱ्यावर जाऊन बसलो. येथे मात्र एक निराळे आतामी दिसले. मी मनात म्हटले की, हेच खरे आतामी आहे. कित्येक तरुण जोडपी हातांत हात घालून येथे मजेने फिरत होती. कित्येक, किनाऱ्यावर प्रियाराधनात दंग होती. आतामी हे जोडप्यानेच भेट देण्याचे स्थान आहे. हे जोडपे लग्नाचे असले पाहिजे असा आतामीचा आग्रह नाही. आतामीचा आग्रह एकच– जे जोडपे येथे आले असेल ते एकमेकांवर अनुरक्त असले पाहिजे.

जपानी जीवनात पति-पत्नींच्या निष्ठा विवाहबाह्य प्रेमाच्या आड येत नाहीत. आपल्याकडे प्रेमाचा अंतिम उद्देश विवाह हाच असतो. विवाहानंतर पती जर दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात सापडला तर आपल्याकडे कौटुंबिक जीवनाची शोकांतिका सुरू होते. जपानमध्ये कौटुंबिक जीवन व प्रेम-जीवन ही दोन भिन्न क्षेत्रे मानली गेली आहेत. एक क्षेत्र मानवी कर्तव्याचे आहे, दुसरे विरंगुळ्याचे आहे, चैनीचे आहे. माणसाच्या जीवनात लहानसेच खरे, पण चैनीला स्थान आहे; हा जपानचा शेकडो वर्षांचा संस्कार आहे. आंघोळ करण्यात जसा पाप-पुण्याचा संबंध नाही तसा विवाहबाह्य प्रेम-जीवनातही नाही. फक्त एका क्षेत्राने दुसऱ्या क्षेत्रात ढवळाढवळ करता कामा नये. एवढा एक नियम पाळला म्हणजे बस्स आहे. मग बायकोदेखील नवऱ्याला एखाद्या मैत्रिणीकडे जायला परवानगी देईल. आपली सांकेतिक नीती व जपानी लोकांची सांकेतिक नीती यांत या बाबतीत बरेच अंतर आहे.

या जोडप्यात एक म्हातारा एका तरुण मुलीच्या कंबरेला विळखा घालून जात असलेला मी पाहिला. मी त्याच्याकडे कौतुकाने पाहू लागलो. इतक्यात नरेश मंत्री म्हणाले— " या म्हाताऱ्याला ही प्रेयसी येथे भाड्याने मिळाली असली पाहिजे. "

म्हणजे? येथे प्रेयसी भाड्यानेदेखील मिळतात? मग हे प्रेम कसले? ही बखबख आहे! ही हातात हात अडकवून जी जोडपी येथे फिरत आहेत त्यांच्यामध्ये

अशीही जोडपी आहेत की, ज्यांच्या प्रेमात हृदयाचा ओलावा नाही! एकाची स्वप्ने दुसऱ्याच्या अंतरंगात उमललेली नाहीत! मग हे प्रेम कसले? हा बाजार आहे! ज्या संस्कृतीला मुक्त प्रेमाचा वारसा मिळालेला आहे तेथे ही विकृती कोठून आली?


माझे मन उद्विग्न झाले. मुक्त प्रेमाची जी कल्पना मी केली होती ती अशी बाजारी असेल असे मला वाटले नव्हते. आम्ही उठलो आणि आमच्या हॉटेलकडे जायला निघालो. मघाशी ज्या रस्त्यावरून आलो होतो तो झकपक रस्ता सोडला आणि मंद प्रकाशाच्या दुसऱ्या रस्त्यावरून जाऊ लागलो. येथे अनेक पेयगृहे होती. आम्ही सावकाश चालत होतो. आम्ही विदेशी आहोत हे तेथे पेयगृहासमोर उभ्या असलेल्या एका इसमाने ओळखले. तो आमच्या मागे आला आणि मोडक्या-तोडक्या इंग्रजीतून काही तरी विनवू लागला. मुंबईत कुलाब्याच्या बाजूला आपण संध्याकाळच्या वेळी पोहोचलो म्हणजे ' साब, प्रायव्हेट! बढिया माल है ' करून जसे काही ' दलाल ' आपल्या मागे लागतात तसेच हे दृश्य होते. मी मंत्रींना विचारले, ' तो काय म्हणतो आहे ? '

" ' स्ट्रीप टीज् ' बघायला चला म्हणून आग्रह करतो आहे. "

' स्ट्रीप टीज् ' म्हणजे एक असा खेळ की, जेथे एक तरुण स्त्री रंगमंचावर येते आणि अलगद हाताने अंगावरचे आपले एक एक वस्त्र काढून जवळ जवळ विवस्त्र बनते.

आतामीचे असले हे छचोर स्वरूप पाहावयास मिळेल याची कल्पना मी केली नव्हती. ज्या उत्साहाने मी या शहरात प्रवेश केला होता तो रात्री पार मावळला! ज्या लोकांच्या संस्कृतीत चैनीलादेखील एक विशिष्ट स्थान आहे तेथे आलेली ही भडक विकृती पाहून माझे मन विषादाने भरून आले. मी आतामीला रात्रीचा राहिलो नसतो तर फार बरे झाले असते असे मला वाटू लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेच्या प्रभावाखाली जपान आले तेव्हापासून ही विकृती येथे सुरू झाली असे जेव्हा मला सांगण्यात आले तेव्हा मला अमेरिकेची अतोनात चीड आली. जपानवर अणुबॉम्ब फेकून अमेरिकेने या देशाचा जेवढा विध्वंस केला त्याच्यापेक्षा हा सांस्कृतिक विध्वंस मला मोठा वाटला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही आतामीचा निरोप घेतला. त्या वेळी ती आळसावून पहुडलेल्या वारांगनेसारखी दिसत होती. कालचे तिचे लावण्य, तिचे हास्य, सर्व काही लुप्त झाले होते!!



## : ७ : एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व

जपानच्या पर्वतराज फुजीचे दर्शन मला सर्वप्रथम आतामीहून हाकोनेला जाताना वाटेत घडले. पण त्याअगोदर आतामीलाच जपानमधील एका उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घेण्याचे भाग्य मला लाभले होते. ते म्हणजे आधुनिक जपानचे आध्यात्मिक नेते महास्थवीर निचिदात्सु फुजीई ऊर्फ ओश्योसामा यांचे होय.

जपानची बहुसंख्य जनता धर्माने बौद्ध असली तरीही जो बौद्ध धर्म तेथे प्रचलित आहे, तो महायान परंपरेतला असून ही परंपरा धर्मानंद कोसंबी प्रभृतींच्या ग्रंथांमुळे आपल्याला परिचित झालेल्या थेरवादी परंपरेहून भिन्न आहे. या उभय परंपरांमध्ये मूलभूत असे कोणते फरक आहेत याचे विवेचन करण्याचे हे स्थान नव्हे. तथापि ओश्योसामाचे जपानच्या सार्वजनिक जीवनातले स्थान समजून घेण्याच्या दृष्टीने काही स्थूल गोष्टींवरून ओझरती दृष्टी फेकणे आवश्यक आहे.

भगवान बुद्धाचे परिनिर्वाण होऊन पुरे शतकदेखील लोटले नव्हते, तो त्यांच्या अनुगामी लोकांमध्ये भगवानांचा अंतिम संदेश कोणता या मुद्द्यावर दोन मोठे तट पडले. त्रिपिटकांत संग्रहित केलेल्या बुद्ध-वचनांना अनुसरून जे चालत होते ते म्हणू लागले की, ' निर्वाण ' हेच बुद्ध मताचे अंतिम ध्येय आहे. अर्थात ज्यांना निर्वाण-

प्राप्ती करून घ्यायची असेल त्यांनी जग आपल्या मागून येईल की नाही याची वाट न पाहता सर्व-संग-परित्याग करून जनन-मरणाच्या फेऱ्यातून स्वतःची सोडवणूक करून घेतली पाहिजे. त्यासाठी त्यांनी भिक्षू बनले पाहिजे.

याच्या उलट दुसरा पक्ष म्हणू लागला की, निर्वाण हे जरी माणसाचे अंतिम ध्येय म्हणून भगवानांनी जगापुढे ठेवलेले असले तरी स्वतः भगवान ज्या अर्थी आयुष्यभर जगदुद्धाराचे कार्य करीत राहिले त्या अर्थी भगवानांचा अंतिम संदेश केवळ वैयक्तिक निर्वाण-प्राप्ती असू शकत नाही. आपण अडचणीच्या जागी ज्याप्रमाणे उदारपणाने स्वतः बाजूला सरून इतरांना पुढे जाण्याचा मार्ग करून देत असतो त्याचप्रमाणे जगदुद्धारासाठी आपली मुक्ती क्षणभर बाजूला ठेवून इतरांना बरोबर घेऊन पुढे जाणे हाच भगवानांचा खरा संदेश आहे.

हे लोक सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न करीत होते. म्हणून ते स्वतःला महायानी म्हणवू लागले. याच्या उलट जे लोक जुन्या परंपरेला चिकटून राहिले ते हीनयानी या नावाने ओळखले जाऊ लागले. ते मात्र स्वतःची ओळख थेरवादी ( म्हणजे जाणत्यांच्या मार्गाचे अनुसरण करणारे ) म्हणून करून देत असतात.

या दोन ' यानां 'पैकी हीनयानाचा प्रसार लंका, ब्रह्मदेश, सयाम वगैरे ठिकाणी झाला. तर, महायानी परंपरा तिबेट, चीन, मंगोलिया, कोरिया व जपानपर्यंत पसरली.

या महायान पंथातून आणखी काही पोटपंथ निघाले. त्यांपैकी जपानमध्ये होस्सो, जिशु, जोदो, केगॉन, रित्सु, शिंगॉन, शिन्शु, तेंदाइ, झेन, निचिरेन, युझु-नेमबुत्सु असे दहा-बारा पोटपंथ चालू आहेत. त्यांतला ' निचिरेन ' पंथ हा शुद्ध जपानी आहे. ओश्योसामा हे या पंथातील एका शाखेचे नेते आहेत.

या ' निचिरेन ' पंथाचे संस्थापक भगवान निचिरेन यांच्याइतके प्रभावी व्यक्तिमत्त्व जपानच्या सबंध धार्मिक इतिहासात दुसऱ्या कुणाचेच आढळत नाही. ते ज्ञानी तर होतेच; शिवाय एक झुंजार योद्धेही होते. बुद्धाच्या नावाने चालणाऱ्या अनेक पंथांपैकी खरा पंथ कोणता याचा अत्यंत तळमळीने शोध लावता ' सद्धर्म पुंडरिक ' या ग्रंथामध्ये विशद करण्यात आलेला धर्म हाच खरा बौद्धधर्म आहे अशा निर्णयावर ते पोहोचले. आणि त्याने भारून जाऊन ते एखाद्या प्रेषिताप्रमाणे त्याचा पुरस्कार करीत फिरू लागले. बुद्धाच्या नावाने चालणारे इतर सर्व पंथ झूट आहेत, ढोंगी आहेत, देशद्रोही आहेत; त्यांनी जपानचा नाश केला आहे, या सर्वांचे उच्चाटन केले पाहिजे, आणि सर्वांनी एक ' सद्धर्म पुंडरिका 'ला शरण गेले पाहिजे, असा प्रचार त्यांनी आरंभला. आपले म्हणणे जर जपानने स्वीकारले नाही तर देशावर विदेशी आक्रमणाच्या रूपाने

एक मोठे संकट येणार आहे असेही ते प्रतिपादू लागले. त्यांच्या या असल्या लढाऊ प्रचारामुळे इतर सारे बौद्धपंथ डिवचले गेले व त्यांनी निचिरेनांचा कडाडून विरोध केला. इतकेच नव्हे तर त्यांनी निचिरेनवर मारेकरीही घातले. त्यांच्या घराला आग लावण्यात आली. पण निचिरेन डगमगले नाहीत. उलट जसजसा विरोध तीव्र होत गेला तसतसे ते शहराशहरांतून, गावागावांतून, गल्लीगल्लीतून अपल्या मताचा प्रचार तीव्रतर करीत फिरू लागले. निचिरेनमुळे शांततेला धोका निर्माण होतो, या सबबीवर त्या वेळच्या सरकारने त्यांना पकडले व त्यांना इसा नावाच्या एका ठिकाणी स्थानबद्ध करून ठेवले. तीन वर्षांनी जेव्हा ते सुटून परत आले, तेव्हा त्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. ते ‘ पुनश्च हरिः ॐ ’ करून त्याच भूमिकेने वावरू लागले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन अनेक अनुयायी त्यांच्या भोवती गोळा होऊ लागले. बरोबर याच वेळी कुब्लाईखान, चीन व कोरिया पादाक्रांत करून जपानवर स्वारी करण्याचा बेत करीत असल्याची बातमी आली. निचिरेननी तावडतोब आपण अगोदर दिलेल्या इशाऱ्याची सरकारला व जनतेला आठवण करून दिली. पण त्याचा परिणाम वेगळा झाला. निचिरेन कुब्लाईखानला फितूर असल्याचा सरकारला संशय आला, आणि त्याने निचिरेनचा शिरच्छेद करण्याची आज्ञा सोडली. एक आख्यायिका आहे की, मारेकऱ्याने निचिरेनवर तलवार उचलली तेव्हा ( जगातील संतांच्या जीवनात सापडणाऱ्या आख्यायिकेसारखीच ही एक आख्यायिका आहे. ) एक चमत्कार घडला. अचानक आकाशाला आग लागल्यासारखी दिसली. आगीचा एक गोळा आग्नेयेकडून वायव्येकडे गेला. हा चमत्कार पाहून मारेकरी गर्भगळित झाला व त्याच्या हातातली तलवार खाली पडली. निचिरेनचा शिरच्छेद करणे अशक्य होऊन बसले. स्वतः निचिरेनच्या मनावर या गोष्टीचा एवढा मोठा परिणाम झाला की, त्यांना स्वतःचा नवा जन्म झाल्यासारखे वाटू लागले. त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि ते पूर्वीपेक्षाही अधिक जोराने आपल्या मताचा प्रचार करू लागले. “ मी म्हणजे जपान आहे. जपान माझ्या खांद्यावर उभे आहे. माझे डोळे जपानचे डोळे आहेत. जपान माझ्या मुखातून बोलेल, माझ्या डोळ्यांतून पाहील ” या वृत्तीने त्यांचा आता प्रचार चालू लागला.

बरोबर याच वेळी कुब्लाईखानचे आक्रमण जपानवर खरोखरीच येऊन ठेपले. सरकार निचिरेनशी तडजोड करायला तयार झाले; पण एका अटीवर. निचिरेननी इतर पंथांची अवहेलना करू नये. पण निचिरेन याला कसे तयार होतील? अनेक पंथांत माझा एक पंथ? शक्य नाही. इतर सारे पंथ नष्ट झालेच पाहिजेत. माझाच एक पंथ खरा आहे. जपानमध्ये हाच एक पंथ चालेल. इतकेच नव्हे तर इथून साऱ्या जगात या पंथाचा प्रचार होईल. या दृढ भूमिकेत ते वावरू लागले.

निचिरेनचे जीवन एका क्रांतिकारी राष्ट्रीय संताचे होते. साहस व संकट यांनी भरलेले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये संताचे मार्दव होते, योद्ध्याचा कणखरपणा होता, ज्ञानवंताची प्रज्ञा होती आणि राष्ट्रनेत्याचा उत्साह होता. संघटनाचातुर्यही त्यांच्यात मुबलक प्रमाणात होते.

तेराव्या शतकातल्या या तेजस्वी राष्ट्रपुरुषाची जपानच्या जीवनावर जबरदस्त छाप आहे, आणि निचिदात्सु फुर्जाई ऊर्फ ओश्योसामांच्या जीवनावर तर ती एवढी मोठी आहे की, त्यांच्याही जीवनामध्ये आपल्याला निचिरेनच्या जीवनाचे थोडेबहुत प्रतिबिंब पाहावयाला मिळते. अर्थात सातशे वर्षांपूर्वीची परिस्थिती आज नसल्यामुळे आपला पंथ सोडून इतर सर्व पंथ नष्ट व्हावेत असे निचिरेनप्रमाणे ओश्योसामा म्हणत नाहीत. पण ' सद्धर्म पुंडरिक 'मध्ये जो धर्म सांगितला गेला आहे तोच खरा धर्म असून तोच जगाला तारणारा असल्यामुळे जगभर त्याचा प्रसार झाला पाहिजे, अशी निचिरेनसारखीच ओश्योसामांचीही श्रद्धा आहे.

श्रद्धावान माणूस जर क्रियाशील असला तर त्याच्यामध्ये एक प्रकारचा कर्मठपणा येत असतो. ओश्योसामांमध्ये तेवढा कर्मठपणा आहे. पण ती त्यांची शक्ती आहे. या कर्मठपणाच्या जोडीला चारित्र्य व तेजस्विता, वक्तृत्व व संघटनकुशलता हेही गुण त्यांच्यामध्ये असल्यामुळे ओश्योसामांनी शेकडो लोकांची निष्ठा संपादन केली आहे. जो एकदा त्यांच्या प्रभावात येतो तो कायमचा त्यांचा होऊन राहतो, इतकेच नव्हे तर तो त्यांचा जवळ जवळ अंध अनुयायी बनून राहतो. आणि मग आपली बुद्धी, ऐश्वर्य, कर्तृत्व – सर्व काही तो त्यांच्या चरणी अर्पण करून टाकतो. स्वभावाने सामान्यतः लोण्याहूनही मऊ, पण प्रसंगी वज्राहूनही कठोर. आपल्या भक्तांवर आईप्रमाणे प्रेम करतील. पण लहानशीदेखील चूक जर त्यांच्या हातून घडली तर त्यांना शिक्षा करताना वज्राहूनही कठोर बनतील.

इतकेही असून आश्चर्य म्हणजे ओश्योसामा हुकूमशाह बनले नाहीत. सत्तेपासून ते नेहमी दूरच राहिले. वैभव व आराम यांच्यापासूनही दूर राहिले. धर्मकार्याला वाहून घेण्याचा जेव्हा त्यांनी संकल्प केला तेव्हा तो संकल्प दृढ करण्याच्या दृष्टीने त्यांनी एक प्रकारची अग्निदीक्षा घेतली– पेटत्या मेणबत्त्या त्यांनी आपल्या दोन्ही बाहूंना लावून घेतल्या होत्या.

जपानच्या बाबतीतली त्यांची भावना निचिरेनच्यासारखीच राष्ट्रवादी. एके काळी म्हणे ते साम्राज्यवादीही होते. पण त्यांच्या साम्राज्यवादाने नंतर निराळे रूप घेतले. आशिया खंडावर जपानची हुकमत चालावी ही जपानी लोकांची महत्त्वाकांक्षा दुसऱ्या

महायुद्धात धुळीला मिळाली. पण जपान आशियाचा निदान " मार्गदर्शक " व्हावा ही भावना ओश्योसामांमध्ये असावी.

ऐन तारुण्यात ते बौद्धक्षेत्रांना भेट देण्यासाठी हिंदुस्थानात आले होते. त्या वेळी गांधीजींच्या आश्रमातही येऊन राहिले होते. गांधीजींनी जेव्हा त्यांना 'तुम्ही येथे कशासाठी आलात ?' म्हणून प्रश्न केला तेव्हा ओश्योसामांनी सरळ 'हिन्दुस्थान जिंकण्यासाठी आलो आहे' असे उत्तर दिले. गांधीजी चपापले. त्यांनी पुन्हा प्रश्न केला– 'कसे ?'

'भगवान् बुद्धांनी जपान जसे जिंकले तसे.' उत्तर मिळाले.

'मग हरकत नाही; तुम्ही खुशाल हिन्दुस्थान जिंका.' गांधीजी म्हणाले.

पण ओश्योसामांनाच गांधीजींनी जिंकले. त्यांनी आश्रमात राहून अहिंसक प्रतिकाराच्या तंत्राचे निरीक्षण केले. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात भाग घेण्याची त्यांची इच्छा होती. पण तशी संधी लाभण्यापूर्वीच ते जपानला परतले. द्वितीय महायुद्धानंतर जपानचे जबरदस्तीने निःशस्त्रीकरण करण्यात आले तेव्हा एखाद्या कुशल राष्ट्रपुरुषाच्या कौशल्याने परिस्थितीचे संधीत रूपान्तर करून ओश्योसामा जपानभर जोरजोराने प्रचार करीत फिरू लागले की, अमेरिकेने आपल्यावर लादलेले हे निःशस्त्रीकरण ईश्वराचे एक वरदान आहे असे समजा, आणि आपण आता हे धोरण सोडता कामा नये असा निश्चय करा. गांधीजींचे तत्त्वज्ञान अमलात आणण्यासाठी त्यांना आता संधी मिळाली, आणि तेव्हापासून त्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्यात शांततेच्या पुरस्काराचीही भर पडली. आज ऱ्याऐंशी वर्षांच्या उतार वयातदेखील ते विश्वशांतीच्या कार्यात लोकमत संघटित करण्यासाठी एकसारखे जपानभर फिरत असतात.

आम्ही आतामीला पोहोचलो त्या दिवशी ओश्योसामाही तेथे आले होते. तिथल्या डोंगरमाथ्यावर जो मोठा स्तूप आहे त्याच्या जवळच्या मंदिरात ते उतरले होते. आम्ही त्यांना भेटायला तेथे गेलो त्या वेळी ते मंदिरात संध्याकाळच्या प्रार्थनेला भगवान बुद्धाच्या देव्हाऱ्यासमोर एका किंचित उंच अशा आसनावर गुडघे टेकून मागच्या बाजूला पायांची जपानी पद्धतीची मांडी घालून बसले होते. त्यांच्या डाव्या हातात चामड्याचा एक गोल पंखा होता. उजव्या हातात एक लहानशी काठी होती, ती त्या पंख्यावर वाजवीत ते 'नम् म्यो होरेंगे क्यों' या मंत्राचा जप करीत होते. त्यांच्या मागच्या बाजूला त्यांचे शिष्य तसेच पंखे वाजवीत त्यांना साथ देत होते. दोन्ही बाजूंना त्यांचे दोघे शिष्य दोन मोठे ढोल वाजवीत बसले होते.

आम्ही तेथे पोहोचलो तेव्हा त्यांच्या शिष्यांनी आमचे स्वागत केले आणि आम्हांला सरळ प्रार्थनामंदिरात नेऊन बसविले. आमच्याही हातांत पंखे दिले गेले. जवळ जवळ अर्धा तास त्या मंत्राचा जप चालला. काकासाहेबांनी मला नंतर त्या


मंत्राचा अर्थ सांगितला. या मंत्रातले ‘ नम् ’ हे संस्कृत ‘ नमः ’ असून ‘ म्यो होरेंगे क्यों ’ हे चिनी व जपानी शब्द आहेत; आणि मंत्राचा अर्थ, ‘ सद्धर्म पुंडरिक सूक्ताला नमस्कार करतो. त्याचा विजय असो, मी त्या ग्रंथाला शरण जात आहे, ’ असा आहे. निचिरेन पंथी लोकांच्या मते हा मंत्र म्हणजे धर्मसर्वस्व आहे. आपल्याकडे जसे काही लोक गीतेला शरण जाताना ‘ गीते माते नमोस्तुते ’ म्हणतील, तसे हे लोक भगवान बुद्धांना शरण जाण्याऐवजी ज्या ग्रंथात भगवानांचा त्यांच्या दृष्टीने खरा उपदेश संग्रहित करण्यात आला आहे त्या ग्रंथाला शरण जातात. हाच मंत्र जगाला तारणार अशी निचिरेनची श्रद्धा होती, आणि त्याने त्याची घोषणा सूर्याला साक्षी ठेवून केली होती. या पंथातील लोक जेव्हा एकमेकांना भेटतात तेव्हा न चुकता या मंत्राचा उच्चार करून एकमेकांना अभिवादन करीत असतात. हे लोक कुठेही जावोत ते आपल्या खांद्याला एक पिशवी लटकावतात. त्या पिशवीत चामडयाचा तो पंखा असतो. तो वाजवीत व या मंत्राचा जप करीत ते जगभर फिरत असतात.

प्रार्थना संपली आणि ओश्योसामा आपल्या आसनावरून उठले. उंची सामान्य जपानी माणसाइतकीच. पण तोंडावळा जरा मोठा. वय झालेले असूनही बांधा मजबूत. दातांना सोन्याची कोर. हसतमुख चेहरा. अशी ती मूर्ती पाहून मी चांगलाच प्रभावित झालो. काकासाहेबांशी नंतर त्यांचे बराच वेळ संभाषण झाले. काकासाहेब हिन्दीत बोलत. ओश्योसामा जपानीत. कात्सु नावाची एक मुलगी दुभाष्याचे काम करीत होती. हिन्दीचा अभ्यास करण्यासाठी ती काकासाहेबांकडे दिल्लीला येऊन राहिली होती. चार-पाच वर्षांनी स्वदेशी परत गेली. सध्या ती ओश्योसामांची भक्तिभावाने व दक्षतेने सेवा करीत असते.

ओश्योसामांशी हा माझा प्रथमच परिचय होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची माझ्यावर चांगली छाप पडली. गांधीजींच्या सहकाऱ्यांपैकी काकासाहेबांविषयी त्यांच्या मनात आपुलकी जास्त. त्यामुळे काकासाहेबांना येथे आलेले पाहून त्यांना फार आनंद झाला होता. वस्तुतः दोघांच्याही जीवनदृष्टीत व कार्यपद्धतीत जमीन-अस्मानाचे अंतर. तरीही दोघांमधला हार्दिक एकोपा पाहून मला अचंबा वाटला.

त्या दिवशी तेथे एक ल्हानसा समारंभ होता. ओश्योसामांच्या मातुश्रींची तेथे जवळच समाधी आहे. तिच्या पायाभरणीचा तो समारंभ होता. त्या समारंभात काका-साहेबांनी छोटेसे भाषण केले.

आम्ही तेथून निघालो तेव्हा रात्र झाली होती. उगवत्या चंद्राने आपली चंदेरी किरणे समुद्रावर फेकून वातावरण प्रसन्न केले होते.



# : ८ : फुजीसानचे प्रथम दर्शन

काकासाहेबांनी आतामीच्या उच्छृंखल लीला पाहिल्या नव्हत्या. तिचे सृष्टि-सौंदर्य पाहूनच ते तिच्यावर खूप झाले होते. ते आहेही तसे खूष होण्याजोगे. त्यांनी आपली ही खुषी दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही आतामी सोडताना पुन्हा एकदा मंदिरात गेलो त्या वेळी ओश्योसामांपुढे व्यक्त केली आणि म्हणाले— 'मी माझ्या देशातल्या लोकांना सांगत असतो की तुम्ही जपानला गेलात तर आतामी पाहिल्या-वाचून राहू नका!'

ओश्योसामा लगेच म्हणाले, 'आतामी तुम्हांला इतकी आवडत असल्यास तुम्ही इथेच का राहात नाही? भारताला परतण्याची काय आवश्यकता आहे? जपान-मधील तुमचा कार्यक्रम पुरा झाल्यावर इथं येऊन राहा.'

काकासाहेब हसले व म्हणाले— 'भारतात काम नसते तर कदाचित राहिलोही असतो.'

मी मनात म्हटले— एखादे सुंदर स्थान पाहिल्यावर तेथेच राहण्याची काका-साहेबांची वृत्ती असती तर ते हिमालयाच्या यात्रेतून परतलेच नसते. सौंदर्याशी तादात्म्य

अनुभवून पुन्हा तटस्थ राहण्याची त्यांच्यात शक्ती वसत असल्यामुळे ते कोठेच चिकटून राहिले नाहीत.

थोडा वेळ तेथे बसून आम्ही निघालो. ओश्योसामांनाही जेव्हा मी आमच्याबरोबर निघालेले पाहिले तेव्हा मला अतोनात आनंद झाला. दोन सत्पुरुषांचा सहवास एकाच वेळी लाभणे व त्यांच्यामध्ये चालणारा संवाद ऐकायला मिळणे ही मोठी पर्वणीच होती !

नागमोडी वळणे घेत घेत आमच्या मोटारी पहाड चढू लागल्या. जसजसे वर जाऊ लागलो तसतसा निसर्ग आपल्या अद्भुत लीला प्रगट करू लागला. आतामीच्या सृष्टिसौंदर्याच्या तुलनेने इथला निसर्ग केवळ अद्भुत होता. क्षितिजापर्यंतचा सारा परिसर अप्रतिम वनश्रीने नटलेला होता. शेकडो–अक्षरशः शेकडो–टेकड्या हिरव्याचार वनश्रीने भारावून गेल्या होत्या. हिरव्या रंगाच्या इतक्या विविध छटा पाहून मीही भारावून गेलो. मला एका जपानी हाइकु कवितेचा इंग्रजी अनुवाद आठवला :

In this land of ours
Even a grass puts forth
Flowers like cherry-blossoms.

मी उजव्या बाजूला पाहू लागलो, डाव्या बाजूला पाहू लागलो. मला प्रत्येक दृश्य अद्भुत् वाटत होते. सृष्टिसौंदर्यांच्या दृष्टीने जपान स्वर्गीय आहे याची मला येथेच सर्वप्रथम जाणीव झाली.

डोंगरमाथ्यावर पोहोचल्याबरोबर अचानक आमच्या गाड्यांचा वेग कमी झाला. आमच्या पुढच्या गाडीत काकासाहेब व ओश्योसामा यांना डाव्या बाजूला काही तरी पाहात असल्याचे मी पाहिले. मीही माझी दृष्टी त्या बाजूला वळवली. तेथे एक रम्य–भीषण खोरे होते. त्यात एक कृष्णनील सरोवर दिसले आणि त्याच्या पलीकडे—

आकाशाच्या रंगाशी मिसळलेला व सारे क्षितिज व्यापून राहिलेला जपानचा पर्वतराज फुजीयामा दिसला ! आम्ही गाडी थांबविली आणि खाली उतरलो.

आमच्या सह्याद्रीच्या अनेक विभूती मी पाहिल्या आहेत. बेळगावहून सावंतवाडीला जाताना वाटेत पाहायला मिळणारी आंबोलीची विभूती, गोव्याला मोटरीने येताना दिसणारी अनमोड घाटाची विभूती, आणि रेल्वेतून आलो तर दूधसागरला डोक्यावर घेतलेली तिनईघाटची विभूती–अशा त्याच्या किती तरी विभूती मी अनेकदा पाहिल्या आहेत आणि माझी कधी तृप्ती झालेली नाही. शिवाय हिमालयाच्या यात्रेत मी नगाधिराजाच्या सान्निध्यात दीडदोन महिने राहिलो आहे. गंगोत्री, जम्नोत्री, केदार व बद्री

अशा ज्या त्याच्या काही भव्य व संस्कृतिमान्य विभूती मला पाहावयास मिळाल्या त्या चिरस्वप्नांसारख्या माझ्या मनात कायमच्या राहिल्या आहेत.

पण आज जेव्हा फुजीयामा प्रत्यक्ष समोर उभा असलेला दिसला तेव्हा मी काव्यमस्त होऊन सारे दृश्य पिऊ लागलो.

जपान हा देशच पर्वतांचा आहे. एकाहून एक सुंदर असे शेकडो पर्वत येथे आहेत; पण या पर्वतप्रदेशातदेखील जो एक पर्वत सर्वांत आगळा दिसतो तो म्हणजे फुजीयामा. तो आपल्या हिमालयाइतका उंच नाही. त्याच्या अर्ध्यानेही नाही. ( आल्प्स् जरी मी पाहिलेला नसला तरी त्याच्यासंबंधी ऐकले आहे त्यावरून म्हणतो ) हा आल्प्स्सारखा गर्वोन्नतही नाही, पण तो अद्वितीय आहे यात शंकाच नाही. चोहोबाजूंनी सारखाच वाटणारा हा पर्वत जपानचा राष्ट्रीय पर्वत आहे. जपानच्या हृदयामध्ये याला जे स्थान प्राप्त झाले आहे ते पार्थिव नसून देवतेचे आहे. जपानी माणूस याला फुजीयामा कधी म्हणायचा नाही. फुजी ' सान ' म्हणेल. तो केवळ दगडधोंड्यांचा पर्वत नाही. तो देवता आहे. जपानच्या उत्तमोत्तम कवींचे हे स्फूर्तिस्थान आहे. उत्तमोत्तम चित्रकारांचे स्वप्न आहे. जपानी संस्कृतीमध्ये जे काय उच्च, उदात्त, भव्य, मंगल, स्थायी आहे त्या सर्वांचे हे प्रतीक आहे.

त्याच्या दर्शनाने मी धन्य झालो. वैगुण्य एकच होते, त्याच्या माथ्यावर पर्वतांना शोभा आणणारा बर्फाचा मुकुट नव्हता. बर्फाचे नुसते दोनच पट्टे सामुराईच्या कमरेला लटकावलेल्या तलवारीसारखे भासत होते.

नरेश मंत्री हे तर त्याचे एक भक्त. त्याला पाहून ते म्हणाले, " आपण मोठे भाग्यवान आहोत. याच्यासारखा लहरी पर्वत दुसरा नाही. दर्शन दिले तर दिले नाही तर राहील गुप्त. " असे म्हणून ते आपला कॅमेरा घेऊन त्याला पकडायला पुढे सरसावले. मी त्याला हृदयात स्थिर करायला लागलो. जसजसा मी त्याच्याकडे पाहू लागलो तसतसे जपानी लोकांना याचा मोठा अभिमान का आहे हे मला उमजू लागले. खरोखर जगातील सुंदर पर्वतांपैकी हा एक आहे. किती भव्य, सर्वतोभद्र आणि घोटीव आहे ! सृष्टीचे हे एक उदात्त काव्यच आहे !

नरेश मंत्रींचे फोटो काढून झाल्यावर आम्हांला निघावे लागले. मोटार सुटली तेव्हा मंत्री म्हणाले—हाकोनेहून गोतेम्बाला गेलो म्हणजे तेथून फुजीसानचे आपल्याला चांगले दर्शन होईल. गोतेम्बा त्याच्या पायथ्याशी वसलेले आहे.

उन्हाळ्याचे दिवस होते ( जपानमध्ये जुलै व ऑगस्टमध्ये उन्हाळा असतो ) तरीही सभोवतालचा परिसर अगदी हिरवाचार होता. दूरदूरचे डोंगर आकाशाच्या

रंगाशी असे काही मिसळले होते की, निळ्या व हिरव्या रंगांत फारसा फरक जाणवत नव्हता. आमचा रस्ता एका जुन्या रस्त्याला समान्तर जात होता. त्याच्याकडे बोट दाखवून मंत्री म्हणाले, ‘ हा एक प्रसिद्ध रस्ता आहे. क्योतोपासून तोक्योपर्यंतच्या या रस्त्याला तोक्कायदो हे नाव असून त्याचे त्रेपन्न पडाव आहेत. ’

जपानला निघण्यापूर्वी मी जपानी चित्रकलेचे एक पुस्तक चाळले होते. त्यात मी या रस्त्याची काही चित्रे पाहिली होती. मला त्याची आठवण झाली आणि मी विचारले, ‘ एका जुन्या चित्रकाराने काढलेली जी प्रसिद्ध चित्रे आहेत ती याच रस्त्यावरील दृश्याची ना ? ’

‘ होय. हिरोशिगो हे त्याचे नाव. त्याची चित्रे हा जपानी चित्रकलेचा एक मौल्यवान ठेवा आहे. पण त्या चित्रांइतकेच महत्त्वाचे ‘ जिप्पेनशा ’ नावाच्या एका लेखकाचे या रस्त्यावरून केलेल्या यात्रेच्या वर्णनाचे एक पुस्तक आहे. जपानी साहित्याची ती एक अमर-कृती आहे. ’ मंत्र्यांनी पुस्ती जोडली.

मी तो रस्ता निरखून पाहिला. तो जुना असला तरी दुतर्फा उभ्या असलेल्या गगनचुंबी वृक्षांमुळे त्याच्यात एक प्रकारची भव्यता प्रतीत होत होती. जुन्या काळी या रस्त्यावरून पायी यात्रा करणाऱ्यांच्या अनुभवाला येणाऱ्या आनंदाची कल्पना मी करू शकलो.

पण फुजीसानवर जे माझे लक्ष खिळले होते ते काही केल्या हालेना. त्याला आपल्या कॅमेऱ्यात पकडण्याचा मंत्र्यांचा उद्योग चालत्या गाडीतूनदेखील चालला होता. फुजीयामा एका काळी एक धगधगता ज्वालामुखी होता या गोष्टीवर विश्वासच बसत नव्हता. आज दोनशे वर्षे झाली, तो शांत पडला आहे. परंतु दोनशे वर्षांपूर्वी त्याच्या मुखातून धुराचे लोट निघत असत व ते आकाशातील ढगाशी जाऊन मिसळत असत, त्या वेळी तो कसा दिसत असावा याची मी कल्पना करू लागलो. आज त्याच्या परिसरात कित्येक सरोवरे आहेत, कित्येक पर्वत आहेत आणि विविध प्रकारच्या वनश्रींनी नटलेली जंगले आहेत. पण त्या वेळी येथे काय होते ? त्या वेळी हा भूभाग इतकाच रमणीय दिसत होता की भीषण होता ? दोनशे वर्षे म्हणजे काही फार जुना काळ नव्हे.

मी कल्पना लढवू लागलो. इतक्यात मघाशी जे सरोवर डोंगरमाथ्यावर दिसले होते त्याचे पुन्हा दर्शन घडले. आता आमच्या गाड्या त्याच्या काठावरून धावू लागल्या. त्याचे पाणी एखाद्या महाकवीच्या प्रतिभेसारखे शांत, शीतल व स्वच्छ होते. आसपासच्या निसर्गावरून लावण्य ओसंडत होते. आमची वाट कधी सरोवराच्या सपाटीपर्यंत उतरत असे तर कधी दुरून त्याची शोभा न्याहाळता यावी म्हणून उंच

होत असे. मी प्रथमदर्शनीच या सरोवरावर आशक झालो. आता स्नान-पान-दान केल्याशिवाय पुढे कसे जाता येईल ? इतक्यात आठवण झाली की, मी भारतात नसून विदेशात आहे. मंत्रींनी माझ्या हृदयातील आनंदाच्या लहरी माझ्या चेहऱ्यावर पाहिल्या असाव्यात. ते म्हणाले, 'आता आपण थोड्या वेळाने गोतेम्बाला पोहोचणार आहोत. तिथून पुन्हा येथे परतून आठवडाभर या सरोवराच्या काठावर राहणार आहोत.' 'आदिंचि साखर आवडे आणि तेचि जरी ओखदा जोडे' अशी माझी स्थिती झाली. आता प्रश्न होता तो नावाचा. रूपाशी नाव जोडले गेले नाही तर कुठल्या प्रवाशाचा आत्मा संतुष्ट होईल ? मंत्री तर माझ्यासारखेच आनंदाचे उपासक. निसर्गाचे हे काव्य पाहून त्यांचे हृदय केव्हाच विरघळून गेले होते. खरोखर स्वतःला हरवून बसण्याजोगेच हे दृश्य होते. काव्याचा एवढा मोठा विस्तार अनुभवल्यानंतर कुठला रसिक गप्पा-गोष्टींत लक्ष घालील ? त्यांच्या हातातला कॅमेरा हे दृश्य टिपून घेण्यासाठी जेव्हा पुढे सरसावला तेव्हाच मी त्यांना हाक मारली व सरोवराचे नाव विचारले. ते म्हणाले, "सरोवराचे नाव 'आशी' आहे. जपानी लोक याला 'आशिनोको' म्हणतात. 'नो' म्हणजे 'चे' आणि 'को' म्हणजे सरोवर, आशीचे सरोवर."

त्यानंतर आम्हांला बोलावेसे वाटेना; आम्ही निःस्तब्ध झालो. पावलोपावली आश्चर्य आणि चमत्कृती प्रत्ययाला येत होती. शिवाय आता सूर्य बराच वर आला होता. त्यामुळे सभोवतालची वनश्रीही चकाकू लागली होती. पायी आलो असतो तर हे सौंदर्य, पावित्र्य, शांती आणि हे काव्य पाहून आमचे पाय येथेच खिळून राहिले असते. पण आम्ही वाहनात होतो, आणि आमचे वाहन भर वेगात धावत सुटले होते.

एकाएकी आमची मोटार डाव्या बाजूला वळली, आणि इतक्यात ढम्…ढम्… ढम् चामड्याच्या पंख्यांचा आवाज आणि 'नम् म्यो होरेंगे क्यों' मंत्राचा उद्घोष कानी पडला. आम्ही हाकोनेच्या पलीकडे, फुजीसानच्या पायथ्याखाली गोतेम्बाला पोहोचलो होतो. मंदिरात काकासाहेबांचे स्वागत चालले होते, आणि मंदिराच्या मागच्या बाजूला भव्य फुजीसान भगवान् बुद्धाच्या देशातल्या या पाहुण्याला आशीर्वाद देण्यासाठी उभा होता.



## : ९ : कृष्ण सरोवर ‘ आशी ’

गोतेम्बाच्या अलीकडे हाकोने आहे. तेथे आशी सरोवराच्या काठाजवळ एका उंचवट्याच्या जागेवर ‘ कागेत्सुयेन ’ नावाच्या एका हॉटेलात आमची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. आमच्या खोल्या चौथ्या मजल्यावर होत्या. खिडकीतून बाहेर दृष्टी फेकली असता समोर सरोवर दिसायचे आणि उजव्या बाजूच्या टेकडीमागे फुजीसानचे शिखर दिसायचे. बाकीचा सारा परिसर हिमालयातील चीड किंवा देवदार-सदृश वृक्षांनी नटलेला.

उन्हाळ्याचे दिवस होते. तरीही येथे तपमान शून्याच्या खाली उतरले होते. एखाद्या दिवशी पिरिपिरी पाऊसही पडायचा. कधी धुके इतके पसरायचे की समोरचे सरोवर, सभोवतालची झाडे, फार कशाला, माथ्यावरचे आकाशदेखील आपण एखाद्या विरळ पडद्यामधून पाहत आहोत असा भास व्हावयाचा. अशा वेळी फुजीसान तर लुप्तच व्हायचा. आम्ही येथे एक आठवडा होतो. तिसऱ्या की चौथ्या दिवशी असेच धुके पसरले असताना काकासाहेब म्हणाले, “ इथला निसर्ग मोठा कलाकार आहे. अभिजात कलेला वस्तूंचा सगळा तपशील सहन होत नसतो. जे काही सूचक, उठावदार असेल, आकर्षक असेल तेवढेच ठेवावे, बाकीचे सर्व पुसून टाकावे आणि तेही अशा

सफाईने की, हे पुसलेले सर्व बेमालूमपणे लुप्त न होता त्याची मोहकपणे किंचित जाणीव व्हावी, हा उत्तम कलेचा स्वभाव आहे. तो इथल्या निसर्गाला चांगला साधला आहे."

काकासाहेबांना कदाचित काही लिहिण्याची स्फूर्ती झाली असेल असे मला वाटले आणि मी त्यांना म्हणालो– "आपल्याला काही लिहावयाचे असल्यास मी ते लिहून घ्यायला तयार आहे."

पण काकासाहेब बाहेर दृष्टी खिळवून म्हणाले, "आपल्याला हे शब्दबद्ध करता यावे एवढ्यासाठीच परमेश्वराने ही अद्‌भुत लीला पसरून ठेवली आहे काय?"

मी समजलो. सौंदर्याचा जो प्रवाह येथे वाहात होता त्याला शब्दबद्ध करायला गेलो असता त्याचे अंकन झाले नसते. नुसते सूचनच झाले असते. जो खरा रसिक असतो तो आपला सारा आनंद शब्दबद्ध थोडाच करतो! अशा निरतिशय आनंदाच्या वेळी समानधर्मी लोकांबरोबर सौंदर्यपान करण्यातच खरे सुख असते. सुदैवाने आम्ही सारे जण सौंदर्य-रसिक होतो. एकमेकांच्या सोबतीने सात्त्विक आनंदाचा उपभोग द्विगुणित करण्यात आनंद मानणारे होतो.

मला तर सौंदर्याचे जे नवे नवे उन्मेष रोज येथे दिसत असत ते पाहून स्वतःला येथे हरवून टाकावेसे वाटायचे. खरोखर हाकोनेला यायचे ते स्वतःला हरवून टाकण्यासाठीच.

जपानला ईश्वराने जसे अप्रतिम सृष्टिसौंदर्य दिले आहे तशी इथल्या लोकांना उच्च प्रकारची सौंदर्यबुद्धीही दिली आहे. जपानने आधुनिक विज्ञानाचा आश्रय घेऊन भौतिक प्रगतीत कमालीची आघाडी गाठली. अद्यतन असे सर्व प्रकारचे उद्योगधंदे सुरू केले. स्वतःला पुरून उरेल इतका माल तयार करून जपान पुन्हा ऐंशी टक्के माल निर्यातही करू लागला. या गोष्टीचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. पण त्याने हे सर्व आपल्या अद्‌भुत-रम्य प्राकृतिक दृश्यांना यत्किंचितही बाधा येऊ न देता केले हे महत्त्वाचे आहे. त्याने हे सर्व एकादेखील झाडावर कुऱ्हाड न चालविता केले; मानवांना आनंद व संस्कारिता यांची दीक्षा देणाऱ्या कोणत्याच प्राकृतिक विभूतीच्या विरुद्ध पाखंडी विद्रोह न करता केले, या गोष्टीचे खरे कौतुक झाले पाहिजे.

हाकोनेला सिमेंट-कॉंक्रीटचे रस्ते आहेत. वीज आहे, अद्यतन अशा मोटारगाड्या आहेत. अतिशय कठीण असा पर्वत-कडा सहज चढविणाऱ्या 'केबल-ट्रेन' आहेत. डोंगरमाथ्यावरून व्योमयात्रा करवून सरोवराकडे पोहोचविणारी 'रोप-वे' आहे.

सरोवरात विहार करता यावा म्हणून वाफर आहेत, मोटार-बोटी आहेत. आधुनिक विज्ञानाचा जेवढा उपयोग करता येईल तेवढा करून येथे सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. फार कशाला, सभोवताली जे दाट जंगल दिसते तेदेखील सौंदर्य-वृद्धीसाठी मानव-निर्मित आहे. त्यातले प्रत्येक झाड प्रयत्नपूर्वक लावलेले आहे. इतके असूनही हे स्थान हिमालयातल्या एखाद्या स्थानाइतकेच रम्य-भीषण आहे!

एके दिवशी वातावरण स्वच्छ होते. अशा वेळी दुपारी गोतेम्बाहून ओश्योसामा आपल्या काही शिष्यांसह हाकोनेला आमच्याकडे आले आणि आम्हांला मोटारीतून 'गोरा' नावाच्या एका 'स्टेशन'वर घेऊन गेले. तेथे आम्ही डोंगराच्या कड्यावरून चालणारी 'केबल-ट्रेन' पकडली आणि डोंगर-माथा चढून तेथे 'रोप-वे'त बसलो. आठ-दहा माणसे मात्र बसू शकतील एवढाच हा रोप-वेचा डबा होता. लोखंडी दोरखंडा-वरून तो झुलत झुलत थेट आशी सरोवराच्या काठापर्यंत जात होता. आम्ही त्यात बसलो आणि—

खाली एक वेगळेच विश्व पसरलेले दिसले! इतके हिरवेगार व सुंदर की काय करू – काय नको असे वाटायला लागले. खालची झाडे उन्हात चकाकत होती. क्षणाक्षणाला रंग बदलत होती. डोळ्यांनी कितीही पाहिले तरी तृप्ती होईना. पण हा आठ-दहा मिनिटांचाच अनुभव होता. पुढे तर दबलेल्या एका ज्वालामुखीचा द्रोण लागला. आमच्या डब्यात एक चुणचुणीत मुलगी होती. ती प्रवाशांना खाली दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे महत्त्व समजावून देण्याचे काम करीत होती. हा द्रोण दिसल्याबरोबर तिने आपला आवाज असा काही बदलला की जपानी भाषेचे एक अक्षरदेखील न कळणाऱ्या मला ती काय सांगते ते कळू लागले. त्या द्रोणात मध्ये मध्ये भोके पडली होती व त्यांतून गंधकाच्या ज्वाला निघत होता. सुगंध-दुर्गंधाच्या बाबतीत अगदीच स्थितप्रज्ञ झालेल्या माझ्या नाकालादेखील त्याची उग्रता जाणवली. मला नंतर कळले की या द्रोणाचा व्यास दीड हजार मीटरचा असून त्या ज्या ज्वाला निघत होत्या त्यांची उष्णता इतकी असते की त्यात अंडे टाकले तर ते जळून त्याचा कोळसा बनतो. तीस-पस्तीसच मिनिटांची ही व्योमयात्रा मला इतकी रोमांचक वाटली की तिची आजदेखील आठवण काढल्यास माझ्या अंगावर शहारे येतात. वस्तुतः हा ज्वालामुखी दबलेला होता, मृत्यु-पंथाला लागलेला होता. जपानच्या प्रवासात पुढे सेन्सुइक्योला गेलो असता तेथे जवळ असलेल्या आसो नावाच्या एका जिवंत ज्वालामुखीच्या तोंडात डोकावून पाहण्याचा योग आला होता. त्या वेळच्या अनुभवाच्या मानाने आजचा अनुभव छोटासाच मानला पाहिजे. पण तो पहिला अनुभव होता. त्यामुळे अजूनही तो माझ्यासमोर जिवंत उभा आहे.

९८९८८

हां हां म्हणता आम्ही सरोवराच्या काठावर येऊन पोहोचलो. काकासाहेब व ओश्योसामा अगोदर एका वाफरात जाऊन बसले होते. आम्ही आत बसल्याबरोबर वाफर चालायला लागला. जणू काय तो आमचीच वाट पाहात होता. वाफरात आमच्या तुकडीशिवाय जपानी तरुण-तरुणींची एक तुकडी होती. जपान हे स्वभावतःच निसर्ग-वेड्यांचे राष्ट्र आहे. निसर्गाने आपले सगळेच वैभव या राष्ट्रावर ओतलेले आहे. त्याचा परिणाम म्हणून की काय, इथल्या लोकांचे हृदय अत्यंत संवेदनक्षम बनले आहे. सृष्टीची विभूती जेथे जेथे ऐन ऐश्वर्यात प्रगट झालेली दिसते तेथे तेथे या लोकांच्या टोळयाच टोळया भटकायला निघतात. तसली ही एक समानधर्मा टोळी आज आमच्याबरोबर सरोवरात विहार करायला निघाली होती.

सरोवराचा आकार वाकडातिकडा होता. जेथे पाहावे तेथे ल्हान ल्हान टेकड्या सरोवराच्या आरशात स्वतःचे दर्शन घेत बसलेल्या दिसत होत्या. त्यांच्यावरची वनश्री सरोवराच्या निळया पाण्यात मिसळून गेल्यासारखी दिसत होती. किती तरी वेळ आम्ही त्या सरोवरात सहल केली. प्रत्येक कोपऱ्यातून त्याचे काव्य खुलून दिसायचे. मी तर या आनंद-लोकाच्या यात्रेत इतका दंग झालो की मी कुठे आहे– जागृतीत की स्वप्नात, भूलोकात की स्वर्गलोकात– याचे मला भान राहिले नाही. ओश्योसामांनी जेव्हा मला ‘ कसे वाटले जपान ?’ म्हणून विचारले तेव्हा ‘ नुसता स्वर्ग आहे– स्वर्ग ’ असेच उत्तर माझ्या तोंडून निघाले.

मोतो-हाकोनेला ( म्हणजे जुन्या, मूळ हाकोनेला ) जेव्हा आम्ही उतरलो तेव्हा दुपारचे चार वाजले होते. जवळ जवळ तीन तास आम्ही या स्वप्नसृष्टीत विहार करीत होतो. तरीही मन तृप्त झाले नव्हते. निसर्गाचे दर्शन कितीही डोळे भरून, हृदय भरून घेतले तरी तृप्ती कधी व्हायचीच नाही. मोतो-हाकोनेला शरद पंड्यांनी ठराव आणला– आम्हांला ‘ स्पीड-बोट ’ने आणखी एकदा एक चक्कर मारण्याची परवानगी देण्यात यावी. ठराव पास झाला. पण फक्त मी, मंत्री व पंड्या या तिघांनाच परवानगी मिळाली. पण हे राम ! गेलो आणि आलो ! एवढे मोठे सरोवर अवघ्या दहा मिनिटांत पाहावयाचे म्हणजे अरसिकतेची कमालच म्हटली पाहिजे. तरीही त्वरित गतीने का होईना, पुन्हा एकदा साऱ्या सरोवरावरून दृष्टिक्षेप करता आला याची धन्यता अनुभवायला मिळाली. वाफरमधून केलेला जलविहार संथ गतीने केला होता तेव्हा टेकड्या दुरून चांगल्या खुलून दिसत होत्या. स्पीड-बोटने आम्ही काठाकाठाने सहल करू शकलो. त्यामुळे टेकड्यांना जवळून पाहण्याचा योग आला. पण त्यांचे सौंदर्य मुळीच कमी वाटले नाही.

[illegible] ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]

संध्याकाळ झाली होती. आम्ही परतलो. सरोवराच्या काठाकाठावरून आमचा रस्ता जात होता. येथेदेखील सौंदर्य पसरले होते आणि सरोवराचे मधून मधून दर्शनही घडत होते. माझ्या मनात विचार आला, मघाशी आम्ही सरोवरात होतो, आता सरोवराच्या बाहेर आहोत. पण सरोवराचा काठ हा सरोवराचाच भाग नव्हे काय? आंगठीतला खडा हा आंगठीपासून वेगळा मानायचा काय? या सरोवराला जी शोभा आली आहे ती केवळ त्याच्यातल्या पाण्यामुळे नाही. त्याच्या काठावरच्या वनश्रीचाही त्यात भाग आहे.

हॉटेलात पोहोचल्याबरोबर काकासाहेबांनी दुसरा एक विचार माझ्यासमोर ठेवला. ते म्हणाले– "सरोवराची शोभा पाहून सर्वांच्याच डोळ्यांत सारखीच प्रसन्नता तरळत होती. पण ती खरोखर सारखीच होती की त्यातही विविधता होती? आम्हा सर्वांच्या डोक्यांत जे विचार चालत होते त्यांच्यामध्ये समानता होती काय? आता आमचीच गोष्ट घ्या. मी जेव्हा हे सरोवर पाहात होतो, तेव्हा, आतापर्यंत पाहिलेल्या देश-विदेशांतल्या सरोवरांशी त्याची तुलना करीत होतो. सरोजच्या डोक्यातदेखील अशाच काही जुन्या आठवणी ताज्या झाल्या असतील. तुम्हांला कदाचित गोव्यातील एखाद्या खाडीत केलेल्या नौकाविहाराची आठवण झाली असेल. आपल्या सर्वांच्या जीवनानंदात काही साम्य अवश्य आहे; पण आपल्यापैकी प्रत्येकाचा आनंद किती भिन्न प्रकारचा असेल? आणि ते जपानी लोक? त्यांना कोणत्या प्रकारचा आनंद झाला असेल? आपण सर्वांनी आज एकत्र बसून सरोविहार केला. पण आपल्यापैकी प्रत्येकाचा जीवनप्रवाह जसा निराळा तसा जीवनानंददेखील किती निराळा असेल याचा तुम्ही विचार करून पाहा. म्हणजे तुम्हांला एक निराळया प्रकारची आनंदयात्रा केल्याचा अनुभव येईल."

मी विचारात पडलो. डोके त्या दिशेने चालवू लागलो. पण जीवन हे इतके गूढ आहे की मला त्याचे नीट आकलन होईना. फार कशाला, खुद्द मला जी जीवनानुभूती आज झाली तिचे पुरे अंकन मला कुठे करता येते? सृष्टीचे खरे सौंदर्य जिवंतपणात आहे. त्याचे निरीक्षण हृदय उन्नत करण्यासाठीच करायचे असते, शब्दांनी बांधून ठेवण्यासाठी नव्हे.

अचानक मला आठवण झाली– आज फुजीसान कुठे गेला? आज सकाळपासून हवा स्वच्छ होती. पण फुजीसानने आज चुकूनदेखील आम्हांला दर्शन दिले नव्हते. जणू दर्शन दिले तर आमचे सारे लक्ष त्याच्याकडेच केंद्रित होईल आणि सभोवती जी लीला पसरली आहे तिचा आनंद उपभोगण्याच्या बाबतीत आमच्याकडून कुचराई होईल असा विचार करून त्याने आज गुप्त राहणेच पसंत केले असावे. कुणी सांगावे?

तो दगड-धोंड्यांचा पर्वत थोडाच आहे! ईश्वराची ती एक चैतन्यमय विभूती आहे. त्याने काय विचार केला असेल, कसे कळेल?

आम्ही जेवण करून रात्री गच्चीवर जाऊन बसलो आणि ज्या दिशेने फुजीचे शिखर दिसत असे तेथे एकसारखे पाहू लागलो. पण तो शेवटपर्यंत दिसला नाही तो नाहीच. त्याने जणू आज आम्हांला आदेशच दिला होता की आज जे पाहिले ते अगोदर हृदयस्थ करा. त्यानेच अगोदर भाव-समृद्ध व्हा. तुम्हांला पुन्हा केव्हा दर्शन द्यायचे हे मी स्वतःच ठरवीन. तुम्ही जे आज पाहिले ते काय थोडे आहे? जीवनात तुम्हांला नवनवे अनुभव यापुढे पुष्कळ येतील. पण आज जो तुम्ही अनुभव घेतला आहे त्याची गोड आठवण मात्र कायम राहील.

हो, ती कायम राहील यात शंकाच नाही.



# : १० : पर्वतराज फुजीच्या पाठीवर

सृष्टि-निरीक्षणाने मनुष्याला आनंद का होतो? ज्या लोकांचा कल अध्यात्माकडे असतो त्यांना जर आपण हा प्रश्न विचारला तर ते म्हणतील—' आम्हांला तर बुवा सृष्टि-निरीक्षणात साक्षात ईश्वराचेच दर्शन होत असते. हे विश्व म्हणजे विष्णूने परिधान केलेले एक वस्त्रच आहे. त्यानेच हे विश्व आपल्या मायेने निर्माण केले आणि नंतर त्याने स्वतः त्यात प्रवेश केला. आपले दर्शन घ्यायचे असल्यास ते या विश्वामार्फतच घ्या असाच जणू त्याचा आदेश आहे.'

हे लोक नद्या, समुद्र, सरोवरे, पर्वत-शिखरे, जंगले, प्राणिसृष्टी, वनस्पति-सृष्टी वगैरे विश्वाच्या निरनिराळया विभूती पाहतात आणि मग त्यांना त्यांत असलेला विष्णू दिसायला लागतो.

माझाही अध्यात्माकडे थोडाबहुत कल आहे. नाही कसे म्हणू? पण मी काही वरील प्रकारचे उत्तर देण्याचे धाडस करणार नाही. सृष्टि-निरीक्षणातून मला सृष्टिकर्त्याचे दर्शन होते असा दावा मी कसा करू? पण मी जेव्हा सृष्टीकडे पाहतो तेव्हा तिच्याकडे आकृष्ट होतो, आणि तिचे निरीक्षण करताना मला एक प्रकारचा अनिर्वचनीय आनंद

होत असतो हे मात्र मला निःसंकोचपणे कबूल करावे लागेल. इतकेच नव्हे तर सत्याची प्रतारणा होऊ नये म्हणून मला हेही मान्य करावे लागेल की, जेव्हा सृष्टीच्या एखाद्या उन्मेषाचे निरीक्षण करतो तेव्हा मला त्याचे आणि माझे काही तरी नाते आहे असे अगदी प्रकर्षाने वाटायला लागते, आणि माझे हृदय त्याच्याशी एकतानता साधायला प्रवृत्त होते. ब्रह्मानंद हा काय प्रकार आहे याचा मला अनुभव नाही. पण सृष्टि-निरीक्षणामुळे होणाऱ्या आनंदाचा मला अनुभव आहे; आणि जेव्हा मी प्रवासाला निघतो तेव्हा माझा प्रधान हेतू मला हा आनंद उपभोगायला मिळावा हाच असतो. हाकोनेच्या आमच्या वास्तव्यात मला हा आनंद यथेच्छ अनुभवायला मिळाला.

फुजीने तर अगदी कमालच केली होती. ज्या दिवशी आकाश स्वच्छ असायचे त्या दिवशी तो आपल्या साऱ्या ऐश्वर्यासहित समोर उभा राहायचा. त्या वेळी तो सुंदरच दिसायचा. कधी ढग यायचे व त्यांचे एक मोठे संमेलन त्याच्या पायथ्याखाली भरायचे. त्या वेळी तो स्वर्गातून खाली उतरतो आहे असा भास व्हायचा. एखादे वेळी धुके इतके पसरायचे की फुजीचे नुसते सूचनच व्हायचे. त्या वेळची त्याची शोभा शब्दांनी वर्णन करता यायची नाही. फ्रेडरिक स्टार नावाच्या त्याच्या एका भक्ताचे एक छोटेसे फुजीस्तोत्र मला येथे वाचायला मिळाले. स्टार म्हणतो—

Fuji bare and naked in a blaze of Sunshine is beautiful.
Fuji with its summit wrapped in cloud and mist is more beautiful.
Fuji blotted out by the fog until but a hint or a line is left is most beautiful.

एके दिवशी पहाटेला आकाश अगदी स्वच्छ होते. मी उठल्याबरोबर पश्चिमेकडे दृष्टी फेकली. फुजीच्या चेहऱ्यावर उषेच्या रक्तिमेचे स्मित फाकले होते. मी अनिमिष नेत्रांनी हे दृश्य पाहू लागलो. त्याच्या चेहऱ्यावर पसरलेला शेंदरी रंग घटकेत गडद व्हायचा, घटकेत नाहीसा व्हायचा. काय करावे, मला काहीच सुचेना. नरेश मंत्री बाथरूममध्ये गेले होते. शरद पंड्या दुसऱ्या खोलीत होते. काकासाहेबांची खोली जरा दूर होती. त्यांना फोन करून कळवायला मला येथून उठावे लागले असते. उठलो असतो तर क्षणाक्षणाला बदलणाऱ्या या छटांना मला मुकावे लागले असते. शेवटी अप्पलपोट्या बनून एकटा-एकटाच मी हे दृश्य पिऊ लागलो.

आकाश निरभ्र असले आणि फुजीने कृपा केली तर आज त्याच्यावर आरोहण करायचे असे कालच ठरले होते. आज हा योग घडून येईल या विचाराने मी आनंद-विभोर झालो. सकाळच्या न्याहरीसाठी जेव्हा आम्ही सर्व हॉटेलच्या 'ग्रील रूम'मध्ये एकत्र आलो, तेव्हा सरोजबेन म्हणाल्या– 'आजे सवारनुं दृश्य केवुं सरस हतुं!'

मी प्रफुल्लित होऊन विचारले– ' तमे जोयुं तुं ? '

काकासाहेब म्हणाले– ' रंगांचा जो सबंध थाट होता तोच खास बघण्याजोगा होता. '

नरेश मंत्रींना काही हे भाग्य लाभले नव्हते. पण ते आज आपल्याला फुजीची यात्रा करायला मिळेल या विचारानेच प्रफुल्लित झाले होते.

आम्ही हाकोनेहून गोतेम्बाला गेलो. गोतेम्बा हे फुजीचे महाद्वार आहे. एकंदरीत पाच मोटारी निघाल्या. ओश्योसामाही आमच्याबरोबर निघाले. गोतेम्बाहून एका तासाच्या वाटेवर फुजी–योशिदा नावाचा एक गाव आहे. तिथून फुजीवर चढण्याचा एक जुना रस्ता फुटतो. पूर्वीच्या काळी जेव्हा लोक फुजीची पायी यात्रा करीत तेव्हा याच रस्त्याने जात असत. तेथे एक शिन्तो-मंदिर आहे, आणि रस्त्याच्या दुतर्फा आकाशाला भिडू इच्छिणारे प्रचंड वृक्ष आहेत. अजूनही काही लोक याच रस्त्याने पायी यात्रा करीत असतात. ज्या भक्तिभावाने आपण हिमालयाची यात्रा करीत असतो त्याच भक्तिभावाने फुजीची यात्रा करणारे लोक जपानमध्ये अजून आहेत.

या रस्त्याला जवळ असा दुसरा एक रस्ता आहे. त्या रस्त्यावरून आमच्या मोटारी धावू लागल्या. योशिदाला पोहोचण्यापूर्वी यामानाका नावाचे एक सरोवर आम्हांला लागले. सामान्यपणे मी जेव्हा एखादे प्राकृतिक दृश्य पाहतो तेव्हा पूर्वी पाहिलेल्या तसल्या एखाद्या दृश्याशी त्याची तुलना करण्याची मला बुद्धी कधी होत नसते. तुलनेमुळे यात्रानंदात व्यत्यय येत असतो असा माझा अनुभव आहे. प्रत्येक प्राकृतिक दृश्याचे स्वतःचे असे एक आगळेपण असते. त्याचे रसपान त्याची इतर दृश्यांशी तुलना न करता हृदयामार्फत सरळ करायचे असते. जेव्हा बुद्धी त्याची दुसऱ्या दृश्यांशी तुलना करायला लागते तेव्हा ती आपल्या रसपानात व्यत्यय आणते असे मला वाटायला लागते. पण यामानाका सरोवर जेव्हा दिसले तेव्हा मला उडिसातले चिल्का सरोवर आठवले. तीन वर्षांपूर्वी भुवनेश्वरला जाण्याचा योग आला होता. आम्ही एक मोटार घेऊनच गोव्याहून निघालो. महाराष्ट्र, म्हैसूर व सबंध आंध्र प्रदेश पार करून तिसऱ्या की चौथ्या रात्री आम्ही ब्रह्मपूरला पोहोचलो. माझ्या हातांत भारताचा नकाशा होता. चिल्का सरोवर येथून जवळच आहे असे मी त्यांत पाहिले. माझे सोबती ब्रह्मपूरला न राहता सरळ भुवनेश्वरपर्यंत जाण्याच्या विचाराचे होते. आम्ही तसे गेलो असतो तर भुवनेश्वरला पहाटे पोहोचलोही असतो. पण अंधारात चिल्का सरोवर बघायचे राहून गेले असते. मी अनेक युक्तिवाद लढवून ब्रह्मपूरला राहण्याच्या पक्षात त्यांचे मन वळविले.

दुसऱ्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी चिल्का सरोवराचे दर्शन घडले. आमच्या-बरोबर युरोपमध्ये हिंडून आलेले एक गृहस्थ होते. त्यांना राहवेना. ते म्हणाले– ‘ युरोपमधील अतीव सुंदर सरोवरासारखेच हे सरोवर आहे ! ’

मी म्हणालो– ‘ काकासाहेबांनी नद्या, प्रपात, सरोवरे, समुद्रकिनारे वगैरेंचे वर्णन करून ‘ जीवनलीला ’ नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. त्यात चिल्का सरोवराचा उल्लेख करताना लॉर्ड कर्झनचे एक वाक्य टाकले आहे. त्याने म्हणे एकदा म्हटले होते की, ‘ हिन्दुस्थानात श्रेष्ठ सौंदर्यधाम कुठले असेल तर ते चिल्का सरोवर होय.’ मला या गोष्टीचे येथे स्मरण झाले. खरे म्हणजे, हाकोनेला ज्याच्या काठावर आम्ही राहत होतो त्या आशी सरोवराचे स्मरण येथे व्हायला हवे होते; पण ते झाले नाही. कारण काय असावे ? ही दोन्ही सरोवरे जवळ जवळ असली तरी दोन्हींचे विभूतिमत्त्व वेगळे आहे म्हणून ? की यामानाकाचे चिल्काशी साम्य अधिक आहे म्हणून ?

फुजीच्या परिसरात ‘ आशी ’ सरोवर सोडले तर दुसरी पाच सरोवरे आपल्या सौंदर्याने लोकांना आकृष्ट करीत असतात. ती म्हणजे यामानाका, कावागुची, साइको, शोजी व मोतोसु ही होत. यांतले यामानाका सर्वांत अधिक विस्तृत आहे. उन्हाळ्यात येथे वीस डिग्रीहून जास्त तपमान नसते. त्यामुळे जपानमधील अनेक श्रीमंत व रसिक लोक याच्या काठावर येऊन राहतात. याच्या काठावर अनेक छोटे-मोठे बंगले असून उत्तमोत्तम अशी कित्येक हॉटेलेही आहेत. सरोवराचा किनारा वनश्रीने नटलेला आहे; आणि त्याहून विशेष म्हणजे नाना प्रकारचे राग आळविणारे अनेक जातींचे पक्षी या दिवसांत येथे वास्तव्य करतात. आम्ही तेथे पोहोचलो तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते. शेकडो लोक सरोवरात पोहत होते. दुसरे कित्येक होड्या हाकीत होते. जीवनाचा आनंद जेवढा घेता येईल तेवढा हे जपानी लोक तेथे घेत होते त्यांचा आनंद पाहून मला इथले पक्षीही आनंदविभोर झाल्यासारखे दिसले. मी त्यांना एका हाइकु कवितेतून सांगितले—

Birds of Passage !
I, too, am a passer-by
In your native land.

आमचा रस्ता सरोवराच्या काठावरूनच जात होता. पण आम्ही मोटार-वेगाने धावत होतो. फुजीला आम्ही केव्हा वळसा घातला, लक्षातच आले नाही. समोर जपानचे आल्प्स पर्वत दिसले. त्यांची शोभा मी न्याहाळू लागलो. इतक्यात कोणी तरी म्हटले– हा बघा फुजी येथे दिसतो. मी डाव्या बाजूने माझी दृष्टी वळविली. गोतेम्बाहून जसा दिसत होता तसाच फुजी येथे दिसत होता. आम्ही मागच्या बाजूला आलो होतो.

तरी त्याच्या आकृतीत फरक पडला नव्हता. फुजीचे हे वैशिष्ट्य पहिल्यांदाच लक्षात आले. त्याच्या पायथ्याचा घेर पस्तीस ते चाळीस किलोमीटरचा असून उंची तीन हजार सातशे शहात्तर मीटरची आहे. पण तो इतका नीटनेटका आहे की कोणत्याही बाजूने पाहिले असता तो सारखाच दिसतो. इतकी सुरेख 'सिमिट्री' साधलेला सर्वतो-भद्र पर्वत, मला वाटते, जगात दुसरा नसावा.

फुजीच्या शिखरापर्यंत जो रस्ता जातो त्याचे दहा पडाव आहेत. पूर्वीच्या काळी लोक जेव्हा पायी यात्रा करीत तेव्हा विश्रांतीसाठी या पडावांवर थांबत असत. आज या दहा पडावांपैकी पाचव्या पडावापर्यंत – गोगोयेनपर्यंत – मोटारी जातात. आमचा रस्ता मोठ्या जंगलातून जात होता. (जंगल कसले! बागच ती. मोठे गगनभेदी वृक्ष तेथे आहेत म्हणून त्याला जंगल म्हणायचे.) जसजसे वर चढू लागलो तसतसा निसर्ग एकाहून एक आगळी दृश्ये आमच्यापुढे प्रकट करू लागला. आरोहणाच्या वेळी नेहमी असेच होत असते. आपण एक दृश्य पाहतो तो समोर दुसरे दृश्य उभे राहते, आणि रस्ता जर नागमोडी असला तर पुढे जाताच पहिले दृश्य दुसऱ्या स्वरूपात दिसते. एकच दृश्य; पण जेव्हा विस्तार वाढतो तेव्हा अगदीच वेगळे दिसते, आणि आरोह-णाच्या वेळी तर क्षणाक्षणाला आपली दृष्टी अधिक विस्तार सामावू लागते. दृष्टीचा (angle) कोनही एकसारखा बदलत असतो. त्यामुळे प्रत्येक दृश्यात एक प्रकारचा नवनवोन्मेषशाली जिवंतपणा आढळतो.

'पाहिले ते पुष्कळ झाले. आता थोडे अन्तर्मुख व्हा' असा आदेश देण्या-साठीच जणू एकाएकी ढग आले आणि समोरच्या दृश्यावर त्यांनी पडदा टाकला. बघता बघता ढगांनी आकाशही व्यापले आणि आमचा रस्ताही व्यापला. पुढचा रस्त धड दिसत नव्हता. त्या क्षीरसागरातून आम्ही मार्ग क्रमीत चाललो. एकाच क्षणी विरस व आनंद यांचा अनुभव आला. इतके वर येऊन आपल्याला दूरवर पाहता येऊ नये? असा विचार मनात येतो न येतो तोच एका कोपऱ्यात ढगाचा पडदा दूर झाला आणि क्षणभर का होईना, खालचे सारे खोरे दिसले. पण लगेच पुन्हा पडदा पडला. आता कल्पनेनेच दृश्य बघायचे! ढगांनी हा लपंडाव गोगोयेनपर्यंत चालविला. त्यामुळे दर्शनानंदात वृद्धीच झाली.

गोगोयेनला असंख्य स्त्री-पुरुष जमले होते. अगदी चेंगराचेंगरी व्हावी इतकी गर्दी होती. त्यांच्या हातांतल्या काठ्या, डोक्यावरच्या गवती टोप्या, गिर्यारोहणाच्या वेळी वापरायचे पायांतले खास जोडे या सर्व गोष्टी पाहिल्याबरोबर मला माझ्या हिमा-लयाच्या यात्रेची आठवण झाली. पण केवढा फरक! हिमालयाच्या आमच्या यात्रेच्या वेळी आमचे टोळके सोडून तरुण असे कुणीच नव्हते. येथे वृद्ध कुणी नव्हते.

गोगोयेनपासून शिखरापर्यंतची वाट दीड-दोन तासांचीच होती. दुपारचे बारा वाजले होते. आम्ही चालायला लागलो असतो तर चार वाजेपर्यंत सहज परतलो असतो. इथपर्यंत आल्यावर पुढे जायचे नाही ही कल्पनाच मला सहन होण्याजोगी नव्हती. पण ओश्योसामांना आमची कल्पना पसंत पडली नाही. आमच्याकडे थंडीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासारखे पुरेसे कपडे नाहीत ही सबब त्यांनी पुढे केली. पण दुपारची वेळ होती. हवा जरी गार असली तरी चालून चालून शरीरात उष्णता वाढली असती. शिवाय चार वाजेपर्यंत आम्ही परतलोही असतो. पण ओश्योसामा जाऊ द्यायला तयार झाले नाहीत. आम्ही हिमालयाची यात्रा केली आहे. जम्नोत्री, गंगोत्रीपर्यंतची अतिशय दुर्गम यात्रा केली आहे असेही आम्ही त्यांना सांगून पाहिले. पण ओश्योसामांचे हृदय जरादेखील द्रवले नाही. 'जायचे असेल तर जा. पण येताना एकटेच बसीतून या.' असे सांगून ते गप्प बसले. आम्ही काकासाहेबांपुढे प्रस्ताव ठेवला. त्यांनी शब्द टाकला तर ओश्योसामा नाही म्हणणार नाहीत याची आम्हांला खात्री होती. त्यांनी सरोजबेनना सांगितले. सरोजबेननी कात्सूला सांगितले. कात्सूने ओश्योसामांपुढे आमची वकिली सुरू केली—'यांना जाऊ द्या, हे तरुण आहेत. दोन महिने हिमालयात पायी फिरले आहेत. त्यांना पायी चालायची सवय आहे. फुजीसानविषयी त्यांच्या मनात भक्तिभाव आहे. त्यांना आपली हौस पुरी करू द्या. आपण पाच गाड्या घेऊन आलो आहोत. एक यांच्यासाठी ठेवता येईल.' पण ओश्योसामांनी जाऊ न देण्याचा निर्धार केला होता त्याला ती बिचारी काय करणार? 'त्यांना जाऊ दिले तर काकासाहेबांना आनंद होईल' अशीही पुस्ती तिने जोडली. पण ओश्योसामा म्हणाले—'मी त्यांना कुठे अडवले आहे? मला न विचारता त्यांनी खुशाल जाऊन यावे. मला विचारले तर मात्र मी जा म्हणणार नाही आणि त्यांना मोटार कशाला पाहिजे? हिमालयाची यात्रा करून आले आहेत तर येथेही चालत यावे.'

झाले! आता उपाय नव्हता. मी निराशेच्या भरात मनात म्हटले— अशा ठिकाणी वृद्धाबरोबर आलो हीच चूक झाली. मला कधीच कुणाची आली नव्हती इतकी आज ओश्योसामांची चीड आली होती. पण काय करणार? तिथल्या आरामगृहात बसून फुजीच्या शिखरापर्यंतची यात्रा करायला आलेल्या त्या असंख्य जपानी स्त्री-पुरुषांकडे मी मत्सराने पाहू लागलो; का कुणास ठाऊक, मला त्यांचीच चीड अधिक यायला लागली.

मंत्री म्हणाले— 'चला आपण थोडेसे हिंडून तरी येऊ या.'

फर्लांग-दीड फर्लांग आम्ही चालत गेलो. पण रस्ता सोडून आम्हांला काहीच दिसत नव्हते. आज हवा खरोखर बिघडली होती. आम्हांला वर जायची परवानगी


मिळाली असती तर ढगांमुळे आम्हांला काहीही दिसले नसते. वरपर्यंत आलो एवढेच समाधान मानून परतावे लागले असते. पण—

कोल्ह्याने द्राक्षे आंबट ठरवली होती. शेवटी मी मनात विचार आणला— जे पाहायला मिळाले नाही त्याचे दुःख करीत बसण्यापेक्षा जे पाहायला मिळाले आहे त्याचा आनंद लुटण्यातच खरे श्रेय आहे. जपानमध्ये पुन्हा कधी यायचे होणार नाही असे कसे म्हणता येईल? कदाचित ही गोष्ट व्हायची राहून गेली एवढ्यासाठीच ईश्वर येथे येण्याची दुसरी संधी उपलब्ध करून देईल. नाही कुणी म्हणावे?

आम्ही तास – दीड तास तेथे आजूबाजूला यथेच्छ हिंडलो. मंत्रींच्या खांद्यावर जानव्यासारखा कॅमेरा लटकत होता. त्याच्या मदतीने तिथली काही दृश्ये टिपून घेण्यात आम्ही आनंद मानला. फारसे काही दिसत नव्हते. सगळा धूम्रसागरच पसरला होता.

संध्याकाळी जेव्हा घरी परतलो तेव्हा ओश्योसामांनी वर जाण्याची आम्हांला परवानगी दिली नाही ही ईश्वराची मोठी कृपाच असे वाटायला लागले. वर गेलो असतो तर परतीच्या प्रवासात जे पाहावयास मिळाले ते आम्हांला चुकले असते. मनुष्याने एक इच्छा करावी व ईश्वराने त्यात अडथळा आणावा, पण शेवटी हा अडथळा आपल्या श्रेयासाठीच होता असा अनुभव यावा – तसाच आम्हांला त्या दिवशी प्रत्यय आला.

पण त्याचे वर्णन मला जरा विस्ताराने करावे लागेल.



: ११ :

# गंधर्व-प्रदेशातली फेरी

जेथे पाणी थिजून त्याचे बर्फ बनत असते अशा एखाद्या बर्फाळ प्रदेशात जर आपल्याला जमिनीतून उफाळून येणारा उकळत्या पाण्याचा एखादा झरा पाहावयास मिळाला तर आपण किती स्तंभित होऊन जाऊ ! निसर्गाच्या नियमाच्या दृष्टीने विचार केल्यास असल्या दृश्यात अद्‌भुत असे काहीही नसते. पण असली दृश्ये क्वचितच कुठे पाहावयास मिळतात, त्यामुळेच ती पाहिल्याबरोबर आपण विस्मयाने स्तब्ध होऊन जातो.

हिमालयात जेथून यमुनेचा उगम होतो, तेथे जम्नोत्रीला गेलो असता असे एक दृश्य पाहावयास मिळाले होते. त्या वेळी मी आश्चर्यमुग्ध झालो होतो.

येथे जपानमध्ये, फुजीच्या परिसरातदेखील असे एक स्थान आहे. पण त्याचे स्वरूप जम्नोत्रीपेक्षा अगदीच भिन्न आहे.

फुजीच्या पाठीवर, गोगोयेनला, आम्ही तास-दीड तास मनसोक्त खेळलो. किंबहुना असे म्हणता येईल की, ढगांनी जो लपंडाव चालविला होता त्यातून निर्माण होणारे काव्य यथेच्छ पिऊन जेव्हा आम्हांला वाटले की हे कितीही प्यालो तरी तृप्ती कधी व्हायचीच नाही तेव्हा, आम्ही खाली उतरायला लागलो. फुजीच्या शिखरापर्यंत

जाता आले नाही याचा विषाद होताच. तरीही जे पाहावयाला मिळाले होते ते थोडे-थोडके नव्हते. अशा विषाद व आनंद या मिश्रभावाने आम्ही फुजीचा निरोप घेतला. वीस-पंचवीस मिनिटांच्या मोटार-यात्रेनंतर आम्ही रस्ता बदलला. ज्या रस्त्यावरून चढलो होतो तो सोडून निराळ्या रस्त्याने आम्ही धावू लागलो. ढगांनी तर गोगोयेनलाच राहण्याचे व तेथे जमलेल्या यात्रिकांबरोबर फुजीच्या शिखरापर्यंत जाण्याचे पसंत केले होते. त्यामुळे येथे सृष्टी प्रसन्न स्मित करून आमचे स्वागत करायला उभी होती. दुपारची वेळ होती. वनश्री पुऱ्या ऐश्वर्यात चकाकत होती. सूर्यकिरणांच्या मदतीने प्राणि-सृष्टीची सेवा करण्याचे तिचे कार्य ती या वेळी अगदी तन्मयतेने करीत होती. म्हणूनच की काय तिच्या चेहऱ्यावर निर्मितीचा आनंद फुललेला दिसत होता.

अर्ध्या-एक तासाने आमच्या गाड्या एका बागेसमोर येऊन उभ्या राहिल्या. मी जपानमध्ये अजून एकही वनस्पत्यालय पाहिले नव्हते. वनश्रीची विविध साम्राज्ये पाहिली होती. तरीही तिच्या घटकांचा नीट परिचय झाला नव्हता. तो केव्हा तरी एखाद्या वनस्पत्यालयात जाऊन घ्यायचाच होता. त्यामुळे मी उत्सुकतेने या बागेच्या द्वारातून प्रवेश केला. पण तेथे आमच्या हातात एक एक मेणबत्ती देण्यात आली. तेव्हा हे वनस्पत्यालय नसून दुसरे काही तरी असावे असे वाटले. आम्ही काही पायऱ्या उतरलो आणि बरेच खाली गेल्यानंतर गार वाऱ्याची एक झुळूक जेव्हा अंगाला स्पर्श करून गेली तेव्हा आम्ही एका गुंफेच्या आत जात आहोत हे लक्षात आले. जवळ-जवळ शंभर मीटर उतरल्यावर एखादा मीटर उंच व दोनेक मीटर रुंद असलेले गुंफेचे द्वार लागले. नाशिकला गोदावरीच्या तीरावर एकदा अशीच एक गुंफा मी पाहिली होती. अरण्यवासात सीता तेथे राहात होती व रावणाने त्याच ठिकाणी तिचे हरण केले होते असे तिथल्या पंड्यांनी मला सांगितले, तेव्हा मोठ्या कुतूहलाने पण महा-प्रयत्नाने जसा मी तिच्यात प्रवेश केला होता तसा येथेही केला. येथे एका दोरखंडाच्या मदतीने आत जाणाऱ्यासाठी व आतून बाहेर येणाऱ्यासाठी असे मार्गांचे दोन विभाग करण्यात आले होते. मी ओणवा होऊन आत शिरलो. उभे राहून चालण्याची सोय नव्हती. ओणवा होऊनही चालता येण्याजोगे नव्हते. डोके वर आपटण्याची भीती होती. मी बसून छाती वाकवून मार्ग क्रमू लागलो. तीस-पस्तीस मीटर अडखळत, धडपडत खाली उतरल्यावर पुढे काय पाहावयास मिळेल या स्वाभाविक उत्सुकतेऐवजी काकासाहेब येथे आले तर त्यांचे काय हाल होतील याची चिंता मनात उत्पन्न झाली. मी क्षणभर थांबलो आणि परतणाऱ्या लोकांमध्ये एखादा ओळखीचा दिसतो की काय हे पाहू लागलो. आम्हा मंडळींपैकी काही लोक आमच्यापुढे गेले होते हे मी पाहिले होते. ओश्योसामाही पुढे गेले होते. त्यांच्यापैकी कुणी परतला तर काकासाहेबांना वर निरोप पाठवावा असा विचार करू लागलो. पण परतणाऱ्या लोकांमध्ये ओळखीचा

कोणी दिसत नव्हता. आणि मला थांबता येण्याजोगे नव्हते. माझ्यामागे अनेक लोक येत होते. थांबलो असतो तर त्यांच्या मार्गात अडथळा निर्माण झाला असता. ( काकासाहेबांनी ही गुंफायात्रा सुखरूपपणे केली हे मला लवकरच कळले. ) मी सरकत सरकत खाली उतरलो. साठ-सत्तर मीटर खाली उतरल्यावर उभे राहून चालता येण्याजोगी जागा दिसली. एखाद्या बोगद्यासारख्या दिसणाऱ्या या जागेत लोक मेणबत्त्यांच्या मदतीने काही तरी पाहात होते. तेथे काय असेल या उत्सुकतेने मी पुढे सरकलो आणि—

आश्चर्याने मी अगदी मुग्ध झालो ! पृथ्वीच्या पोटात हे इतके बर्फ कुठून आले ? येथे ज्वालामुखीचा एखादा अवशेष पाहावयास मिळाला असता तर मला आश्चर्य वाटले नसते. पण ज्वालामुखीच्या या प्रदेशात, त्याच्या एका अवशेषाच्या पोटात, बर्फाचा ढीग पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला ! हे बर्फ येथे मुद्दाम कुणी आणून तर ठेवले नसेल ? बोगद्याच्या भिंतीला टेकून त्याच्या लाद्या किती व्यवस्थित मांडून ठेवल्या आहेत ! पण नाही. हे बाहेरून आणून ठेवलेले बर्फ असणे शक्य नाही. ही निसर्गाचीच एक अद्‌भुत लीला आहे. हिमालयात जम्नोत्रीसारख्या बर्फाळ प्रदेशात जर निसर्ग उकळत्या पाण्याचा झरा सोडू शकतो तर येथे ज्वालामुखीच्या पोटात बर्फाच्या लाद्याही ठेवू शकतो ! मी या लाद्या न्याहाळीत पुढे गेलो. जेथे मुख्य गुहा संपली होती तेथे डाव्या बाजूला दुसरी एक पोट-गुंफा होती, आणि तेथे बर्फाची काही स्वयंभू लिंगे होती ! ही शिवलिंगे येथे कुठून आली ? एक, दोन, तीन ...... पुरी आठ शिवलिंगे मी मोजली. मी विचार करू लागलो. काश्मीरला अमरनाथच्या गुंफेत जे पाहावयास मिळते त्याला जर शिवलिंग म्हणायचे तर यांना शिवलिंगे का म्हणू नये ? निसर्गाने तेथे जी लीला प्रकट केली आहे ती येथेही केली आहे. हीसुद्धा स्वयंभू शिवलिंगेच आहेत ! अमरनाथ भारतात आहे म्हणून ते शिवलिंग व हे जपान आहे म्हणून ही शिवलिंगे नव्हेत ? शिवाची सत्ता काय फक्त हिन्दुस्थानातच चालते ? ती एक ‘ नॉन-डाइमेन्शनल ’ विभूती आहे. तिची सत्ता सर्वत्र चालू शकते. मी जसजसा त्यांच्याकडे पाहू लागलो तसतसा माझ्यातला हिन्दू संस्कार डोके वर काढू लागला, आणि—

माझे हात भक्तिभावाने जोडले गेले !

मी बराच वेळ तेथे उभा राहिलो. माझ्या विचारांनी आता निराळी दिशा घेतली— आपल्या देशात जेथे जेथे निसर्गाची भव्य, उदात्त, काव्यमय अशी विभूती प्रकट झाली आहे तेथे तेथे आपल्या लोकांनी तीर्थस्थळे उभी केली आहेत. हे जे समोर दिसते तसले एखादे अद्‌भुत् स्थान आपल्या देशात दिसले असते तर त्याचे आपण काय करून टाकले असते ? आपण येथे एखादे पूजा-स्थान उभे केले नसते काय ? आणि मग येथे भाविकांची व त्यांच्या भाविकतेचा गैरफायदा घेणाऱ्या जोगी, रोगी,

पुजारी, भिकारी यांची गर्दी झाली नसती काय? जपानी लोकांना असले काहीच कसे सुचले नाही? त्यांच्या मनोवृत्तीत व आपल्या मनोवृत्तीत कोणता फरक आहे?

जपानच्या काही लोककथांमधून जपानच्या लोकमानसाचे जे चित्र उभे राहते ते आपल्यापेक्षा भिन्न नाही. भोळ्या समजुतींचा वारसा या लोकांना आपल्यासारखाच मिळाला आहे. मग या लोकांनी हे स्थान आपल्या धार्मिक समजुतींनी संस्कारित कसे केले नाही? हे केवळ संस्कार-यात्रिकांचे स्थान त्यांनी कसे राहू दिले?

माझ्या हातातली मेणबत्ती संपत आली तेव्हा हाताला चटका बसला. मी शिवलिंगांना पुन्हा एकदा भक्ति-भावाने प्रणाम करून निघालो. माझे हृदय विस्मयाने जितके भरून आले होते तितके उत्कट भक्तिभावानेही भरून आले होते. अत्यंत पवित्र व मधुर स्मृती घेऊन मी परतलो.

शिवलिंगांच्या दर्शनाने काकासाहेबदेखील प्रभावित झाले होते. गुंफेतून वर आल्यावर ते मला म्हणाले— 'मला थकवा आला होता, पण भगवान् शंकराच्या दर्शनाने मला इतका आनंद झाला की माझा थकवा कुठल्या कुठे नाहीसा झाला.'

फुजीच्या खांद्यावर जी पाच सरोवरे खेळत असतात त्यांतल्या यामानाकाचे दर्शन गोगोयेनला जाताना वाटेत घडले होते. हे सरोवर विस्ताराने या पाचांत सर्वांत मोठे आहे; पण त्यांतले सर्वांत छोटे जे शोजी सरोवर, ते सर्वांत सुंदर असेल याची मी कल्पनाही केली नव्हती.

आम्ही शिवलिंगांच्या दर्शनाने भक्ति-विनम्र होऊन जेव्हा परतलो तेव्हा वाटेत शोजीचे दर्शन घडले. एका कच्च्या रस्त्यावरून आम्ही गेलो आणि अचानक एखादी अप्सरा प्रकट व्हावी तसे शोजी सरोवर आमच्यासमोर उभे राहिले. ज्या सरोवराचे पैलतीर दिसते त्या सरोवरात सौंदर्य नसते अशी माझी समजूत होती. पण सरोवराचे सौंदर्य त्याच्या पाण्याच्या विस्तारात असते की त्याच्या काठावरील वनश्रीच्या काव्यात असते? शोजीला चहूबाजूंनी टेकड्यांनी वेढलेले आहे, आणि टेकड्यादेखील अगदी हाताच्या अंतरावर असाव्यात इतक्या जवळ जवळ आहेत. टेकड्यांवरील वनश्रीच्या अनाघ्रात वाटणाऱ्या सौंदर्याकडे आपले लक्ष जाते न जाते तोच त्यांच्या मागे फुजीसानचे भव्य दर्शन घडते.

सरोवराच्या काठावर एक ल्हानसे हॉटेल होते. तेथे आम्ही जेवण करायला बसलो. आज भूक चांगलीच लागली होती. एका बाजूने आम्ही पोटाची भूक शमवीत होतो तर दुसऱ्या बाजूने डोळ्यांचे पारणे फेडीत होतो. फुजीचे एक आगळे दर्शन घ्यायला मिळावे म्हणून हे नाजुक सरोवर निसर्गाने निर्माण केले आहे की जीवनात

भव्यतेइतकेच नाजुकतेला स्थान आहे याची आपल्याला दीक्षा देण्यासाठी उत्पन्न केले आहे? हे सरोवर जपानी लोकांना कोणती दीक्षा देत असेल?

आमच्याबरोबर एक गोड जपानी मुलगी होती. तिला इंग्रजी जेमतेम येत होते. तरीही जेव्हा सरोवराच्या पाण्यावर बगळ्यासारखा दिसणारा 'ओशिदोरी' नावाचा एक पक्षी येऊन बसला, तेव्हा तिने आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजीत मला एक गोष्ट सांगितली—

एकदा म्हणे एक शिकारी या बाजूला फिरत फिरत आला व त्याला या सरोवराच्या पाण्यावर पोहत असलेले ओशिदोरीचे एक जोडपे दिसले. त्याला भूक पुष्कळ लागली होती. त्याने धनुष्य उचलले व त्यांतल्या नरावर बाण सोडला. घायाळ झालेल्या नराच्या चीत्काराने दचकून ओशिदोरी मादी उडत रानात पळून गेली.

मेलेला ओशिदोरी घेऊन शिकारी घरी आला व त्याने तो पक्षी शिजवून खाऊन टाकला रात्री त्याला एक स्वप्न पडले. एक अतिशय सुंदर स्त्री त्याच्या जवळ आली आहे आणि रडून रडून त्याला विचारीत आहे– माझ्या पतीचा तू का वध केलास? त्याने तुझा कोणता अपराध केला होता? आम्ही किती सुखात येथे राहात होतो! त्याला मारून तुला काय मिळाले? तू किती दुष्ट-कर्म केले आहेस याची तुला कल्पना आहे का? मलादेखील एका दृष्टीने तू मारून टाकलेस. नाही, नाही,– मी माझ्या पतीवाचून जगू शकणार नाही.. तू काय केलेस याची तुला कल्पना नाही...पण तुला सांगून ठेवते...तू उद्या पुन्हा सरोवराकडे जाऊन बघ...जाऊन बघ...जाऊन बघ...

तिच्या आक्रोशाने शिकारी खडबडून जागा झाला. त्याला पुन्हा झोप येईना. 'सरोवराकडे उद्या जाऊन बघ, जाऊन बघ, जाऊन बघ'...हे शब्द त्याच्या कानांत घुमू लागले.

'बघू तर खरे' या विचाराने तो सकाळी उठल्याबरोबर सरोवराकडे गेला. तेथे सरोवराच्या पाण्यावर मादी ओशिदोरी एकटीच पोहत होती. शिकाऱ्यावर तिची दृष्टी पडल्याबरोबर ती उडून जाण्याऐवजी सरळ त्याच्यासमोर येऊन उभी राहिली आणि पाणावलेल्या डोळ्यांनी त्याला एकसारखी पाहू लागली. नंतर एकाएकी तिने आपल्या चोचीने आपले पोट फाडले आणि एका क्षणात तिने आपला प्राण सोडला.

त्याच दिवशी शिकाऱ्याने आपले मुंडन करून घेतले आणि तो बौद्धभिक्षू बनला!

यामानाका सरोवर सर्वांत अधिक विस्तृत, शोजी सर्वांत छोटे, तर त्याच्यापुढचे मोतोसु सरोवर सर्वांत अधिक खोल आहे. नरेश मंत्रींचे तर हे अत्यंत आवडते सरोवर आहे. एकदा म्हणे ते तेथे आपल्या काही जपानी विद्यार्थ्यांना घेऊन आले होते आणि चार-सहा दिवस राहिले होते. या सरोवराच्या काठावर एके काळी जपानचे मूळ रहिवासी 'आयनू' लोक राहात असत.

आपल्या देशातील बहुसंख्य लोक जसे मूळ हिंदुस्थानातले नाहीत तसे आजचे जपानी लोक हेदेखील मूळचे जपानी नाहीत. चीन, कोरिया व मंचुरिया वगैरे प्रदेशांतून अति-प्राचीनकाळी ज्या टोळ्या जपानमध्ये आल्या त्यांचे वंशज हेच आजचे जपानी होत. पण या टोळ्या येण्यापूर्वी येथे 'आयनू' नावाचे लोक राहात असत. वांशिक दृष्टीने हे लोक Caucasian म्हणजे युरोपियन परिवारातील लोक असावेत. त्यांची स्वतःची लेखी भाषा नव्हती. त्यांचा धर्मदेखील आपल्याकडील आदिवासी लोकांच्या धर्मासारखा पशु-पूजेचाच एक प्रकार होता. अस्वल हे त्यांचे मुख्य दैवत होते. त्यांच्या वैभवकाळी ते मोठे लढवय्ये असावेत. आजच्या जपानी लोकांचे मोंगोल-वंशीय पूर्वज जपानमध्ये आले तेव्हा आयनूंनी त्यांना चांगलाच त्रास दिला असावा. पण विचाऱ्यांची संस्कृती या नवीन लोकांच्या संस्कृतीच्या मानाने कमजोर होती. त्यामुळे ते परास्त झाले.

या लोकांचे मूळ स्थान असा मोतोसु या शब्दाचा अर्थ आहे. ते येथे राहात असताना फुजीचा म्हणे एकदा प्रचंड स्फोट झाला. (तो त्या काळी एक जिवंत ज्वालामुखी होता.) तेव्हा त्यांना हे स्थान सोडून जावे लागले. पुढे फुजी शान्त झाल्यावर जेव्हा ते परत आले तेव्हा त्यांना आजच्या जपानी लोकांच्या पूर्वजांशी संघर्ष करावा लागला. त्यात ते चिरडले गेले. आज या वंशातील थोडे लोक उत्तरेकडील होक्कायदो या बेटात व त्याच्या उत्तरेस Sakhalin साखालिन बेटात सापडतात. त्यांची स्थिती अशी विचित्र आहे की हे लोक या शतकाच्या शेवटपर्यंत संपूर्णतः निर्वंश होतील असे नृवंशविद्येच्या पंडितांचे मत आहे.

ते कसेही असो; ज्या लोकांनी फुजीला फुजी हे नाव दिले (फुजी म्हणजे आयनू भाषेत अग्निदेवता) ते नामशेष होणार असले तरी जपानी लोकांना त्यांचे विस्मरण कधी व्हायचे नाही. आम्ही मोतोसूच्या काठावर उतरलो ते त्यांचे उत्कट स्मरण करीतच.

यामानाकाचे दर्शन आम्ही मोटारीतून घेतले होते. शोजीचे तिथल्या हॉटेलमधून, पण मोतोसूला पोहोचल्याबरोबर आम्ही मोटारीतून खाली उतरलो आणि सरळ पाण्याकडे गेलो. इतकी सरोवरे पाहिली तरी आचमन वगैरे प्रकार आम्ही कुठेच केले नव्हते. येथे काकासाहेबदेखील पाण्यात उतरले आणि 'अपवित्रः पवित्रो वा' हा श्लोक म्हणून त्यांनी शास्त्रपूत आचमन केले.

सरोवराच्या चहूबाजूंस उंच–उंच टेकड्या होत्या आणि त्या पाण्यात पाहणाऱ्यांना आपले उलटे दर्शन घडवीत होत्या. फुजीच्या परिसरातले हेच एक असे सरोवर आहे की जे थंडीच्या दिवसांत थिजत नाही. बाकीची सारी सरोवरे म्हणे थिजून जातात व त्यांच्यावरून मग मनसोक्त चालता येते. मोतोसु मात्र याला अपवाद आहे. येथे पाणी त्याही दिवसांत आपले लास्य चालू ठेवते. हा अमृतसर कधी आटत

नाही, थिजत नाही, अन् कधी थकतही नाही.

संध्याकाळची वेळ झाली. कोवळी उन्हे सर्वत्र पसरली. या उन्हात चहूबाजूंच्या टेकड्यांचे लावण्य खुलून आले, आणि गंधर्व-लोकात प्रवेश केल्यासारखे आम्हांला वाटू लागले. अशा वेळी सरोवराचे दर्शन अधिकच आल्हादकारक भासू लागले.


सरोवराच्या काठावर चार-चार, पाच-पाच मजली घरे होती. पण ती सरोवराच्या शोभेत व्यत्यय आणीत नव्हती. उलट, ती नसती तर तेवढे न्यून राहून गेले असते असेच वाटत होते. आमच्यापैकी कुणाच्या तरी तोंडून उद्गार बाहेर पडले — एवढे मोठे काव्य येथे पसरलेले असताना आम्ही काठावर उभे राहून तटस्थपणे नुसते त्याचे अवलोकन करतो, हे काही आपल्याला शोभत नाही. आपण होडी घेऊन सरो-विहार केला पाहिजे. ‘ मांही पड्या ते महासुख प्राणे, देखनारा दाझे जोने ’ पण आमचे यजमान संयमी होते. एवढ्याशा ल्हान डोळ्यांतून तुम्ही या सर्व अद्भुत दृश्याचे आकंठ पान करीत आहांत हे काय थोडे आहे असेच जणू त्यांना म्हणायचे होते. जपानमध्ये अशी कित्येक दृश्ये तुम्ही पाहणार आहांत. एकाच दृश्यावर तुटून का पडता ? असे त्यांनी स्पष्ट सांगितले नसले तरी त्यांनी निघायची घाई केली तेव्हा दुसरे काही भाष्य करणे आम्हांला शक्य नव्हते.

आम्ही परतलो. आज सकाळपासून जवळ जवळ एकशे वीस मैलांची आनंद-यात्रा आम्ही केली होती. या यात्रेत इतक्या अद्भुत गोष्टी पाहिल्या होत्या की आणखी काही पाहण्याची आवश्यकताही नव्हती. ज्या पाहिल्या होत्या तेवढ्याच या विश्वामागच्या विष्णूची ओळख पटवून द्यायला पुरेशा होत्या.

माझ्या नोंद-वहीत एक उल्लेख आढळतो. तो असा की, परतीच्या यात्रेत मोतोसु सरोवरानंतर आम्ही कावागुची सरोवरही पाहिले होते. फक्त ‘ साइको ’ सरोवर दूर होते म्हणून सोडून दिले होते. पण हे लिहायला बसलो आहे त्या वेळी कावागुची काही केल्या डोळ्यांसमोर उभे राहात नाही. चैतन्याचा साक्षात्कार झाल्यानंतर जडाच्या सीमारेषा जशा विरून जातात तसेच काही तरी माझे झाले आहे. त्या दिवशी पाहिलेली दृश्ये हृदयाला इतकी उन्नत करणारी होती की ते त्यांच्याशी जवळजवळ एकरूप झाले होते. जेथे हृदयच स्वतःचे पृथकत्व विसरून गेले होते, तेथे दृश्यांचे पृथकत्व कायम कसे राहू शकले असते ?

आम्ही ही आनंद-यात्रा करून गोतेम्बाला पोहोचलो त्या वेळी माझ्या मनात ईशावास्य उपनिषदातला पहिला श्लोक एखाद्या कवीला कवितेचा पहिला चरण स्फुरावा तसा स्फुरून आला आणि हाकोनेच्या आमच्या निवासस्थानी मी प्रवेश केला तो हा श्लोक गुणगुणतच—

ईशावास्यम् इदम् सर्वम् यत्किंच जगत्यां जगत् ।



# : १२ : एक जपानी छंद

पक्षी जसा दिवसभर आकाशात भराऱ्या मारून संध्याकाळ होताच आपल्या घरट्यात येऊन बसतो, तसे आम्ही हाकोनेच्या आमच्या वास्तव्यात दिवसभर कुठे ना कुठे विहारासाठी जात असू; पण सूर्य अस्ताला गेल्याबरोबर आशी सरोवरांच्या काठावरील आमच्या 'कागेत्सुयेन' हॉटेलमध्ये परतत असू.

आमचे हे हॉटेल होते युरोपियन पद्धतीचे. पण त्याचे वातावरण मात्र जपानी होते. एवढेच नव्हे, तर या हॉटेलमध्ये राहणाऱ्या लोकांनी जपानी बनून रहावे, जपानी डोळ्यांनी, जपानी हृदयाने, जपानच्या सृष्टि-सौंदर्याचा आस्वाद घ्यावा, असा त्याच खास आग्रहही होता.

आमच्या खोलीत एक सूचना-फलक होता. त्यावर लिहिले होते– "आपले जपानमधील वास्तव्य सुखकर होण्यासाठी आम्ही आपल्याला काही सूचना करू इच्छितो : आमच्या मदतीने आपण 'जपानी' बना. आपले पाश्चात्त्य कपडे खुंटीला अडकवून जपानी किमोनो वापरा आणि मगच जपानचे सृष्टि-सौंदर्य उपभोगा."

या सूचनेला अनुसरून जपानी बनण्यासाठी आम्हांला येथे रोज धुतलेले किमोनो दिले जात असत. त्यांतला एक हॉटेलमध्ये वापरण्यासाठी असायचा व दुसरा हॉटेलच्या बाहेर पडताना वापरण्यासाठी असायचा. आम्ही आठ दिवस असे जपानी ' बनून येथे राहिलो.

या हॉटेलमध्ये असतानाच मला जपानी स्नान-पद्धतीचा परिचय घडला.

जपान हे संस्काराने बौद्ध राष्ट्र असले तरी भौतिक व शारीरिक सुखांच्या बाबतीत त्याने बौद्ध आदर्श आंधळेपणाने कधीच स्वीकारले नाहीत. उलट, जीवनात शैथिल्य येऊ न देता त्याने या सुखांचे नेहमीच विलक्षण कौतुक केले. इतकेच नव्हे तर ललित-कलांची त्याने जितक्या आस्थेने उपासना केली तितक्याच आस्थेने त्याने या सुखांची जोपासना केली आहे. जीवनात जे अनेक आनंद असतात त्यांच्या बाबतींत या राष्ट्राने उदासीनता कधी धारण केली नाही. या जीवनोपासनेमुळे त्याला जे काही छंद जडले त्यांत स्नानानंदाचा छंद हा एक आहे.

सामान्यपणे आपण स्नान करतो शरीर स्वच्छ करण्यासाठी. नळाच्या किंवा शॉवरच्या खाली बसलो म्हणजे आपले शरीर स्वच्छ होते. जपानी लोक स्वच्छतेचे भोक्ते असले आणि आंघोळ ते स्वच्छतेसाठीही करीत असले तरी तेवढ्याने त्यांचे समाधान होत नाही. स्नानाचा एक स्वतंत्र आनंद असतो. तो भरपूर प्रमाणात उपभोगणे हाच त्यांचा स्नानामागचा मुख्य उद्देश असतो.

हाकोनेच्या आमच्या हॉटेलात प्रत्येकाच्या खोलीत युरोपियन पद्धतीचे स्नानगृह होते. पण त्याचा स्नानासाठी उपयोग मात्र जपानी लोक करीत नसत. स्नानासाठी ते जायचे तळमजल्यावरील सामुदायिक स्नानगृहात. नरेश मंत्रींनी जपानमध्ये राहून स्वतःला जे काही छंद लावून घेतले, त्यांतला सामुदायिक स्नानगृहात जाऊन स्नान करण्याचा एक आहे. एके दिवशी कुतूहलवश होऊन मीही त्यांच्याबरोबर या सामुदायिक स्नानगृहात गेलो.

स्नानगृहाचे पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी असे दोन स्वतंत्र विभाग होते. पुरुषांच्या स्नानगृहाबाहेर जी खोली होती तेथे प्लॅस्टिकच्या काही टोपल्या ठेवण्यात आल्या होत्या. त्यांतली प्रत्येकाने एक-एक उचलली व त्यांत आपले सर्व कपडे उतरवून ठेवले. सामान्यपणे जपानी लोकांनाही नग्न शरीराचे प्रदर्शन करताना संकोच वाटत असतो. पण तो स्नानगृहात पोहोचल्याबरोबर कुठल्या कुठे पळून जातो. ते येथे लहान मुलांइतक्याच निःसंकोचपणे हातात ( स्नान आटोपल्यानंतर अंग पुसण्यासाठी ) एक लहानसा रुमाल घेऊन दिगंबरावस्थेत प्रवेश करतात.

सामुदायिक स्नानगृहात भिंतीला लागून काही नळ असतात. प्रत्येक जपानी एक-एका नळाजवळ जाऊन बसतो व आपण जिला आंघोळ म्हणतो ती करतो. म्हणजे पाण्याने व साबणाने आपले शरीर अगोदर स्वच्छ करून टाकतो. तेथेच एक हौद असतो. त्यात गरम पाणी असते. सामान्यपणे हे पाणी ११० डिग्री फॅरेनहाइटइतके उष्ण असते. शरीर स्वच्छ केल्यानंतर तो त्या हौदात जाऊन पडून राहतो. हौदात दहा-बारा माणसे एकाच बरोबर आरामात पडलेली असतात. यालाच हे लोक स्नान म्हणत असतात.

अशा प्रकारे गरम पाण्यात पडून राहणे – अगदी लालबुंद होईपर्यंत पडून राहणे – हा जपानी लोकांचा मोठा छंद आहे. तोक्योपासून उत्तरेकडे एकशेवीस मैलांच्या अंतरावर कासात्सु नावाचे एक स्थान आहे. तेथे हाकोनेप्रमाणेच गरम पाण्याचे झरे आहेत. त्या पाण्याचे उष्णतामान जवळ जवळ एकशेवीस डिग्री असते. अशा पाण्याचा एखादा थेंब अंगावर उडाला तर अंग भाजून निघण्याची भीती असते. तरीही जपानी लोक या पाण्यात अर्धा-अर्धा, पाऊण-पाऊण तास सहज पडून राहतात.

गरम पाण्यात पडून राहणे केवळ थंडीच्या दिवसांतच नव्हे तर भर उन्हाळ्यात-देखील चालू असते.

जेथे निसर्गाने उन्हाळी झरे निर्माण केले आहेत (आणि जपानमध्ये तर असे हजार-बाराशे उन्हाळी झरे आहेत) तेथे हा स्नानानंद लुटण्यासाठी हजारो लोक एकत्र येत असतात. पण जेथे नैसर्गिक झरे नाहीत अशा ठिकाणीही सामुदायिक स्नानगृहे दिसतात. शेकडो वर्षे झाली, सामुदायिक स्नानगृहात स्नान करण्याची प्रथा जपानमध्ये चालू आहे. दिवसभराचे काम आटोपून जपानी माणूस जेव्हा घरी परततो तेव्हा आपले नित्याचे कपडे उतरवून ठेवतो व 'युकाता' चढवून तो सामुदायिक स्नानगृहाकडे चालायला लागतो. तेथे पैसे देऊन आत प्रवेश करतो आणि हा स्नानानंद लुटतो.

ही स्नानगृहे एका अर्थाने क्लब किंवा स्नेहमंडळासारखी सामाजिक व्यवहाराचीही स्थाने असतात. येथेच लोक एकमेकांच्या भेटी घेतात. येथेच एकमेकांचे कुशल विचारतात. एकमेकांविषयी गैरसमज पसरविणे किंवा पसरलेले गैरसमज दूर करणे येथेच चालते. फार कशाला, निवडणुकीत कुणाला मत द्यायचे वगैरे गोष्टी लोक येथेच ठरवितात. कम्युनिस्ट लोकांनी आपल्या विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी ही स्थाने पसंत केली आहेत. यावरून या स्नानगृहांना सामाजिक महत्त्व केवढे आहे हे लक्षात येईल. प्रत्येक स्नानगृहात रोज जवळ जवळ हजार-बाराशे लोक आंघोळ करीत असतात असे मी ऐकले.

रोज स्नान केलेच पाहिजे हा जपानी लोकांचा आग्रह आहे. माणूस कितीही थकलेला असो, ‘ राहू द्या आज स्नान ’ असे तो कधी म्हणायचा नाही. उलट, थकलेला असेल तर तो जास्त वेळ हौदात पडून राहील आणि ताजातवाना होऊनच घरी जाईल. गरम पाण्यात असे पडून राहणे किती आल्हाद्कारक असते हे अनुभवाशिवाय आपल्याला कळायचे नाही आणि एकदा त्याची चव चाखल्यानंतर दुसऱ्यांदा आपल्याला अशी संधी लाभली तर आपण ती सहसा सोडणार नाही. आंघोळ करायची तर ती अशीच केली पाहिजे असे माझे स्वानुभवान्ती मत बनले आहे.

एकाच कुंडात असे अनेक लोक पडून राहिले, तर ते पाणी अस्वच्छ होत नसते काय? असा एक प्रश्न मला पडला होता. पण मी जेव्हा कुंडात उतरण्याआधी लोकांना अंग धुताना पाहिले आणि कुंडातून बाहेर आल्यानंतर त्यांना पुन्हा आंघोळीसाठी नळाखाली बसलेले पाहिले, तेव्हा माझी अस्वच्छतेची भीती नष्ट झाली. उलट, प्रत्येकासाठी निराळे पाणी वापरण्यात आले असते तर किती पाणी लागले असते आणि ते गरम करण्यासाठी किती जळण खर्च झाले असते याचा जेव्हा मी हिशेब लावून पाहिला, तेव्हा जपानी लोकांनी स्वच्छता व काटकसर या दोन गोष्टींचा समन्वय साधून स्नानानंदाची केवढी सुंदर सोय केली आहे याची कल्पना येऊन त्यांच्या बुद्धीचे मला कौतुक वाटायला लागले.

हाकोने येथील आमच्या वास्तव्याच्या शेवटच्या दिवशी आम्ही ‘ कागेत्सुयेन ’ हॉटेल सोडून एका दिवसासाठी फुजिया नावाच्या एका दुसऱ्या हॉटेलमध्ये राहावयास गेलो होतो. जपानमधील हे एक अतिशय प्रसिद्ध हॉटेल आहे. कागेत्सुयेनपासून पाच-सात मैलांच्या अंतरावर एका भव्य खोऱ्यात हे वसलेले आहे. तेथे जपानी पद्धतीची चार निरनिराळ्या प्रकारची स्नानगृहे होती. त्यांतले ‘ रोमन ॲक्वेरियम ’ या नावाचे स्नानगृह विशेष आकर्षक होते. मंद प्रकाशाच्या या स्नानगृहात गरम पाण्याच्या कुंडात पडलेल्यांची दृष्टी भिंतीला लागून असलेल्या काचेच्या मत्स्यालयाकडे जावी आणि तेथे निरंतर नाचात मग्न असलेल्या सोनेरी माश्यांना त्याने पाहात राहावे म्हणजे तो सारे दुःख विसरून जाईल व गरम पाण्याच्या स्पर्शाने मिळणाऱ्या शरीरसुखाबरोबर त्याला या दर्शनाने नयनसुखही लाभेल अशी खास व्यवस्था तेथे होती. रोमन साम्राज्याच्या भरभराटीच्या वेळी तिथले सम्राट म्हणे अशाच प्रकारच्या स्नानगृहात स्नान करीत असत. ते सुख आपल्याला येथे अनुभवावयाला मिळते.

स्नानगृहात स्त्री-पुरुषांसाठी वेगवेगळ्या खोल्या असल्या तरी एका गोष्टीचा मात्र अपवाद असतो. कित्येक सामुदायिक स्नानगृहांत एक इसम असतो. ( त्याला ‘ सान्सुके ’ म्हणतात ). त्याला पैसे दिले म्हणजे तो आपली पाठ चोळतो किंवा

शरीराला मालिश करतो. आश्चर्य म्हणजे स्त्रियांचीदेखील पाठ चोळण्याचे काम पुरुष सान्सुकेच करीत असतो. जपानमध्ये स्त्री सान्सुके असल्यास मला काही ती आढळली नाही.

स्नानाच्या वेळी नग्न शरीर दुसऱ्यांच्या दृष्टीस पडू देऊ नये याची दक्षता घेण्याची जपानी लोकांना आवश्यकता वाटत नाही आणि नग्न शरीर दृष्टीस पडले तर ते पाहात राहण्याची विकृत जिज्ञासाही त्यांना नाही. काही ठिकाणी स्नानगृहांच्या बाहेर थंड पाण्याचे काही तलाव आढळतात. तेथे पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळ्या जागा निश्चित केलेल्या असतात. परंतु हे तलाव उघड्यावर असल्यामुळे पुरुष व स्त्रिया यांची एकमेकांवर दृष्टी पडते. पण तेथेदेखील विकृत दृष्टी मला आढळली नाही.

सर्वच ठिकाणी सामुदायिक स्नानगृहे असली तरी काही लोकांच्या घरी स्वतःचे असे एक खाजगी स्नानगृह असतेच. तेथेही व्यवस्था अशीच असते. आजकालच्या सर्वच मध्यमवर्गीय व धनिक लोकांच्या घरी अशी स्नानगृहे असतात आणि कुटुंबातली माणसे वयाच्या क्रमाने त्यांचा उपयोग करीत असतात.

एके दिवशी हाकोनेला मी आणखी एक प्रकारच्या स्नानाचा अनुभव घेतला. सामूहिक स्नानगृहाजवळ गुंफेसारखी एक खोली होती. तेथे उशाला एक दगड घेऊन मी पंधरा-वीस मिनिटे पडून राहिलो. खाली भट्टी तापविण्यात आली होती. तिच्या वाफेने शरीर घामाघूम होईपर्यंत पडून राहिलो. या बाष्प-स्नानानंतर जेव्हा जपानी पद्धतीने स्नान केले तेव्हा शरीर अगदी फुलासारखे हलके झाले. खरोखर हा आनंद अवर्णनीय असतो.

स्नानाचा छंद या लोकांना इतका आहे की, आपण जसे लोकांना आपल्या घरी जेवायला बोलावीत असतो तसे हे लोक आपल्या गावात जर उन्हाळी झरा असला तर आपल्याला स्नानासाठी आग्रहपूर्वक बोलावीत असतात. जपान सोडण्यापूर्वी आम्ही एकदा मिनोबू पर्वताच्या शिखरावर चढलो होतो. तेथून खाली उतरलो तेव्हा पार थकून गेलो होतो. आणखी कुठे जाण्याचे त्राण राहिले नव्हते. त्याच रात्रीची गाडी पकडून आम्हांला तोक्योला यायचे होते. पण भिक्षू सातोसान यांनी आम्हांला आग्रह करून कोफू नावाच्या एका शहरात केवळ स्नानासाठी नेले. तिथल्या एका स्नानगृहात जपानी पद्धतीचे स्नान करून बाहेर आलो तेव्हा पुन्हा मिनोबू पर्वत चढायचा झाल्यास सहज चढू शकेन इतका ताजातवाना झालो होतो !



## : १३ : हृदये जोडण्याचा मार्ग

आम्ही राहात असू हाकोनेला. पण या ना त्या कारणाने रोज आमची गोतेम्बाला वारी व्हायची. ओश्योसामा तेथे उतरले होते हे एक तेथे जाण्याचे आकर्षण होतेच. शिवाय तेथे काही ना काही सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जायचे.

या कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम विशेष उल्लेखनीय आहे. या कार्यक्रमामुळे जपानच्या सामाजिक संस्कारांच्या इतिहासाचे थोडे दर्शन आम्हांला होऊ शकले आणि या देशाच्या आत्मीयतेचा अनुभव घ्यायचा असेल तर कोणत्या मार्गाने गेले पाहिजे हेही मला समजले.

जपान हे महायान परंपरेतले बौद्ध राष्ट्र आहे. या परंपरेचे तत्त्वज्ञान जवळ जवळ औपनिषदिक तत्त्वज्ञानासारखे आहे. जगात जे काही जीवन आहे ते एकाच अव्यक्त तत्त्वाचे व्यक्त स्वरूप आहे. या व्यक्त तत्त्वात विविधता भासत असली तरी ती वरवरची आहे. वस्तुतः व्यक्त स्वरूपात दिसणाऱ्या साऱ्याच गोष्टी एकमेकींशी निगडित आहेत. त्यांचे एकमेकींशी नाते आहे. ती एकाच अखंड जीवनाची अंगे आहेत. अज्ञानामुळे आपण या सर्व गोष्टी एकमेकींपासून वेगळ्या मानीत असतो व स्वतःला आपण अज्ञानामुळेच या सभोवतालच्या जीवनापासून वेगळे समजत असतो. आपलेही

अज्ञान जर आपण दूर केले तर सभोवतालच्या जीवनाशी आपले जे नाते आहे त्याची आपल्याला ओळख पटेल; हे या तत्त्वज्ञानाचे सार आहे.

विश्वात्मैक्याची ही साधना हा महायान बौद्धधर्माचा परमोच्च आदर्श आहे. या आदर्शाने जपानी मानसावर फार खोल संस्कार केले. विश्वात्मैक्याचा अनुभव घ्यायचा असेल तर आपले पृथक्त्व आपण विसरले पाहिजे आणि सभोवतालच्या जीवनाशी एकरूप झाले पाहिजे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास– आपले जीवन सभोवतालच्या जीवनाला आपण समर्पित केले पाहिजे. त्यासाठी मंदिरे बांधायची, बौद्ध 'धातू'ची स्थापना करून स्तूप बांधायचे, भगवान बुद्धाच्या मूर्ती स्थापन करायच्या, धर्मग्रंथांच्या नकला करून ठेवायच्या, वगैरे काही सवयी जपानने स्वतःला लावून घेतल्या.

जपानमध्ये जी अनेकानेक बौद्ध मंदिरे पाहावयास मिळतात ती याच भावनेतून बांधण्यात आली आहेत. जपानच्या कला–विश्वावर या भावनेने जबरदस्त परिणाम केला आहे आणि आजदेखील ओश्योसामा ठिकठिकाणी जे शांतिस्तूप बांधण्याचे काम करीत आहेत त्यांच्याही मागे हीच प्रबल भावना आहे.

जीवन जर अखंड आहे तर ज्याला आपण मृत्यू म्हणतो तो मिथ्या आहे. ज्याचा मृत्यू होतो तो वस्तुतः नष्ट होत नसून व्यक्त दशेतून अव्यक्त दशेला जात असतो, एवढेच. पण तो 'असतो.' त्याचे स्मरण करणे व त्याच्याशीदेखील एकरूपता साधणे हे विश्वात्मैक्याच्या साधनेतलेच एक अंग आहे. जपानच्या मनोधारणेशी अभिन्न असलेल्या शिन्तो संस्कारामध्ये हे तत्त्व होते. त्याला महायान बौद्ध धर्माने एक तात्त्विक बैठक प्राप्त करून दिली. या तात्त्विक बैठकीमुळे जपानी मानसाची आध्यात्मिक पातळी उंचावली आणि सर्वव्यापी प्रेम हेच निर्वाणाचे खरे साधन आहे या निर्णयाप्रत ते पोहोचले.

पितरांच्या स्मरणाचा जो श्राद्ध-विधी येथे साजरा केला जातो त्याला 'ओ-बोन' हे नाव असून तो एखाद्या उत्सवाप्रमाणे साजरा केला जातो. ओ-बोन हा बौद्धांच्या 'उद्लंबन' या शब्दाचा जपानी अपभ्रंश आहे. गोतेम्बाला आम्हांला हा तीन दिवसांचा श्राद्धविधी पाहावयास मिळाला.

ओ-बोनच्या पहिल्या दिवशी सर्व लोक स्मशानात जातात व तेथे पितरांच्या थडग्यापुढे धूप वगैरे लावून त्यांना श्रद्धांजली अर्पण करतात. जेव्हा अंधार पसरतो तेव्हा थडग्यावर कागदी कंदील पेटवून ते पितरांना घरी येण्याची विनंती करतात आणि त्या कागदी कंदिलाच्या उजेडात ते त्यांना घरी घेऊन येतात. हे न दिसणारे पितर जपानी लोकांना समोर दिसणाऱ्या लोकांइतकेच 'जिवंत' वाटत असतात आणि म्हणून त्यांना स्मशानातून घरी घेऊन येताना वाटेत एखादा खड्डा सापडला तर 'सांभाळा बरे का! येथे खड्डा आहे' असे सांगून जिवंत माणसांची जितकी काळजी घेतली गेली असती तितकी त्यांची घेतात.

घरात जी सर्वांत चांगली खोली असते तेथे देव्हाऱ्यासमोर एक ‘ तातामी ’ ( चटई ) पसरली जाते. तेथे त्या त्या दिवंगत व्यक्तींचे आवडीचे पदार्थ ठेवले जातात. एखाद्या बौद्ध पुजाऱ्याला बोलावून त्यांच्यासाठी धर्मग्रंथातील काही सूत्रांचे पठणही केले जाते आणि जणू ते मृतात्मे उपस्थित आहेत या भावनेने आपल्या सुखदुःखांच्या गोष्टीही ते त्यांना सांगतात.

तीन दिवस असे त्यांच्या सान्निध्यात घालविल्यानंतर शेवटच्या दिवशी जेव्हा त्यांना निरोप द्यावा लागतो तेव्हा ते त्यांना निरोपाचे जेवणही देतात आणि त्यांना जाताना वाट नीट दिसावी म्हणून पुन्हा कंदील पेटविले जातात.

ज्यांची थडगी नाहीत त्यांना निरोप देताना गवताची एक छोटीशी होडी बनविली जाते. तिच्यात उत्सवात वापरलेल्या काही वस्तू ठेवतात व दिवा पेटवून ती होडी नदीच्या प्रवाहात किंवा समुद्रात सोडून देतात.

ओबोनचा हा विधी जुलैच्या मध्याला येत असतो. पण तो एकाच दिवशी सर्वत्र पाळण्याऐवजी निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या दिवशी पाळला जातो. एकंदरीत जपानमध्ये जवळ जवळ महिनाभर श्राद्धाचा हा विधी चालत असतो. या उत्सवाला जपानच्या जीवनात धार्मिक महत्त्वाइतकेच सामाजिक महत्त्व आहे. ज्या दिवशी पितरांचे स्मरण केले जाते त्या दिवशी जपानमधील त्या त्या ठिकाणचे सर्व स्त्री-पुरुष आपापसांतील उच्च-नीच भाव विसरतात व रस्त्यावर येऊन थकून अगदी ग्लान होईपर्यंत नाचत राहतात. आम्ही दक्षिणेकडची यात्रा संपवून तोक्योला परतत होतो. त्या वेळी एके रात्री शिकोकु बेटातल्या ताकामात्सु शहरात पोहोचलो. त्या दिवशी तेथे ओ-बोनचा उत्सव होता. सारे ताकामात्सु शहर रस्त्यावर लोटले होते आणि सबंध रात्र धिंगाणा घालीत होते.

गोतेम्बाला तर हा उत्सव विशेष उत्कटतेने साजरा करण्यात आला. काही दिवसांपूर्वी ओश्योसामांचे एक पट्टशिष्य भिक्षू मारूयामा यांचे अपघातात निधन झाले होते. त्यांच्या स्मरणाने येथे सर्वांची हृदये भरून आली होती. मंदिरात त्या दिवशी मारूयामांच्या स्मरणाने जवळ जवळ दोन तास विधिपूर्वक पूजा चालली. पूजेच्या शेवटी ओश्योसामांनी या दिवसाचे महत्त्व समजावून सांगितले आणि नंतर काकासाहेब बोलले— “ मी एक हिन्दू बौद्ध या नात्याने आपल्यापुढे उभा आहे. हिन्दू धर्मानेदेखील श्राद्धाचे महत्त्व सांगितले आहे. श्राद्धाद्वारे आपण आजच्या पिढीला पितरांशी व पुढे येणाऱ्या आपल्या वंशजांशी जोडीत असतो. जगात दोन मोठी तत्त्वे आहेत. अनंत आकाश व अनंत काल. अनंत काल हे ईश्वराचेच रूप आहे, हे जो ओळखतो तोच खरा मनुष्य आहे. आपल्या पूर्वजांनी काय केले याचे आपण स्मरण करतो आणि वंशजांना नव्या गोष्टी देऊन ठेवतो. काळाला जो ओळखतो तोच प्रगती

करतो... आमच्या धर्मात ईश्वराचे अनेक अवतार मानले गेले आहेत. पण चालू अवतार बुद्धाचा आहे. मी आमच्या लोकांना सांगत असतो की, जो बुद्धाला मानतो तोच खरा हिन्दू होय. आमच्या वेदांतावर बुद्धाचा प्रभाव चांगलाच आहे. मी ओश्योसामांना सांगत असतो, तुम्ही हिन्दुस्थानात तुमचे शिष्य पाठविता व लोकांना बौद्धधर्माची दीक्षा देता. ठीक आहे. माझे काम निराळे आहे. मी सबंध हिन्दुधर्मालाच बौद्ध बनवू इच्छितो. जुन्या ग्रंथात जे काही सांगितले आहे ते आदरपूर्वक समजून घ्यायचे आणि पुढे चालायचे हे मनुष्याचे लक्षण आहे. बौद्धधर्मातच म्हटलेले आहे की, बुद्धाची शिकवण हीच उत्तम वस्तू आहे. गांधीजी तर रवीन्द्रनाथांसारख्यांचे कथनदेखील बौद्धकथन मानीत असत..."

नंतर म्हणाले— 'ओश्योसामा गांधीजींना भेटायला सेवाग्रामला जात असताना आगगाडीत मी त्यांना भेटलो होतो. आश्रमात ते आपल्या चामड्याचा पंखा घेऊन 'नम् म्यो होरेंगे क्यों'चा मंत्र म्हणायचे. आम्हांला चिनी-जपानी येत नाही. त्यामुळे मंत्राचा अर्थ आम्हांला कळला नाही. पण ओश्योसामांमधली भक्ती व धर्मनिष्ठा पाहून आम्ही प्रभावित झालो. गांधीजीही प्रभावित झाले. पुढे ओश्योसामांनी आपल्या शिष्यांना तेथे पाठवायला सुरुवात केली. त्यांतल्या मारूयामाशी माझी मैत्री जुळली. मारूयामांनी गांधीजींसाठी एक छोटी भेट आणली होती– ते तीन वानर. वाईट बोलू नये, वाईट पाहू नये, वाईट ऐकू नये– असा उपदेश देणारे. गांधीजींना भेट इतकी आवडली की, त्यांनी त्या वानरांना आपले गुरू मानले. मारूयामांची आम्हा आश्रम-वासियांवर चांगली छाप पडली. एके दिवशी ते गांधीजींकडे गेले आणि त्यांनी स्वतः-साठी एक नवे नाव मागितले. गांधीजींनी नाव दिले – आनंद. भगवान बुद्धाचा एक उत्तम शिष्य होता आनंद. आनंद म्हणजे प्रसन्नता. ती मारूयामांच्या चेहऱ्यावर सदैव तरळत असे. आश्रमात ते नेहमीच प्रसन्न राहायचे. फारसे बोलत नसत. सोपविलेली कामे निष्ठेने करीत असत आणि फावल्या वेळात लिहीत बसत. त्या वेळी इंग्रजांचे राज्य होते. त्यांनी जेव्हा जपानी लोकांची धरपकड सुरू केली, तेव्हा ते मारूयामांनाही आश्रमातून घेऊन गेले. गांधीजी म्हणाले– आपण गुलाम आहोत, म्हणून हे आपल्या पाहुण्यांनादेखील पकडून घेऊन जाऊ शकतात. आता आपण स्वतंत्र झालेच पाहिजे. मग म्हणाले– इंग्रज मारूयामांना घेऊन गेले म्हणून काय बिघडले? त्यांचा मंत्र आपण आपल्या प्रार्थनेत दाखल करू शकतो आणि तेव्हापासून 'नम् म्यो होरेंगे क्यों' हा मंत्र आमच्या आश्रमी प्रार्थनेचा एक भाग झाला. या मंत्राने जपान व भारत यांना एकत्र आणले आहे. आम्हांला हे संबंध दृढ करायचे आहेत."

काकासाहेबांनी या छोट्या भाषणाने जणू जपानचे हृदय जिंकले! तेथे जमलेले सारे जपानी खूष झाले. 'हे आपलेच आहेत' असे त्यांना वाटू लागले.

या देशाशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करावयाचे तर काकासाहेबांच्याच मार्गाने गेले पाहिजे, ही भावना दृढ होऊनच मी त्या दिवशी हाकोनेला परतलो.

विदेशात जाणाऱ्या लोकांमध्ये दोन प्रकारचे भारतीय मी आतापर्यंत पाहिले होते. आपल्याकडे काहीही नाही; शिकण्यासारखे जे काही आहे ते सर्व विदेशांतच आहे, या वृत्तीने जाणारे हा एक प्रकार व ज्ञान, धर्म, सदाचार व चारित्र्य यांची दीक्षा भारतच जगाला देऊ शकतो, ही भूमिका घेऊन जाणारे दुसरे. वस्तुतः कुठल्याच एका राष्ट्राला देवाने सर्वश्रेष्ठ बनविलेले नाही. एखाद्याची थोरवी एका बाबतीत असते, दुसऱ्याची दुसऱ्या बाबतीत असते. ज्याच्याकडून घेण्याजोगे असते त्याला देण्याजोगेही आपल्याकडे असते, हे तारतम्य ठेवून परदेशात जाणारे कितीसे आहेत ?

भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा आपली अनेक शिष्टमंडळे निरनिराळ्या देशांत गेली. काही चीन–जपानच्या बाजूलाही गेली होती. दुर्दैवाने यांपैकी काही लोकांनी या देशाची हृदये जिंकण्याऐवजी "तुमच्याकडे बौद्धधर्म आला तो आमच्या देशातून; आम्ही तुम्हांला सुसंस्कृत केले" अशी गुरुपदाची भूमिका घेतली आणि या देशांना थोडेसे डिवचले. जपान, कोरिया, काम्बोडिया, सियाम आदी देशांना भारताविषयी भक्तिभाव वाटत असतो याविषयी शंकाच नाही. भारतात भगवान बुद्धाचा जन्म व बौद्धधर्माचा उदय झाला, म्हणून हे लोक भारताला पुण्यभूमी मानत असतात हेही खरे; पण या देशांनी बौद्धधर्माचा स्वीकार करून त्याला स्वतःचे असे एक रूप दिले हे विसरून चालता यायचे नाही. या देशातील लोकांनी बौद्धधर्माचा जो विकास केला तो त्याच्या भारतीय आवृत्तीपेक्षा निराळ्या प्रकारचा आहे, याचे भक्तिपूर्वक अध्ययन केल्याशिवाय आपल्याला बौद्धधर्माच्या समृद्ध स्वरूपाचे आकलन व्हायचे नाही. त्यासाठी नम्रतेची आवश्यकता आहे. आपण जेव्हा नम्र बनून त्यांना म्हणतो की, आपला परिवार जरी एकच असला व त्या दृष्टीने आपण भाऊ भाऊ असलो तरी आपण अनेक क्षेत्रांत प्रावीण्य संपादन केले आहे, ते घेण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. तेव्हा तेही नम्र होतात व म्हणतात–‘आम्ही भारताकडून पुष्कळ घेतले आहे. तुम्ही आमचे वडील बंधू आहात.’ या देशाशी आत्मीयतेचे संबंध घनिष्ट करण्याचा हाच मार्ग आहे.

जपान व भारत यांचे राजकीय संबंध आज सलोख्याचे आहेत. ते उत्तरोत्तर दृढ होत जातील याविषयी शंका नाही. या दोन्ही देशांच्या संबंधांवरच आशिया खंडाचे भवितव्य अवलंबून आहे. परंतु या दोन्ही देशांची हृदये जोडायची असतील तर काकासाहेबांच्या पद्धतीने आपल्याला दोन्ही देशांमधील सांस्कृतिक संबंध अधिकाधिक दृढ करावे लागतील; दुसरा मार्ग नाही.



## : १४ : जपानचे सुंदर हृदय

होरिउचीसाननी एक पुरा आठवडा आमच्यावर आपल्या अतिथ्याचा वर्षाव केला. तेच आमचे इथले मुख्य यजमान होते. भारतातून आलेल्या या पाहुण्यांना काय दाखवू, काय नको, काय देऊ, काय नको ही एकच विवंचना जणू त्यांना आठवडाभर लागून राहिली होती. हाकोने गोतेम्बाच्या आजूबाजूला जे जे काही सुंदर व भव्य होते ते ते सर्व त्यांनी आम्हांला दाखविले. तरीही त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून ते एकदा आम्हांला आडवाटेने एका डोंगरमाथ्यावर घेऊन गेले व तेथून हाकोनेचे दृश्य कसे भव्य दिसते ते आम्हांला दाखविले. एके दिवशी ते एका उंच पुलावर आम्हांला घेऊन गेले व तेथून खोल वाहणाऱ्या नदीचे दर्शन त्यांनी आम्हांला घडविले.

हाकोनेच्या मियानोशिता भागात असा एक उंच पूल आहे. तो त्यांनी आम्हांला मोठ्या उत्साहाने एकदा दाखविला होता. मियानोशिता भागातल्या फुजिया हॉटेल-मध्ये त्यांनी आम्हांला एक दिवस मुद्दाम ठेवले होते तेही तिथल्या भीषण-रम्य सृष्टीचे आम्हांला दर्शन घेता यावे म्हणूनच.

त्यांच्या पत्नी हारूसान आमचे आतिथ्य करण्यासाठी मुद्दाम तोक्योहून गोतेम्बाला येऊन राहिल्या होत्या. आपल्याबरोबर त्या मासाकोसान व रिजूकोसान नावाच्या

दोन मुलीही मदतीसाठी घेऊन आल्या होत्या. या मंडळीने आमच्यावर जो आतिथ्याचा वर्षाव केला तो अनुभवून मी तर अगदी गुदमरून गेलो.

जपानी आतिथ्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय त्याची कुणाला कल्पना यायची नाही. आपण भारतीय लोक आतिथ्यशील आहोत अशी आपली ख्याती आहे. भारतीयांमधील आम्हा गोमंतकीयांची आतिथ्यशीलता तर अगदी दोषरूप वाटावी इतकी पराकाष्ठेची असते. पण गोतेम्बाला जपानी आतिथ्याचा जेव्हा मी प्रत्यक्ष अनुभव घेतला तेव्हा माझा गर्व कुठल्या कुठे नाहीसा झाला.

इतक्या मधुर अनुभवानंतर या मंडळींचा निरोप घेताना हृदय भरून आले. हाकोने सोडण्याच्या आदल्या दिवशी गोतेम्बाच्या मंदिरात होरिउचीसाननी आम्हांला निरोपाचे जेवण दिले. दुपारी दीड वाजता हा कार्यक्रम सुरू झाला होता तो चार वाजेपर्यंत चालला. काकासाहेब व ओश्योसामा उठून गेल्यानंतर श्रीमती हारूसाननी आम्हांला एक उत्कृष्ट नृत्य करून दाखविले. इशिबासीसान नावाच्या एका वयस्क साधूने जे सामुराई नृत्य करून दाखविले ते तर अंगावर रोमांच उभे करणारे होते.

इशिबासीसानशी आमचा परिचय आतामीला झाला होता. ते कित्येक वर्षे भारतात मुम्बई–सुरतच्या बाजूला व्यापाराच्या निमित्ताने राहिले होते. स्वतःची ओळख ते ' मैं जापानका साधु नहीं हूँ, भारतका हूँ ' अशी द्यायचे. दोन वर्षांपूर्वी त्यांनी बौद्ध भिक्षूची वस्त्रे परिधान केली. आपला देह भारतात राजगीरला ठेवण्याची त्यांची मनीषा त्यांनी आमच्यापाशी व्यक्त केली. तेव्हापासून त्यांच्याविषयी आमच्या मनात एकप्रकारची आत्मीयता उत्पन्न झाली होती. पण हा म्हातारा इतका रसिक असेल याची मला कल्पनाही नव्हती.

नृत्यातले मला विशेष काही समजत नाही. पण भारतात मी अनेक प्रकारची उत्कृष्ट नृत्ये पाहिली आहेत. संगीताप्रमाणेच आपले नृत्यही आपण पूर्णतेला पोहोचविले आहे अशी माझी समजूत होती व अजूनही आहे. तरीही मला वाटते की, जपानी नृत्यात घेण्याजोगे बरेचसे आपल्याला सापडेल. अर्थात तज्ज्ञांनी याचा विचार केला पाहिजे.

गोतेम्बालाच आम्ही जपानी लोकनृत्याचे काही उत्कृष्ट नमुने पाहिले. माझ्या अवलोकनात एक गोष्ट आली होती ती ही की, आपल्याकडील नृत्यात मुद्रा जशा बोटांनी दर्शवितात तशा जपानी नृत्यात हातातील पंख्यामार्फत भाव व्यक्त करण्यात येतात. डोळ्यांना, बोटांना, चेहऱ्याला या नृत्यात स्थान जरी असले तरीही भाव प्रकट करण्यासाठी हातातील पंख्यालाही तितकेच महत्त्व आहे.

येथेच मला माझ्या समाजातील तरुण वर्गाच्या दोषांची प्रकर्षाने जाणीव झाली. का कुणास ठाऊक, हिन्दू समाजातील तरुणांना बिगर हिन्दू समाजाशी मिसळताच येत नाही. मिसळण्याची आपली प्रामाणिक इच्छा असते. पण मिसळणे आपल्याला सहसा साधत नसते. हिन्दू तरुणांपेक्षा देशी मुसलमान किंवा देशी ख्रिस्ती विदेशी समाजात चांगले मिसळू शकतात असे मी पाहिले आहे. माझ्यासारख्यांना म्हणजे ज्यांना गाता येत नाही आणि नाचताही येत नाही त्यांना विदेशी समाजात मिसळता आले नाही तर मी समजू शकतो. पण जे हिन्दू तरुण युरोपियन वातावरणातच वाढले आहेत– म्हणजे ज्यांना खाण्यापिण्याच्या बाबतीत कोणत्याच प्रकारचा विधिनिषेध नाही, ज्यांना गाता-नाचताही चांगले येते व आवडते, त्यांनादेखील विदेशी समाजात मिसळता येत नाही, असा माझा अनुभव आहे. फार कशाला, विदेशात स्थायिक होऊन राहिलेल्या हिन्दूंनादेखील त्या त्या देशातील समाजाशी कधी एकरूप होता आले नाही. असे का व्हावे मला समजत नाही. आपण बाहेरून कितीही बदललो तरी आतून मात्र मूळचेच राहतो. इतर समाजाशी कितीही मिसळलो तरी नेहमी वेगळेच राहतो. कोणत्या संस्कारामुळे हिन्दू असा झाला आहे, ( exclusive ) ईश्वर जाणे !

त्या दिवशी आमच्यावर भारतीय गीते म्हणून दाखविण्याचा प्रसंग ओढवला. मंदिरात जमलेल्या जपानी स्त्री–पुरुषांनी अनेक प्रकारची जपानी गीते म्हटल्यावर आता भारतीय गीते म्हणून दाखवा म्हणून आमच्याशी त्यांनी आग्रह धरला. मी तर बाथरूम-मध्येदेखील कधी गुणगुणत नसतो असे सांगून संकट टाळले. शरद पंड्याही लाजले. होय-नाही म्हणत म्हणत सरोजबेननी ‘ वैष्णवजन तो तेने कहिये ’ म्हटले. पण शेवटी नरेश मंत्रींनी आमची अब्रू राखली. त्यांनी प्रथम दोन जपानी गीते म्हणून दाखविली आणि नंतर जपानी अभिरुचीला पसंत पडेल असे मीराबाईचे ‘ बोलमा बोलमा बोलमा रे ’ हे गुजराती भजन म्हटले.


समारंभाच्या शेवटी सर्वांनी मिळून एक समूहगान म्हटले. ‘ माणसाचे हृदय शुद्ध असले तर त्याला अशक्य काय आहे ? ’ असा त्या गीताचा भाव होता. मला त्याचे शब्द आठवत नाहीत, आठवणे शक्यही नाही. पण त्याचे सूर मात्र अजून आठवतात. त्या गीतामुळे त्या दिवसाचे सारे वातावरण प्रसन्न–तृप्त झाले होते.

शेवटी हाकोनेचा आम्हांला दुसऱ्या दिवशी निरोप घ्यावा लागला. आठ दिवसांपूर्वी येथे आलो होतो तेव्हा कुणाशीच आमचा परिचय नव्हता. सगळे परक्यां-सारखे वाटत होते. पण हळूहळू परिचय वाढत गेला आणि शेवटी हे सर्व स्वकीयच आहेत असे वाटायला लागले; त्यांचा निरोप घेताना अंतःकरण भरून आले. खरोखर हाकोने येथील आमचे ते आठ दिवस म्हणजे कोणालाही आमचा हेवा वाटावा अशा

प्रकारचे होते. किती अपरिचित लोकांशी ओळखी झाल्या होत्या ! आणि किती हृदयांत आम्हांला प्रेमाचे स्थान मिळाले होते ! पण—

'या तरंगत्या जगात किती तरी लोकांशी भेटी होतात आणि किती तरी लोकांचा आपण निरोप घेतो' अशा अर्थाची जपानी भाषेतच एक म्हण आहे. जे काल-परवापर्यंत परके होते ते आज अत्यंत जवळ आले होते. आज त्यांचाही निरोप घेऊन आम्ही पुढे जात होतो.

हाकोनेहून गोतेम्बाला येऊन आम्ही तोक्योला जाणारी आगगाडी पकडली. स्टेशनवर सगळी मंडळी निरोप द्यायला आली होती. गाडी सुटायची वेळ झाली तेव्हा होरिउचीसानच्या डोळ्यांत मी आसवे पाहिली आणि मी पार विरघळून गेलो. त्याच क्षणी गाडीने गोतेम्बा स्टेशन सोडले. मी पुन्हा एकदा बाहेरच्या वनश्रीवर दृष्टी फेकली. प्रेमाच्या साक्षात्कारात तिचाही वाटा होता. तिला पुन्हा एकदा डोळेभर पाहून घ्यावे असे वाटले. जसजशी गाडी तोक्योच्या दिशेने धावू लागली तसतसा माझ्या हृदयातून एक आवाज उठू लागला – जपान सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीने अतिशय सुंदर आहे, पण जपानचे हृदय त्याहूनही सुंदर आहे.



## : १५ : एका धाग्याने विणला गेलेला देश

काही दिवसांपूर्वी प्रथमच जेव्हा तोक्योला पाऊल ठेवले त्या वेळी — नाही म्हटले तरी — कसे परके परके वाटत होते ! नवीनच आलो होतो त्यामुळे प्रत्येक गोष्टीकडे कुतूहलाने व स्नेहपूर्ण दृष्टीने पाहात होतो. तरी माझ्या परिचित जगापेक्षा अगदीच भिन्न अशा जगात आलो आहे याची जाणीव मला मधून मधून झाल्यावाचून राहात नसे. आज दहा दिवसांनंतर पुन्हा जेव्हा मी या शहरात पाय ठेवला त्या वेळी मी परकी जगात आलो आहे असे वाटलेच नाही. या समाजात मी बराच रुळलो आहे असेच जणू वाटू लागले. दहा दिवसांत माझ्या दृष्टीत व वृत्तीत केवढा मोठा फरक पडला होता !

अडचण केवळ भाषेचीच होती. जपानी भाषेचे एक अक्षरदेखील मला समजत नव्हते. नाही म्हणायला एव्हाना आठ-दहा जपानी शब्द माझ्या परिचयाचे झाले होते. सकाळी कुणी ओळखीचा भेटला म्हणजे मी न चुकता 'ओहाइयो गोझाय मस' (सुप्रभातम्) म्हणत असे. कृतज्ञता व्यक्त करताना हटकून 'दो मो आरिगातो

गोझाय मस्ता ’ ( मी आपला फार आभारी आहे ) हेही वाक्य वापरत असे आणि कुणाशी काही बोलत असलो व तो मला काही सांगू लागला ( अर्थात इंग्रजीत ) तर त्याचे बोलणे ऐकताना मधून मधून ‘ सो देस्का ’ ( असं काय ) हे जपानी शब्द पेरीत असे. नाही म्हणायला ‘ आरे ! ’ ह्या आमच्या कोकणी आश्चर्यवाचक उद्‌गाराला जपानी भाषेतही तोच अर्थ असल्याचे समजल्यावर मी ‘ आरे ! ’ असे जपानीत म्हणून माझे आश्चर्य व्यक्त केले होते. याच्यापलीकडे माझी मजल गेली नव्हती. माझ्यापेक्षा शरद पंड्यांनी थोडे अधिक शब्द अवगत करून घेतले होते. त्यांचे जपानला येण्याचे निश्चित झाल्याबरोबर त्यांनी सर्वप्रथम दिल्लीला कुठून तरी जपानी ‘ स्वयंशिक्षक ’ मिळवून घेतला व तो थोडाबहुत अभ्यासूनही काढला. येथे त्यांच्या हातात त्या स्वयंशिक्षका-शिवाय एक इंग्रजी–जपानी कोशही असायचा. त्यांच्या जोरावर ते येथे लोकांशी जपानीतूनच बोलण्याचा प्रयत्न करीत. पण त्यातून समजुतीचा घोटाळाच अधिक होत असे. शरदच्या तोंडून जपानी वाक्य निघाले म्हणजे समोरच्या व्यक्तीला यांना जपानी समजते असे वाटायचे व ती व्यक्ती भराभरा जपानीतूनच उत्तर द्यायची. अशा वेळी ‘ मला जपानी कळत नाही ’ असे कबूल करून शरद पंड्यांना मोकळे व्हावे लागत असे. एखाद्या हॉटेलमध्ये तर याहूनही ज्यास्ती घोटाळा व्हायचा. शरद पंड्यांनी मला मांस नको, मासे नकोत, असे सांगून ऑर्डर दिली म्हणजे त्यांच्यासाठी हटकून मांस व मासे यायचे. मग शरद पंड्या कंटाळून म्हणायचे, ‘ कसले लोक आहेत हे ! यांना त्यांच्या भाषेत सांगितले तरी समजत नाही. ’ या अनुभवावरून मी थोडा शहाणा झालो. मी जपानी भाषा समजून घेण्याचा थोडा प्रयत्न केला खरा; पण बोलण्याच्या भानगडीत कधी पडलो नाही. तरीही माझे काही अडले नाही. जपानी लोकांच्या हृदयाशी संबंध जोडायला मला माझ्या भाषेच्या अज्ञानाची अडचण जराही आली नाही. हृदय ही वस्तूच अशी आहे की, त्याला दुसऱ्या हृदयाशी एकतान व्हायला शब्दांच्या मदतीची फारशी आवश्यकता भासत नाही.

या खेपेला तोक्योत विश्वविद्यालयातील काही प्राध्यापकांच्या भेटी झाल्या. काहींशी तर घनिष्ठ संबंधही प्रस्थापित झाले. त्यांच्याकडून मला जपानच्या सामाजिक जीवनाविषयीच्या काही महत्त्वाच्या गोष्टी समजल्या.

उदाहरणार्थ, जपानमध्ये प्रत्येकाचे जसे कुटुंब असते, तसा प्रत्येकाचा स्वतःचा असा एक समूह– Group–ही असतो. या समूहाबाहेर जपानी माणसाला व्यक्ती या नात्याने स्वतंत्र स्थान नाही, वेगळे अधिकार नाहीत. व्यक्तिवादाचा संस्कारच या राष्ट्राच्या मानसावर नाही. जपानच्या सामाजिक इतिहासातली सारभूत अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती हीच होय.

जपानच्या इतिहासात अनेक प्रकारचे लढे झाले. पण व्यक्ति-स्वातंत्र्यासाठी एकही लढा झाला नाही. व्यक्ति-स्वातंत्र्याची कल्पना जपानी मनाला कधी शिवलीही नाही माझ्यापाशी वेळ आहे, संपत्ती आहे, मी या गोष्टींचा मला हवा तसा उपयोग करीन असे म्हणणारा इसम जपानमध्ये आढळायचा नाही. व्यक्ती ही समाजाशी काही कर्तव्यांनी बांधली गेली आहे, ही सामाजिक कर्तव्यांची भावना हीच जपानची नीती आहे. या कर्तव्यांपासून जी व्यक्ती च्युत होते ती येथे अनीतिमान मानली जाते.

जपानी मनुष्य जेव्हा आपल्या मुलाला नीतीचे आदर्श शिकवितो तेव्हा तो पाप-पुण्याचा विचार करीत नाही. (जपानी भाषेत म्हणे पाप-पुण्यासाठी प्रतिशब्दही नाहीत.) पण तो दुसऱ्या एका मूल्यावर भर देतो. या मूल्याला ‘ शिन्यो ’ हे नाव आहे. या मूल्यामध्ये दिलेला शब्द पाळणे, कुटुंबनिष्ठ व समाजनिष्ठ राहणे, अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. ‘ शिन्यो ’ हे इथले एक मोठे जीवन-मूल्य आहे. या मूल्याचे पालन प्रत्येकाने काटेकोरपणे केलेच पाहिजे. अन्यथा त्याला इथे प्रतिष्ठा राहत नाही.

या मूल्यामुळे जपानी मनुष्य एक-पक्षी त्याच्या पितरांशी, आई-वडिलांशी, वडील बंधूंशी व वरिष्ठांशी, काही कर्तव्यांनी बांधलेला असतो; तर दुसरे-पक्षी तो आपल्या धाकट्या भावांशी, मुलांशी व आपल्या आश्रयाखाली राहणाऱ्या किंवा हाताखाली काम करणाऱ्या लोकांशी बांधला जातो. या बंधनातच प्रत्येक जपानी स्वतःला सुरक्षित मानतो. कोणीही या बंधनापासून स्वतःची सोडवणूक करून घेण्याचा किंवा निसटण्याचा प्रयत्न करीत नाही. निसटला तर त्याचे पतन झाले असे समजायचे. मग अशा माणसाचे स्थान ‘ जिगोकु ’मध्ये नरकामध्ये. तेथून मुक्ती मिळणे अशक्य.

सामान्यतः सामाजिक रूढींचा कडकपणा शहरापेक्षा खेड्यामध्ये अधिक असतो. परंतु जपानमध्ये औद्योगीकरणामुळे खेड्यांचेदेखील आता झपाट्याने नागरीकरण होऊ लागले आहे. अलीकडच्या काळात बहुतेक खेडी कुठल्या तरी जवळच्या मोठ्या शहराची उपनगरे बनू लागली आहेत यामुळे इथल्या खेड्यांना खेडी म्हणण्यापेक्षा नगरेच म्हणण्याची इच्छा होते. लोकवस्ती भरगच्च, व्यापाराच्या उलाढाली यथेच्छ, बँका, हॉस्पिटले, हॉटेले ही आतोनात, चित्रपटगृहे, पेय-गृहेही तितकीच. शिवाय ‘ पाचिंको ’सारखे खेळ. या गोष्टींमुळे जपानी खेडे खेड्यासारखे दिसतच नाही. त्यात जर हे खेडे एखाद्या संस्कारधामाजवळ असले तर विदेशी प्रवाशांची गर्दीही तेथे व्हायची. पण आश्चर्य हे की, तरीही जपानी खेड्यांच्या सामाजिक जीवनात या शहरीकरणाने स्थित्यंतर झालेले नाही. शेकडो वर्षांपासून जपानी समाज ज्या मूल्यांनी गुंफला गेला आहे ती सामाजिक मूल्ये अजूनही अबाधित स्वरूपात आहेत. जेव्हा पेरणीचे वा कापणीचे दिवस येतात तेव्हा खेड्यातले सर्व शेतकरी आजही एकमेकांच्या

मदतीला जातात. नदीचा बांध तुटलेला असेल तर गावातील सगळे लोक एकत्र येऊन तो बांधतील. टाइफूनमुळे — वादळामुळे — एखाद्याचे घर उडून गेले तर गावातले सगळे लोक एकत्र येऊन त्याला नवीन घर बांधून देतील. एखाद्याचे लग्न झालेले नसेल तर गावचे लोक त्याला लग्न करून घ्यायचा आग्रह करतील. इतकेच नव्हे तर ते त्याच्यासाठी एखादी चांगली मुलगीही शोधून काढतील.

माणसाची प्रतिष्ठा येथे त्याच्या सामाजिकतेवर अवलंबून आहे. जो आपली सामूहिक कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडतो तोच येथे सदाचारी मानला जातो.

जपानी खेड्यातील घरांना कड्या नसतात, याचे कारणही हेच. येथे कोणीही दार लावून इतरांपासून स्वतःला वेगळा काढू इच्छीत नाही. सगळ्यांचेच हितसंबंध एकमेकांशी गुंतलेले असल्यामुळे येथे कोणी एकमेकांच्या बाबतीत अनास्था बाळगू शकत नाही. एखादा माणूस समाजाची बेपर्वा करून वैयक्तिक जीवन जगू लागला तर तो येथे अजूनही चर्चेचा विषय होतो आणि मग सगळेच त्याची हेटाळणी करायला लागतात. समाजाची बेपर्वा करणे म्हणजे एक प्रकारचे संकट ओढवून घेण्यासारखे आहे. अशा वेळी सारा समाज एक होतो व त्या व्यक्तीवर उलटतो.

तोक्योसारख्या अत्याधुनिक शहरातदेखील लोक याच नियमाला अनुसरून एकमेकांशी वागत असतात. या खेपेला माझी व शरद पंड्यांची व्यवस्था सानबांची हॉटेलाऐवजी आओयामा येथील किनोकुनिया सुपर मार्केटच्या अतिथिगृहामध्ये करण्यात आली होती. तेथे किनोकुनिया सुपर मार्केटचे अध्यक्ष व उपाध्यक्ष मासुई बंधू यांचा त्यांच्या कंपनीत काम करणाऱ्या लोकांशी असलेला जिव्हाळ्याचा संबंध व त्या लोकांची मासुई बंधूंच्याविषयी असलेली निष्ठा पाहण्याची संधी मिळाली. मालक व नोकर हा संबंधच तेथे आढळत नव्हता. सर्वच जणू एकाच परिवारातली माणसे आहेत असे वाटत होते. जवळ जवळ चारशे लोक तेथे काम करीत होते. पण या सर्वांकडे मासुई बंधू आपुलकीने वागत. हे लोक आपल्याकडे काम करतात, तेव्हा त्यांच्याकडून काम घेणे एवढीच आपली जबाबदारी नाही. त्यांच्या सुखदुःखाच्या बाबतीतदेखील आपली काही कर्तव्ये आहेत, या भावनेने दोघेही बंधू वागत असत आणि काम करणारे लोकदेखील हे आपले केवळ मालक नसून वडील बंधू आहेत या भावनेने मासुई-बंधूंकडे पाहात असत.

संपूर्ण जपानी समाज या अशा भावनेने एकमेकांशी बांधला गेला आहे. म्हणूनच या राष्ट्राची A Nation that acts as one अशी प्रतिष्ठा आहे. इथली प्रत्येक व्यक्ती जशी आपल्या कुटुंबाला एकनिष्ठ असते तसे प्रत्येक कुटुंब आपल्या

समाजाला एकनिष्ठ असते आणि हे सगळे लहान-मोठे समाज राष्ट्राला एकनिष्ठ असतात. जपान हे आशियातल्या सर्व राष्ट्रांपासून वेगळे दिसते ते याचमुळे.

आज जपानात लोकशाही आहे. म्हणजे तत्त्वतः येथे व्यक्ति-स्वातंत्र्याची प्राण-प्रतिष्ठा झाली आहे. औद्योगीकरणामुळे समाजाची बंधने थोडीबहुत ढिली पडली असतील. मागच्या युद्धातल्या पराजयाने जपानच्या सामाजिक जीवनाला थोडा तडा गेला असेल; तरीही एक गोष्ट निर्विवाद आहे की, हा देश ज्या एका धाग्याने विणला गेला आहे तो धागा अजून शाबूत आहे.

एके दिवशी मी आओयामाहून जवळच असलेल्या शिबुया स्टेशनवर गेलो होतो. एका मित्राला तेथे भेटायचे होते. स्टेशनच्या बाहेर कारंजाजवळ माझ्या मित्राची वाट पाहात मी उभा होतो. सहज माझी दृष्टी एका पुतळ्यावर पडली. हा पुतळा ‘ हाची ’ नावाच्या एका कुत्र्याचा होता. पुतळ्याखाली इंग्रजीत हाचीचे चरित्र दिले होते—

हाची कुठे जन्माला आला कुणास ठाऊक ! पण जन्माला आल्याबरोबर त्याला एक परकी इसम आपल्या घरी पाळायला घेऊन गेला. तेथे त्याला घरच्या मुलाप्रमाणे वागणूक मिळाली. हाचीही त्यामुळे मालकावर प्रेम करू लागला. मालक शिबुया स्टेशनच्या जवळच कुठे तरी राहात असे. पण कामासाठी तो रोज दूर कुठे तरी जात असे. त्यासाठी त्याला शिबुया स्टेशनवर ‘ लोकल ’ गाडी पकडायला यावे लागत असे. मालकाबरोबर त्याला पोहोचवायला हाचीही नियमितपणे स्टेशनवर येत असे. संध्याकाळी साडेपाच-सहाच्या सुमाराला हाचीने पुन्हा स्टेशनवर यावे व मालकाची वाट पाहात तेथे बसावे. एका ठराविक गाडीने मालक नेहमी येत असे.

एके दिवशी मालक आपल्या कामाला गेला असता तेथेच हृदयक्रिया बंद पडून वारला. तिथून परभारे त्याचे प्रेत घरी आणून त्याची उत्तरक्रिया करण्यात आली. हाचीला विचाऱ्याला याचा पत्ता लागला नाही. तो रोजच्याप्रमाणे साडेपाच-सहाच्या सुमाराला शिबुया स्टेशनवर गेला. ज्या गाडीने मालक रोज येत असे त्या गाडीतून आज मालक आला नाही. तो दुसऱ्या गाडीची वाट पाहात बसला. दुसरी गाडी आली, तिसरी आली, चौथी आली, परंतु मालक काही परतला नाही. हाची रात्र पडेपर्यंत तेथे बसून राहिला आणि शेवटी निराश होऊन घरी परतला.

दुसऱ्या दिवशी पुन्हा तो नित्याप्रमाणे संध्याकाळी स्टेशनवर आला आणि मालकाची वाट पाहात रात्र पडेपर्यंत तेथेच बसून राहिला. आजही मालक परतला नाही तेव्हा पुन्हा निराश होऊन हाची घरी आला.

मालक केव्हा ना केव्हा घरी परतणार या आशेने हाची नित्य स्टेशनवर येत असे. असा तो एक दिवस, दोन दिवस, तीन दिवस... नव्हे, सतत दहा वर्षे येत राहिला आणि शेवटी एके दिवशी हाचीने स्टेशनवरच प्राण सोडला.

स्टेशनवर येणारे-जाणारे हाचीला नेहमी पाहात असत. पावलॉवच्या सिद्धान्ता-प्रमाणे 'कंडिशन्ड रिफ्लेक्स'चा हा प्रकार असू शकेल अशी त्यांच्यापैकी कुणाच्याच मनात शंका आली नाही. त्यांना ती हाचीची स्वामिनिष्ठा वाटली. ही स्वामिनिष्ठा पाहून सगळेच प्रभावित झाले होते. हाची जेव्हा मेला तेव्हा सर्वांनी तेथे त्याचे स्मारक बांधण्याचे ठरविले आणि एका चांगल्या शिल्पकाराकडून हाचीचा पुतळा बनवून, हाची ज्या ठिकाणी मालकाची वाट पाहात बसत असे तेथे तो उभारण्यात आला.

जपानच्या हृदयाचे मर्म याच्याहून उत्कृष्ट प्रकारे आणखी कोणत्या गोष्टीने व्यक्त झाले असते?



## : १६ : नाण्याची दुसरी बाजू

ज्या लोकांना भूकंप, ज्वालामुखीचे स्फोट व वादळी वारे या नैसर्गिक संकटांशी नित्य नेमाने सामना करावा लागतो त्या लोकांमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते निर्माणच कसे होऊ शकतील! जपानी लोकांना एकमेकांच्या मदतीने शिस्तबद्ध सामूहिक जीवन जगण्याचे जे वळण मिळाले आहे ते इतर कोणत्याही कारणापेक्षा इथल्या भूगोलनेच लावले असले पाहिजे. भूगोल हा मानवाचा एक मोठा दीक्षागुरू आहे.

ते कसेही असो; या देशात जगायचे असेल तर प्रत्येकाला भरपूर मेहनत करून एकमेकांच्या सहकार्यानेच जगावे लागेल; अन्यथा येथे जगणे कठीण आहे ही भावना जपानी मानसामध्ये चांगलीच रुजलेली पाहावयास मिळते. आपण जेव्हा जपानी लोकांकडे पाहतो तेव्हा आपले लक्ष सर्वप्रथम त्यांच्या कामसू वृत्तीकडे जाते. हे लोक कामचुकार नाहीत, आरामतलब नाहीत; पुरुषार्थी आहेत. काम अंगावर घेतले तर ते दक्षतेने करतील. त्यांची कार्यशक्ती दांडगी आणि सहनशक्तीही मोठी. केवढेही मोठे संकट आले तरी हे लोक कधी हार खाणार नाहीत; इतकेच नव्हे तर तोंडावरदेखील दुःखाची छटा उमटू देणार नाहीत.

सोळाव्या शतकात ' फॅर्नांव मॅन्दिश पिन्तू ' या नावाचा एक पोर्तुगीज प्रवासी येथे आला होता. त्याने येथे जपानी लोकांना अचाट कामे करताना पाहिले. पोर्तुगालला परतल्यावर त्याने आपल्या जपानच्या प्रवासातले अनुभव लिहून लोकांपुढे ठेवले. जपान-वर तो मुग्ध झाला होता. पण लोकांनी ते अनुभव वाचून विचाऱ्याची थट्टा सुरू केली. हा यथेच्छ थापा मारतो आहे अशीच लोकांची समजूत झाली. पोर्तुगीज भाषेत थापा मारणे याला ' मेन्तीर ' हा शब्द आहे. ' तू थापा मारतोस काय ? ' असे विचारायचे झाल्यास पोर्तुगीज लोक ' मॅन्तिश ? ' म्हणून विचारतात; आणि ' होय, मी थापा मारतो ' असे म्हणताना ' मिन्तु ' हा शब्द वापरतात. फॅर्नांवच्या नावातल्या मॅन्दिश पिन्तूचे ' मेन्तिश मिन्तु ' असे रूपांतर करून त्याच्या नावावरच ते कोटी करू लागले.

ज्या वेळी आधुनिक विज्ञानाने जपानमध्ये प्रवेश केला नव्हता त्या वेळी त्यांची ख्याती अचाट कामे करणारे म्हणून होती; आणि आता तर विज्ञानाच्या प्रवेशानंतर या लोकांची शक्ती किती तरी वाढली आहे.

आमच्या गोव्यात पाऊस यथेच्छ पडत असतो; आणि त्यामुळे खते वगैरे टाकून तयार केलेली जमीन धुऊन जवळजवळ वाहून जाते. पाऊस संपल्यावर आम्हांला पुन्हा जमीन तयार करावी लागते. या त्रासातून मुक्त होण्यासाठी जपानी लोकांकडे एखादी उपाययोजना आहे काय ? याची पृच्छा मी एका मित्रापाशी केली. या अनु-षंगाने बोलता बोलता माझ्या मित्राने मला सहज एक गोष्ट सांगितली —

जपानमध्ये वादळी वाऱ्यांचे अनुमान बिनचूक लावले जाते. हवामानशास्त्राचा या लोकांनी चांगलाच विकास केला आहे. वादळी वारे कोणत्या दिवशी येतील, कुठे कुठे वाहू लागतील, कोणकोणत्या गावांवर आदळतील, व त्यामुळे त्या गावाचे कोणत्या प्रकारचे किती नुकसान होईल याचे अंदाज हे लोक पंधरा-वीस दिवस अगोदरच बांधू शकतात. त्याप्रमाणे एकदा असे वादळी वाऱ्याचे अनुमान लावले गेले. हे वादळी वारे अमूक दिवशी अमूक एका गावाला आदळतील आणि त्यामुळे अमूक एका नदीला पूर येऊन अमूककडची इतकी घरे वाहून जातील,—वगैरे माहिती जपानी वेधशाळेने पंधरा दिवस अगोदर जाहीर केली. ज्या गावाचे जास्तीत जास्त नुकसान होणार होते त्या गावच्या लोकांना वर्तमानपत्रांतून, तसेच रेडिओ व टेलिव्हिजनद्वारा ही माहिती सकाळी मिळाली. निदान ज्यांची घरे वाहून जाणार होती त्यांच्या मनामध्ये तरी या बातमीने घबराट पसरायला पाहिजे होती; परंतु आश्चर्य म्हणजे कुठेच धावाधाव झाली नाही. सगळेचजण नित्याप्रमाणे अगदी निर्विकार बुद्धीने आपापल्या कामावर गेले. त्यांना ठाऊक होते की असे काही घडणार असले तर सरकारकडून आपल्याला काही सूचना येतील आणि वेळेवर मदतही येईल. आपण उगीच मध्ये गडबड काय म्हणून करायची ?

दुपारपर्यंत सरकारकडून खरोखर सूचना व मदत आली. गावात काही तज्ज्ञ आले, काही कामगार आले, आणि गावच्या लोकांच्या मदतीने त्यांनी या गावाचे रक्षण करण्याची उपाय-योजना आखून काढली. एक डोंगर खोदून त्यातून एक बोगदा काढला आणि ज्या नदीला पूर येणार होता त्या नदीचा प्रवाहच त्या बोगद्यातून वळवून समुद्रात नेऊन सोडला.

मी ही गोष्ट ऐकली तेव्हा थक्कच झालो. पण यात खरोखर आश्चर्य करण्याजोगे काहीही नव्हते. असली अचाट कामे करण्याची जपानी लोकांना सवयच आहे. त्यांच्या हाडामांसातच हा पराक्रम भिनलेला आहे. अलीकडेच म्हणे त्यांचा रशियाबरोबर एक करार झालेला आहे. रशियन लोक पुरुषार्थी खरेच; पण त्यांनादेखील सायबेरिया अजून वसविता आलेला नाही. या करारान्वये सायबेरिया ऊर्जितावस्थेला आणण्याची जबाबदारी आता जपानने उचलली आहे.

मी विचारले, ‘ तिथे जपान काय करणार आहे ? ’

‘ उत्तर-ध्रुवाकडून एक नदी खोदून ते ती जपानी सागरात आणून सोडणार आहेत. ’ मला उत्तर मिळाले.

मी मनात म्हटले, हे जपानी लोकांनाच शक्य आहे. आपल्याकडे असला पुरुषार्थ फक्त भगीरथाने एकदा केला होता – तोही पुराणकाळात.

ही झाली एक बाजू. पण या नाण्याची दुसरीही एक बाजू आहे, —

सामूहिक रीतीने काम करण्याची सवय या लोकांच्या इतकी अंगवळणी पडली आहे की, वैयक्तिकरीत्या एखादे काम करावे लागले तर त्यांना ते जणू करताच येत नाही. अगदी ल्हानसहान कामेदेखील चार-चौघांना विचारून सर्वसम्मतीने करता करता स्वतंत्ररीत्या निर्णय घेऊन काम करण्याची यांची शक्तीच जणू कुंठित झाली आहे. एखाद्या ठरलेल्या कार्यक्रमात आयत्या वेळी थोडासा बदल करण्यात आला तर या लोकांची तारांबळच उडते. आपल्याकडे समजा, आठ-दहा जपानी आले आणि त्यांचे आतिथ्य करताना आपण त्यांना विचारले, ‘ आपण काय घेता ? चहा की कॉफी ? ’ तर ते एकमेकांची तोंडे बघायला लागतील. चटकन उत्तर मिळायचे नाही. एखाद्याच्या तोंडून ‘ चहा आणा ’ असे उत्तर निघाले तर मग बाकीचे सगळे चहाच आणा म्हणतील.

एकदा एका शाळेतल्या विद्यार्थ्यांचे एक शिष्टमंडळ कुणा तरी एका प्रतिष्ठित व्यक्तीच्या भेटीला गेले होते. त्या प्रतिष्ठित गृहस्थाने मुलांचे आतिथ्य करताना त्यांना एक थंड पेय प्यायला आणून दिले. इतक्यात त्याला फोन आला. तो उचलायला तो

आतल्या खोलीत गेला असता बराच वेळ तेथे फोनवर अडकून राहिला. परत येऊन पाहतो तर मुलांनी अजून पेय तोंडाला लावलेच नव्हते. कारण ते घ्या म्हणून त्यांना कुणी सांगितलेच नव्हते. घ्या म्हटल्याशिवाय कसे घ्यायचे ?

या स्वभावाचा एक परिणाम असा झाला आहे की, काम सांगणारा कुणी पुढे आल्याशिवाय जपानी माणूस आपण होऊन कोणतेच काम अंगावर घेत नाही. सांगणारा पाहिजे. मग लोक त्याच्यामागे चालायला लागतात; आणि सांगणारा जर प्रभावी असला तर त्याच्या मागे संपूर्ण राष्ट्र चालायला लागते. हुकमाशिवाय काम करायचे नाही; आणि हुकूम झाला तर त्याचा अव्हेर कधी करायचा नाही, हा जपानचा एक स्वभाव आहे.

एखाद्या बागेत फुले तोडू नका अशी पाटी लावलेली असली तर कोणताच जपानी माणूस फूल तोडणार नाही. मुख्य रस्त्यावर जिथे मोटरींची वर्दळ मोठी असते तेथे रस्ता ओलांडण्यासाठी ज्या लक्ष्मणरेषा घातलेल्या असतात त्याचे उल्लंघन पायी चालणारा कोणताच जपानी करणार नाही. ही शिस्तबद्धता आणि तंत्रनिष्ठा जपानी लोकांच्या अंगवळणीच पडलेली आहे.

जबाबदारी अंगावर येऊन पडली तर ती कसोशीने पार पाडणे हेही त्यांच्या अंगवळणी पडलेले आहे. पण त्याचबरोबर नवी जबाबदारी शक्यतो टाळणे हेही त्यांच्या स्वभावाचे अंग बनले आहे.


एके दिवशी मला बँकेत काम होते. किनोकुनिया कंपनीमधील इंग्रजी जाणणाऱ्या एका तरुणाला घेऊन मी सकाळी दहा वाजता बँकेत गेलो. वाटेत एके ठिकाणी एका इसमाला मोटरीचा धक्का लागून खाली पडलेला मी पाहिला. जपानमध्ये विशेषतः तोक्यो, ओसाका यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये मोटारीचे अनेक अपघात होत असतात. पोलिस-चौकीवर ठिकठिकाणी बोर्ड लावलेले असतात व खेळांचे ‘ स्कॉर ’ जसे जाहीर करतात तशा पद्धतीने अपघातांची संख्या जाहीर केली जाते. त्या माणसाला खाली पडलेला पाहून मी माझ्याबरोबर आलेल्या तरुणाला म्हटले, ‘ अरे, त्याला अपघात झाला आहे; चल आपण त्याला मदत करायला जाऊ या. ’

‘ No, it is dangerous. ’ तो म्हणाला.

या उत्तराचा अर्थ माझ्या लक्षात आला नाही. आश्चर्य म्हणजे तेथे रस्त्यावरून शेकडो लोक जात होते. पण त्यांपैकी एकदेखील त्या इसमाला मदत करायला धावला नाही. एक माणूस गाडीचा धक्का लागून पडला आहे आणि कोणीही त्याला मदत करायला सरसावत नाही हे दृश्य पाहून मला धक्का बसला. जपानी लोकांच्या माणुसकी-

बद्दलच्या ज्या कल्पना मी केल्या होत्या त्यांत ही गोष्ट बसण्याजोगी नव्हती. माझ्या-बरोबर असलेल्या तरुणाला त्याच्या मदतीला धावणे जसे धोक्याचे वाटले तसे कदाचित त्या शेकडो लोकांनाही वाटले असावे. मी विचारले, 'का धोक्याचे आहे?' पण मला समजावून सांगण्याइतके त्या तरुणाला इंग्रजीचे ज्ञान नव्हते. तेवढ्यात आमची गाडीही पुढे निघून गेली. मी स्वतः काही करू शकलो नाही याचे मला फार दुःख झाले. माझा सबंध दिवस अस्वस्थ मनःस्थितीत गेला. कुणाला सांगण्याचेदेखील धैर्य झाले नाही.

पुढे कित्येक दिवसांनंतर रूथबेनेडिक्टचे 'दि क्रिझांथेमम् ॲण्ड दि स्वोर्ड' हे पुस्तक वाचले तेव्हा मला या जपानी स्वभावाचे रहस्य उमजले. ज्याला अपघात झाला होता तो त्याच क्षणी मेला असता तर आसपासच्या लोकांनी तावडतोब त्याची व्यवस्था लावली असती. तो मेला नाही हेच त्याचे चुकले. जिवंत माणसाला – मग तो घायाळ झालेला का असेना – मदत करायला जाणे म्हणजे आणखीन एक नवी जबाबदारी ओढवून घेण्यासारखे आहे. आहेत त्या जबाबदाऱ्या पुष्कळ आहेत; नवीन कशाला ओढवून घ्या? बरे, मदत करायला गेलो तर पडलेल्या माणसाला उभा करून प्रकरण तेथे मिटते थोडेच! पुढचीही जबाबदारी आपल्या अंगावर येऊन पडते. त्याला हॉस्पिटलमध्ये पाठवा, त्याच्या घरच्या लोकांना कळवा, मग तो बरा झाला की नाही याची चौकशी करा, या साऱ्या गोष्टी एकामागून एक आपल्यामागे लागतील. माणुसकीच्या दृष्टीने या गोष्टी लावून घेता आल्या असत्या. पण खरी कटकट व अडचण यापुढे सुरू होते. घायाळ इसम आपण त्याला मदत केली म्हणून कायमचा आपल्या उपकारात राहतो. उपकार व प्रति-उपकार यांची मग एक शृंखला सुरू होते; आणि हे एक नवे बंधन होऊन बसते. जपानी माणूस टाळतो ते नेमके हेच. तो कुठल्याही इसमाला आपल्या बंधनात किंवा उपकारात ठेवू इच्छीत नाही. दुसऱ्याला उपकारात ठेवायला तो अतिशय घाबरतो.



## : १७ : काही स्वभाव-वैशिष्ट्ये

जपानमध्ये ओळखीच्या इसमाला किंवा ज्याच्याशी आपली प्रथमच ओळख होते त्याला अभिवादन करताना आपण कमरेपासून वाकले पाहिजे, हा नियम कळल्यापासून मी हस्तांदोलनासाठी हात पुढे करण्याचे जवळ जवळ सोडूनच दिले होते. पण वाकायचे म्हणजे कितीदा वाकायचे हे शास्त्र मात्र बरेच दिवसपर्यंत मला समजले नव्हते. आपण जितक्यांदा वाकतो तितक्यांदा जपानी इसम वाकतो अशी निरीक्षणान्ती समजूत करून घेऊन मी या चढाओढीला आपणच कुठे तरी मर्यादा घातली पाहिजे असा विचार करून दोनदाच वाकायचे असा माझ्यापुरता नियम ठरवून टाकला.

पुढे लक्षात आले की, वाकायचे असते एकदाच; पण नंतर जेव्हा आपली औपचारिक बोलणी होतात तेव्हा प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देताना वाकूनच उत्तर द्यायचे असते. उदाहरणार्थ, सकाळी उठल्याबरोबर जेव्हा एखाद्या मित्राची भेट होते तेव्हा आपण दोघेही एकमेकांना ' ओहाइयो गोझय मस् ' ( म्हणजे, सुप्रभातम् ) म्हणून वाकून अभिवादन करतो. त्यानंतर तो विचारतो ' रात्री झोप कशी आली ? ' तेव्हा ' छान ' असे उत्तर देताना ते वाकून द्यावे लागते. ' कालच्या सहलीनंतर तुम्हांला त्रास तर झाला नाही

ना ?' या प्रश्नालाही 'मुळीच नाही, उलट फार आनंद वाटला.' असे उत्तर देताना पुन्हा वाकावे लागते. 'जेवण चांगले मिळाले ना ?' पुन्हा वाकून 'होय उत्तम' असे उत्तर द्यायचे.

दोन जपानी महिला जेव्हा वाटेत एकमेकींना भेटतात तेव्हा त्यांच्यामध्ये लांब-लचक संवाद चालतो – घरची मंडळी ठीक आहेत ना ? मुले-बाळे ? अमूक अमूक सध्या कुठे असतो ? त्यांची पत्रे येतात ना ? तो बरा आहे ना ? त्याला माझा आशीर्वाद कळवायला विसरू नका बरें का ! अशी विचारपूस एक करते, तेव्हा दुसरीही तितकेच प्रश्न करून तिच्या कुटुंबाची चौकशी करते आणि दोघीही एकमेकींना उत्तरे देताना वाकून वाकून देतात. आपल्याला त्यांची भाषा कळत नसते. त्यामुळे कितीदा वाकावे याला येथे काही मर्यादाच नाही असा निर्णय घेऊन आपण मोकळे होतो.

एके दिवशी मला एक विचित्र शोध लागला : जपानी माणसाला जेव्हा 'नाही' म्हणायचे असते तेव्हा आपण 'होय' म्हणताना जशी मान हलवितो तशी तो हलवीत असतो. हे पाहून मला मोठी मौज वाटली आणि मी चौकशी केली. तेव्हा 'तुमच्या प्रश्नावर ते अवलंबून आहे' असे मला उत्तर मिळाले. आपण प्रश्नच जर नकारात्मक केला तर त्याला होय म्हणून उत्तर मिळेल. उदाहरणार्थ, 'तुम्ही अजून जेवण केले नाही ना ?' असा प्रश्न विचारल्यास 'केले नाही' असे सांगण्याऐवजी तो 'होय' म्हणून मान हलवील. मी त्याच क्षणी ठरविले की, "जपानी माणसाला आपण कधी नकारात्मक प्रश्नच विचारू नये. म्हणजे समजुतीचा घोटाळा होणार नाही.

आपल्याला जर कुणी विचारले, 'काल तुम्ही अमूक ठिकाणी गेला होता ना ?' तर 'कोण, मी ?' असे म्हणताना आपण आपल्या छातीकडे बोट दाखवितो. पण जपानी माणसाला जर आपण हा प्रश्न केला तर स्वतःचा निर्देश करताना तो आपल्या नाकाला बोट लावील ! !

जपानी लोकांची अशी बारीकसारीक कित्येक वैशिष्ट्ये थोड्याच दिवसांत माझ्या लक्षात आली. पुढे कित्येक दिवसांनंतर एक अतिशय महत्त्वाची गोष्ट लक्षात आली ती ही की, इतके आतिथ्यशील हे लोक कधी आपल्या घरी कुणाला मेजवानी देत नाहीत. घरोबा जर जास्त असला किंवा आपण खेड्यात पोहोचलेलो असलो तर गोष्ट निराळी. अन्यथा अतिथीचा सत्कार घरी बोलावून करायचा नसतो, तो नेहमी बाहेर एखाद्या जपानी पद्धतीच्या हॉटेलात किंवा चहापानगृहात करायचा असतो. हा इथला शिष्टसंमत नियम आहे. पाहुण्यांना घरी बोलावणे म्हणजे पाहुण्यांचा अनादर करण्या-सारखे आहे असे येथे मानले जाते. तोक्यो येथील किनोकुनिया सुपर मार्केटचे अध्यक्ष

व उपाध्यक्ष मासुई बंधू या दोघांच्याही मनामध्ये काकासाहेबांविषयी नितान्त आदर आहे. काकासाहेबांच्या तोक्यो येथील वास्तव्यात त्यांच्या आतिथ्याची सर्व जबाबदारी या दोघा बंधूंनी प्रामुख्याने उचलली होती. पण हे दोघेही त्यांना आपल्या घरी कधी घेऊन गेले नाहीत, हे मी पाहिले तेव्हा माझे कुतूहल जागृत झाले आणि तेव्हाच मला या शिष्टसंमत नियमाची माहिती मिळाली.

पाहुण्यांना किंवा मित्रांना भेटी देण्याचे जपानी लोकांना जणू वेडच असते. त्यातही जपानी लोकांचे स्वभाववैशिष्ट्य दिसून येते. वस्तू छोटी असो किंवा मोठी, ती सुंदर कागदात अत्यंत सुबक रीतीने बांधलेली असायची. ती आपल्या मित्राला किंवा पाहुण्याला देताना जपानी माणूस म्हणतो, 'अत्यंत क्षुल्लक वस्तू आहे ही. स्वीकार व्हावा!' जी वस्तू तो भेट म्हणून देतो ती कित्येकदा मौल्यवानही असते. पण ती कितीही मौल्यवान असली तरी आपण तिला नेहमी क्षुल्लकच मानली पाहिजे असा त्यांचा संकेत असतो. घेणारा मग लगेच म्हणतो, 'नाही, नाही. असे काय म्हणता? आपण खरोखर ही वस्तू देऊन माझा बहुमान केला आहे!' येथे लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, भेट-वस्तू घेणारा इसम कधीच देणाऱ्यासमोर ती उघडून बघत नसतो. वस्तू एखाद्या वेळी खरोखरच क्षुल्लक असली तर ती देणाऱ्याला संकोच वाटू नये हीच त्याची या बाबतीत भावना असते. मात्र दुसऱ्या खेपेला ते जेव्हा एकमेकांना प्रथमच भेटतात तेव्हा भेट स्वीकारणारा इसम ती देणाऱ्याचे न विसरता आभार मानतो.


मेजवानीच्या बाबतीतही हाच नियम. मेजवानी घेणारा इसम ती देणाऱ्याचे आभार त्याच दिवशी मानायचा नाही; पण दुसऱ्यांदा जेव्हा त्यांची भेट होईल तेव्हा 'कालची तुमची मेजवानी उत्तम होती. मी तुमचा फार फार आभारी आहे.' असे न विसरता सांगेल.

मेजवानीच्या बाबतीत एका जगावेगळ्या रिवाजाकडे कुणी तरी माझे लक्ष शेवटी शेवटी वेधले. मेजवानी संपल्यानंतर म्हणे पाहुण्यांनी निरोप घेण्यापूर्वीच यजमान कित्येकदा स्वतः निघून जात असतो. तोक्योसारख्या शहरात मेजवान्या सर्वसामान्यपणे एखाद्या जपानी रेस्तोराँमध्ये दिल्या जातात. यजमानाने रेस्तोराँच्या मालकाला किंवा मालकिणीला आज इतक्या लोकांची सरबराई करायची आहे असे सांगून पैसे अगाऊ देऊन टाकलेले असतात. पाहुण्यांना हे ठाऊक असते. त्यामुळे अशा मेजवान्यांच्या वेळी यजमान व पाहुणे असा भेद राहात नसतो. रेस्तोराँचा मालक किंवा मालकीण यांच्याकडून सर्वांची सारखी सरबराई होते. अशा मेजवान्यांत 'साके'– तांदळापासून काढलेली जपानी दारू पाजली जाते आणि प्रत्येक पाहुण्याच्या जवळपास एखादी गेयशा असते. कित्येकदा पाहुण्यांना साकेचा नशा चढलेला असतो. अशा वेळी

त्यांच्या आनंदात आपल्याकडून व्यत्यय येऊ नये या भावनेने यजमान पाहुण्यांना तिथेच ठेवून निघून जातो. असला रिवाज जपान सोडून जगात कुठेच पाहावयास मिळायचा नाही.

जपानी लोकांच्या एका स्वभाववैशिष्ट्यावर मात्र मी अगदीच लुब्ध झालो. जपानी माणूस कितीही गरीब असो, तो पैशांच्या बाबतीत कंजूष नसतो. तो कधी क्षुल्लक हिशेब लक्षात ठेवायचा नाही. एखाद्या मित्राकडे त्याचे पैसे राहिले असल्यास तो चुकूनदेखील त्याला त्याची आठवण करून द्यायचा नाही आणि मित्राने ते आणून दिले ( आणि ते नगण्य असले ) तर तो ते कधीच परत घ्यायचा नाही. 'राहू दे रे! त्यात काय मोठेसे!' असे म्हणून तो त्याचा हात त्याच्याच खिशात घालील. कित्येकदा मित्र एकत्र येऊन एखाद्या रेस्तोराँमध्ये जातात आणि चहा-कॉफी किंवा बियरचे ग्लास उडवितात. पण जेव्हा बिल येते तेव्हा संपूर्ण बिल त्यांतला एकजण कुणी तरी देऊन टाकतो. मित्रांच्या आपआपसांतील व्यवहारात ल्हानसान हिशेब कधी ठेवला जात नाही. फार कशाला, जपानमध्ये अशी काही खास जपानी पद्धतीची हॉटेले आहेत की जेथे लोकांची उत्तम प्रकारची सरबराई केली जाते. पण जपानी माणूस जेव्हा अशा हॉटेलात जाऊन राहतो तेव्हा तो हॉटेलच्या मालकाला पैशांचा हिशेब अगोदर विचारीत नसतो. तो हॉटेल सोडतो तेव्हा हॉटेलचा मालक किंवा मालकीण गिऱ्हाइकाच्या योग्यतेप्रमाणे जे बिल बनवून देईल ते तो मुकाट्याने चुकते करून निघून जातो. घासाघीस करीत नाही.

जपानचे हे वैशिष्ट्य कदाचित त्याच्या जुन्या सरंजामशाही संस्काराचे लक्षण असेल; पण ते जपानच्या खानदानी स्वभावाचे द्योतक आहे यात शंकाच नाही. जपानला जर नीट समजून घ्यायचे असेल तर ते त्याच्या असल्या छोट्या-मोठ्या स्वभाव-वैशिष्ट्यांतून समजून घेतले पाहिजे. त्याच्या चारित्र्यधनाची हीच खरी कोठी आहे.



# : १८ : घरांच्या बागा

तोक्योमधील सिमेन्ट-कॉंक्रीटच्या मोठमोठ्या इमारती पाहून व जपानी लोकांच्या या इमारतींविषयीचा अभिमान पाहून मला वाटले होते की, ' जपानी लोकांची घरे लाकडाची असतात. ' हे जे आपल्याला शाळेत शिकविले जाते ते इतिहासजमा झालेल्या जपानचे वर्णन असावे. पण इतक्या दिवसांच्या परिभ्रमणानंतर मला दिसून आले की, खेड्यांची गोष्ट सोडूनच द्या, तोक्योसारख्या जपानच्या मुख्य शहराची देखील वसती प्रामुख्याने एकमजली आहे आणि लाकडी घरे हे जपानी नगर-रचनेचे एक वैशिष्ट्य आहे.

मी येथे असताना येथील वर्तमानपत्रांतून एक मोठा वाद चालू होता. या वादाचा मुख्य विषय आज जपानमध्ये ज्या सिमेंट-कॉंक्रीटच्या मोठमोठ्या इमारती बांधण्यात आल्या आहेत त्यांच्यामध्ये भूकंप झेलू शकण्याची क्षमता आहे की नाही हा होता. या प्रश्नावर दोन तट पडले होते आणि दोन्हीही आपापल्या बाजू मोठ्या आवेशाने मांडीत होते.

जपान हा भूकंप व वादळी वारे यांचा देश आहे. आपल्याकडे जसा पावसाळा 'नेमेचि' येत असतो तसे हे नैसर्गिक उत्पात जपानमध्ये नियमितपणे येत असतात. या उत्पातांना तोंड देण्याची शक्ती सिमेंट-कॉंक्रीटच्या इमारतींना नाही असे एका पक्षाचे म्हणणे होते; तर दुसऱ्या पक्षाचे म्हणणे होते की, ज्या देशाची जवळ जवळ ऐंशी टक्के जमीन डोंगरांनी व्यापली आहे, आणि केवळ वीस टक्केच जमीन शेती, उद्योग व वसती यांच्यासाठी मोकळी आहे तेथे एक किंवा दोन मजली लाकडी घरे बांधून वसतीसाठी जास्त जमीन अडवणे ही जमिनीची उधळपट्टी आहे; आणि ती देशाला महाग पडणारी आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, आज जरी एकीकडे कॉंक्रीटच्या मोठमोठ्या इमारती येथे उभारल्या जात असल्या तरी दुसरीकडे त्याच्याहूनही मोठ्या प्रमाणात लहान-लहान लाकडी घरे बांधली जात आहेत. ती लाकडी असण्याचे मुख्य कारण दगड किंवा विटा यांच्यापेक्षा लाकूड येथे सहज-सुलभ आहे हे असू शकेल. कदाचित दगड-विटांच्या घरापेक्षा लाकडी घरामध्येच भूकंप किंवा वादळी वारे यांच्याशी टक्कर देण्याची क्षमता अधिक आहे ही भावनाही असू शकेल. पण ती लहान, एक किंवा दोन मजली असण्याचे प्रमुख कारण एकच आहे. प्रत्येक जपानी माणसाला चाळीत किंवा भाड्याच्या घरात राहण्यापेक्षा स्वतःच्या अशा एका लहानशा घरात राहावे असे मनापासून वाटत असते हेच होय. लहानसे का असेना, पण स्वतःचे असे एक घर असल्याशिवाय जपानी माणसाला आपले जीवन परिपूर्ण झाले असे वाटतच नाही.

मला ही लाकडी घरे आपण जे लहान लहान बंगले बांधतो त्यांच्यापेक्षा अधिक सुंदर वाटली. त्यांचे छप्पर चांगले मजबूत असते आणि ते इतक्या कलात्मक रीतीने बांधलेले असते की, घराची मुख्य शोभा त्या छपरातच आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. भिंतींच्या आकाराच्या मानाने या घरांच्या खिडक्या मात्र जरा मोठ्या असतात.

प्रत्येक घरापुढे एक छोटीशी बाग असतेच. किंबहुना असे म्हणता येईल की, बाग नाही असे घरच जपानात सापडायचे नाही. घरासमोरील जागा कितीही लहान असो, जोपर्यंत तेथे बाग उभी केली जात नाही, तोपर्यंत जपानी आत्मा संतुष्ट व्हायचा नाही. जपानी माणूस धर्माने किंवा पेशाने कुणीही असला तरी संस्काराने शिन्तो असतो. म्हणजे स्वभावतःच निसर्गप्रेमी असतो. निसर्गविन्मुख अशा कारखान्यांच्या किंवा ऑफिसच्या वातावरणात दिवसभर कंठून जेव्हा संध्याकाळी तो घरी परततो तेव्हा त्याला निसर्गाच्या सान्निध्यात क्षण – दोन क्षण तरी घालविल्याशिवाय चैन पडत नाही. तो घरी परतल्यावर आपला पाश्चात्त्य धर्तीचा पोशाख काढून ठेवील. घरात वापरायचा

'युकाता' चढवून बागेत जाईल, झाडांना पाणी घालील आणि त्यांचे दर्शन-सुख घेईल. पुष्कळ वेळा त्याची बाग म्हणजे आयुष्यात केव्हा तरी पाहिलेल्या आणि आवडलेल्या एखाद्या निसर्ग-दृश्याची एक छोटी प्रतिकृती असते. तिच्याकडे पाहिले म्हणजे त्या दिवसांची त्याला आठवण होते आणि तो सुखावतो.

बागेत फुलझाडे असली पाहिजेत असा जपानी माणसाचा आग्रह नाही. हिरवीगार पाने असलेली झाडे असली म्हणजे त्याचे समाधान होते. मी काही ठिकाणी मोठ्या वृक्षांवर काही विशिष्ट संस्कार करून ठेंगणी बनविलेली झाडे पाहिली. त्यांना 'बोन्साय' हे नाव आहे. मला ही खुजट 'बोन्साय' झाडे पाहून कसेसेच वाटले.

जपानी बागेचे दुसरे एक वैशिष्ट्य म्हणजे तेथे मुद्दाम आणून ठेवलेले दगड हे होय. निरनिराळ्या आकारांचे व रंगांचे दगड (खडक) शोधून जपानी माणूस ते आपल्या बागेत आणून ठेवतो. तेही अशा पद्धतीने की, जणू ते तेथे निसर्गतःच पडले आहेत असे वाटावे. या दगडांशिवाय त्यांची बाग पूर्ण होत नाही. या दगडांमागे तो पैसेही यथेच्छ खर्च करतो. कोकीनागा नावाचे माझे एक जपानी मित्र आहेत. त्यांनी आपल्या बागेत असले चार-पाच दगड चांगले हजारभर रुपये खर्च करून आणून ठेवलेले मी पाहिले तेव्हा मला आश्चर्याचा धक्काच बसला!

घरासभोवतालची जागा जरा विस्तृत असेल तर जपानी माणूस आपल्या बागेत एका कोपऱ्यात अनेकदा कृत्रिम धबधबा सोडील, एखादी नकली नदी वाहती करील आणि तिच्यावर एखादा छोटेखानी पूल उभा करील. दगडी कंदील तर तेथे असायचाच, आणि अशा बागेत ते लाकडी घर पाहिले म्हणजे ते जणू या बागेचेच एक अंग आहे असे दिसू लागते.

केवढेही मोठे संकट येऊन कोसळले तरी जपानी माणूस कधी डगमगत नसतो. या त्याच्या स्वभावाचे रहस्य अनेकांनी उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. बहुतेक सर्वांचे मत असे आहे की, तो शान्त असतो याचे कारण त्याला अगदी लहानपणापासूनच तशी तालीम देण्यात आलेली असते. पण जपानी माणसाला रोज तास-अर्धा तास न चुकता बागेत काम करताना मी पाहिले, तेव्हा त्याच्या शांत स्वभावाचे रहस्य एका नव्या संदर्भात माझ्यासमोर उभे राहिले; मला वाटले, जो माणूस रोज निसर्गाच्या सहवासात काही वेळ घालवितो – प्रत्यक्ष काही ना काही काम करून घालवितो – त्याला निसर्ग आपल्या स्वभावाची दीक्षा दिल्याशिवाय कसा राहील? तज्ज्ञ काहीही म्हणोत, जपानी स्वभाव घडविण्याच्या बाबतीत त्यांच्या या बागांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा असला पाहिजे.

जपानी घराचे अंतर्दर्शन त्याच्या बाह्य-दर्शनाइतकेच वैशिष्ट्यपूर्ण असते. तें करून घेताना आपल्याला जपानी शिष्टाचाराच्या आणखी एका पैलूचेही दर्शन घडते.

आजकालच्या सामान्यतः प्रत्येक घराला 'बेल' ही असतेच. ती वाजवायची आणि बाहेर उभे राहून आतल्या लोकांना ऐकू येईल एवढ्याच मोठ्या आवाजात 'गोमेन कुदासाय' असे एक-दोनदा म्हणायचे. 'गोमेन कुदासाय' म्हणजे 'एक्स्क्यूज मी.' लगेच आपल्याला कुणाची तरी चाहूल ऐकू येईल. बाहेर आल्याबरोबर ती व्यक्ती थोडीशी वाकेल आणि आपल्याला 'दोऽझो' म्हणेल. 'दोऽझो' म्हणजे 'प्लीज.' आपला डोळा त्या व्यक्तीच्या डोळयाला लागला म्हणजे प्रथम वाकून अभिवादन करण्याचा विधी आपल्याला पार पाडावा लागेल. हा विधी संपल्यावर पुन्हा ती व्यक्ती 'दोऽझो' म्हणून आपल्याला आत यायला सांगेल.

आत प्रवेश करण्यापूर्वी आपल्याला आपली पादत्राणे बाहेर काढून ठेवावी लागतात. आपण ती काढतो आणि तेथेच ठेवून आत जातो. पण आपल्या स्वागता-साठी आलेली व्यक्ती लगेच वाकते आणि आपली पादत्राणे अशा पद्धतीने नीट करून ठेवते की, बाहेर पडताना आपले पाय सरळ त्यात पडावे. लगेच आपल्यासमोर घरात वापरायच्या विशिष्ट सपाता ठेवल्या जातात. घरात प्रवेश करताना पादत्राणे काढण्याचा रिवाज भारतीय रिवाजासारखाच असला तरी पाहुण्याला घरात सपाता देण्याची पद्धत मात्र खास जपानचीच आहे. सपातांच्या बाबतीत आणखी काही बारीकसारीक नियम असल्याचे मला पुढे आढळून आले. उदाहरणार्थ, संडासात वापरावयाच्या सपाता निराळ्या. त्या बाहेर आणायच्या नाहीत आणि बाहेरच्या आत न्यायच्या नाहीत. तसेच घरात वापरायच्या सपातादेखील आगत-स्वागताच्या खोलीत जाताना वापरायच्या नाहीत. घरात प्रवेश करताना जशी आपण आपली पादत्राणे काढून ठेवली होती तशा, या खोलीत शिरताना सपाता बाहेर ठेवायच्या. त्याही अशा रीतीने ठेवायच्या की खोलीतून बाहेर पडताना आपले पाय त्यात सरळ पडावेत. खोलीत अनवाणीच प्रवेश करायचा.

खोलीत प्रवेश केल्याबरोबर आपले भान हरपते. ती अतिशय स्वच्छ असते आणि जवळ जवळ रिकामीच असते. जमिनीवर तातामी ( म्हणजे खास आकाराच्या चटया ) आंथरलेल्या असतात. त्या रेशमासारख्या मऊ वाटतात. तातामींचा आकार ठरलेला असतो. त्यामुळे येथे खोलीची लांबी-रुंदी तातामीच्या मापाने मोजली जाते. जसे – दहा तातामीची खोली, बारा तातामीची खोली इत्यादी.

खोलीत मधोमध चौरंगासारखे एक फूट उंचीचे एक बसके टेबल व त्याच्या-भोवती बसायला ठेवलेल्या चार-सहा गिरद्या ( त्यांना 'झाबुतोन' हे नाव आहे ).

एवढ्या गोष्टी सोडल्या तर फर्निचर असे काहीच नसते. खोलीतला हा कमालीचा साधेपणा पाहून आपण प्रभावित होतो, तोच आपली दृष्टी 'तोकोनोमा'कडे जाते. भिंतीच्या एका बाजूला असलेला लांब–रुंद कोनाड्यासारखा हा भाग म्हणजे जपानी घरातली सर्वांत सुंदर अशी जागा आहे. तेथे कधी एक फुलदाणी ठेवलेली असते तर कधी साधेसे चित्र टांगलेले असते.

जपानी लोकमानसाने या तोकोनामाला दिलेले काव्यमय रूप समजल्यावर तो मला अधिकच सुंदर वाटायला लागला. एखाद्या रात्री जपानचा सम्राट चुकून आपल्या घरी आला तर त्याला झोपायला योग्य अशी जागा प्रत्येक घरात असलीच पाहिजे असे लोकमानस मानते. आणि समजा, सम्राट आला आणि तोकोनामा नसला तर ? पण हे होईलच कसे ? तोकोनामाशिवाय जपानी घरच असणार नाही.

तोकोनामाच्या जवळच्या खोलीचा जो भाग असतो त्याला हे लोक 'कामिझा' या नावाने ओळखतात. त्याच्या समोरचा भाग तो 'शिमोझा.' आपण जेव्हा खोलीत प्रवेश करतो. तेव्हा शिष्टाचाराप्रमाणे 'शिमोझा' भागात उभे राहायचे. नंतर यजमान आपल्याला 'कामिझा' भागाकडे नेतो. हा भाग खोलीतला बहुमानाचा भाग मानला जातो. तेथे टेबलाजवळ जी गिरदी असते तिच्यावर बसायला जेव्हा यजमान सांगेल तेव्हा प्रथम 'दो मो आरिगातो गोझाय मस' ( मी आपला फार आभारी आहे ) म्हणून गुडघे टेकून बसायचे. आपण गुडघे टेकून बसलो आहोत हे पाहिल्याबरोबर यजमान आपल्याला आरामात बसायला सांगेल. त्यानंतर मांडी घालून बसायला आपण मोकळे होतो. मांडी घालण्यापूर्वी पुन्हा एकदा 'दोमो आरिगातो' म्हणायचे असते. आपण मांडी घालून बसलो आहोत हे पाहिल्यानंतरच यजमान मांडी घालील. तोपर्यंत तोही दुसऱ्या गिरदीवर गुडघे टेकून बसलेला असेल.

गुडघे टेकून मागच्या बाजूने पायाची उलटी मांडी घालून जपानी माणूस तासन् तास बसू शकतो. स्त्रियांची बसायची तर हीच पद्धत आहे. त्या पुरुषाप्रमाणे मांडी घालून बसत नाहीत.


आता 'ओशिबोरी' ( थंड पाण्यात भिजवून पिळलेला नॅपकिन ) येईल. त्याच्या मागोमाग ओ-चा. कधी कधी ओ-चाबरोबर एका कागदात लपेटलेली एक मिठाईही येईल. ओशिबोरीने हात-तोंड पुसायचे व हळुवार हाताने मिठाईचा पुडा खोलायचा. चहाचा कप हातात कसा घ्यायचा हे आता आपल्याला समजलेले असते. आपण चहाचा एक घोट घेतो आणि नंतर मिठाई खातो. त्यानंतर चहाचा कप संपवितो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

संध्याकाळच्या वेळी आपण आलेलो असलो तर ओ-चाऐवजी 'बीयर' येईल. बीयर ही दारू आहे असे हे लोक मानीत नाहीत. ती पाण्यासारखीच निरुपद्रवी मानली जाते. येथे मोठ-मोठे पवित्र साधूदेखील सर्रास बीयर घेत असतात. त्यांना त्यात वावगे असे काहीच वाटत नाही. एवढेच नव्हे तर मंदिरातदेखील बीयर पिणे आणि देवाच्या भेटीसाठी आणणे सर्रास चालू असते. भारतीय मनाला हे पाहून कसेसेच वाटले तर आश्चर्य नाही. एकदा गांधीजींची एका शिष्या जपानला आली असता तिला मंदिरातला हा 'अनाचार' पाहून एवढा मोठा धक्का बसला की, ती भारतात तात्काळ परतली. सदाचाराच्या आपल्या व जपानी लोकांच्या कल्पना किती भिन्न आहेत हे यावरून दिसून येईल.

आता आपण घरातल्या बारकाव्याकडे पाहू लागतो. अचानक आपल्या लक्षात येते की, या घरात आगत-स्वागताची खोली निराळी, झोपायची निराळी आणि जेवायला बसायची निराळी असा प्रकार नाही. एकच खोली या तिन्ही गोष्टींसाठी वापरली जाते. तोकोनोमाच्या बाजूला भिंतीला टेकून भिंतीच्याच आकाराचे एक लाकडी कपाट असते. ते कपाट आहे हे लक्षात यायला वेळ लागतो. ते जेव्हा उघडले जाते तेव्हाच दिसून येते. त्यात गाद्या-गिरद्या वगैरे ठेवलेल्या असतात. रात्रीच्या वेळी त्या बाहेर काढल्या जातात आणि सकाळ झाल्याबरोबर त्या पुन्हा आत व्यवस्थित ठेवल्या जातात.

क्षेत्रफळाने एवढ्याशा या देशात दहा कोटी लोक कसे मावू शकले हे आता माझ्या लक्षात आले. ज्या देशाकडे वस्तीसाठी रिकामी जमीनच नाही तेथे युरोपियन पद्धतीचे फर्निचर बसविणारे मोठे बंगले कसे परवडले असते? कमीत कमी जागेत जास्तीत जास्त लोक ऐस-पैस कसे जगू शकतील हे शिकविणारी जीवनपद्धतीच येथे उगवली पाहिजे. मागच्या एका शतकाच्या काळात युरोपशी संबंध आल्यापासून आशिया खंडात जो सुशिक्षित लोकांचा एक वर्ग निर्माण झाला त्याने जेवण-खाण, कपडे-लत्ते, राहणी-करणी इत्यादी युरोपच्या चालीरीती उचलल्या. फक्त जपानच काय ते याला अपवाद आहे. जपानने युरोपकडून फक्त विज्ञान घेतले. पण आपले सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व कायम ठेवले. युरोपियन जीवनपद्धती खर्चिक आहे, अस्वाभाविक आहे हे त्याच्या लक्षात यायला वेळ लागला नाही.



## : १९ : अस्वाद-प्रती लोक

चहा हे जपानचे राष्ट्रीय पेय आहे. इतकेच नव्हे तर जपानी लोक पट्टीचे चहाबाज आहेत, अशी त्यांची ख्याती आहे. चहाला येथे कोकणी किंवा गुजरातीतल्या-प्रमाणे 'चा' हा शब्द आहे. या पेयाची प्रतिष्ठा येथे एवढी आहे की, त्याला नुसता 'चा' न म्हणता ते त्याला बहुमानार्थ 'ओ' लावतात व 'ओ-चा' असे त्याला संबोधत असतात. या लोकांच्या आहारात मीठ वाजवीपेक्षा जरा जास्त असते. त्यामुळे त्यांना एकसारखा ओ-चा घ्यावा लागतो. नपेक्षा जीव तहानेने व्याकूळ होतो. बहुतेक ऑफिसांत, दुकानांत व कारखान्यांत ओ-चा बनवून देण्यासाठी खास मुली नेमल्या जातात. ऑफिसमधील कारकुनांना व येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना अधून मधून चहा बनवून देणे हे त्यांचे काम असते.

पहिल्याच दिवशी जेव्हा मी हा ओ-चा पाहिला तेव्हा जरा घाबरून गेलो. त्यात दूध नव्हते, साखरही नव्हती. 'ग्रीन टी' नावाच्या पाल्याबरोबर उकळलेले ते नुसते पाणी होते. बरोबर लिंबाची एक चकती होती. ती त्या पाण्यात टाकायची व थोडा वेळ ठेवून काढायची. अशी माहिती मला देण्यात आली. मी तसे केले पण जो

चहा मी भारतात नेहमी घेत असे त्याची चव व गरज हा ओ-चा भागवू शकत नव्हता. मी परिचारिकेला बोलावून विचारले, 'दुधा–साखरेचा चहा येथे मिळत नाही काय?'

'ओ! मिल्कुती? हाय' असे ती बोलली आणि समोरच्या 'ओ-चा'चा कप घेऊन गेली. थोड्या वेळाने माझ्यापुढे 'को-चा' नावाचे एक पेय ठेवण्यात आले. ते चहासारखे दिसत होते. पण तो माझ्या परिचयाचा चहा नव्हता आणि मेनूमध्ये मी त्याची किंमत पाहिली तेव्हा तो दुधापेक्षाही महाग असल्याचे मला आढळून आले.

या अनुभवानंतर मी ओ-चाची सवय लावून घेतली. दुसरा इलाज नव्हता.

त्याच दिवशीचा दुसरा अनुभव—

तोक्योमध्ये उएनो पार्क नावाची एक सुंदर जागा आहे. तिच्याजवळच एक राष्ट्रीय संग्रहालय आहे. आम्ही ते पाहावयाला गेलो होतो. ते पाहता पाहता चांगले तीन तास खर्च झाले.

तेवढ्यात दुपारच्या जेवणाची वेळ झाली. येथेच कुठे तरी जेवण उरकून घ्यावे असे ठरले. तोकुओसान आमच्याबरोबर आले होते. ते विचारायला लागले, 'तुम्ही कोणत्या पद्धतीचे जेवण घेणार आहात? युरोपियन की जपानी?'

ज्या प्रदेशात आपण जातो तिथल्या लोकांचा सर्वसामान्य आहारच आपण घेतला पाहिजे असे माझे मत आहे. या मताला अनुसरून मी म्हणालो, 'अर्थात जपानी पद्धतीचे.'

उएनो पार्क ओलांडून आम्ही एका लहानशा खाणावळीत गेलो. खाणावळ कसली? ते लाकडी बांधणीचे एक लहानसे बैठे घर होते. चार-सहा लोकांनाच बसता येईल एवढी जागा तेथे होती. उजव्या बाजूला एका उंचवट्याच्या जागेवर दोन बैठी टेबले होती. त्यांच्या सभोवती बसायला चौकोनी गिरद्या मांडल्या होत्या. आम्ही चपला काढून वर गिरद्यांवर जाऊन बसलो. तोकुओसान जेवणाची ऑर्डर देऊ लागले. मी पिढीजात मत्स्याहारी असल्यामुळे माझा विशेष प्रश्न नव्हता. पण शरद पंड्या पूर्ण शाकाहारी होते.

जपानमध्ये मांसाहार व शाकाहार यांच्या व्याख्या विचित्र आहेत. मांस नको म्हटले तर ते गाईचे तेवढे मांस अन्नात टाकणार नाहीत पण हॅम टाकतील. हॅमची गणना ते मांसात करत नाहीत. हॅमही आम्ही खात नाही म्हटले तर मासे वाढतील. माशांचा समावेश येथे मांसात होत नाही. मासे नको म्हटले तर खेकडे किंवा कोलंबी टाकतील. त्यांची गणना माशांत होत नाही. काहीच नको म्हटले तर निदान अंडी तरी घातल्यावाचून राहणार नाहीत. अशा परिस्थितीत शाकाहारी जेवण मागविताना प्रत्येक

गोष्टीचे नाव घेऊन 'नेति नेति' म्हणत राहावे लागते. हे फार किचकट काम असते. तोकुओसानना हे सर्व समजावून सांगण्यात चांगली दहा मिनिटे लागली.

मी ऑर्डर घेणाऱ्या त्या मुलीकडे बघू लागलो. तोकुओसानच्या प्रत्येक वाक्याबरोबर ती मानेला एक गोड लचका देऊन 'हाय' (म्हणजे 'होय') म्हणत असे. आणि हळूच आश्चर्याने आमच्याकडे बघत असे. हे नको, ते नको करणारे हे लोक शेवटी खातात तरी काय आणि खाण्याजोगे काहीच न खाता हे लोक धुष्टपुष्ट कसे बनू शकले या दोन प्रश्नांची उत्तरे बिचारी शोधत असावी असे तिच्या डोळ्यांवरून वाटत होते.

बऱ्याच वेळाने जेवण आले. चिनी मातीच्या एका वाटीत सोयाबीनचा सूप होता. दुसऱ्या एका वाटीत भात होता. एका लहानशा बशीत चटणीसारखा एक पदार्थ होता. दुसऱ्या एका बशीत काकडीचे लोणचे. तिसऱ्या मोठ्या बशीत कच्च्या भाज्या, चौथ्या बशीत तळलेले काही पदार्थ. शिवाय मी व तोकुओसान यांच्यासाठी इल नावाच्या माशाचे काही तुकडे — एवढ्या गोष्टी आल्या.

प्रत्येक बशीचा रंग, आकार व त्यांत कलात्मक रीतीने ठेवलेले पदार्थ पाहून जपानी लोक जिभेऐवजी डोळ्यांनी प्रत्येक पदार्थाची चव घेत असावेत असे वाटले.

आता जेवायचे कसे हा प्रश्न होता. तोकुओसाननी प्रथम चटणीसारखा जो पदार्थ होता तो सुपात टाकायला लावला. नंतर चॉपस्टिकच्या मदतीने भात कसा तोंडात टाकायचा ते दाखविले आणि म्हटले आता थोडासा सूप घ्या व भात तोंडातच कालवा. मला जेवणाची ही पद्धत अभिनव वाटली. जेवण मात्र थोडे वेचवच वाटले. त्याच दिवशी, आपण जेथे जातो तिथला लोकांचा सर्वसामान्य आहार आपण घेतला पाहिजे हा माझा आग्रह मी सोडून दिला आणि तेव्हापासून युरोपियन पद्धतीचे जेवण मागवू लागलो.

जपानी लोकांची आहारपद्धती इथल्या हवेला अनुकूल अशीच असावी. शिवाय निसर्गाने ज्या गोष्टी या देशाला दिल्या आहेत तेवढ्याच गोष्टींचा आधार घेऊन या लोकांनी आपले आहारशास्त्र उभे केले असावे. उदाहरणार्थ, येथील लोकांच्या आहारात गहू जवळ जवळ आढळतच नाही. यांचे मुख्य अन्न म्हणजे तांदूळ हेच होय. सर्वसामान्यपणे जपानी लोक भातावरच जगत असतात. सकाळ, दुपार, संध्याकाळ, तिन्ही-त्रिकाळ भातावाचून त्यांचे चालत नाही. या लोकांची सकाळची न्याहारीदेखील भाताची पाहून मी थक्कच झालो.

येथे मटण नावाची वस्तू नाही. कारण येथे बकरा नाही. त्याचे पालन-पोषण करायला येथे पुरेशी जमीनही नाही. गो-मांस भक्षण आज येथे सर्रास चालते. पण

जपानी साहित्यातील वेचीव उताऱ्यांचे एक पुस्तक माझ्या वाचनात आले. त्यातील एका उताऱ्यात गोमांस-भक्षण करू लागलेल्या लोकांचा उपहास करण्यात आला आहे. त्यावरून शंभर वर्षांपूर्वी ते येथे निषिद्ध मानले जात असावे असे वाटते. एके काळी आपण गोमांस निषिद्ध मानीत होतो, या गोष्टीवर जपानी लोकांचा विश्वासही बसणार नाही; इतके ते आज त्यांच्या वापरात येत असते.

मासे मात्र हे लोक अगदी प्राचीन काळापासून खात आले आहेत. इतकेच नव्हे, पट्टीचे मत्स्याहारी लोक म्हणून जपानी लोकांची जगात ख्याती आहे. देश समुद्र-वलयांकित, शिवाय माशांचे उत्पन्न पुष्कळ, त्यांच्या जातीही पुष्कळ. त्यात 'ईल' नावाचा मासा येथे विशेष लोकप्रिय आहे. हा मासा दिसतो सापासारखा पण चवीला येतो बोंबलासारखा. काही दुकाने केवळ ईल माशाचे निरनिराळे प्रकार बनवून देणारी असतात. त्या दुकानाशेजारी एक लहानसा हौद असतो. त्यात हे मासे पाळले जातात. गिऱ्हाईक येऊन अमूक मासा मला पाहिजे म्हणून सांगते. त्यांच्यासमोरच मासा पकडला जातो व समोरच साफ करून भाजून शिजवून खावयाला देण्यात येतो.


हे लोक काही मासे कच्चेच खातात. कच्चे मासे खाण्याची मला हिम्मतच नव्हती. एक दिवशी कच्च्या माशाचे तुकडे (ते कच्च्या माशाचे आहेत हे मला न सांगता) माझ्या पुढे ठेवण्यात आले. अगोदर कळले असते तर कदाचित त्या तुकड्यांना मी शिवलोही नसतो. खाऊन झाल्यावर मला सांगण्यात आले तेव्हा मी बोलून गेलो—मग इतके दिवस आपण उगीचच मासे शिजवून खाल्ले!

पण या गोष्टी नंतरच्या आहेत. त्या दिवशी जेव्हा मी प्रथमच जपानी जेवण घेतले त्या वेळी मी पोट कसेबसे भरले; पण जेवल्यासारखे मला वाटलेच नाही. शरद पंड्या तर जवळ जवळ उपाशीच राहिले.

तोकुओसाननी जेवणाचे जेव्हा तीन हजार येन (जवळ जवळ साठ रुपये) भरले तेव्हा चार-सहा लोकांचीच सरबराई करू शकणारी एवढीशी खाणावळ कशी चालू शकते हे माझ्या लक्षात आले.

त्यानंतर दोन महिन्यांच्या वास्तव्यात मला प्रसंगविशेषी निरनिराळ्या जपानी खाद्यपदार्थांची चव चाखावयाला मिळाली. तेम्पुरा, सोबा, सुकियाकी वगैरे नाना पदार्थ मी चाखून बघितले. झेन पद्धतीच्या दोन-दोन, तीन-तीन तास चालणाऱ्या जेवणाचाही अनुभव घेतला. पण मी तेथे जगलो तो मुख्यतः युरोपियन पद्धतीच्या जेवणावर किंवा दूध, टोस्ट व फळे यांच्याच जोरावर. सर्वसामान्यपणे माझा तिथला आहार हाच होता.

बिचारे नरेश मंत्री! इतकी वर्षे ते जपानी पद्धतीच्या आहारावर जगत आहेत! तोही शाकाहार!! इतके कडकडीत अस्वाद-व्रत त्यांनी वर्ध्यांच्या आश्रमातदेखील कदाचित पाळले नसावे.



# : २० : कुवलय समुद्रातून

हिरोशिमा व नागासाकी येथे सहा दिवस अत्यंत विषादयुक्त मनःस्थितीत घालविल्यानंतर सातव्या दिवशी जेव्हा आम्ही आकामिझूला पोहोचलो तेव्हा मला पुन्हा एकदा एका नव्या जगात प्रवेश केल्यासारखे वाटले.

नागासाकीहून आम्ही एका खास वातानुकूलित बसमधून येथे आलो होतो. इसाहायाला पोहोचेपर्यंत माझी मनःस्थिती गंभीरच होती. पण इसाहाया सोडल्यानंतर जपानचे प्राकृतिक लावण्य जसजसे डोळ्यांसमोर खुलू लागले, तसतशा माझ्या चित्तवृत्तीसुद्धा खुलू लागल्या.

आमच्या बसमध्ये अठरा-वीस वर्षे वयाची एक मोहक 'गाइड' होती. विमानात जशी एअर-होस्टेस असते, तशी इथल्या बसेसमधून एक गाइड असते. हातात एक लहानसा 'माइक' घेऊन प्रवाश्यांचे मनोरंजन करणे हे तिचे काम. समोर उभी र न ही आमची 'गाइड' आपल्या डाव्या हाताने इशारे करायची, आणि आजूबाजूच्या प्रदेशाची माहिती पुरवायची. विशेष प्रेक्षणीय असे काही न दिसल्यास तेवढ्या अवधीत

ती चुटके सांगायची, हसवायची, आणि गीते गायची. तिचा आवाज मधुर होता, आणि तिच्या व्यक्तिमत्त्वातही एक प्रकारचा गोडवा होता. बसमध्ये आमचा सारा गोतावळा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा होता. आमच्यात ब्रिटनचे लोक होते, अमेरिकेचे होते, युगोस्लाव्हियाचे होते, मंगोलियाचे होते, आणि आम्ही भारतीय होतो. शिवाय जपानीही होते. हिरोशिमा, नागासाकीला सहा दिवस आम्ही एकत्र राहिलो होतो. त्यामुळे आमच्यामध्ये एक प्रकारची पारिवारिक भावना निर्माण झाली होती. 'गाइदोसान' आजच या परिवारात सामील झाली होती. वयस्कांना आपली मुलगी वाटावी व आमच्यासारख्यांना धाकटी बहीण वाटावी अशीच तिची निष्पाप व मोकळी वागणूक होती. कित्येक जपानी गीते तिने आपल्या सुरेल आवाजात आम्हांला गाऊन दाखविली. त्यानंतर सहज लडिवाळपणे ती म्हणाली, 'मी जपानी गीते तुम्हांला गाऊन दाखविली, आता तुम्ही तुमच्या देशातली गीते आम्हांला ऐकवली पाहिजेत.'

लोक जणू सूचनेची वाटच पाहात होते. लगेच युगोस्लाव्हियातले एक लोकगीत हवेत घुमू लागले. ब्रिटनचे वृद्ध ह्यूजदेखील उत्साहाने पुढे आले आणि त्यांनीही एक लोकगीत गाऊन दाखविले. मादाम नोनोमिया जपानी खऱ्या, पण त्यांनी जपानी गीताबरोबर एक इंग्रजी गीत उत्कृष्टरीत्या गाऊन दाखविले. सामान्यपणे आढेवेढे घेणारे शरद पंड्याही गाऊ लागले. हां हां म्हणता अनेक देशांतल्या गीतांनी सारे वातावरण घुमू लागले.

आमच्या डाव्या बाजूस समुद्र-किनारा पसरला होता. तोक्योहून आतामीला जाताना चिगासाकीनंतर जे दृश्य पाहिले होते तशाच प्रकारचे हे दृश्य होते. शेकडो तरुण स्त्री-पुरुष समुद्रात पोहत होते. दुसरे तितकेच किनाऱ्यावर पडल्या पडल्या सूर्यस्नानाचा आनंद लुटत होते. पोहोणाऱ्यांमध्ये काही नवखे होते, काही तरबेज होते. या स्त्री-पुरुषांच्या घोळक्याच्या पलीकडे दृष्टी फेकली तेव्हा समुद्रात कित्येक लहान-मोठी बेटे दिसली. त्यांतली काही जणू पोहत पोहत अगदी क्षितिजापर्यंत जाऊन पोहोचली होती, तर काही जवळच तरंगत होती. एकेक उचलावे व आंगठीत बसवावे इतकी सुंदर पाचूसारखी हे बेटे दिसत होती.

मध्येच गाइदोसानने प्रश्न विचारला—

'तुम्हांला कोणत्या रंगाचे मोती आवडतात?'

प्रश्नाचा संदर्भ माझ्या लक्षात आला नाही. पण ह्या साऱ्या घोळक्यात मोत्यांच्या शास्त्रात थोडासा पारंगत मीच होतो. जपानच्या प्रवासातून परतताना घरी मुलांसाठी मला काही तरी न्यायचेच होते; काही तरी नेल्याशिवाय गत्यंतर नव्हते. जपानचे वैशिष्ट्य असे नेण्याजोगे काय आहे, याचा शोध लावत फिरताना जपानच्या तरल,

टपोऱ्या मोत्यांनी माझे लक्ष वेधले. सुरुवाती-सुरुवातीला खरे मोती व कल्चर्ड मोती असा भेदभाव मी करायचो. जणू कल्चर्ड म्हणजे खोटे मोती. दुकानात गेलो म्हणजे हटकून विचारायचा, ‘ हे खरे मोती आहेत की कल्चर्ड ? ’ वरवरून पाहता त्यांच्यात फारसा फरक आढळत नव्हता. पुढे लक्षात आले की, कल्चर्ड मोती हेही खरे मोती असतात. मोती तयार करण्याचे काम समुद्रातल्या काही शिंपल्या करतात. या शिंपल्यांच्या अंगावर जेव्हा वाळूचा किंवा अशाच एखाद्या दुसऱ्या पदार्थाचा कण पडतो तेव्हा त्या शिंपल्यांचे अंग शहारते व त्या कणाभोवती एक द्रवपदार्थ गोळा होतो. कालांतराने त्याचाच मोती बनतो. वाळूचा कण यदृच्छेने हवेतून उडून येऊन पडला तर त्यापासून जो मोती निर्माण होतो त्याला आपण खरा मोती म्हणत असतो. हवेऐवजी माणसाने कण टाकला तर त्याचा कल्चर्ड मोती बनतो. कित्येक वर्षांपूर्वी कोकिची मिकिमोतो नावाच्या एका जपानी गृहस्थाने पहिलावहिला कल्चर्ड मोती तयार केला. तेव्हापासून कल्चर्ड मोत्याचा उद्योग जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर चालू लागला. एवढे हे ज्ञान जपानच्या भूमीवर पाय ठेवला त्याच्या दोन-तीन दिवसांच्या आत मी प्राप्त करून घेतले होते. जपानमधील मोत्यांच्या दुकानात मी गुलाबी, पांढऱ्या व निळसर छटा असलेले असे तीन प्रकारचे मोती पाहिले होते. त्यात गुलाबी छटा असलेल्या मोत्यांनी मला मोहित केले होते. या माहितीच्या जोरावर मी उत्तर दिले—

‘ मला गुलाबी छटेचे मोती आवडतात. ’

माझे उत्तर ऐकून गाइदोसानचा चेहरा प्रफुल्लित झाला व ती म्हणाली, ‘ क्लिओपात्रा सौंदर्याची सम्राज्ञी का होती हे तुम्हांला ठाऊक आहे काय ? ती म्हणे रोज एक गुलाबी मोती दुधात घोळवून पीत असे. ’

आणि आपला डावा हात ऐटीत उजव्या बाजूला वळवून ती म्हणाली, ‘ पलीकडे जी बेटे दिसत आहेत त्यांत एक बेट मोती निर्माण करणारे आहे. ’

पण त्या बेटाकडे माझी दृष्टी वळण्याऐवजी ती उजव्या बाजूला असलेल्या एका डोंगरावर जाऊन खिळली. त्याचा आडवा पडलेला देह झोपलेल्या बुद्धासारखा वाटत होता. फक्त त्याचे नाक तेवढे जपान्यांसारखे चपटे होते. एक हिरवी रेशमी शाल त्याने ओढली होती. त्याच्या अंगावर वृक्षराजी नव्हती. त्याच्यावर जी दृष्टी खिळली ती त्या मोत्याच्या बेटाकडे वळलीच नाही. तेवढ्यात ते बेटही मागे सरकले.

येथे नारळी–पोफळीच्या बागा नव्हत्या. आंबे, फणस, काजू यांची झाडे नव्हती. तरीही का कुणास ठाऊक, हा परिसर मला थोडाबहुत आमच्या गोव्यासारखा वाटला. मी माझ्या हातांतला नकाशा उघडून पाहिला तेव्हा आम्ही उनझेन पर्वताच्या परिसरात

आहोत असे समजले. वाऱ्याची झुळुक येऊन हिरवी भात-शेते जेव्हा शहारू लागत तेव्हा आपण गोव्यातल्या एखाद्या शेताच्या बांधाजवळून चाललो आहोत असाच भास होत होता.

इतक्यात शिमाबारा आले. येथून आम्हांला फेरीबोटीतून मासुमीला जायचे होते. आमच्या बसमध्ये इंग्रजी व फ्रेंच या भाषा जाणणारी एक जपानी मुलगी होती. शिमाबाराला पोहचल्याबरोबर तिने या शहराविषयी माहिती सांगितली—' येथे तीनशे-साडेतीनशे वर्षांपूर्वी खिस्ती लोकांची कत्तल करण्यात आली होती. '

मी विचारले, ' कशासाठी ? '

' त्या वेळी इथल्या खिस्ती लोकांचे गुरुपद परकीय पोर्तुगीजांकडे होते व पोर्तुगीजांनी जपानी खिस्त्यांना जपान-विरोधी बनविले होते.' थोडा वेळ थांबून ती म्हणाली—' आणि या कत्तलीनंतर जपानने आपले दरवाजे जगाला बंद केले. '

कोणी तरी म्हटले, ' तेही अशा वेळी की, जेव्हा युरोपमध्ये ' रेनेसांस 'ची लाट उसळली होती आणि युरोपमध्ये आधुनिक विज्ञानयुगाचा प्रारंभ होत होता. '

मी लगेच प्रतिसाद दिला, ' पण पोर्तुगीज काही ' रेनेसांस 'ची विद्या घेऊन इथे आले नव्हते ! ते जी विद्या घेऊन येथे आले होते त्या विद्येचे पुरस्कर्ते युरोपमध्ये रेनेसांसच्या अध्वर्यूंना जिवंत जाळत होते. '

पण मला आश्चर्य वाटले ते याच गोष्टीचे की, पोर्तुगीजांनी खिस्तीधर्माचा प्रसार करण्यासाठी जपानमध्ये गोव्यासारखी हुबेहूब दिसणारी भूमी कशी निवडून काढली ?

शिमाबाराला आम्ही आमच्या बससहित फेरी बोटीवर आरोहण केले. फेरी बोट चांगलीच मोठी होती. बस खाली राहिली आणि आम्ही डेकवर गेलो. तेथे बसायला जागा होती; पण आजूबाजूचे दृश्य शांत थोडेच बसू देत होते ! फेरी बोटीने किनारा सोडला आणि आम्ही क्षणात या बाजूला तर क्षणात त्या बाजूला असे लहान मुलांप्रमाणे धिंगाणा घालू लागलो. जसजशी बोट पुढे जाऊ लागली तसतसे समोर अद्‌भुत-रम्य काव्य पसरू लागले. आमचा हा जल-विहार वस्तुतः सागरातून चालला होता. पण हा सागर आहे असे शपथ घेऊन सांगावे लागत होते. याला चहूबाजूंस बेटांनी वेढले होते. त्यामुळे आम्ही जणू एखाद्या सरोवरातच जलविहार करीत आहोत असा भास होत असे. सागरात जसा विराटतेचा अनुभव येतो तसा येथे येत नव्हता. हा पृथ्वीवलयांकित सागर होता. मधाचा झोपलेला बुद्ध येथे नाकासमोर दिसायला लागला. त्याच्या जोडीला त्याचे दुसरे अनेक शिष्य तेथे होते. त्यांनी हिरव्या शाली ओढल्या होत्या. या हिरव्या टेकड्यांची जेव्हा पाण्यात उलटी प्रतिबिंबे पडत तेव्हा

पाण्याच्या मुखावर प्रसन्नतेची छटा तरळू लागे. दुपारची वेळ होती, टेकड्या नुसत्या तेजाने तळपत होत्या. सारा देखावा कल्पना-शक्तीला चकित करून सोडणारा होता. युगोस्लाव्हियाचे दोघेही प्रतिनिधी आश्चर्यचकित होऊन समोर पाहू लागले. मंगोलियाचा घुमा प्रतिनिधी–त्याला बिचाऱ्याला आपली सोडून दुसरी कोणतीच भाषा येत नव्हती, समोरचे दृश्य पाहून डोलू लागला. फार कशाला, ह्यूजदेखील प्रसन्न चित्ताने या काव्यात पोहू लागले. सामान्यतः स्कॉटलंडचे लोक थोडेसे पाखंडी असतात. त्यांत ह्यूज हे तर बर्नार्ड शॉच्या निकटवर्ती गोटातले. त्यांनी आमची थट्टा केली असती तर त्यांना ती शोभली असती. पण ते माझ्याजवळ आले आणि म्हणाले, ‘ आता कुमामोतोला पोहोचल्याबरोबर घरी बायकोला तार पाठवून देतो—


‘ Deeply regret. Joined Buddhist Monastery. ’

आणि समोरच्या एका दृश्याकडे बोट दाखवून ते म्हणाले,— ‘ हे तर आमच्या स्कॉटलंडसारखेच हुबेहूब दिसते.

समोर पहाड होते. त्यांच्यावर शत-शतकांच्या वाऱ्यांनी आपल्या लहरी अंकित करून ठेवल्या होत्या.

हा आनंद आम्ही जवळजवळ तासभर अनुभवला. नंतर दोन विशालकाय पहाडांना जोडणाऱ्या एका सुंदर व उंच अशा तांब्याच्या पुलाखाली आमची बोट आली, आणि पाहता पाहता आम्ही मासुमी-बंदरला आलो.

जो आनंद या जलविहारात अनुभवला होता त्याची धुंदी हृदयात साठवून आम्ही बसमध्ये जाऊन बसलो. आम्ही पंचवीस-तीस जण होतो. पण आता एकत्र असूनही सगळे एकएकटे झालो होतो. प्रत्येकजण आपआपल्या आनंदात मग्न होता. कुणी कुणाशी बोलत नव्हता.



# : २१ : आसो ज्वालामुखीच्या सान्निध्यात

शुक्रवार होता. मी पहाटेला जागा झालो. रात्री आमच्या हॉटेलच्या वरच्या गोलगोल फिरणाऱ्या भोजनालयात जेवायला गेलो असता तेथे आम्हांला सूचना मिळाली होती — ' तुम्हांला आकामिझूचे अतिशय काव्यमय रूप पाहावयाचे असल्यास सकाळी सूर्योदयाच्या वेळी न्याहारीला इथे या. म्हणून आम्ही सूर्योदयाच्या वेळीच तेथे हजर झालो. भोजनालयाच्या भिंती काचेच्या होत्या व ते गोलगोल फिरत होते. त्यामुळे बसल्या बसल्या आम्हांला चहूबाजूंचा देखावा पाहावयास मिळाला. आकाश निरभ्र होते. पूर्वेकडील टेकड्यांमागून सूर्य वर येताच त्याची कोवळी उन्हे पश्चिमेकडील टेकड्यांवर पडली. त्यांच्या मागच्या आकाशाच्या चेहऱ्यावरील तांबड्या व निळ्या रंगांच्या, क्षणोक्षणी बदलणाऱ्या छटा एखाद्या नवोढेचीच आठवण देऊ लागल्या. पूर्वेकडील टेकड्यांच्या अंगावर त्यांच्या शिखराचीच छाया पसरली होती, पश्चिमेकडील टेकड्यांवरचा गालिचा प्रकाशाने उजळून निघाला होता आणि या तेजोनिधीत दोन्ही बाजूंच्या टेकड्यांचे काठिण्य जणू विरघळल्यासारखे वाटत होते. या देखाव्याने माझे चित्त प्रसन्न झाले.

आठ वाजता काही मोटार-गाड्या व बसेस आल्या आणि आम्ही सेन्सुइक्योला जाण्यासाठी निघालो. आज तेथे एका नवीन स्तूपाचे उद्घाटन व्हायचे होते. या उद्घाटन-समारंभाला हजर राहण्यासाठी रशिया, ब्रह्मदेश, लंका वगैरे देशांतील राजदूत आले होते. शिवाय आम्हीही अनेक देशांचे प्रतिनिधी हजर होतो. पाच-सात मोटारी व तितक्याच बसेस यांची जणू एक मिरवणूकच सेन्सुइक्योला जाण्यासाठी निघाली.

भारत स्वतंत्र झाल्याबरोबर स्वर्गीय जवाहरलालजींनी भगवान् बुद्धाच्या अवशेषांचा एक भाग भारताच्या वतीने जपानला भेट देऊन दोन्ही देशांची हृदये जोडण्याची एक महत्त्वाची कामगिरी पार पाडली होती. या भेटीमुळे जपानच्या हृदयाची तार छेडली गेली. जपानचे आध्यात्मिक नेते निचिदात्सू फुजीई यांनी तिची योग्य ती कदर करून त्या अवशेषांचे कित्येक भाग पाडले व त्यांची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी जपानभर महत्त्वाच्या ठिकाणी शांति-स्तूप उभारण्याची एक योजना आखली. या योजनेत सेन्सुइक्योतील स्तूपाचा विसावा क्रमांक होता.

या स्तूपाची दोन वैशिष्टये होती. त्याची रचना सांचीच्या स्तूपासारखी करण्यात आली होती व दुसरे, त्याची बांधणी केवळ स्थपतींकडे न सोपविता अनेक बौद्ध साधूंनी श्रमदान करून त्या कामात हातभार लावला होता. दोन राष्ट्रांमध्ये हजारो वर्षांनंतर झालेल्या पवित्र देवाण-घेवाणीच्या या एका प्रतीकाच्या उद्घाटन-विधीला आम्ही भक्ति-विनम्र होऊन गेलो.

हॉटेलमधून निघाल्यानंतर आम्ही डाव्या बाजूने वळलो आणि मैलभराच्या वाटेवर चीड-देवदार यांच्यासारख्या वृक्षांचे एक अतिशय सुंदर वन लागले. या परिसरात आतापर्यंत मोठ्या वृक्षांची वने फारशी दिसलीच नव्हती. हिरव्या रेशमी शाली ओढून बसलेले वृक्षविहीन पहाड तेवढे पाहिले होते. सगळीकडे खाली पसरलेला हिरवा गालिचा पाहिला होता. वाऱ्याच्या झुळकीबरोबर या गालिच्यावर उठणाऱ्या लहरीही मनसोक्त पाहिल्या होत्या आणि पहाडावर तर त्या लहरी कायमच्या अंकित झालेल्या होत्या. असल्या सौंदर्याची जी खास लज्जत असते तिचा आम्ही अनुभव घेतला होता. पण सौंदर्याच्या अनुभवात वैचित्र्याच्या अनुभवाची एक आगळीच गोडी असते, ती आम्हांला या वनामुळे चाखायला मिळाली.

या वनाच्या पलीकडे असलेल्या काही प्रचंड पर्वतांनी आमचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्यावर झाडे नव्हती, झुडपेही नव्हती. तरीही ते आपल्या भव्य व्यक्तिमत्त्वाने येथे उठून दिसत. लगेच त्यांचा परिचय करून देण्यात आला. यांतला एक 'नाका-दाके'

होता. दुसरा ‘ ताका-दाके ’ आणि तिसरा ‘ नेको-दाके. ’ फुजीच्या परिसरात जशी पाच सरोवरे आहेत तसे या परिसरात पाच पर्वत प्रख्यात आहेत. त्यांतले तीन येथून दिसले. यांपैकी ‘ ताका-दाके ’ क्युशू बेटातला सर्वांत उंच पर्वत आहे. त्याच्या बरोबर मध्यावर शांति-स्तूप बांधण्यात आला आहे.

याच रस्त्यावर आम्ही सर्वप्रथम जपानचे धष्टपुष्ट गोधन बघितले. त्यांतील प्रत्येक गाईच्या पाठीवर तिच्या मालकाचे नाव मुद्रांकित केलेले पाहून जरा कसेसेच वाटले.

क्युशूबेटात आसो नावाचा एक जिवंत व भीषण ज्वालामुखी आहे व तो या प्रवासात कधी तरी आम्हांला पाहावयास मिळणार आहे याची मला कल्पना होती. पण तो या ठिकाणी अगदी जवळच असेल व तो आजच पाहावयास मिळेल याची मात्र मुळीच कल्पना नव्हती.

स्तूपाचा उद्‌घाटन-समारंभ संपल्यावर जेवण करून आमच्या हॉटेलमध्ये परतण्याच्या बेतात होतो. इतक्यात युगोस्लाव्हियाच्या प्रतिनिधींनी भिक्खू इशिबासीसानना विचारले– “ येथून ‘ आसो ’ ज्वालामुखी म्हणे जवळच आहे. मग तो तुम्ही आम्हांला आज का दाखवीत नाही ? ”

ह्यूजनीही पुस्ती जोडली – ‘ येथे आम्हांला पुनःपुन्हा थोडेच येता येणार आहे ! जेवढे दाखवता येईल तेवढे दाखवा. ’

आसोचा कार्यक्रम दुसऱ्या दिवसासाठी ठेवण्यात आला होता. पण दुसऱ्या दिवशी या लोकांना तोक्योला जायचे होते. ही गोष्ट लक्षात येताच इशिबासीसाननी चक्रे फिरविली. कार्यक्रम बदलला आणि आसोला आजच जाण्याचे ठरले !

दुपारच्या तीनच्या सुमाराला दोन छोट्या मोटारी आल्या आणि चौघा-चौघांना घेऊन रोप-वेच्या स्टेशनजवळ पोहोचवू लागल्या. स्टेशन केवळ फर्लांग–दीड फर्लांगच्या वाटेवर होते. इतक्या जवळ जाण्यासाठी आम्हांला वाहनाची आवश्यकता नव्हती. आम्ही आनंदाने चालत गेलो असतो. पण स्टेशन किती दूर आहे हे कोण सांगणार ? आणि जवळ असले तरीही चालत जा असे हे आतिथ्यशील जपानी लोक कशाला म्हणतील ?

काही मिनिटांच्या व्योमविहारानंतर आम्ही एका खास बसमध्ये जाऊन बसलो; आणि लाव्हारसाच्या सुकून तडकलेल्या, काळ्या ठिक्कर असंख्य भोवऱ्यांच्या वाटेवरून वळणे घेत घेत ज्वालामुखीच्या पायथ्यापाशी येऊन पोहोचलो.

येथून आम्हांला वर चढावयाचे होते आणि चढण तर बरीच उभी होती. मोठेच अवसान आणून आम्ही चढायला लागलो.... एकसारखे चढू लागलो. जेथे पाहावे तेथे

दूर दूरपर्यंत, लाव्हारसाच्या काळ्या व पांढऱ्या राखेने सारा परिसर भरलेला दिसत होता. जणू सर्वनाशाचे साम्राज्यच. जवळ जवळ अर्ध्या तासाच्या आरोहणानंतर आम्ही ज्वालामुखीच्या तोंडाजवळ येऊन पोहोचलो.

ज्वालामुखीच्या प्रचंड द्रोणातून– ह्याचा आकार काहीसा माणसाच्या कानासारखा होता– गंधकाच्या धुराचे लोट एकसारखे उडत आहेत! क्षणात काळे, क्षणात पांढरे, तर क्षणात निळे दिसणारे हे लोट आकाशाला गवसणी घालण्यासाठी अगदी ख-स्वतिका-पर्यंत जाऊन भिडले आहेत असे दृश्य पाहिले. मी अर्जुनाप्रमाणे 'विस्मयाविष्ट-हृष्टरोमा' होऊन ज्वालामुखीचे हे रूप पाहू लागलो. त्याच्या मुखात जणू प्रलय-काळचे तांडव चालले होते. खद् खद्... खद् खद्... ज्वालामुखी अखंडपणे खदखदत होता. मध्येच धुरातून एक अग्नि-शिखा दिसायची. तिचा सौम्य ताम्ररंग पाहिल्याबरोबर अंगावर रोमांच उभे राहायचे. मध्येच स्फोट झाल्यासारखा आवाज व्हायचा आणि आगीचा एक गोळा धुराबरोबर वर चढून पुन्हा आत पडायचा. आत लाव्हारसाचे एक कुंड एकसारखे धगधगत होते. त्याचा रंग व अवतार भयानक वाटत होता. द्रोणाच्या भिंतींना मधून मधून भोके पडली होती. त्यांतून धुराचे लोट व आगीच्या ज्वाला जेव्हा वर उसळून येत, तेव्हा ज्वालामुखीचा आता– याच क्षणी – स्फोट होईल अशी भीती वाटे. विश्वरूप-दर्शन होताच अर्जुनाची काय स्थिती झाली असेल याची मला अंधुक कल्पना आली. मी भयभीत व व्याकुळ अंतःकरणाने आसोच्या त्या प्रलयकालीन अग्निसमान प्रज्वलित मुखाकडे पाहू लागलो.

शंभर-सव्वासे माणसे तेथे होती. सर्वच 'प्रव्यथितान्तरात्मा' होऊन हे दृश्य पाहात होती. सर्वांच्या चेहऱ्यावर भीती, व्याकुळता व विस्मय यांचे तरंग उठत असलेले दिसत होते.

माझे हात प्रणामार्थ जुळले गेले. मी तेथेच बसून विनोबांच्या गीताईतला अकरावा अध्याय मनातल्या मनात गुणगुणू लागलो—

सांगा असा कोण तुम्ही भयाण
नमू तुम्हा देव-वरा न कोपा ।
जाणावया उत्सुक आदि-देवा
ध्यानी न ये की करणी कशी ही ।।

गेल्या कित्येक वर्षांपासून आम्ही गीताईतला अकरावा अध्याय आमच्या प्रार्थनेत रोज संध्याकाळी म्हणत असतो. पण आज जितक्या उत्कटतेने मी तो म्हटला तितकी उत्कटता मी यापूर्वी आयुष्यात कधीच अनुभवली नव्हती.

ह्यूज माझ्या मागेच उभे होते. मी जेव्हा प्रार्थना संपवून त्यांच्या तोंडाकडे पाहिले. तेव्हा ते मला म्हणाले, " It is a thrilling experience. I shall never forget this day."

माझ्या उजव्या बाजूला उंचवट्याची एक जागा होती. काकासाहेब तेथे जाऊन पोहोचले होते. 'जीवनातला हा एक असाधारण आनंद आहे. प्रत्येक क्षणाचा उत्तमांतला उत्तम उपयोग करून घेतला पाहिजे.' जणू या भावनेने ते वयाची पर्वा न करता समोर, मागे, सगळीकडे जे जे काही पाहण्याजोगे होते ते पाहण्यात व स्मृतिपटावर त्याची छायाचित्रे उमटविण्यात एखाद्या तरुणाच्या उत्साहाने गुंतले होते!"


जगात जेवढे ज्वालामुखी आहेत त्यांतले वीस टक्के – म्हणजे जवळजवळ अठ्ठ्याऐंशी ज्वालामुखी – म्हणे एका जपानमध्ये आहेत! त्यांतले चाळीस तर जिवंत ज्वालामुखी आहेत! मधून मधून या ज्वालामुखींचा स्फोट होतो तेव्हा ते आसपासचा सारा भूभाग जाळून टाकतात. अशा वेळी हजारो लोक मृत्युमुखी पडतात. अशा या धोक्याच्या ठिकाणी जपानी लोक निर्धास्तपणे कसे राहतात, कोण जाणे! 'आसो' हा अशाच प्रकारचा एक ज्वालामुखी आहे. त्याचा केव्हा स्फोट होईल हे सांगता यायचे नाही आणि म्हणून वस्तीसाठी हा परिसर अत्यंत धोक्याचा आहे. तरीही येथे आज लाख–सव्वा लाख लोकांची वस्ती आहे! तोक्योच्या उत्तरेला केवळ वीसच मैलांच्या अंतरावर आसामा नावाचा आणखी एक जिवंत ज्वालामुखी आहे. त्याचाही नित्य नेमाने उद्रेक होत असतो. तरीही तेथे हजारो लोक जाऊन राहिले आहेत. धोक्याच्या ठिकाणी जाऊन निर्धास्तपणे राहण्याच्या जपानी लोकांच्या मनोवृत्तीचे काही केल्या मला आकलन झाले नाही. 'धोका सगळीकडे असतो. तो आहे म्हणून काय पळून जायचे?' हे तत्त्वज्ञान जपानी लोकांच्या अंगात मुरलेले आहे. 'धोका आहे म्हणून काय विश्वरूप-दर्शन घ्यायचे सोडून द्यायचे? असल्याच भव्य दर्शनाने आपली दृष्टी दिव्य होते. हृदय समृद्ध होते. या दिव्यतेची व समृद्धीची दीक्षा देण्यासाठीच निसर्गाने हा अवतार धारण केला आहे.' हे तत्त्वज्ञान मला मान्य आहे. इतकेच नव्हे तर या तत्त्वज्ञानाला अनुसरून मी अशा भव्य व दिव्य ठिकाणी, धोका पत्करून जाण्यास नेहमी उत्सुकही असतो. पण धोक्याच्या ठिकाणी कायमची वस्ती करून राहण्यास मी कधी काळी तयार होईन की नाही हे मात्र सांगता यायचे नाही.

पूर्वी आमच्या गोव्यात एक जपानी बाहुली मिळायची. तिला पाय नसायचे. तिचा आकार गोल असायचा, पण तिची खालची बाजू जरा जड असायची. त्यामुळे तिला कशीही उलटीसुलटी फेकून दिली तरीही जमिनीवर पडताना ती नेहमी उभीच पडायची. त्या बाहुलीला 'दारूमा' हे नाव आहे, हे मला येथेच समजले. बोधिधर्म

या नावाचा एक भारतीय बौद्ध साधू होऊन गेला. अनेक वर्षे तपश्चर्या केल्यामुळे त्याचे पाय गळून पडले. जपानमध्ये जो झेन नावाचा ध्यान-मार्गी संप्रदाय चालतो त्याचा तो एक संस्थापक होता. त्याची म्हणे ही मूर्ती आहे. मला ही मूर्ती जपानी स्वभावाची प्रतीक वाटली. जपानी माणसाला तुम्ही कसेही फेका, तो खाली पडताना या ' दारूमा '-प्रमाणे उभाच पडेल. त्यांच्या इतिहास-विधात्याने त्यांच्यावर कित्येकदा हा प्रयोग केला आहे आणि पाहिले आहे की तो सातदा पडला तरी आठदा उभा राहतो. जपानी लोकांमध्ये ही जी लोकोत्तर शक्ती दिसून येते ती ज्वालामुखीच्या सान्निध्यात नित्य धोक्यात जीवन जगूनच त्यांनी मिळविली नसेल कशावरून? राष्ट्राचा स्वभाव घडविण्यात भूगोलाचा भाग हा असतोच!

खरोखर, हे ज्वालामुखी म्हणजे जपानचे खरे वैभव आहे. निसर्गाने–त्या सर्वश्रेष्ठ कलाकाराने–ही भूमी ज्वालेच्या रंगाने रंगविली आहे. म्हणूनच तर ती प्रकाशाचे वाहन बनू शकली आहे!

बसल्या बसल्या माझ्या मनात नाना प्रकारचे विचार येऊ लागले. आजवर कधीच न पाहिलेले सृष्टीचे हे असले अनंत तेजोमय उग्ररूप तासभर पाहून झाल्यावर मला तिचे नेहमीचे प्रसन्न – सौम्य स्वरूप पाहण्याची आता चुटपुट लागली. थोड्या वेळाने आम्ही तेथून उठलो आणि दुसऱ्या मार्गाने घरी यायला निघालो. ' रोप-वे 'मधून पुन्हा एकदा व्योम-विहार करून खाली उतरलो, तेव्हा प्रसन्न – सौम्य हिरवळीने आमचे मनःपूर्वक स्वागत केले. डाव्या बाजूला एक चुमुकली हिरवी टेकडी दिसली. तिचा आकार कासवासारखा होता. हाही म्हणे एके काळचा ज्वालामुखी होता. पण आज त्याच्या पाठीवर गवताची पाती जीवनाच्या पताका फडकावीत डौलाने डोलत होती. आमच्यापैकी प्रत्येकाच्या मुखावर प्रसन्न गांभीर्य पसरले होते. सृष्टीचे आज एक अत्यंत दुर्लभ स्वरूप पाहिल्याची कृतार्थता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विलसत होती. परतताना आम्ही पार बदलून गेलो होतो.



# : २२ : बेप्पू

क्युशू बेटात बेप्पू नावाचे एक अतिशय रमणीय स्थान आहे हे मी पहिल्याप्रथम कान्ती मेहता नावाच्या एका गुजराती व्यापारी कुटुंबातील तरुणाच्या तोंडून ऐकले. हिरोशिमाला एका रात्री आम्ही सहलीला बाहेर पडलो असता आमच्या हॉटेलच्या तळमजल्यावरच कान्तिभाईंशी भेट झाली होती. जपानमधील अनेक स्थळे बघत बघत ते त्या दिवशी हिरोशिमाला येऊन पोहोचले होते.

प्रवासी लोक एकमेकांना भेटले म्हणजे ते प्रवासाशिवाय दुसऱ्या कोणत्या विषयावर बोलणार? ओळख होताच कान्तिभाईंना आम्ही पाहिलेल्या स्थानांची माहिती सांगितली. त्यांनी आपण बघितलेल्या स्थानांची वर्णने केली. काकासाहेब सध्या जपानमध्ये असून याच हॉटेलमध्ये उतरले आहेत हे कळताच त्यांना अतिशय आनंद झाला व ते म्हणाले—

‘ हा कपिलाषष्ठीचा योग आहे. मला काकासाहेबांची भेट घ्यायची आहे. त्यांचे जपानच्या प्रवासाचे पुस्तक बरोबर घेऊनच मी येथे हिंडत आहे. त्यात त्यांनी बेप्पूचे वर्णन का लिहिले नाही हे मला त्यांना विचारायचे आहे. ’

रात्रीचे दहा वाजून गेले होते. आम्ही तळमजल्यावरून काकासाहेबांना त्यांच्या खोलीत फोन केला. कान्तिभाईंची गोष्ट कानावर पडताच ते म्हणाले– ' त्यांना लगेच वर घेऊन या. '

सामान्यतः प्रवासी लोक गोष्टीवेल्हाळ असतात. त्यांतल्या त्यात कान्तिभाई चांगले रसिक प्रवासी होते. मग काय विचारता ! गोष्टीवरून गोष्टी निघाल्या आणि त्यांतून आम्ही न पाहिलेल्या जपानमधल्या कित्येक स्थानांची माहिती आम्हांला मिळाली. त्यांतल्या त्यात बेप्पूने आम्हा सर्वांचे लक्ष अधिक वेधले. त्याच क्षणी आम्ही निश्चय केला– बेप्पू बघितल्यावाचून जपानची भूमी काही झाले तरी सोडायची नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी इशिबासीसानची भेट होताच आम्ही चौकशी सुरू केली – बेप्पू कोठे आहे ? तेथे कोठून जायचे ? कसे जायचे ? आमच्या कार्यक्रमात बेप्पूचा समावेश करण्यात आला आहे की नाही ? इशिबासीसाननी ताडले की, आता बेप्पूचा कार्यक्रम ठरविल्यावाचून या पाहुण्यांना स्वास्थ्य लाभायचे नाही. त्यांनी ओश्योसामांच्या कानावर ही गोष्ट घातली आणि आसोचा कार्यक्रम संपवून तोक्योला परतताना बेप्पूवरून परतण्याचा निर्णय त्यांनी त्याच दिवशी घेतला.

आसोहून बेप्पू शंभर किलोमीटर्स आहे.

आसोच्या ज्वालामुखीचे भीषण – भव्य दर्शन घेतल्यानंतर आकामिझूला आम्ही एक दिवस अधिक राहिलो आणि दुसऱ्या दिवशी सकाळी अकराच्या सुमाराला बस पकडून बेप्पूला जाण्यासाठी निघालो. ताकादाके वगैरे परिचित नगराजांचा निरोप घेतला आणि आसोला वळसा घालून त्याच्या एकेकाळच्या बाह्य द्रोणावरून– Outer crater वरून वेगाने धावू लागलो.

ज्याप्रमाणे नदीचे दर्शन होताच आपल्याला पोहण्याची निदान नौकाविहार करण्याची इच्छा होत असते, तसे पर्वत पाहताच त्यांच्या शिखरावर चढून त्यांच्या आसपास पसरलेला दूरदूरचा भू-भाग एका दृष्टिक्षेपात पाहण्याची उत्कंठा मला नेहमी होत असते. अशा प्रकारचा पर्वतानंद उपभोगण्यासाठी मी काही वर्षांपूर्वी हिमालयातल्या जम्नोत्री–गंगोत्रीसारख्या ठिकाणी मनसोक्त हिंडून आलो होतो. परवा, आसो ज्वालामुखीचे दर्शन घेतल्यानंतर जेव्हा रोप-वेमधून खाली उतरत होतो त्या वेळी आसोचा हा बाह्य-द्रोण मी पाहिला होता आणि त्याच्यावर चढून जाण्याची उत्कंठा मनात उत्पन्न झाली होती. माझी ही इच्छा आज बस पुरवीत आहे हे लक्षात येताच मला अत्यंत आनंद झाला. बस जसजशी टेकड्या चढू लागली तसतसा समोर एकाएकी प्रकट होणाऱ्या अनेकानेक टेकड्यांची शोभा पाहण्यात मी दंग झालो. फुलाची एक

एक पाकळी उमलावी तशी एक एक टेकडी समोर उमलू लागली आणि हां हां म्हणता पहाडी पाकळ्यांचा एक टवटवीत गुलाब समोर प्रकट झाला.

पर्वतारोहणाच्या बाबतीतला माझा एक अनुभव खास नमूद करण्याजोगा आहे. जेव्हा आपण एखादा पहाड चढू लागतो तेव्हा त्याच्या पायथ्यापाशी असलेली झाडे आपल्याला लळा लावतात. बराच वेळपर्यंत ती प्रवासात आपली सोबत करतात. पण पुढे, ठराविक उंचीवर पोहोचल्याबरोबर, त्यांना आपल्या मर्यादेची एकाएकी आठवण होते आणि ती तेथेच थांबतात. या म्हटले तरी पुढे येत नाहीत. त्यांचा निरोप घेताना मन जरा खट्टू होते. पण लगेच पुढे दुसऱ्या प्रकारची वनस्पती आपल्या स्वागताला तयार असलेली पाहतो आणि आतापर्यंत बरोबर आलेल्या झाडांना क्षणभर विसरून या नव्या वनस्पतीच्या प्रेमात पडतो.

येथेदेखील मला हा अनुभव आला. आसोचा हा बाह्यद्रोण चढताना मी प्रथम त्याच्या पायथ्याशी असलेल्या 'मात्सू' नावाच्या एक विशिष्ट प्रकारच्या वृक्षांच्या प्रेमात पडलो. हे वृक्ष चीड–देवदार यांच्या परिवारातलेच होते. पण चीड–देवदारा-प्रमाणे सरळ उभे राहण्याऐवजी ते जणू नृत्याच्या 'पोझ'मध्ये उभे होते. त्यांच्या हाताच्या बोटांच्या निरनिराळ्या प्रकारच्या मुद्रा पाहात पाहात आम्ही वर जाऊ लागलो. बराच वेळपर्यंत त्यांनी आमची सोबत केली आणि एके ठिकाणी पोहोचताच ते एकाएकी जणू निरोपाच्या 'पोझ'मध्ये उभे राहिले. त्यांच्या वियोगाचे दुःख अनुभवतो न अनुभवतो तोच हिरव्या मखमलीसारख्या एका पर्वतशिखरावर आमची बस चढली आणि एका कोपऱ्यात जाऊन उभी राहिली.

आसोहून बेप्पूला जाणारी बस सामान्यतः वाटेत कोठेच उभी राहात नसते. समय-पालनाच्या बाबतीत तोक्योहून ओसाकाला जाणाऱ्या सुपर एक्स्प्रेस ट्रेनची जी ख्याती आहे तीच आसोहून बेप्पूला जाणाऱ्या या बसची आहे. दुपारी दोन वाजून दहा मिनिटांनी ती बेप्पूला पोहोचणार म्हणजे बरोबर दोन वाजून दहा मिनिटांनी ती तेथे पोहोचलीच पाहिजे. प्रवाशांना रस्त्यात भूक लागली तर ते धावत्या बसमध्येच जेवण करून घेतात. त्यासाठी ते आपल्याबरोबरच शिदोऱ्या घेऊन येतात. आपल्या येथे हलवायाच्या दुकानांत जशा मिठाईच्या पेट्या मिळतात तशा प्रकारच्या येथे कित्येक दुकानांत "भोजन-मंजुषा" मिळत असतात. पुठ्याएवढ्या पातळ लाकडाच्या पेटीत व्यवस्थित मांडून ठेवलेल्या या जेवणाला येथे 'बेन्तो' हे नाव आहे. भाताच्या चार-सहा चिमुकल्या मुदा, माशाचे किंवा मांसाचे दोन-तीन तुकडे, थोडा ताजा भाजीपाला, सफरचंदाचा एखादा तुकडा अशा पद्धतीचे जेवण त्यात असते. तोंड पुसायला बरोबर एक कागदी रुमालही असतो आणि जपानी लोक

चमच्यासारखा ज्यांचा उपयोग करतात त्या लाकडाच्या दोन काड्याही ( चॉप स्टिक्स ) त्यात असतात. प्रवासात सगळेच लोक हे ' बेन्तो ' जेवण घेत असतात. फार कशाला, जपानमध्ये रस्त्यावर काम करणाऱ्या मजुरांचे दुपारचे हेच जेवण असते. आणि तिथल्या पार्लमेन्टच्या–दियतच्या–सदस्यांचेही हेच जेवण असते. या बाबतीत जपानी लोकांची ' समानता ' खरोखर आश्चर्य व कौतुक करण्याजोगी आहे.

वाटेत कुठेच न थांबणारी बस आज या पर्वतशिखरावर एकाएकी थांबलेली पाहून बसमधील जपानी प्रवाशांना आश्चर्याचा धक्का बसला. ते एकमेकांची तोंडे बघू लागले. त्यांना काय ठाऊक की बसमध्ये जे भारतीय पाहुणे बसले आहेत त्यांच्या बहुमानार्थ आज हा खास अपवाद करण्यात आला आहे! बस सोडण्यापूर्वी तिच्या मॅनेजरने ड्रायव्हरला तशी खास सूचना दिली होती. थोड्या दिवसांपूर्वी जपानचे सम्राट हिरोहितो या बाजूला आले होते. त्या वेळी त्यांनी ज्या स्थानावरून आसोचा भव्य-रमणीय परिसर बघितला होता तेथे आम्ही उतरावे व तेथून दिसणारे दृश्य बघून घ्यावे ही आपली इच्छा मॅनेजरने बस सोडण्यापूर्वी आमच्यापाशी बोलून दाखविली होती आणि आम्हीही मोठ्या आनंदाने उतरून ते स्थान बघण्याची तयारी दाखविली होती. खरे म्हणजे, यात आपल्या सम्राटाविषयीचा त्याच्या मनातला पूज्यभावच विशेषे-करून दृग्गोचर होत होता आणि आम्हांला त्याची कदर होती.

आपली जशी राष्ट्रध्वजाच्याविषयीची भावना असते तशाच प्रकारची भावना जपानी लोकांच्या मनात त्यांच्या सम्राटाविषयी– त्यांच्या ' तेन्नो 'विषयी– आहे. राष्ट्राची सारी प्रतिष्ठा, सारे मांगल्य, सारे श्रेष्ठत्व, सारे दिव्यत्व यांचे सम्राट हे एक जिवंत प्रतीक आहे. जपानी लोकांनी इतिहासाच्या प्रारंभकालापासून ही भावना प्रयत्नपूर्वक पोषण देऊन आपल्या मनामध्ये दृढमूल करून घेतली आहे. जपानच्या जीवनामध्ये जे अत्यंत विलोभनीय असे एक-राष्ट्रीयत्व दिसून येते त्याच्या मुळाशी हीच भावना आहे. मेइजी काळात जेव्हा जपानच्या राष्ट्रीय जीवनामध्ये प्रचंड उलथापालथ झाली तेव्हा सम्राटाचे काय करावे असा प्रश्न उपस्थित झाला. त्या वेळी याविषयीचा सल्ला घेण्यासाठी जपानचे धुरीण म्हणे त्या वेळच्या पुढारलेल्या जगातल्या सर्वश्रेष्ठ समाजशास्त्रज्ञाकडे– हर्बर्ट स्पेन्सरकडे – गेले आणि स्पेन्सरने खोल विचार करून त्यांना हाच सल्ला दिला की, तुम्हांला एक पुढारलेले राष्ट्र म्हणून जगापुढे यायचे असेल तर तुमच्या परंपरागत जीवनामध्ये सरंजामशाहीचे जेवढे अवशेष असतील ते सर्व प्रयत्नपूर्वक उखडून फेकून द्या. पण तुम्हा सर्वांना एक-राष्ट्रीयत्वाच्या भावनेत एकत्र गुंफणारा हा दुवा मात्र तुटू देऊ नका. मेइजी काळातल्या समाजधुरीणांनी स्पेन्सरचा हा डोळस सल्ला शिरोधार्य मानला आणि त्यांनी आपले सारे राष्ट्रीय जीवन आमूलाग्र बदलले. पण सम्राटाच्या

स्थानाला व प्रतिष्ठेला यत्किंचितही बाधा येऊ दिली नाही. एवढेच नव्हे तर त्यांनी सारी सामाजिक क्रांती सम्राटाच्या नावानेच केली आणि क्रांतीचे नाव जे मेइजी तेदेखील सम्राटालाच लावून टाकले. यावरून त्यांची सम्राटाविषयीची भावना पूर्वीसारखीच आहे असे दिसून येते.

सम्राटाच्या पादस्पर्शाने पुनीत झालेल्या त्या स्थानावरून आम्ही आसोचा तो भव्य परिसर डोळेभरून पाहून घेतला आणि पुन्हा बसमध्ये जाऊन बसलो.

बस लगेच पुढचा मार्ग क्रमू लागली. काल माझ्या हातांत रूथ बेनेडिक्टचे ' दि क्रिझांथेमम ॲण्ड दि स्वोर्ड ' या नावाचे जपानविषयक एक अप्रतिम पुस्तक पडले होते. आपल्या या पुस्तकात बेनेडिक्टबाईने जपानच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे इतके रसपूर्ण विवेचन केले आहे की, ते पूर्ण वाचून झाल्यावरच मी झोपायला गेलो होतो. कालच्या या थोड्या जागरणामुळे मला आता येथे झोप आली. पंधरा-वीस मिनिटे माझा डोळा लागला असता बोटीच्या भोंग्यासारखा आवाज कानी पडला. मी त्या आवाजाने खडबडून जागा झालो. पाहतो तर तो आमच्या बसचा हॉर्न होता. हॉर्नचा आवाज जपानमध्ये प्रथमतःच माझ्या कानांवर पडला होता. मी विस्मयाने खिडकी-बाहेर पाहिले—

अरे ! पण हे तुफान अचानक कुठून आले? नुकतेच तर सारे कसे शान्त होते !

बाहेर सोसाट्याचा वारा सुटला होता. तो पिऊन झाडे इतकी मत्त झाली होती की ती जणू तांडवनृत्य करू लागली आहेत असे वाटत होते. तुफानाशी एकरूप होऊन ती त्याचा आनंद मनसोक्त लुटीत आहेत हे पाहून मला प्रथम त्यांचा हेवा वाटला. पण जेव्हा झंझावात सुरू झाला आणि झाडे भुतासारखी वेडीवाकडी नाचू लागली, तेव्हा त्यांच्या मुळांचा संयम सुटला तर काय होईल याचीच मला भीती वाटायला लागली.

समोर धुके पसरले होते; पुढची वाट दिसत नव्हती. आमच्या बसला आता कैफ चढला. तुफानाशी ताल धरून तीही मोठमोठ्याने आरडत ओरडत भयंकर वळणे घेत धावू लागली. आम्ही जवळजवळ तेराशे मीटर वर चढून आता तेथे पसरलेल्या धुक्याच्या विस्तारातून वाट काढीत उतरत होतो.

दहा-एक मिनिटे हे तांडवनृत्य चालले असेल. इतक्यात वारा एकाएकी शान्त झाला. त्याबरोबर झाडांचाही कैफ उतरला आणि समोरच्या धुक्याचा पडदा फाटून पुन्हा सृष्टीचे शान्त नि सौम्य स्वरूप दृष्टीसमोर दिसले. मला वाटले, एका संकटातून सुटलो एकदाचे. पण जाता जाता एक अद्भुत दृश्य पाहिले खरे !

आम्ही थोडे उतरलो, पुन्हा थोडे वर चढलो आणि पुन्हा खाली उतरायला लागलो. जरा पुढे गेल्यावर लहान-मोठ्या असंख्य टेकड्यांचा जणू एक थवाच समोर दिसला. जेथे पाहावे तेथे टेकड्याच टेकड्या ! इतक्या टेकड्या येथे कुठून आल्या याचेच जणू आश्चर्य वाटावे. अगदी क्षितिजापर्यंत त्या पसरल्या होत्या. खवळलेल्या सागरात जशा लाटा दिसाव्यात तशा या टेकड्या येथे दिसत होत्या. एक-एक टेकडी म्हणजे जणू एक-एक लाटच. एकीची शोभा पाहून आपण तृप्त होतो तोच दुसरीने दृष्टी ओढून घ्यावी. इतक्यात तिसरीने उत्तुंग उंची गाठून आपल्याला विस्मयात टाकावे ! या पहाडी प्राकारात मध्येच एक निळे सुंदर सरोवर दिसले. जणू आंगठीतला इंद्रनीळाचा एक सुंदर खडाच. ते दृष्टीस पडताच ‘ सृष्टि-सौंदर्य पाहून तुम्हांला का आनंद होतो ? ’ असे विचारणाऱ्या शरद पंड्यांनादेखील आनंदाचे भरते आले आणि ते म्हणाले, ‘ किती सुंदर दृश्य आहे बघा ! ’

जरा खाली उतरल्यावर लक्षात आले की जे सरोवर आम्ही पाहिले होते ते सरोवर नव्हतेच मुळी. तो समुद्र होता आणि त्याच्या पलीकडे ज्या टेकड्या दिसत होत्या त्या टेकड्या नव्हत्या, बेटे होती. इतक्यात उन्हाळी झऱ्याचे कारंजे दृष्टीस पडले. एक, दोन, तीन, चार...मी मोजू लागलो. पण मोजता येण्याइतके ते नव्हते. ते असंख्य होते. मी मोजायचे सोडून दिले. त्याच क्षणी कुणी म्हटले– ‘ बेप्पू आले ! ’ मी घड्याळाकडे पाहिले. बरोबर दुपारची दोन वाजून दहा मिनिटे झाली होती !

आम्ही प्रथम आमचे सामान एका हॉटेलमध्ये नेऊन ठेवले व लगेच गाड्या मागवून हिंडायला बाहेर पडलो. संध्याकाळपर्यंत जेवढे काही पाहून घेता येण्याजोगे होते तेवढे आम्हांला पाहून घ्यायचे होते. कारण दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हांला बेप्पू सोडायचे होते.

प्रथमदर्शनी बेप्पू मला आतामीसारखे वाटले. आतामीप्रमाणेच या शहराला टेकड्यांनी तिन्ही बाजूंनी वेढले आहे आणि चौथ्या बाजूला समुद्र आहे. फरक एवढाच की, आतामीपेक्षा बेप्पू जरा मोठे व विस्तृत शहर आहे. पण—

जरी हे शहर आतामीसारखे वाटले आणि आतामीप्रमाणेच ते उन्हाळी झऱ्यासाठी प्रसिद्ध असले, तरी ते आतामीहून सर्वस्वी भिन्न प्रकारचे आहे. येथे काही गोष्टी अशा आहेत की, त्यामुळे या स्थळाची तुलना जपानमधील दुसऱ्या कुठल्याच स्थळाशी करता यायची नाही. एवढेच नव्हे तर जगातल्या दुसऱ्या कुठल्याही स्थळाशी करता यायची नाही. निसर्गाने जणू आपली सारी किमया वापरून या स्थळाला अद्वितीय बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

आम्ही 'बौझ्रू जिगोकू' या नावाने प्रसिद्ध असलेले स्थान बघायला गेलो. येथे एक कुंड आहे. ते ज्वालामुखीप्रमाणे एकसारखे खदखदत असते. ज्वालामुखीच्या पोटात डोकावून पाहिले असता ज्या प्रकारचा अनुभव येतो तशाच प्रकारचा अनुभव हे कुंड पाहताना येतो. कुंडातला चिखल – लाव्हारसच म्हटला पाहिजे त्याला – जेव्हा खदखदतो तेव्हा त्याच्या पृष्ठभागावर काही आकृत्या निर्माण होतात. त्या बौद्ध साधूच्या मुंडन केलेल्या डोक्यासारख्या वाटतात. त्यामुळेच याला 'बौझ्रू' हे नाव पडले आहे. 'बौझ्रू' म्हणजे बौद्ध साधूचे डोके आणि 'जिगोकू' म्हणजे 'नरक'. याला नरक का म्हटले हे मात्र लक्षात आले नाही. या लोकांच्या यमयातनेच्या कल्पना कदाचित आपल्यासारख्या असाव्या. आपल्या नरकाच्या भूगोलात अशा प्रकारच्या स्थलांचा उल्लेख आढळतो.

या कुंडाच्या जवळच एक उकळत्या पाण्याचा झरा आहे. तो जमिनीतून उफाळून जेव्हा वर येतो तेव्हा एखाद्या भव्य वृक्षासारखा भासतो.

येथून आम्ही दुसरा एक 'नरक' बघायला गेलो याचे नाव उमी-जिगोकू. 'उमी' म्हणजे समुद्र. पण येथे पाय ठेवताच स्वर्गात पोहोचल्यासारखे वाटावे, इतके इथले वातावरण सुदर व शान्त–तुष्ट आहे. येथे एक अतीव सुंदर तलाव आहे; जणू स्वर्गातली अप्सराच, आणि त्या तलावात असंख्य कमळे आहेत. काही निळी, काही लाल; मी अशा प्रकारची मोठी व सुंदर कमळे यापूर्वी कधीच बघितली नव्हती. तलावाच्या मागच्या बाजूला जी वनश्री आहे तेथे वाफेचा एक मोठा नैसर्गिक फवारा उडतो. तो तलावाची शोभा वाढवितो.

तलावाच्या आजूबाजूला एक वनस्पत्यालय आहे. त्यात निरनिराळया चार-पाच हजार जातींची झाडे आहेत. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे यांतली बहुतेक झाडे जपानच्या भूमीवर सामान्यपणे न सापडणारी वेगळया वातावरणातली आहेत.

पण उमी-जिगोकूचे वैशिष्ट्य तर पुढे आहे. लाल कमळांचे लावण्य न्याहाळीत पुढे गेलो म्हणजे दुसरा एक तलाव लागतो. याच्या सभोवती अत्यंत घनदाट वनश्री आहे. त्यात हा तलाव पाचूसारखा शोभतो. तलावाचे पाणी हिरवे आहे. असे म्हणतात की, बाराशे वर्षांपूर्वी येथे ज्वालामुखीचा एक स्फोट झाला व त्यातून हा तलाव वर आला. तेव्हापासून या पाण्याचा रंग असाच हिरवा राहिला आहे. या तलावाच्या चोहो बाजूंस हजार-बाराशे लोक सहज बसू शकतील इतका तो विस्तृत आहे. त्यामुळे व त्याच्या रंगामुळे याला 'समुद्र' हे नाव मिळाले.

पुढे, दुसऱ्या एका 'नरका'त आम्ही गेलो. त्याचे नाव चिनो-इके-जिगोकू. येथेही बाराशे-तेराशे चौरस मीटर एसपैस तलाव आहे. पण त्याचे पाणी रक्तासारखे

अगदी लाल-भडक आहे. या पाण्याच्या पृष्ठभागावरून जेव्हा वाफ उडते तेव्हा आपले काळीज भीतीने गांगरून जाते.

शिरो-इके-जिगोकूमध्ये जो तलाव आहे तिथले पाणी दुधासारखे पांढरे शुभ्र आहे. किनऱ्यू–जिगोकूमध्ये नुसती वाफच उडते. सकाळच्या वेळी जेव्हा सूर्याची किरणे या वाफेवर पडतात तेव्हा वाफेचा एक भला मोठा 'ड्रॅगन' उडतो आहे असा भास होत असतो. कामादो-जिगोकूमधल्या वाफेचा उपयोग भात शिजविण्यासाठी होऊ शकतो.

बौझ्, उमी व चिनो-इके हे तीन जिगोकू पाहतापाहताच संध्याकाळ व्हायला आली. त्यामुळे आम्ही शिरो-इके, किनऱ्यू व कामादो या जिगोकूंना भेट देऊ शकलो नाही. मला याचे दुःख झाले आहे हे इशिबासीसाननी ताडले व ते म्हणाले, 'तुम्ही पुन्हा येथे यावे म्हणून एवढे राहून गेले आहे. आता तात्सुमाकी बघून घ्या आणि जे राहून गेले आहे ते बघायला पुन्हा बेप्पूला याल असा संकल्प करा.'

तात्सुमाकीला गरम पाण्याचा एक फवारा उडत होता. अनेक दगडांच्या राशीतून तो उडायचा. फक्त तीन मिनिटे उडून बंद व्हायचा. वीस मिनिटांनंतर पुन्हा उडायला लागायचा आणि पुन्हा तीन मिनिटे उडून बंद व्हायचा. पण काय त्याचा उन्माद! फुर्रर्र फुक्, फुर्रर्र फुक् करून उडायचा आणि एखाद्या प्रतिभावान कवीप्रमाणे अनेक कल्पनांचे सूचन करून बंद व्हायचा.

निसर्गाला या बेप्पूमध्ये काय काय सुचले व ते कसे सुचले याचे आश्चर्य करीत आम्ही परतलो. इतके विविध प्रकारचे 'चमत्कार' एकाच ठिकाणी मला वाटते फक्त बेप्पूलाच निसर्गाने करून दाखविले आहेत. निसर्ग जपानचा पक्षपाती आहे हे इतके दिवस मी पाहून आलो होतो. पण बेप्पू पाहिल्यावर माझी खात्रीच झाली की जपान हे निसर्गाचे लाडके बाळ आहे. त्याला गोंजारताना निसर्गाला येथे वात्सल्याचे उमाळे फुटले आहेत. त्याला काय देऊ, काय नको असे झाले आहे आणि त्याने त्याला सर्व-काही देऊन टाकले आहे. या स्थलाला दृष्ट लागू नये म्हणूनच कदाचित बेप्पूमधल्या सर्व वैशिष्ट्यांना या लोकांनी 'जिगोकू' हे नाव दिले असावे. अन्यथा हा स्वर्गच आहे. नव्हे, स्वर्गालादेखील याचा हेवा वाटावा इतके हे सुंदर स्थळ आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी येथून निघताना पाय उचलवत नव्हता. मी मनाला समजावून सांगितले – आपल्याला अजून पुष्कळ वर्षे जगायचे आहे. पुष्कळ हिंडायचे आहे. जपानला पुन्हा येणे होणार नाही असे काय म्हणून मानावे? आता पुन्हा येथे येणे झाले तर बेप्पूला काही दिवस राहण्यासाठीच म्हणून यायचे. या स्वर्गात डुंबत राहण्यासाठीच म्हणून यायचे.

मन म्हणाले– चला तर मग! पुनरागमनाय च!



## : २३ : शिकोकू बेटात

जपान हा जगातल्या इतर कुठल्याही देशापेक्षा निराळा व वैशिष्ट्यपूर्ण असा देश आहे. त्यात पुन्हा त्याचे जे निरनिराळे भाग आहेत ते एकापेक्षा एक वैशिष्ट्यपूर्ण असे आहेत. क्युशू बेटाचा प्रवास संपवून जेव्हा आम्ही शिकोकू बेटात प्रवेश केला तेव्हा मला याची उत्कटतेने जाणीव झाली.

सामान्यपणे परदेशी प्रवासी शिकोकू या एका बाजूला पडलेल्या बेटाकडे जात नसतात. आमच्या प्रवासक्रमात हे बेट नव्हते. पण काकासाहेबांनी ओश्योसामांकडे गोष्ट काढली—

'मी यापूर्वी तीनदा जपानला आलो. पण हे बेट पाहिले नाही. शक्य असेल आणि प्रवासक्रमात बसत असेल तर जपानदर्शनात एवढेच बेट राहून जाऊ नये अशी इच्छा आहे. विशेष आग्रह आहे असे नव्हे. पण सहज साधत असेल तर हे बेट राहून जाऊ नये असे वाटते.'

ओश्योसामांना काकासाहेबांचे म्हणणे पटले आणि वेळात वेळ काढून त्यांनी

जपानी भूमध्य समुद्राच्या पूर्वेच्या या बेटाला प्रवासक्रमात स्थान दिले. जपानच्या चार प्रमुख बेटांपैकी सर्वांत मोठ्या होनशू बेटाचा प्रवास आम्ही सुरुवातीला थोडाबहुत केला होता. तोक्यो, क्योतो, नारा, निक्को, कामाकुरा वगैरे प्रसिद्ध स्थळे याच बेटावर आहेत आणि फुजीयामा हे या बेटाचे गौरवशाली वैशिष्ट्य आहे. पुढे आसो ज्वालामुखीच्या दर्शनाला आम्ही क्युशू बेटात गेलो तेव्हा मला हे बेट होनशूहून निराळ्या प्रकारचे वाटले. सृष्टिसौंदर्याच्याही दृष्टीने आणि लोकजीवनाच्या वैशिष्ट्यांच्याही दृष्टीने.

क्युशू बेटाचा प्रवास संपवून जेव्हा आम्ही शिकोकूला आलो तेव्हा जपानच्या चार मोठ्या बेटांपैकी सर्वांत चिमुकले हे बेट मला होनशू व क्युशू या दोन्ही बेटांहून निराळ्या प्रकारचे वाटले.

उत्तरेकडचे होक्कायदो बेट काही मी पाहू शकलो नाही. तेव्हा या बेटाविषयी मी काही सांगू शकत नाही. पण जाणकारांकडून मी असे ऐकले आहे की, ते इतर तिन्ही बेटांपेक्षा सर्वस्वी निराळ्या प्रकारचे आहे. जणू एका वेगळ्या देशात आपण आलो आहोत अशीच म्हणे तेथे गेल्यावर या बेटाची आपल्या मनावर छाप पडत असते. सृष्टिसौंदर्याच्याही दृष्टीने म्हणे हे बेट इतर तिन्ही बेटांपेक्षा अधिक सुंदर आहे.

होक्कायदो पाहण्याची माझी इच्छा अनिवार होती. एवढेच नव्हे तर जपानला जाताना हे बेट पाहिल्यावाचून परतायचे नाही असा संकल्प करूनच मी निघालो होतो. परंतु होनशू, क्युशू व शिकोकू ही बेटे पाहतापाहताच दोन महिने पूर्ण व्हायला आले होते आणि माझी 'व्हिजा'ची मुदत संपत आली होती. मुदत वाढवून घेणे कठीण नव्हते. पण तोपर्यंत होक्कायदोला हिवाळा सुरू झाला होता आणि सायबेरियातले असह्य थंड वारे तेथे वाहू लागले होते. थोड्या दिवसांनंतर हिमवर्षावही सुरू व्हायचा होता आणि माझ्याकडे गरम कपडे तर नव्हते. 'मला गरम कपडे द्या' असे जपानी मित्रांना सांगण्याचे मला धैर्य झाले नाही. त्यामुळे इच्छा असूनही होक्कायदोचे दर्शन न घेताच मला परतावे लागले. तेथे गेलो असतो तर तिथल्या सृष्टिसौंदर्याबरोबर जपानचे आदिवासी 'आयनू' यांचेही थोडे निरीक्षण करून आलो असतो.

होनशू व क्युशू बेटांत जसे आम्ही मनसोक्त हिंडलो तसे मात्र शिकोकू बेटात हिंडू शकलो नाही. बेप्पूचा आम्ही सकाळी आठाच्या सुमाराला निरोप घेतला आणि पृथ्वीवलयांकित अशा एका समुद्रातून चार तासांचा विहार करून दुपारच्या बाराला शिकोकू बेटातल्या मात्सुयामा बंदरावर उतरलो. तेथे दोनच तास राहून आगगाडीने आम्ही शिकोकूच्या दुसऱ्या टोकावरल्या ताकामात्सूला आलो. दुसऱ्या दिवशी दुपारी ताकामात्सूचा निरोप घेतला. म्हणजे एकंदरीत या बेटात आम्ही केवळ चोवीस तास हिंडलो असे म्हटले पाहिजे.

परंतु या चोवीस तासांच्या प्रवासानेच माझ्या मनावर या चिमुकल्या बेटाची विलक्षण छाप पडली. जपानच्या सृष्टिसौंदर्याचे अलौकिकत्व अनुभवावयाचे असल्यास या बेटाचा प्रवास केला पाहिजे. अजून या सौंदर्याला मानवी हातांचा संस्पर्श झालेला दिसत नाही. तसेच निरागस व निरालस जपानी लोकजीवन बघायचे असल्यास याच बेटाचे दर्शन घेतले पाहिजे. येथे नगरे आहेत, पण नागरी संस्कृतीचा इथल्या लोकांवर परिणाम झालेला दिसत नाही. इंग्रजीत ज्याला Untamed loveliness 'रांगडे सौंदर्य' म्हणतात तशा प्रकारचे सौंदर्य मला येथे इतस्ततः विखुरलेले दिसून आले आणि मी या बेटावर भलताच खूष झालो.

या बेटावरच मी नागो-ओ-दोशी नावाचा विलक्षण सुंदर कोंबडा बघितला. आपल्याकडच्या मोराप्रमाणेच हा इथला राष्ट्रीय पक्षी आहे. तो मोराप्रमाणेच सुंदर असून त्याचा पिसारा जवळजवळ पंधरा-वीस फूट लांब असतो. हा कोंबडा इतर कोंबड्यांप्रमाणे झुंजार नसतो. पिसारा उचलायलाच दोघातिघा माणसांची मदत घेतल्याशिवाय जो एका जागेवरून दुसरीकडे जाऊ शकत नाही तो झुंजेल तरी कसा म्हणा ! त्याची उत्पत्तीच सौंदर्यासाठी.

येथे झुंजण्याची तालीम कोंबड्याऐवजी कुत्र्यांना दिली जाते. जपानी पहिलवान 'सुमो' याच्यासारखाच या कुत्र्यांचा पोशाख असतो. म्हणजे कमरेला एक चड्डी व डोक्यावर एक प्रकारची शेंडी.

पण शिकोकूने मला जे मोहित केले त्याचे खरे कारण म्हणजे तिथली वृक्षराजी. या वृक्षराजीत पुन्हा 'मात्सू' सम्राटासारखा शोभतो. 'मात्सू'यामापासून ताका 'मात्सू'पर्यंत सर्वत्र त्याचेच साम्राज्य पसरलेले आहे. त्याच्या काही भाऊबंदांचे दर्शन मला बेप्पूला जाताना वाटेत घडले होते. पण येथे आल्यावर जणू त्यांच्याच अधिराज्यात प्रवेश केल्यासारखे वाटले. हा वृक्ष असतो गगनभेदीच. पण त्याला अशा काही विलक्षण फांद्या फुटतात की सांगता येत नाही. त्याचे खरे सौंदर्य या शाखावैचित्र्यातच आहे.

मात्सूयामाला जे दोन तास आम्हांला मिळाले तेवढ्या अवधीत आम्ही तिथले प्रसिद्ध इशितेजी मंदिर पाहून घेतले. तेथे मंदिरासमोर पुराण-पुरुषासारखा शेकडो वर्षे वयाचा एक मात्सू वृक्ष पाहिला. त्याचे दर्शन मला मंदिराइतकेच पावन वाटले. काय त्याचा रुबाब ! इतका म्हातारा झाला खरा; पण अजून शेकडो वर्षे जगायचे आहे या ऐटीतच तो उभा होता ! त्याच्या ऐसपैस पसरलेल्या फांद्या आणि त्यांना खालून दिलेला आधार पाहून मला कलकत्त्याच्या वानस्पत्यमममधल्या वटवृक्षाचे स्मरण झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही ताकामात्सूच्या याशिमा पर्वतावरील मंदिराच्या दर्शनाला गेलो. ताकामात्सूला जवळ जवळ ऐंशी प्राचीन मंदिरे आहेत. त्यांतली

आम्ही फक्त दोनच बघितली. एक हे याशिमा पर्वतावरचे व दुसरे शिदो नावाचे. याशिमा मंदिराच्या आसपास मात्सू वृक्षांचे एक सुंदर उपवन आहे. मंदिराच्या परिसरात प्राचीन काळी गेंझीचे प्रख्यात युद्ध झाले होते. ( कदाचित ते काल्पनिक असेल ) त्याचे इशिबासीसान चटकदार वर्णन करून सांगत होते, पण मात्सूच्या या उपवनाने माझे मन इतके काही आकर्षून घेतले की, इशिबासीसानचे वर्णन मी नीट ऐकूनदेखील घेतले नाही. सबंध उपवनात एक चक्कर टाकून आलो तेव्हा मला गीतेचे अठराही अध्याय एकाच बैठकीत वाचून काढल्यासारखा आनंद झाला.

माणसाला वृक्षांचे एवढे आकर्षण का वाटावे ? त्यांची पाने, फुले, फळे इतकेच नव्हे तर मुळेदेखील आपल्या उपयोगी पडतात म्हणून की काय ? की त्यांचे लाकूड उपयोगी येते म्हणून ? वृक्षांमुळेच आपण श्वास घेऊ शकतो. वृक्षांमुळेच पाऊस पडतो. वृक्षांमुळेच पावसाचे पाणी जमिनीच्या पोटात साठून राहते. वृक्ष नसते तर आपल्याला श्वास घ्यायला प्राणवायूही मिळाला नसता; जगायला पाणीही मिळाले नसते. हे सर्व खरे आहे. वृक्षांचा उपयोग इतर कुठल्याही गोष्टीपेक्षा आपल्याला जास्त होतो यात शंकाच नाही.

पण वृक्षांविषयी माणसाला जे आकर्षण वाटते त्याचे हेच एक कारण असेल असे मला वाटत नाही. मूल जसे आईकडे आपोआप ओढले जाते तसा माणूस वृक्षांकडे ओढला जातो. वृक्षांचे व आपले असे काही तरी नाते आहे की, जे रक्ताच्या नात्या-इतकेच गाढ आहे. आपल्या मेंदूत एक असा संस्कार खोल कुठे तरी दडून राहिलेला आहे की, जो आपल्याला वृक्षांकडच्या या नात्याचे नित्य स्मरण करून देत असतो.

या पृथ्वीतलावर जो पहिला वहिला ' जीव ' जन्माला आला तो वनस्पतीच्या रूपानेच अवतरला होता. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे तांबडे रक्त अवतरण्या-पूर्वी हिरवे पान अवतरले होते. गुरे जन्माला यायच्या अगोदर गवत जन्माला आले होते. वनस्पती व प्राणी अशा ' जीवां 'च्या दोन शाखा फुटण्यापूर्वी अनेक कोटी वर्षे जीव वनस्पतीच्या रूपानेच जगत होता. पुढे त्यातून दोन शाखा फुटल्या, आणि दोघांच्याही विकासाने वेगवेगळ्या दिशा घेतल्या. तरीही दोघांचा संबंध तुटला तर नाहीच, पण त्यांच्यामध्ये विलक्षण घनिष्ठ संबंध होत गेला.

ते कसेही असो. याशिमा मंदिराच्या परिसरातील त्या उपवनात माझ्या मनात अशा प्रकारचे अनेक विचार आले. जो विचार कित्येक वर्षांपासून मनात घोळत होता तो येथे दृढ झाला. मी स्वतःशी म्हटले की, ज्या लोकांमध्ये झाडांवर प्रेम करण्याची शक्ती आहे तेच खरे सुसंस्कृत लोक होत. जपानी लोकांमध्ये ही शक्ती विलक्षण आहे. म्हणूनच ते औद्योगिकीकरणाचा उच्चांक गाठूनदेखील जपानचे सृष्टि-सौंदर्य अबाधित ठेवू शकले आहेत.



# : २४ : गेयशा

फुजीयामा, साकुरा व गेयशा ही जपानची वैशिष्टयशाली त्रिपुटी आहे. जपान-विषयक कोणतेही पुस्तक घ्या; या त्रिपुटीचे वर्णन नाही असे पुस्तकच सापडायचे नाही.

फुजीयामाचा हृद्य परिचय आम्हांला हाकोने येथील आमच्या वास्तव्यात चांगलाच घडला होता. जपानच्या या पर्वतराजाच्या व्यक्तिमत्त्वाची छापही आमच्या मनावर खोल पडली होती. त्याचे नित्यनूतन उन्मेष पाहून मी तर त्याच्यावर मुग्ध झालो होतो आणि अशा एका पर्वतराजाच्या सान्निध्यात काही दिवस घालविण्याचे भाग्य मला लाभले याची धन्यताही अनुभवीत होतो.

साकुरांचा मोहर पाहण्याची इच्छा अनिवार असूनही तशी संधी मात्र या खेपेला लाभण्याची शक्यता नव्हती. कारण साकुरांच्या हंगामाला. अजून सहा-सात महिन्यांचा अवधी होता.

जेव्हा साकुरांचा हंगाम येतो आणि गुलाबी छटांची ही पांढरी फुले फुलू लागतात तेव्हा सारे जपान म्हणे आनंदाने अक्षरशः वेडे होते आणि रस्त्यावर येऊन नाचायला

बागडायला लागते. जपानचे भावजीवन या पुष्पविशेषाशी कसे निगडित आहे ते प्रत्यक्ष अनुभवल्यावाचून जपान खरोखर बघितल्याचा दावा कुणालाच करता यायचा नाही, असे मी अनेकांच्या तोंडून ऐकले होते. अनेकांच्या लिखाणातही वाचले होते.

हिरोशिमा येथील आमच्या वास्तव्यात आम्ही एके दिवशी मियाजिमाला गेलो होतो. हिरोशिमाहून काही मैलांच्या अंतरावर असलेले हे एक चिमुकले पण पाचूसारखे हिरवेगार नितान्तसुंदर बेट आहे. इत्सुकुशिमा नावाचे तेथे एक भले मोठे व एक हजार वर्षांपूर्वीचे शिन्तोमंदिर आहे आणि या मंदिरासमोर समुद्रकिनाऱ्यावर लाल-रंगाची एक भव्य 'तोरी' प्रवेशद्वार आहे. जेव्हा समुद्राला भरती येते तेव्हा मंदिर व 'तोरी' समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगत आहेत असे वाटायला लागते. हे अद्‌भुत दृश्य पाहण्यासाठी रोज शेकडो लोक येथे येत असतात.

हे बेट इतके पवित्र मानले गेले आहे की, येथे कुणाला कायम वसती करून राहता येत नाही. कुणाचा जन्मही येथे होऊ नये, कुणाचा मृत्यूही होऊ नये याची खबरदारी घेतली जाते. तिथल्या वृक्षांनादेखील कोणी कुऱ्हाड लावीत नाहीत.

पण मियाजिमाचे सारे सौंदर्य खुलून दिसते ते साकुरांच्या हंगामात. त्या वेळी हजारो लोक येथे येतात आणि मंदिरामध्ये 'बुगाकू' व 'कागुरा' नावाचे जे दोन नृत्यप्रकार त्या वेळी पाहावयास मिळतात ते पाहून हे लोकही बेहोष होऊन साऱ्या बेटभर नाचायला लागतात.

मियाजिमाचे हे वर्णन ज्या क्षणी मी ऐकले त्याच क्षणी मी निर्णय घेतला की, पुन्हा केव्हा तरी जपानला यायचे झाले तर साकुरांच्या हंगामात येईन. साकुरांच्या मोहराचा नयनोत्सव मियाजिमाला पुन्हा येऊन अनुभवल्याशिवाय मला शान्ती किंवा समाधान लाभावयाचे नाही.

गेयशांना पाहण्याची मात्र माझी मुळीच इच्छा नव्हती. एवढेच नव्हे तर जपानच्या प्रवासाला निघताना गेयशांना पाहण्याचा आंबटषोक मी करणार नाही असा संकल्प करूनच निघालो होतो.

या संकल्पामागे दोन कारणे होती. एक – कितीही समर्थन केले तरी गेयशा हे जपानी जीवनाचे एक विकृत अंग आहे, अशी माझी समजूत होती. एखाद्या समाजाच्या दुर्बलतेचे किंवा वैगुण्याचे कितीही सौंदर्यीकरण वा उदात्तीकरण केले तरी मूळ वैगुण्य काही लपून राहात नाही आणि तिचे समर्थनही होऊ शकत नाही. दुसरे– जे लोक गोव्यातल्या आमच्या कलावंतिणींना बघण्यासाठी येतात, त्यांच्याविषयी माझ्या

मनात आदर नाही. इतकेच नव्हे तर मला त्यांची चीड येते, व ते जेव्हा परतल्यावर कलावंतिणींची वर्णने करतात तेव्हा त्यांचा तिरस्कार वाटतो.

मला या लोकांप्रमाणे जपानी लोकांच्या तिरस्काराला पात्र व्हावयाचे नव्हते.

मला आमच्या कलावंतिणींविषयी जसा अभिमानही आहे आणि अनुकंपाही आहे तसा जपानी लोकांना त्यांच्या गेयशांचा अभिमान असेल, अनुकंपाही वाटत असेल; पण आमच्या कलावंतिणींची वर्णने लिहिणारे जसे कलावंतिणींवर अन्याय करून न कळत आमच्या भावनांवर आघात करतात तसा गेयशांवर कदाचित माझ्या हातून अन्याय होईल अशी मला भीती वाटत होती. म्हणूनच मी निघताना असा संकल्प केला होता की, जपानच्या प्रवासात मी मुद्दाम गेयशांना पाहण्यास जाणार नाही, आणि चुकून गेयशांचे दर्शन घडले तर त्यांचे वर्णन लिहिणार नाही.

पण आम्ही शिकोकू बेटाचा प्रवास संपवून ओसाकाला पोहोचलो आणि तेथे काकासाहेबांचे एक स्नेही सुमितोमो कंपनीचे डॉ. कितागावा यांच्याशी गाठ पडली. काकासाहेब जपानच्या दौऱ्यावर असल्याची बातमी त्यांना मिळाली होती, आणि टेलिफोनवरून आमचा शोध लावीत लावीत त्यांनी आम्हांला ताकामात्सूच्या कोकसाय हॉटेलात गाठले होते. ताकामात्सूहून तोक्योला जाताना वाटेत ओसाकाला त्यांची भेट घ्यावी असे त्या दिवशी ठरले.

रात्री ओसाकाला पोहोचल्याबरोबर डॉ. कितागावा आम्हा सर्वांना ‘त्सुरुया’ नावाच्या एका प्रसिद्ध जपानी आरामगृहात घेऊन गेले. तेथे त्यांनी आम्हांला खास जपानी पद्धतीचा खाना दिला. या खान्याच्या दरम्यान बाजूच्या एका खोलीतून दोन तरुण मुली आपल्या चित्ररम्य किमोनोच्या बाह्या फडफडावीत आमच्यासमोर येऊन उभ्या राहिल्या आणि डॉ. कितागावांचा आदेश मिळताच त्यांनी एक अतिशय मोहक नृत्य करून आम्हांला दाखविले. त्या नृत्याने तिथल्या काहीशा रूक्ष वातावरणात एक प्रकारचे लालित्य आणले. त्याच क्षणी मला संशय आला की, इहलोकींच्या अप्सरे-सारख्या दिसणाऱ्या या मुली गेयशाच असल्या पाहिजेत.

मी इशिबासीसानना हळूच कानात विचारले, ‘या गेयशा मुली आहेत काय?’

इशिबासीसान माझ्या कानात पुटपुटले, “ओसाकामधल्या गेयशा नंबर वन आहेत!”

पण तोपर्यंत त्या मुलींनी आपल्या शुभ्र सतेज हास्याने माझे मन चोरून नेले होते. त्यांच्यात मोहक लावण्य तर होतेच, पण एक प्रकारची शालीन संस्कारिताही होती. या मुली वेश्या असणेच शक्य नाही असे मला त्याच क्षणी वाटले आणि मी निर्णय घेतला – ‘यांचे वर्णन लिहिलेच पाहिजे.’

गेयशा या शब्दाचा अर्थ आहे– गुणी व्यक्ती. गेय = गुणी, शा = व्यक्ती.[1]

जपानमध्ये अशा काही स्त्रिया आहेत की, ज्या देखण्या मुलींना त्यांच्या आई-बापांची परवानगी असल्यास आपल्या ताब्यात घेतात आणि असे आई-बापही आहेत की, जे आपल्या मुली अशा स्त्रियांना देऊन टाकतात. या मुलींना मग गेयशांच्या खास शाळेत शिक्षण दिले जाते. क्योतो, नारा यांसारख्या ठिकाणी अशा प्रकारच्या खास शाळा आहेत. या शाळेत मग या मुलींना काव्य, गायन वगैरे ललितकला शिकविल्या जातात आणि विशेष म्हणजे संभाषणकला शिकविली जाते. भूलील, हास्य–लास्य वगैरे विषयांचाही या शिक्षणात समावेश करण्यात आलेला असतो आणि थकल्या-भागल्या पुरुषाचे मन रिझवून त्याला थोडासा विरंगुळा देऊन घरी कसा पाठवावा या कलेचाही त्यात समावेश असतो.

दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळात जेव्हा जपान साम्राज्यशाही महत्त्वाकांक्षेने भारून गेले होते त्या वेळी गेयशांकडे येणाऱ्या राजकारणी लोकांचे त्यांना मनो-विनोदन करता यावे म्हणून त्यांना युद्धशास्त्राची व राजकारणाचीही थोडी माहिती शिकविण्यात येत असे.

जपानी माणूस जेव्हा आपल्या दैनंदिन जीवनाला कंटाळतो तेव्हा मन रिझविण्या-साठी तो एखाद्या आरामगृहात जातो व तेथे गेयशाच्या सहवासात तास-दोन तास किंवा संध्याकाळ घालवितो. ती संभाषणचतुर असते. ती त्याच्याबरोबर सल्ला-मसलत करते, गौप्य-गोपन करते. अत्यंत मोकळेपणाने वागते आणि त्याचे नाना प्रकारे मनो-रंजन करून त्याची चिंता, त्याची निराशा दूर करण्याचा प्रयत्न करते. तिच्या मोहक वागणुकीमुळे त्यालाही वाटते की, आपल्याला एक जिवाभावाची मैत्रीणच जणू भेटली आहे. तिच्या सहवासात तो खुलतो आणि जेव्हा घरी परततो तेव्हा तो पुनः ताजातवाना झालेला असतो.

गेयशांचे हेच काम आहे. निराश माणसाच्या हृदयात आशेची ऊत्र निर्माण करणे, जीवन हे जगण्यासाठी आहे असा उत्साह त्याच्यामध्ये निर्माण करणे, एवढेच. शारीरिक सुख देणे हे तिचे ठरलेले काम नव्हे. ते वेश्येचे काम आहे. गेयशा ही वेश्या नव्हे

डॉ. कितागावा ज्या आरामगृहात आम्हांला घेऊन गेले होते त्याचे वातावरण शान्त व प्रसन्न होते. ओसाकासारख्या एका कर्कश शहरात आम्ही आहोत हे मी तर तेथे विसरूनच गेलो. आरामगृहाच्या अभिजात वास्तुशिल्पाने माझे चित्त वेधून घेतले आणि माझ्या शिणलेल्या दृष्टीला विसावाच लाभला !

---

१ संस्कृतमध्ये गुणिका = गणिका = कलावंतीण. केवळ वेश्या नव्हे.

खोली अगदी मोकळी होती. जमिनीवरच्या तातामी रेशमासारख्या मऊ होत्या. मधोमध जमिनीपेक्षा थोडा उंच असलेला एक चौरंग व त्याच्या सभोवती पाय नसलेल्या बैठ्या खुर्च्या एवढेच फर्निचर तेथे होते. माझ्या उजव्या बाजूला एका कोपऱ्यात हातात सामिसेन नावाचे एक तंतुवाद्य घेऊन एक म्हातारी बाई बसली होती. तिने सामिसेनची तार छेडली आणि बाजूच्या खोलीतून त्या दोन मुली आल्या आणि इतक्या मोहकपणे नाचायला लागल्या की, मला वाटले, सामिसेनमधले सूरच साकार होऊन समोर नाचत आहेत. त्या म्हाताऱ्या बाईचा आवाजही सुरेल होता. एका क्षणात खोलीचे सारे वातावरण बोलके झाले.

नृत्य संपल्यावर त्या मुली आमच्या चौरंगाजवळ येऊन गुडघे टेकून बसल्या. त्यांच्या हास्यात निष्पाप मोकळेपणा होता. आवाजात नाजुक किणकिण होती. त्यांचा गुलाबी चेहरा, काळेशार डोळे, लालचुटुक ओठ आणि मुक्त हास्य पाहून मला तर जपानी स्त्रीत्वाचा एक नवाच साक्षात्कार झाल्यासारखा वाटला.

नृत्याच्या वेळी त्या म्हातारीने जे गीत म्हटले होते त्यात बेडकाचा उल्लेख आला असावा. डॉ. कितागावांच्याबरोबर जे दुसरे एक तरुण गृहस्थ आले होते त्यांची रसिकता वसंतपंचमी साजरी करू लागली होती. त्यांनी त्या मुलींपैकी एकीला म्हटले– हे पाहुणे म्हणताहेत की तुझा चेहरा बेडकासारखा आहे.

त्या मुलीने लगेच टेबलावरची आगपेटी काढली आणि ती त्या गृहस्थांवर अशा काही जादूगिरीने फेकून दिली की, जणू तिची आणि त्या गृहस्थांची अनेक वर्षांची घनिष्ठ मैत्री आहे असेच आपल्याला वाटावे.

गेयशांच्या सहवासाची खरीखुरी गोडी चाखावयाची असल्यास आपल्याला जपानी भाषा अवगत असलीच पाहिजे. जपानी भाषा न समजणाऱ्या इसमाने गेयशाच्या सहवासात राहण्याचा प्रयत्न करणे म्हणजे बहिऱ्याने संगीताच्या मैफलीला जाण्यासारखे आहे. मला जपानी भाषा येत नव्हती, समजतही नव्हती. त्यामुळे या मुलीशी माझे संभाषण निःशब्दच चालले. त्यांचे हास्य, लास्य मी पाहिले. त्यांच्या संस्कारितेवर मी खूष झालो. पण आमच्यामध्ये मनोमनीचे नाते मात्र निर्माण होऊ शकले नाही.

जपानमध्ये एखाद्या प्रतिष्ठित पाहुण्याला खाना द्यायचा झाला तर तो अशा प्रकारच्या एखाद्या आरामगृहातच दिला जातो आणि खाना म्हटला म्हणजे तेथे गेयशा आल्याच. खान्याच्या वेळेला जितके पाहुणे उपस्थित असतील तितक्या गेयशा येतील. त्या मग तुमच्याजवळ येऊन बसतील. तुम्ही सिगरेट ओढत असाल तर त्या आपल्या हातात काड्याची पेटी घेऊन बसतील आणि तुम्ही सिगरेट ओढायला लागल्याबरोबर त्या चटकन पेटवतील. तुम्ही साके घेत असाल तर त्या तुमच्याबरोबर तिचा एखादा घोट घेतील. तुम्हांला जपानी बोलता येत असेल तर त्या आपल्या संभाषणाने तुमच्या

चित्तात आनंदाच्या अमृतलहरी निर्माण करतील आणि इतकेही करून पुन्हा अलिप्त त्या अलिप्तच राहतील.


असे म्हणतात की, एखादी गेयशा एखाद्याची कायमची मैत्रीण म्हणून राहायला तयार होते; पण त्या वेळी त्या इसमाला तिच्याशी प्रथम लेखी करार करावा लागतो. हा करार झाला म्हणजे मग ती त्याच्याशी आयुष्यभर एकनिष्ठ राहते. काही गेयशा स्वतःच एखाद्याच्या प्रेमात पडतात. सर्वसामान्यपणे पंचविशी उलटल्यानंतर सर्वच गेयशा एखाद्या प्रियकराच्या आश्रयाखाली राहण्याचे पसंत करतात. पंचविशीनंतर त्यांच्या लावण्याचा बहर ओसरतो. अशा वेळी कुणाचा तरी आधार त्यांना हवा असतो आणि जपानमध्ये पत्नीशिवाय आपल्याला एखादी मैत्रीण असणे यात वावगे असे कुणालाच कधी वाटत नसल्यामुळे प्रत्येक गेयशेला एखादा प्रियकर सापडतही असतो.

गेयशांच्या एकनिष्ठ प्रेमाच्या किती तरी गोष्टी मी ऐकल्या आहेत.

आज जपानमध्ये गेयशेला एक मोठी प्रतिस्पर्धी निर्माण झाली आहे– ती म्हणजे पेयगृहातील ‘ होस्टेस ’ ही होय. तिने गेयशेचे संभाषणचातुर्य उचलले आहे. तिचे हास्य–लास्यही आपलेसे केले आहे. त्यामुळे ती गिऱ्हाइकाला मानसिक सुखही देते आणि शिवाय शारीरिक सुखही देते. पुन्हा तिची फी सामान्य आवाक्यातली असते.

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानमध्ये या ‘ होस्टेसी ’ पुष्कळ वाढल्या. त्यामुळे गेयशांकडे आज फक्त अभिजात रसिक व फार श्रीमंत तेवढेच लोक जातात. काही लोकांना याची आता चिंता वाटू लागली आहे. जपानी समाजामध्ये ‘ होस्टेस ’चे प्रस्थ माजले तर गेयशांची संस्था वीस-पंचवीस वर्षांच्या आत इतिहासजमा होईल आणि तसे झाले तर जपानच्या सांस्कृतिक जीवनामध्ये एक पोकळी निर्माण होईल असे ते म्हणू लागले आहेत.

हे ‘ संकट ’ ते कसे टाळतील, मला ठाऊक नाही. पण मी एक पाहिले आहे; जपानच्या सांस्कृतिक जीवनावर गेयशांचा ठसा सामुराईंच्या ठशासारखाच खोल उमटलेला आहे. प्रत्येक जपान्याचे जीवन या दोन धाग्यांनी विणले गेले आहे. सामुराईंचा वर्ग आज इतिहासजमा झाला असेल पण सामुराईंचा आदर्श मात्र साऱ्या जपानने उचलला आहे. त्यांच्या हाडामांसात तो खिळला आहे. जपानी माणसामध्ये जी ‘ आर्य ’ वृत्ती दिसून येते ती याचमुळे होय. तो सामुराई संस्कार होय. उद्या समजा, गेयशादेखील सामुराईप्रमाणे इतिहासजमा झाल्या तरी जपानच्या भावजीवनावरील त्याचा ठसा नष्ट होण्याची मला भीती नाही. जोपर्यंत जपानी हृदयामध्ये आतिथ्यशीलता कायम असेल, सौंदर्य-रसिकता शाबूत असेल तोपर्यंत जपानी माणसाला गेयशांची विस्मृती पडणे शक्य नाही. गेयशा जर इतिहासजमा झाल्या तर त्या जपानवर आपला आजच्याहून अधिक प्रभाव पाडू लागतील. मला तरी याविषयी मुळीच शंका नाही.



# : २५ : 'बायको असावी जपानी'

ज्या रात्री गेयशांचे दर्शन घडले होते त्या रात्री पहाटेपर्यंत नरेश मंत्रींच्या व माझ्या गप्पागोष्टी चालल्या. गोष्टींवरून गोष्टी निघाल्या आणि मला एक शोध लागला, तो हा की, जपानमध्ये प्रेमविवाह फारसे होतच नाहीत आणि जे थोडे-बहुत आतापर्यंत झाले त्यांचा अनुभव फारसा उत्साहवर्धक नाही.

ही माहिती खरोखरच बुचकळ्यात पाडणारी होती.

जपान हा एक अतिशय पुढारलेला देश आहे. आशिया खंडातल्या कुठल्याही देशापेक्षा अधिक पुढारलेला आहे. येथे युवक-युवतींना स्वातंत्र्य भरपूर आहे. युवक-युवती येथे एकत्र शिक्षण घेतात. एकत्र काम करतात, एकत्र हिंडतात, गातात, नाचतात, बागडतात! येथे प्रेमविवाह सर्रास व्हायला पाहिजे होते. तरीही म्हणे येथे प्रेमविवाह फारसे होत नाहीत!

मग येथे विवाह कसे होतात?

मुख्य म्हणजे, येथे विवाहाचे आद्य प्रयोजन वंशपरंपरा पुढे चालवणे एवढेच असते. प्रणयाला माणसाच्या जीवनात स्थान अवश्य आहे; पण जीवन म्हणजे काही

केवळ प्रणय नव्हे. जीवन हे अनेक कर्तव्यांचे जाळे आहे. या कर्तव्यांतले एक कर्तव्य पितरांचे ऋण फेडणे हे आहे. पितरांचे ऋण फेडायला आपण त्यांची परंपरा पुढे चालविली पाहिजे. ज्या कुटुंबात आपण जन्म घेतलेला असतो त्या कुटुंबाचे नाव पुढे चालविले पाहिजे. त्यासाठी आपल्याला मुले झाली पाहिजेत. तेवढ्यासाठीच विवाह करायचा.

विवाहाचे हे प्रयोजन लक्षात घेऊनच येथे पत्नीची निवड केली जाते. गृहिणीची कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडू शकणारी पत्नीच माणसाने निवडली पाहिजे. असली महत्त्वाची निवड माणूस तारुण्यात कशी करू शकेल? तारुण्य हा माणसाच्या जीवनातला असा एक काळ असतो की, ज्या वेळी तो अधिकात अधिक मूढ असतो. या काळात माणूस स्वतंत्र बुद्धीने निवड करताना चुकू शकतो. त्या मानाने आई-बाप अधिक अनुभवी असतात. ते चांगली निवड करू शकतात. डोळसपणे विचार करू शकतात. त्यांच्या अनुभवावर विश्वास ठेवणे हेच शहाणपणाचे आहे.

मुलगा जेव्हा विवाह-योग्य होतो, तेव्हा त्याचे आई-बाप त्याला अनुरूप अशी मुलगी शोधायला लागतात. युवक–युवतीचे विवाह जुळवून देणारे काही मध्यस्थ समाजामध्ये असतात. त्यांची अशा वेळी मदत घेतली जाते. मुलीची निवड करताना तिच्या कुटुंबाचे संस्कार, सामाजिक दर्जा वगैरे साऱ्या गोष्टी विचारात घेतल्या जातात. एवढेच नव्हे तर लग्नापूर्वी वधूवरांची कुंडली जुळते की नाही हेही पाहिले जाते.

जपानचे स्वतःचे असे एक फल-ज्योतिष-शास्त्र आहे. भारतीय ज्योतिष-शास्त्रात बारा महिन्यांचे एक राशिचक्र मानले गेले आहे, तर जपानी ज्योतिष-शास्त्रात बारा वर्षांचे एक राशिचक्र मानले गेले आहे. या शास्त्रानुसार प्रत्येक वर्ष एका प्राण्याच्या नावाने ओळखले जाते. दंतकथा अशी आहे की, एकदा म्हणे एका वर्षारंभी भगवान बुद्धांनी जगातील सर्व प्राण्यांना आपल्यापाशी बोलावून घेतले आणि त्यांना सांगितले की, जे प्राणी येतील त्या सर्वांचा बहुमान केला जाईल. प्रत्येकाला एक एक वर्ष बहाल केले जाईल आणि ते ते वर्ष त्या त्या प्राण्याच्या नावाने ओळखले जाईल. त्याप्रमाणे बारा प्राणी आले. सर्वप्रथम उंदीर आला; नंतर बैल आला; वाघ आला; ससा आला; 'ड्रॅगन' आला; साप आला, घोडा, बोकड, माकड, कोंबडा, कुत्रा हे आले आणि सर्वांत शेवटी वराह आला. प्रत्येकाला भगवानांनी एक एक वर्ष बहाल केले. तेव्हापासून म्हणे त्या त्या वर्षावर त्या त्या प्राण्याचा ठसा उमटला. आजदेखील जपानी लोकांची समजूत अशी आहे की, माणूस ज्या वर्षी जन्माला येतो त्या वर्षाच्या प्राण्याचा संस्कार त्याच्या जीवनावर पडलेला असतो. त्याच्यावरून त्याची शक्ती, अशक्ती, त्याची स्वभाववैशिष्ट्ये वगैरे सर्व गोष्टींचा अंदाज बांधता येतो आणि त्याप्रमाणे त्याचे भविष्यही वर्तविता येते.

या शास्त्रानुसार वधूवरांची कुंडली तयार केली जाते आणि विवाहाच्या वेळी ती जुळते की नाही हे पाहिले जाते. त्याच्यानंतर वधूपरीक्षा होते; नंतर साखरपुडा. साखरपुड्यानंतरच वधूवरांच्या प्रेमजीवनाला सुरुवात होते.

प्रेम असल्याशिवाय विवाह होऊ शकत नाही, या विचाराला जपानने व्यवहारात विशेष थारा दिलेला दिसत नाही. जपानच्या साहित्यात प्रणय-कथा पुष्कळ आहेत हे खरे आहे. त्यांची सर्वांत जुनी कादंबरी जी 'गेंजी मोनोगातारी' ती प्रणय-कथांची एक गाथाच आहे. (विश्वसाहित्यातली ही सर्वांत पहिली कादंबरी असावी). तरीही प्रणयाची योग्य ती कदर करूनदेखील प्रणय निराळा व वैवाहिक प्रेम निराळे असे जपानी लोकांनी मानलेले दिसते. जिला कालपर्यंत आपण पाहिलेदेखील नव्हते तिच्याशी उभे आयुष्य कसे घालवायचे याची चिंता जपानी माणूस कधी करीत नाही. लग्नानंतर प्रेम सुरू होऊ शकते; एवढेच नव्हे तर ते उत्तरोत्तर गाढही होऊ शकते, असा त्यांचा आपल्यासारखाच अनुभव आहे.

विवाहाकडे पाहण्याचा जपानी माणसाचा दृष्टिकोण हा अशा प्रकारचा असल्यामुळे आपली बायको सुंदर असलीच पाहिजे असा आग्रह तो विशेष धरीत नाही आणि जपानी स्त्रीदेखील कृत्रिमपणे आपले सौंदर्य वाढविण्याची खटपट करीत नाही. ती नीटनेटकी राहते. आधुनिक प्रसाधनांचाही थोडाबहुत उपयोग करीत असते; पण ती आपल्या सौंदर्याचा खोटा आभास मात्र कधी निर्माण होऊ देत नाही.

तोक्योला एके दिवशी एक प्रोफेसर मला सहज म्हणाला की, दुसऱ्या महायुद्धा-नंतरच्या काळात जपानमध्ये दोन गोष्टी जास्त बळकट बनल्या आहेत. स्त्रिया व पायमोजे "Stockings and women are stronger since the war."

त्यानंतरही मी हा अभिप्राय अनेकांच्या तोंडून ऐकला. त्यावरून हा फरक जपानी लोकांना प्रकर्षाने जाणवत असावा असे दिसले. पायमोजांमधला फरक मी सहज समजू शकलो. पूर्वीच्या मानाने आजचे नायलॉनचे पायमोजे निश्चितपणे टणक आहेत; पण स्त्रियांच्या बाबतीत जो काही बदल घडला असेल तो, ज्यांनी महायुद्धापूर्वीच्या जपानी स्त्रिया बघितल्या असतील त्यांनाच विशेष जाणवत असावा. मला तर त्यांच्या-कडे पाहताना भारतीय स्त्रियाच आठवायच्या. अत्यंत पुढारलेल्या भारतीय स्त्रियांपेक्षा जपानी स्त्रिया किती तरी पटींनी जास्त स्वतंत्र आहेत असे मला वाटायचे; पण त्या स्वतंत्र जरी असल्या तरी पुरुषांच्या 'समान' मात्र अजून होऊ शकलेल्या नाहीत. कायद्याने समानतेचे अधिकार त्यांना लाभलेले आहेत; पण व्यवहारात त्या स्वतःला पुरुषांपेक्षा अजून कमीच मानतात. शिक्षणाच्या क्षेत्रात ठराविक टप्पा गाठल्यावर त्या

शिक्षणदेखील सोडून देतात. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात स्त्रियांची संख्या एकंदरीत कमीच. प्राध्यापिका वगैरे व्हायचे असेल तरच त्या उच्च शिक्षण घ्यायच्या; अन्यथा नाही. तशा उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रिया जपानमध्ये नाहीत असे नाही. अणु-विद्येत तर म्हणे दोन स्त्रिया अग्रगण्य आहेत. तरीही एकंदरीत उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्या येथे कमीच आहे असे म्हटले पाहिजे. राजकारणामध्ये काही स्त्रिया पुढे आल्या; पण त्या यशस्वी न झाल्यामुळे या क्षेत्रातही त्यांना विशेष स्थान असलेले मला आढळले नाही.

जपान इतर सर्व क्षेत्रांत आशिया खंडातल्या इतर देशांहून पुढारलेला देश असेल; परंतु स्त्रियांच्या बाबतीतला त्याचा दृष्टिकोण आशिया खंडाच्या पाचवीला पुजलेल्या उच्च-नीचतेच्या संस्कारापासून अजूनही मुक्त झालेला नाही. युरोपच्या आधुनिक संस्कृतीचे अनेक आदर्श जपानने आत्मसात केले असतील, पण स्त्री-दाक्षिण्याच्या बाबतीतला आधुनिक आदर्श अजूनही त्याच्या अंगवळणी पडलेला दिसत नाही. आज तरुण मुली नोकऱ्या करून पैसे कमावतात; परंतु शेवटी आपल्याला चूल व मूल या दोनच गोष्टी सांभाळावयाच्या आहेत हे त्या कधी विसरत नाहीत. एखाद्या दिवशी तुम्ही ट्यूब-रेल्वेने फिरायला जा. डब्यात जर गर्दी असली आणि त्यात बसायची एखादी जागा रिकामी झाली तर ती पुरुष घेईल. स्त्री ती जागा घ्यायला पुढे जाणार नाही. आणि तिला ती जागा घ्यायलाही कोणी सांगणार नाही. फार कशाला, एखादे वेळी स्त्री उठून उभी राहील आणि पुरुषाला बसायला जागा देईल.

सामाजिक दृष्टीने पाहता जपानी स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या खालचा आहे असे म्हणावे लागते आणि जपानी पुरुष व स्त्रिया उभयतांना यात अस्वाभाविक असे काही वाटत नाही असे दिसते.

पत्नी म्हणून मात्र जपानी स्त्री निःसंशय आदर्शरूप आहे. या नात्याने जपानला तिचा अभिमानही आहे. जपानी भाषेत एक म्हण आहे की, 'माणसाला अमेरिकन पद्धतीचे घर, चिनी पद्धतीचे जेवण व जपानी पत्नी या तीन गोष्टी मिळाल्या तर त्याच्यासारखा भाग्यवान जगात दुसरा कोणी नाही.' ज्या वेळी जपानमध्ये ही म्हण रूढ झाली त्या वेळी कदाचित विजेच्या चुली वगैरे तेथे फारशा रूढ झाल्या नसाव्यात. त्या वेळी अमेरिकन पद्धतीच्या घराचे त्यांना आकर्षण वाटणे स्वाभाविक होते. आता जपानने भौतिक जीवनात इतकी प्रगती केली आहे की, कदाचित अमेरिकन लोकांनाच त्यांचा या बाबतीत हेवा वाटण्याचा संभव अधिक. तेवढ्यापुरता या म्हणीतला पहिला भाग आज जुना झाला आहे. पण त्यातही पुन्हा थोडे संशोधन करून जपानने ही म्हण जिवंत ठेवली आहे. नव्या संशोधित म्हणीत अमेरिकन पद्धतीच्या घराऐवजी अमेरिकन बँक अकाउन्टचा उल्लेख केला जातो.


चिनी पद्धतीचे जेवण निःसंशय रुचकर असते. जगाचा प्रवास करून आलेल्या अनेक लोकांच्या तोंडून मी फ्रेंच पद्धतीच्या जेवणाची तारीफ पुष्कळ ऐकली आहे; पण त्यांनी चिनी जेवणाचा अनुभव घेतला नसावा. चिनी पद्धतीच्या भोजनाची चव ज्याने एकदा चाखली तो ती विसरणे शक्यच नाही, इतके ते अप्रतिम असते.

पण जपानी पत्नी? सहनशीलता, त्याग, निष्ठा वगैरे आदर्शांच्या बाबतीत तिच्याशी तुलना करता येईल अशी माझ्या माहितीत तरी एकच स्त्री आहे. ती म्हणजे हिन्दू-पत्नी ही होय. पण हिन्दू पत्नीदेखील आपल्या नवऱ्याला गेयशेच्या घरी जाऊ देईल की काय याची मला शंकाच आहे आणि समजा, नवरा अशा ठिकाणी जाऊ लागला तर ती आपल्या नशिबाच्या नावाने रडत बसल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे.

याच्या उलट जपानी पत्नी – तिला जरी दुःख झाले तरी – नवरा गेयशेकडे जाऊ इच्छितो असे वाटल्यास ती चांगले उंची कपडे काढून देईल; एवढेच नव्हे तर अनुमति-सूचक स्मित करून त्याला निरोपही देईल. जपानी परंपरेतच हा संस्कार आहे की, माणसाच्या जीवनात – विशेषतः पुरुषांच्या जीवनात – चैनीलाही लहानसे का असेना पण एक स्थान आहे. आणि त्यात ढवळाढवळ करायची नसते. जोपर्यंत तिच्या क्षेत्रात नवऱ्याची चैन ढवळाढवळ करीत नाही तोपर्यंत ती कुरकुरही करणार नाही. विवाहामुळे ती केवळ नवऱ्याशी नव्हे तर त्याच्या कुटुंबाशी संलग्न झाली आहे, अशी तिची दृढ समजूत असते. या कुटुंबाच्या क्षेत्रात जोपर्यंत ती सुरक्षित आहे तोपर्यंत ती कसलीच तक्रार करणार नाही.

तिच्या या समजुतीमुळे जपानमध्ये घटस्फोट – ते घेणे अत्यंत सुलभ असून-देखील – फारसे घेतले जात नाहीत.

कोणत्याच प्रकारची कुरबूर केल्याशिवाय गृहिणीची कर्तव्ये आनंदाने पार पाडण्याच्या बाबतीत जपानी पत्नीचा हात धरू शकणारी स्त्री कदाचित जगात दुसरी नसावी. सहनशीलतेची जणू ती मूर्ती आहे. सहनशीलता हा तिचा स्वभावधर्मच आहे. हा तिचा स्वभावधर्म इतका पराकोटीला गेलेला आहे की म्हणे, प्रसूतीच्या वेळीदेखील ती कधी कण्हत नाही.



# : २६ : भव्यतेचे माहेर – निक्को

तोक्योहून निक्को रेल्वेने केवळ दोन तासांच्या अंतरावर आहे. वाटेत बराच वेळपर्यंत खास बघण्याजोगे असे काही दिसत नाही. एकाच पद्धतीची लहान-लहान घरे व छोटी-छोटी शेते पाहून डोळे थोडेबहुत थकतात.

पण जपानी निसर्गाचे वैशिष्ट्यच हे आहे की, काही नाही असे वाटू लागते न लागते तोच जादूची कांडी फिरावी तशी अचानक एक नवी सुंदर सृष्टी आपल्या डोळ्यांसमोर प्रगट होते.

निक्कोला जाताना वाटेत जपानी लेखक जिरो ओसारागी यांची 'होम कमिंग' ही कादंबरी वाचण्यात मी दंग झालो होतो. इतक्यात जादू झाल्यागत टेकड्यांचा एक सुंदर गुच्छ एकाएकी समोर प्रगट झाला. मी पुस्तक बंद केले. हां हां म्हणता शेकडो गगनभेदी वृक्षांच्या एका उपवनातून आम्ही जाऊ लागलो.

थोड्या वेळाने स्टेशन आले. बाहेर आल्याबरोबर एका विशाल खडकावर उभा असलेल्या एका पुतळ्याने आमचे स्वागत केले. हा पुतळा शोदो–शोनीन नावाच्या

आठव्या शतकातल्या एका बौद्ध साधूचा होता. निक्कोच्या निसर्गाने प्रभावित होऊन तेथे मंदिरे बांधणारा हा पहिलावहिला मानव.

आम्ही टॅक्स्या करून पुढे गेलो. डाव्या बाजूला वळताच एक छोटासा लाल रंगी सुंदर पूल दिसला. दंतकथा अशी आहे की, साधू शोदो–शोनीन जेव्हा येथे प्रथमच आला तेव्हा त्याला समोर काही पंचरंगी ढग दिसले. त्या ढगांजवळ जाण्याची त्याला अनिवार इच्छा झाली. पण इथली दाइया नदी आडवी आली. ती त्याला पुढे जाऊ देईना. त्याने तेथेच प्रार्थना सुरू केली. लगेच पैलतीरावरील पाला-पाचोळयातून सळसळत दोन साप निघाले व त्यांनी नदीवर आपल्या शरीराचा पूल बनवून साधूला वाट करून दिली. त्या पुलावरून साधू पुढे गेला. आजही इथे पूल असून त्याचे नाव मिहाशी आहे. तो पवित्र मानला जातो. या पुलावरून कुणाला जाऊ देत नाहीत.

आम्ही मिहाशीला प्रणाम करून पुढे गेलो. आमची वाट पुलाजवळील एका राजवन-पथावरून जात होती. दुतर्फा सुगी नावाचे महावृक्ष अगदी आकाशाला जाऊन भिडले होते. पुढे चढण लागली. आम्ही जसजसे चढण चढू लागलो तसतसे जणू स्वप्नसृष्टीत प्रवेश करीत आहोत असे वाटायला लागले. जपानी निसर्गाचे दुसरे एक वैशिष्ट्य येथे उत्कटतेने जाणवले – पुढे काय पाहायला मिळेल याचा तो आपल्याला अगोदर पत्ता लागू देत नसतो. आपण एक दृश्य पाहून पुढच्या दृश्याची कल्पना करावी; पण पुढचे दृश्य कल्पनातीत असे वेगळे दिसावे. मग आपण पाहिलेल्या दोन्ही दृश्यांची तुलना करायला बसावे तो समोर तिसरे दृश्य पहिल्या दोन्ही दृश्यांहून अगदीच निराळया प्रकारचे दिसावे. आम्ही हा अनुभव घेत घेत पुढे जाऊ लागलो. अक्षरशः शेकडो वळणे आम्ही घेतली. प्रत्येक वळणावर विशाल सृष्टी विशालतर होत जाऊ लागली. भव्यतेलादेखील भव्य वाटावी अशी एकामागून एक दृश्ये येऊ लागली. मार्गही सुंदर होता. इतका सुंदर मार्ग मी जपानमध्येदेखील अजून बघितला नव्हता. आजूबाजूला गगनभेदी सुगी वृक्ष होते. अन्य प्रकारची झाडे-झुडपेही होती. दूर-दूरपर्यंत हिरवे-हिरवे डोंगर दिसत होते.

या संसृष्टीत सुगीवृक्ष माझे लक्ष विशेषेकरून आकर्षून घेत होता. मासात्सुना मात्सुदाइरा नावाच्या एका सरदाराच्या डोक्यात म्हणे प्रथम या वृक्षांची येथे लागवड करण्याची कल्पना स्फुरली. सतत वीस वर्षांच्या प्रयत्नानंतर सुगीचे त्याने वीस-पंचवीस हजार वृक्ष निर्माण केले. पोटच्या पोराची काळजी वाहावी इतक्या वात्सल्याने त्यांची निगा ठेवली. एखादा वृक्ष तुफान वा इतर काही कारणाने नष्ट झाला तर लगेच तेथे तो दुसरा लावायचा. आजदेखील या वृक्षांची अशीच काळजी घेतली जाते. बहुतेक सर्व वृक्ष तीनशे वर्षांच्या वयाचे आहेत.

आम्ही या महावृक्षांना अभिवादन करीत जसजसे वर जाऊ लागलो, तसतसे जणू इन्द्रधनुष्यावर आरूढ होत आहोत असे वाटायला लागले. साध्या डोळ्यांनी जे मी पाहतो ते खरोखरीचे आहे याची प्रतीती दृढ होण्यापूर्वीच आम्ही आकेची-दाइरा नावाच्या एका नाक्यावर येऊन पोहोचलो. उत्तर-पश्चिमेला नान्ताई पर्वताचा कडा दिसत होता. त्याच्या पायथ्याशी निळे चुझेंजी सरोवर होते. सरोवराच्या पैलतीरावर शिरानेची पर्वतशृंखला होती आणि सरोवराच्या अलीकडे जरा खालच्या बाजूला जपानचा प्रसिद्ध कॅगोनचा धबधबा सभोवतालचे रोमहर्षक काव्य पिऊन मस्तीत आल्यागत भैरव-झेप घेऊन खाली कोसळत होता. त्याचा हा उन्माद पाहून जवळच्या काही खडकाळ कड्यांनाही पाझर फुटले होते. उजव्या बाजूच्या छोट्या धबधब्याकडे पाहिले तेव्हा तिथल्या वृक्षराजींनेही एक दूधसागर लपवून ठेवला आहे असे मला वाटले.

दृष्टी सहज उत्तर-पूर्व दिशा न्याहाळू लागली. आम्ही ज्या राजवन पथावरून वर चढलो होतो तो नागमोडी रस्ता तेथे दिसत होता. हिमालयात गंगोत्रीच्या बाजूला ज्या ऊर्जस्वितेचा साक्षात्कार आपल्याला होतो तशा प्रकारचेच हे दृश्य होते. अलकेश्वराच्या मनातदेखील ईर्षा उत्पन्न व्हावी अशा प्रकारचे इथले वातावरण वाटले.

अर्धा-एक तास विस्मय-मुग्ध हृदयाने आम्ही हे दृश्य पिऊन घेतले आणि जो आनंद अनुभवला तो कसा पचवावा याची विवंचना करीत पुन्हा उन्नतीचा मार्ग क्रमू लागलो.

थोड्या वेळाने ओहिरा नावाच्या ठिकाणी पोहोचलो. येथे कोणते दृश्य पाहावयास मिळेल याची कल्पना नव्हती. आम्ही आकेची-दाइराहून उंच ठिकाणी आलो होतो. त्यामुळे तिथल्या भव्य देखाव्यापेक्षा भव्यतर देखावा येथे पाहावयास मिळेल असे वाटले. मी सभोवती उत्कंठेने पाहिले. समोर रेल्वे स्टेशनासारखी एक छोटीशी इमारत दिसली. इशिबासीसान झपाझप त्या इमारतीचे कुंपण ओलांडून आत गेले. आम्हीही त्यांच्या मागोमाग गेलो. तेथे एक मोठी ‘ लिफ्ट ’ होती. तीस-पस्तीस तरुण-तरुणींच्या घोळक्याबरोबर आम्हीही त्या लिफ्टमध्ये शिरलो. दुसऱ्याच क्षणी तिचे दरवाजे बंद झाले व ती एका विवरातून डोंगराच्या पोटात उतरू लागली. शंभर एक मीटर उतरल्या-वर दरवाजा उघडला. आम्ही एका बोगद्याच्या तोंडाशी पोहोचलो होतो. लिफ्टच्या बाहेर येताच धब-धब-धब-धब धबधब्याचा आवाज कानी पडला. डोंगर उभा पोखरून पुन्हा येथे एक आडवे बीळ काढून धबधबा पाहण्याची जागा शोधून काढणाऱ्या या लोकांच्या कल्पकतेचे कौतुक करीत बाहेर कड्यावर आलो आणि—

उजव्या बाजूच्या एका प्रचंड शिळेवरून तीरासारखा सरळ खाली झेप घेत असलेल्या कॅगोनच्या धबधब्याचे दर्शन घडले.

काय त्याचा उन्माद ! हजारो धुमकेतू एकामागोमाग जोराने खालच्या दरीत कोसळत आहेत असेच वाटत होते. पाण्याचा जथ्था व त्याचा वेग पाहून माझी छाती धडधडू लागली. पाणी जेव्हा खाली पडते तेव्हा त्याचे अक्षरशः पीठ होते. त्या वेळी त्याची जी गर्जना होते त्याने कानठळ्या बसतात.

निकोला चुझेंजी नावाचे एक विस्तृत सरोवर आहे. जवळ जवळ बारा चौरस किलोमीटरचा त्याचा विस्तार आहे. या सरोवरात ओजिरी नावाची एक नदी उगम पावते. तिच्या उगमाची गोष्ट मजेदार आहे. चुझेंजी सरोवरापलीकडे आणखी एक सरोवर आहे. त्या सरोवराच्या पाण्याला म्हणे एकदा आनंदाचे भरते आले आणि ते अधीर होऊन चुझेंजीला येऊन मिळाले. चुझजीने विचार केला, हे सारे पाणी आपण आपल्या पोटात समावून घेतले तर आपल्याला कुल-मर्यादा सोडावी लागेल. त्याच्याऐवजी आपणच आपले थोडे पाणी दान करून का टाकू नये ? त्याने नव्या पाण्याचा स्वीकार केला आणि जुन्या पाण्याला एका कड्यावरून खाली सोडले. या पाण्याने जेव्हा सरळ एका झेपीत उडी घेण्याचा विचार केला तेव्हा त्याचा एक सुंदर धबधबा बनला. तोच हा आपला कॅगोनचा धबधबा. तेव्हापासून तो एकसारखा येथे पडत असतो. त्याची उंची जवळ जवळ शंभर मीटर आहे आणि पाण्याच्या जथ्याची रुंदी सात-आठ मीटर आहे.

मी अनिमिष नेत्रांनी त्याच्याकडे पाहू लागलो. तेव्हा धबधब्याच्या खालच्या कड्यावरून असंख्य हिऱ्यांचे हार जणू खाली उतरावेत तशा दहा-बारा छोट्या प्रपात-धारा मला येथे दिसल्या.

निसर्गाची ही रुद्रवीणा ऐकून माझे हृदय तिच्याशी एक राग, एक ताल व्हायला तळमळू लागले. या आनंदात झोकून द्यावे, वाहून जावे, नष्ट व्हावे असे मला वाटायला लागले. खरोखर मला प्रमत्त करून सोडणारे ते दृश्य होते.

काही वर्षांपूर्वी म्हणे येथे एक इसम आला. तो मोठा पंडित होता. जीवनाचा अर्थ शोधण्यासाठी त्याने तत्त्वज्ञानाचे सारे ग्रंथ पालथे घातले होते. इतकेही करून त्याला जेव्हा तो अर्थ गवसला नाही तेव्हा निराश होऊन त्याने येथे येऊन आत्महत्या केली. जगाचा निरोप घेण्यापूर्वी त्याने एक चिठ्ठी लिहून ती इथल्या एका झाडाच्या बुंध्याला चिकटवली. त्या चिठ्ठीत त्याने लिहिले होते– " मला तुम्हां सर्वांची कीव येते. जीवनाला अर्थ आहे की नाही, असला तर तो काय आहे हे समजून न घेता तुम्ही कसे जगता, मला समजत नाही. हा अर्थ समजल्याशिवाय जगणे मला अशक्य आहे. जगातले सारे धर्म, तत्त्वज्ञानातले सारे संप्रदाय या सर्वांना मी हा प्रश्न विचारला. सर्वांनी मला निराश केले. "

तेव्हापासून म्हणे येथे, आत्महत्या कित्येकजणांनी येऊन केल्या! पंडितच तो! जीवनाचा अर्थ शोधायला गेला पुस्तकांमध्ये; जीवनामध्ये नव्हे. जीवन जरा त्याने नीट निरखून पाहिले असते किंवा जीवनाला अर्थ नाही अशा निर्णयावर येण्याची घाई न करता तो येथे या पाण्याच्या जथ्याकडे शांत चित्ताने बघत राहिला असता तर त्याला जे पुस्तकात सापडले नाही ते येथे गवसले असते आणि इतरांनाही विभवतृष्णेपासून वाचविले असते. हे पाणी अगदी पीठ होईपर्यंत एकसारखे येथे पडत असते. इतकेही करून, जरा पुढे गेल्यावर अगदी शान्त वृत्तीने खळखळ वाहात जाते. कोणत्याच प्रकारची निराशा किंवा कटुता त्याच्या चेहऱ्यावर दिसत नाही.

आपल्या हृदयाला जेव्हा दिव्यत्वाचा स्पर्श होतो तेव्हा आपल्याला काही तरी समजल्यासारखे वाटत असते. पण ते शब्दांमार्फत व्यक्त करायला जाता शब्द लुळे पडतात असा आपल्याला अनुभव येत असतो. मला वाटते, श्रेष्ठ काव्याचा उगम या अनुभूतीत आहे. श्रेष्ठ कलेचाही उगम याच अनुभूतीत असावा. उपनिषदातल्या एका ऋषीला असाच अनुभव आला. तर्कांच्या द्वारा ब्रह्माचे चिंतन करता करता त्याला जे समजले नाही ते हृदयामार्फत गवसले. पण त्याला त्या वेळचा त्याचा आनंद शब्दांमार्फत व्यक्त करता आला नाही, तेव्हा तो हाऽऊ करून नाचायला लागला. कबिराने या अनुभूतीला 'अकथ कथा' म्हटले आहे, जी 'कहते कही न जायी.'

निक्कोच्या ऊर्जस्वितेने प्रभावित होऊन साधू शोदो शोनीन जेव्हा प्रथमच येथे आला तेव्हा त्यालादेखील असाच अनुभव आला असला पाहिजे. दाइया नदी पार करून तो पंचरंगी ढगांच्या दिशेने एकसारखा चढत चढत कॅगोनच्या प्रपाताजवळ पोहोचला असला पाहिजे. उन्नतिक्रमामुळे हृदयात भरलेली भक्तीच जणू या प्रपाताच्या रूपाने ओसंडून पडत आहे असे त्याला वाटले असले पाहिजे. त्या दर्शनाने पावन होऊन तो पुन्हा चढायला लागला. कितीही चढलो तरी उन्नतीला अंतच नाही असे त्याला वाटले असावे व आणखीन चढून चढून वर गेल्यावर त्याला हा अनुभवानंद चुझेंजी सरोवराच्या विस्तारात लीन झाला असावा. इतके वर चढून आलो. वरच्या ढगांनादेखील खाली ठेवून वर चढलो, भव्य, भव्यतर, भव्यतम सृष्टीचे दर्शन घेऊन धन्य धन्य झालो. जन्मांतर झाल्यासारखे वाटले. तरीही सरोवराच्या चहू बाजूंस उन्नत टेकड्या आपल्या हजरच! त्याचे भक्त-हृदय या अनुभवाने विरघळले असावे. तो जवळच्याच एका महावृक्षावर आपले हृदय ओतू लागला. हां हां म्हणता त्या वृक्षाच्या बुंध्यातून 'क्वान्नोन'ची—अवलोकितेश्वराची — एक मूर्ती साकार होऊन निघाली आणि ती साधूला आशीर्वाद द्यायला तेथे

उभी राहिली. साधू शोदो-शोनीनच्या भक्तीने घेतलेले हे सृजनात्मक रूप पाहून आकाशातल्या देवांना आनंदाचे भरते आले आणि ते खाली चुझेंजी सरोवराच्या उतागाहामा किनाऱ्यावर म्हणजे 'गाणाऱ्या' किनाऱ्यावर उतरून गाऊ लागले.

शोदो शोनीनला ही जी प्रेरणा येथे झाली तिने पुढे जपानच्या किती तरी साधु-संतांना, राजपुत्रांना, भाविकांना व सृजनशील कलाकारांना प्रभावित केले, आणि या सर्वांनी मिळून निक्कोच्या प्राकृतिक सौंदर्यात भर टाकण्याच्या विनम्र प्रेरणेने येथे उत्तमोत्तम मंदिरे व समाध्या बांधून काढल्या. आज निक्कोला गेलो म्हणजे आपल्याला तेथे दोन वस्तूंचे प्रामुख्याने दर्शन होते. एक– नद्या, झरे, सरोवरे, प्रपात, पर्वत व वृक्षराजी यांचे संमीलित भव्य-दर्शन, व दुसरे– जपानी वास्तुकलेच्या साऱ्या वळशा-वेलांट्यांचे, सोनेरी लाखेच्या व लाकडावरच्या कारागिरीचे– जपानच्या सर्वोत्कृष्ट कला-कौशल्याचे दर्शन. तीनशे वर्षे वयाच्या वयोवृद्ध महावृक्षांच्या उद्यानात मानवी कलेचे जणू एक प्रदर्शन भरल्यासारखे वाटते. एकदा आपण त्या चक्रव्यूहाच्या आत शिरलो म्हणजे तेथून बाहेर येईपर्यंत आपले डोळे तृप्त होऊन अक्षरशः धापा टाकायला लागतात.

आम्ही कॅगोनचा धबधबा पाहून धन्य धन्य झालो, आणि पुन्हा पर्वतांना वळसे घालून वरच्या चुझेंजी सरोवराजवळ पोहोचलो. सरोवराच्या उतागाहामा किनाऱ्यावरून त्याच्या विस्ताराची व त्याला मर्यादेत ठेवणाऱ्या नान्ताई पर्वताची शोभा न्याहाळली व तेथे जवळ असलेल्या शोदो-शोनीनच्या आद्य मंदिरामधल्या लाकडी अवलोकिश्वतेराच्या भव्य मूर्तीचे दर्शन घेऊन फुतारासान समाधी पाहावयास गेलो. तेथे आम्हांला एक अप्रतिम शिन्तोनृत्य पाहावयास मिळाले.

पुन्हा चुझेंजी सरोवराजवळ येऊन आम्ही खाली उतरलो आणि बौद्ध धर्मातल्या तेन्दाई संप्रदायाचे मुख्य व निक्कोतल्या मंदिरामधले सर्वांत प्रशस्त रिन्नोजी मंदिर बघितले. या मंदिराचे वास्तुशिल्पही म्हणे तेंदाई परंपरेतले आहे. पुजाऱ्यांच्या शांत नि गंभीर हालचाली, आतली कमालीची स्वच्छता, मंद प्रकाशयोजना आणि अप्रतिम पुष्परचना या साऱ्या गोष्टींमुळे मंदिरातले वातावरण विलक्षण गूढ झाले होते. मंदिराच्या मुख्य चौकात – सानबुत्सुदोमध्ये – सोनेरी लाखेचे आवरण असलेल्या तीन विराट लाकडी मूर्ती आहेत. त्यांतली मधली 'अमिदा' (अमिताभ) बुद्धाची असून तिच्या आजूबाजूच्या मूर्तींपैकी उजव्या बाजूची घोड्याचे मुख असलेल्या अवलोकितेश्वराची व डाव्या बाजूची सहस्रबाहू अवलोकितेश्वराची आहे.

मंदिराच्या मागच्या बाजूला सोरिन्तो नावाचा ब्राँझचा एक मीनार आहे. तो विश्वशान्तीचे प्रतीक मानला जातो. त्याच्या पोटात दहा-एक हजार हस्तलिखितांचा (अर्थात सूत्र-ग्रंथांचा) एक मोठा संग्रह आहे असे सांगतात.

येथून बाहेर पडल्यावर एक पाच मजली पॅगोडा दिसतो. वास्तुशिल्पांच्या दृष्टीने याचा वरचा मजला चिनी पद्धतीचा आहे व खालचे चारही मजले जपानी पद्धतीचे आहेत.

येथून आम्ही पुढे गेलो आणि नाना प्रकारच्या समाध्यांच्या चक्रव्यूहात सापडलो! किती समाध्या! हिशेबच नाही. आपण चालून चालून थकून जातो तरी समाध्या काही संपत नाहीत. यांतली मुख्य समाधी इयेमित्सू शोगूनची आहे. पण तिच्यापर्यंत पोहोचावयाला किती तरी प्रवेशद्वारांतून आपल्याला जावे लागते. प्रत्येक प्रवेशद्वाराला कारामॉन, याशामॉन, कोकामॉन, नितेनमॉन, यामेइमॉन अशी निरनिराळी नावे आहेत. यांतल्या काही प्रवेशद्वारांचे वास्तुशिल्प चिनी पद्धतीचे तर काहींचे अभिजात जपानी पद्धतीचे आहे. या प्रवेशद्वारांचे छप्परच बघण्याजोगे असते. ते इतके जाड, रुंद व उंच असते की, त्याला उभे राहायला सहा-सहा, आठ-आठ मजबूत खांबांचा आधार द्यावा लागतो. कलेचे सारे वैभव आपल्याला या प्रवेशद्वारांवरच पाहावयास मिळते.

आम्ही ओमोतेमॉन नावाच्या एका प्रवेशद्वारातून आत शिरलो आणि एका अतिशय सुंदर इमारतीजवळ आलो. हे एक पुस्तकालय आहे आणि त्यात सात-आठ हजार सूत्र-ग्रंथांचा एक मोठा संग्रह आहे. ' रिंझो ' हे या इमारतीचे नाव आहे.

या ' रिंझो 'जवळ एक तबेला होता. तेथे गांधीजींच्या सुप्रसिद्ध गुरुंचे – वाईट पाहू नये, वाईट बोलू नये, वाईट ऐकू नये– हा उपदेश देणाऱ्या त्या तीन वानरांचे – दर्शन घडले. हे चित्र मूळचे इथले.

येथेच ' नेमुरी नेको ' म्हणून एक मांजरीचे चित्र पाहिले. त्या तीन वानरांप्रमाणे ही डोळे झाकून पडलेली मांजरीसुद्धा जगप्रसिद्ध आहे.

आजूबाजूस शिल्पांत फुले, फुलपाखरे, पशुपक्षी आहेत. त्यांची गणती करणे शक्य नाही. या सर्वच कलाकृती जणू जिवंत होऊन आपल्याशी बोलायला लागतात.

यांतल्या योमेइमॉन प्रवेशद्वाराजवळ जेव्हा पोहोचलो तेव्हा माझे भान हरपले. कलेच्या दृष्टीने इतके वैभव-संपन्न प्रवेशद्वार जपानमध्ये तर नाहीच; जगात इतरत्रही कुठे नसावे. बारा खांबांचा आधार घेऊन ते उभे आहे. त्याच्या बारीकसारीक कला-कौशल्याकडे सकाळपासून संध्याकाळपर्यंत बघत राहा, तृप्ती कधी व्हायची नाही. पट्टीचे कलारसिक म्हणे येथे पोहोचल्याबरोबर खिळून राहतात. सूर्यास्त होत आला तरी त्यांचे पाऊल उचलत नाही. म्हणून याला ' सनसेट गेट ' असेही एक नाव पडले आहे.

पण याहूनही एक अधिक आकर्षक स्थळ मी लवकरच पाहिले. ते म्हणजे ' ताइयुईन समाधी ' होय. इयेमित्सु नावाच्या एका ' शोगून 'चे हे स्मारक आहे. संपूर्ण

स्मारक अंतर्बाह्य सुवर्ण मंदिरासारखे आहे. स्मारकाच्या आत गेलो म्हणजे आयनोमा नावाचा एक प्रशस्त हॉल लागतो. त्याच्यापुढे गेलो म्हणजे देव्हारा लागतो. यात ज्या वस्तू ठेवण्यात आल्या आहेत त्या अप्रतिम आहेत. कुठेही दृष्टी फिरवा, ती तेथे काही काळ खिळल्याशिवाय राहणार नाही. अतिशय नाजूक व अतिशय सुंदर कलाकौशल्य जेथे व्यक्त झालेले नाही असा एकदेखील कोपरा या समाधीच्या आत किंवा बाहेर सापडावयाचा नाही.

येथेच मी जपानची काही प्रख्यात चित्रे पाहिली. ती पाहून मी मनात म्हटले— यांचे एक-एक चित्र म्हणजे एक-एक काव्य आहे आणि यांचे काव्य तर मला नेहमीच एका एका चित्रासारखे वाटले आहे.

ते कसेही असो, जपानी कलाकौशल्याचे हे संग्रहालय पाहून माझ्या डोळयांचे पारणे फिटले. इतक्या कलाकृती एकाच ठिकाणी पाहावयाला आपल्याला एखाद्या 'म्यूझियम'मध्ये जावे लागेल. दिल्ली—आग्र्याला मोंगल सम्राटांच्या समाध्या किंवा त्यांचे राजवाडे पाहून जो अनुभव येतो तशाच प्रकारचा अनुभव मला येथे आला. सौंदर्यपानाचा मला कैफ चढला. डोळे तृप्त झाले. संध्याकाळ होत आली. वेळ संपत आली होती; पण वर्णने अजून संपले नव्हते. किती तरी राहून गेले होते. मी आता 'केक्को' ( संतुष्ट झालो )[१] असे म्हणणार होतो पण—

अचानक माझ्या डोक्यात विचारांचे एक काहूर माजले! माझ्यातला निसर्ग-प्रेमी मला विचारू लागला— जेथे निसर्गानेच एकाहून एक सरस अशी आश्चर्ये निर्माण केली आहेत तेथे मानवाला हे कलाविश्व निर्माण करण्याची बुद्धी का झाली? या बुद्धी-मागे निसर्गावर मात करण्याची वृत्ती तर नसेल? असल्यास ती त्यांना कितपत साधली आहे? आणि तिची प्रशंसा आपण कशी करायची?

जपानी लोक स्वभावतःच निसर्ग-प्रेमी आहेत. ज्यांच्या मनावर निसर्ग-पूजक शिन्तो-मताचा खोल संस्कार आहे त्या लोकांना येथे निसर्गावर मात करण्याची, त्याला चकित करून सोडण्याची बुद्धी झाली असे कसे म्हणता येईल? तशी त्यांना बुद्धी झाली असती तर खुद्द जपाननेच तिचा धिक्कार केला नसता काय? तो तर त्याने चुकून-देखील केलेला दिसत नाही. उलट, निक्को पाहून 'केक्को' म्हणून त्याने या कला-सृष्टीचा गौरवच केला आहे.

बरे, या लोकांत सौंदर्यबुद्धी नाही असे तरी कसे म्हणता येईल? सौंदर्यशास्त्राच्या


---

१. जपानी भाषेत एक म्हण आहे.– निक्को पाहिल्यावाचून 'केक्को' म्हणू नये.

पंडितांनी सौंदर्याभिरुचीच्या ज्या काही कसोट्या विशद केल्या आहेत त्यांतली एक चारुता ही आहे. अलंकाराचे मोकाट प्रदर्शन हे या पंडितांनी हीन अभिरुचीचे लक्षण मानले आहे; पण या बाबतीत जपानी लोकांना काही सांगायला जाणे म्हणजे मर्यादेचे अतिक्रमण आहे. जपानी लोकांची अभिरुची आपल्याला त्यांच्या घरात पाहावयास मिळते; त्यांच्या बगीच्यात पाहावयास मिळते; त्यांच्या घरातल्या तोकोनोमांमध्ये सजवून ठेवलेल्या ‘ इकेबाजा ’त ( पुष्पपात्रात ) पाहावयास मिळते; त्यांच्या छपराच्या वक्र पण स्पष्ट रेषेत पाहावयास मिळते. ‘ चा–नो–यू ’ नावाच्या त्यांच्या चहापानविधीत पाहावयास मिळते. जपानी कलास्वादाने कधी श्रीमंतीचे ओंगळ प्रदर्शन केले नाही. दिखाऊपणा त्याने कधी दाखविला नाही. अहंकार त्याला कधी शिवला नाही. अशा लोकांना सौंदर्यशास्त्राची दीक्षा देण्याचे धाष्ट्र्य कुणी करावे ?

मग निक्कोच्या कारागिरीमागची वृत्ती कोणती आहे ? मी जसजसा विचार करू लागलो तसतसे मला वाटू लागले की, या कारागिरीमागे आत्मसमर्पणाचीच भावना प्रामुख्याने आहे. निक्कोच्या भीषणरम्य निसर्गाचे दर्शन घेऊन माणूस जेव्हा विनम्र झाला व त्याच्याशी संधान बांधण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा त्याला आत्मनिवेदनाचा उमाळा फुटला व तो अनिवार होऊन त्यातूनच या कलाविश्वाची निर्मिती झाली. साधू शोदो-शोनीनने ज्या वृत्तीने चुझेंजी सरोवराजवळील झाडाच्या बुंध्यावर अवलोकितेश्वराची मूर्ती खोदून काढली, त्याच वृत्तीने इतरांनी या समाधीवर ही वळशा-वेलांट्यांची संसृष्टी निर्माण केली. निक्कोच्या निसर्गाच्या भव्यतेपुढे ही सारी कलासृष्टी तुच्छ आहे असे वाटल्यास तुम्ही म्हणा;— ही सृष्टी निर्माण करणारे हृदय या निसर्गाइतकेच सुंदर व भव्य आहे, असेच म्हणावे लागेल.

संध्याकाळी जेव्हा मी तोक्योला परतलो तेव्हा निसर्ग व मानव यांच्या युतीची एक नवी प्रचीती घेऊनच परतलो. या अनुभवाने माझेही हृदय आत्मनिवेदनाच्या उमाळ्याने भरून आले होते.



# २७ : कामाकुरा

कामाकुरा हे जपानमधले एक प्रख्यात संस्कारधाम आहे. ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाचे. मिनामोतो शोगूनची ही एके काळी राजधानी होती. नव्हे, जपानच्या इतिहासातल्या प्रख्यात शोगूनशाहीचा प्रारंभच येथून झाला होता. या प्रारंभाची कथा-देखील रोमहर्षक आहे. मिनामोतो सत्तेवर येण्यापूर्वी जपानची सत्ता ताइरा नावाच्या एका घराण्याच्या हातात होती. ती योरितोमो मिनामोतो नावाच्या केवळ तेरा वर्षे वयाच्या एका मुलाने हिसकावून घेतली. त्यासाठी त्याला जे युद्ध करावे लागले त्याच्या गाथा जपानचे लोक अजूनही गात असतात. जपानी साहित्य या युद्धातल्या वीर-गाथांनी भरलेले आहे. अजूनदेखील एखाद्याला नाटक लिहायची प्रेरणा झाली तर त्याला या युद्धातलाच एखादा प्रसंग प्रथम आठवत असतो. जपानच्या भावजीवनावर या काळाचा इतका खोल ठसा उमटलेला आहे.

पण आज जेव्हा आपण कामाकुराला जातो तेव्हा या इतिहासाची आपल्याला आठवणदेखील होत नाही. आजचे कामाकुराचे वातावरण संपूर्णतः सांस्कृतिक आहे. राजकीय उलाढाली कितीही महत्त्वाच्या असोत, इतिहास त्याचे फारसे स्मरण ठेवीत

नाही, याचीच आपल्याला येथे प्रकर्षाने जाणीव होते. कामाकुरा राजधानी बनण्यापूर्वी जपानची राजधानी क्योतो होती. ती फारच सुसंस्कृत आहे म्हणून मिनामोतो शोगून घाबरला. या सुसंस्कृतपणाचा संस्पर्श आपल्याला झाला तर आपणदेखील इतरांप्रमाणे ‘ बिघडून ’ जाऊ या भीतीने त्याने क्योतोच्या संसर्गापासून दूर असलेले कामाकुरा हे शहर राजधानीसाठी पसंत केले. पण ज्या वातावरणाला तो घाबरला होता तेच वातावरण आज कामाकुराला विद्यमान आहे. मिनामोतोच्या तलवारीचा खणखणाट इतिहासजमा झाला; पण ज्या कलाकारांनी दगड वा लाकूड खोदून मूर्ती तयार केल्या त्यांच्या छिन्नीचे घाव अजूनही येथे ऐकू येतात.

सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीने कामाकुरा हे स्थान हाकोने, गोतेम्बा, बेप्पू किंवा निक्को यांच्या पासंगालाही पुरणारे नाही; पण जपानमधल्या समुद्रकिनाऱ्यावरील सर्वसामान्य सर्वच स्थानांप्रमाणे कामाकुरालाही तिन्ही बाजूंनी हिरव्या टेकड्यांनी वेढले आहे. चौथ्या बाजूचा त्याचा समुद्रकिनारा स्नानासाठी फार प्रख्यात आहे. तोक्यो येथून दूर नाही. योकोहामाही जवळच आहे. त्यामुळे उन्हाळ्यात तर स्नानासाठी येथे लोकांची अतोनात गर्दी होत असते. अगदी चेंगराचेंगरी व्हावी इतकी.

आम्ही कामाकुराला योकोहामावरून गेलो. जपानमधल्या चार मोठ्या शहरांपैकी हे एक शहर आहे. शिवाय बंदर या नात्याने हे जपानमधले दुसऱ्या पंक्तीचे बंदर आहे. कोबेनंतर योकोहामाचेच नाव मोठे. मला या शहराचा तोंडावळा प्रथम आपल्या मुंबई-सारखा वाटला. इथल्या गिरण्यांच्या चिमण्या एकसारख्या धूर सोडीत होत्या. त्यामुळे येथे एक क्षणदेखील न थांबता पळ काढावा असे वाटायला लागले. अशा या शहरावरून मी कामाकुराला गेल्यामुळे की काय इथल्या टेकड्यांवरील सामान्य कोटीची वनश्री पाहूनदेखील माझ्या तोंडून ‘ सुंदर ’ असे उद्गार निघाले.

प्रथम आम्ही त्सुरुगाओका हाचिमांगू नावाची समाधी बघायला गेलो. पन्नास-साठ पायऱ्या चढून जावे तेव्हाच कुठे या समाधीचे दर्शन होते. या समाधीच्या डाव्या बाजूला एक लहानसे वस्तु-संग्रहालय आहे. तेथे शोगूनचे पोशाख, त्यांच्या तलवारी वगैरे वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. समाधीवरचे लाकडी वास्तुशिल्प बघण्याजोगे आहे. एके ठिकाणी लाकडावर खोदून काढलेले एक चित्र होते. एक म्हातारा एका पक्ष्याला अन्न घालतो असे ते चित्र होते. म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावरचा संतोष लाकडातूनदेखील उठून दिसत होता.

समाधीकडे जाण्यासाठी जेव्हा आपण पायऱ्या चढायला लागतो तेव्हा डाव्या बाजूला गिंकगो जातीच्या एका महावृक्षाचे आपल्याला दर्शन घडते. त्याच्या बुंध्याची

रुंदीच जवळ जवळ सात मीटरची. उंची असेल बावीस–तेवीस मीटरची. जपानमधले कुठलेही मंदिर किंवा कुठलीही समाधी बघायला जा, तिथल्या झाडांच्या फांद्यांना कागदाचे छोटे कपटे बांधलेले दिसायचे. या महावृक्षाच्या फांद्यांवरदेखील असेच कागदाचे असंख्य कपटे बांधलेले होते.

इशिबासीसान मला एकदा म्हणाले, ‘दैनंदिन जीवनात आम्हांला अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. तेव्हा आम्ही या झाडांजवळ येऊन प्रार्थना करतो. आम्हांला जे हवे असते ते आम्ही देवापाशी मागतो. आमची मागणी देवाने ऐकून घेतली — आम्हांला जे हवे होते ते मिळाले — म्हणजे येथे येऊन झाडाच्या फांद्यांना आम्ही कागदाचे हे तुकडे लावतो.’

जपान पुष्कळ सुधारलेले आहे. इतके ‘सुधारलेले’ आहे की, आधुनिक जपानी माणूस तसा धार्मिक नाही, तो थोडासा उपेक्षाधर्मीच आहे; पण त्याचे काही भोळसट संस्कार अजून गेलेले नाहीत. ज्यांची प्रार्थनेवर श्रद्धा आहे त्यांनी कागदाचे हे तुकडे पाहून वाटल्यास मानावे की, उत्कट प्रार्थना कधी फुकट जात नाही याचेच हे प्रत्यंतर आहे.

पण त्सुरुगाओका हाचिमांगू समाधीजवळचा हा गिंक्गो वृक्ष आणखी एका कारणामुळे लोकांना माहीत आहे. या वृक्षाजवळच एका शोगूनचा खून झाला होता. तोही म्हणे त्याच्या पुतण्यानेच केला. म्हणजे राज्य-लोभाने घरच्या वडीलधाऱ्या माणसाचा खून करण्याच्या प्रथेपासून जपानचाही इतिहास अलिप्त राहू शकला नाही!

राज्य-लोभाने जपानच्या इतिहासात कित्येक सत्ताधीशांचे खून झाले आहेत. एवढेच नव्हे तर राजकीय कारणामुळे एका संताचादेखील खून करायला हा इतिहास एकदा प्रवृत्त झाला होता, याचे स्मरणही आपल्याला कामाकुरा करून देते. येथे र्‍युकोजी नावाचे एक मंदिर आहे. जपानच्या धार्मिक इतिहासातल्या एका अत्यंत तेजस्वी संताचा – भगवान निचिरेनचा – शिरच्छेद करण्याचा एकदा येथे प्रयत्न झाला होता. पण आयत्या वेळी एक ‘चमत्कार’ घडला आणि शिपायाच्या हातातली तलवार गळून पडली; त्यामुळे निचिरेनचा शिरच्छेद अशक्य होऊन बसला. ज्या ठिकाणी हा चमत्कार घडला तेथे हे र्‍युकोजी मंदिर बांधण्यात आले आहे. या मंदिराचे वातावरण शांत–गंभीर आहे. निचिरेन-पंथी बौद्धांचे हे एक मोठे तीर्थस्थळ आहे. सज्जनांची तेजस्विता ही केवढी प्रभावी शक्ती असते याची आपल्याला येथे उत्कटतेने जाणीव होते आणि आपल्याला आपले सुखवस्तू जीवन अगदी पामर वाटायला लागते.

गिंक्गो वृक्षाचे खरे ऐश्वर्य मी पाहिले ते इथल्या युगयोजी मंदिरात. या मंदिराचे लोकप्रिय नाव आहे शोजोकोजी. वयाच्या दृष्टीने सातशे वर्षे जुने; म्हणजे जवळ जवळ ज्ञानेश्वरकालीन. इथली प्रचंड लोखंडी घंटा बघायला लोक येथे येत असतात. पण इथले गिंक्गो वृक्ष त्यांचे लक्ष तिच्याकडे जाऊच देत नाहीत. या मंदिराहूनही वयाने मोठ्या अशा काही वृक्षांच्या बुंध्यांची मदत घेऊन त्यांच्यावर हे मंदिर बांधण्यात आले आहे.

वृक्षांनी कधी एकमेकांना आलिंगन दिलेले तुम्ही बघितले आहे काय? लता देत असते; तिचा तो स्वभावधर्मच; पण जेव्हा इथले दोन महावृक्ष एकमेकांना आलिंगन देतात तेव्हा ते दृश्य वसिष्ठ–विश्वामित्र यांच्या आलिंगनासारखेच पवित्र दिसते. शेकडो वर्षे झाली, हे दोघे ऋषी असे एकमेकांना भेटलेले आहेत आणि ते तसेच तेथे उभे आहेत.

हे युगयोजी मंदिर म्हणजे बौद्धांमधल्या जिशू संप्रदायाचे आद्य-पीठ आहे. मंदिरामध्ये बुद्धाची एक सुंदर मूर्ती आहे.

पण मी एक प्रचंड लाकडी मूर्ती बघितली ती इथल्या हासे-कान्नोन मंदिरामध्ये. न्युकोजी मंदिरात भगवान निचिरेनचे स्मरण करून आम्ही तेथून जवळच असलेल्या एका सुंदर उद्यानात गेलो. हे उद्यान एका डोंगराच्या कड्यावर होते. काही पायऱ्या चढून जेव्हा वर गेलो तेव्हा या मूर्तीचे दर्शन घडले. केवढी मोठी मूर्ती! अगदी गगन-भेदी! जपानामधली ही सर्वांत उंच लाकडी मूर्ती आहे. तिला अकरा तोंडे असून ती करुणामूर्ती मानली जाते. मधल्या मुख्य मुखाकडे निरखून पाहिले म्हणजे, करुणेला अवतार घ्यावासा वाटला व ती या मूर्तीच्या रूपाने अवतरली असेच वाटते. आठव्या शतकात तोकुदो नावाचा एक भिक्षू होऊन गेला. तो भक्तही होता आणि कलाकारही होता. त्याचीच ही कृती आहे आणि इतकी वर्षे झाली, तरी अजूनही ती 'जिवंत' आहे.

येथून आम्ही 'दाइ-बुत्सू' बघायला गेलो. 'अमिदा' बुद्धाची एवढी मोठी ही बैठी मूर्ती म्हणजे जपानमधले एक 'आश्चर्य' आहे. आतापर्यंत पाहिलेल्या सर्व मूर्ती फिक्या वाटाव्या इतकी ती भव्योदात्त आहे. नुसती एक कलाकृती म्हणून तिच्याकडे बघितले तरी ती अद्वितीय वाटते. तांबे व कथील या धातू मिसळून बनविण्यात आलेली असून तिची उंची जवळ जवळ अकरा-बारा मीटर आहे. तिचा केवळ चेहराच तीन मीटर रुंद आहे. पण ही मूर्ती इतकी प्रभावी आहे की, तिच्याकडे केवळ कला-प्रेमी या नात्याने बघणे मला शक्य झाले नाही. तिच्यापुढे मी इतका भक्तिनम्र झालो

की, तिच्या पायाखालचा धूलिकणदेखील मला हिमाल्याहून उंच वाटायला लागला आणि बुद्धाची ही विभूती जणू सर्व बाजूंनी ब्रह्मांडाला वेढून पुन्हा दहा अंगुळे अधिक राहिली आहे असे वाटायला लागले. माझ्या श्रद्धावान भारतीय मनात भक्तीचे तरंग उठले आणि मी उद्गारलो—

एतावानस्य महिमा अतो ज्यायांश्च पुरुषः ।
पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि ।

येथे एके काळी कोतोकुईन नावाचे एक मंदिर होते. त्या मंदिरामध्ये ही मूर्ती होती; पण चौदाव्या शतकात येथे एक मोठे चक्रीवादळ आले आणि त्यामुळे मंदिर कोसळून पडले. फक्त साक्ष पुरविणारे मंदिराच्या स्तंभांचे काही अवशेष आज राहिले आहेत. बाकी सर्व वाहून गेले. मात्र या मंदिरातली ही मूर्ती येथे ऊन, पाऊस, वारा सर्व काही झेलून सतत सहा शतके शान्त-चित्त बसून आहे. सभोवताली जन्म-मृत्यूचे तांडव एकसारखे चालले असताना हा जणू अमृतत्वाचा राजा आहे! त्याच्या चेहऱ्यावर केवढी प्रसन्न शांती पसरलेली आहे! दृष्टी नासिकाग्रावर केंद्रित केल्यामुळे डोळे मिटल्यासारखे दिसत असले तरी त्यांचे स्निग्ध-गंभीर तेज सूचित झाल्यावाचून राहिलेले नाही. त्याचप्रमाणे पुढे आणून ध्यानमुद्रेत जुळविलेली करकमलेसुद्धा ‘ तथागता ’ची अपार तत्त्वश्रद्धा दर्शवितात.

मी विचार करू लागलो– बुद्धमत कोणत्या शक्तीमुळे इतके पसरू शकले? या मतामध्येच तेवढी शक्ती होती की त्याच्या जनकाची संकल्पशक्तीच दांडगी होती? की या मताचा प्रचार करणाऱ्या जीवनवीरांची श्रद्धा मोठी होती? जगातले हे एकच मत असे आहे की जे तलवारीची यत्किंचितदेखील मदत न घेता केवळ स्वतःच्या तेजाने एका विस्तीर्ण भू-खंडावर पसरू शकले. आपले मत अशा प्रकारे पसरेल याची कल्पना स्वत. भगवान बुद्धांना तरी होती काय? ‘ इहासने शुष्यतु मे शरीरम् त्वगस्थिमांसं प्रलयं च यातु ’ असा दृढ निश्चय करून या अध्यात्मवीराने जी ‘ आर्यसत्ये ’ शोधून काढली त्यांचा प्रचार त्यांनी आयुष्यभर अत्यंत उत्कटतेने केला. पण त्यांच्या विहाराचे क्षेत्र उत्तर भारतातल्या गयेपासून वाराणसीपर्यंतच्या परिसरापुरतेच मर्यादित होते. एवढा मोठा भारत देश त्यांच्यासमोर पसरला होता; पण ते स्वतः या देशातदेखील सगळीकडे पोहोचू शकले नव्हते. त्यांनी आपल्या शिष्यांना ‘ बहुजन हिताय बहुजन सुखाय ’ या मताचा प्रसार जगभर करा असे सांगितले होते हे खरे आहे; पण त्या वेळचे ‘ जग ’च इतके लहान होते की, एवढासा भारतदेखील त्यांच्यात नीट मावत नव्हता.

जो विचार प्रत्यक्ष भारतात सगळीकडे पसरू शकला नाही तो त्याच्याही पलीकडे कसा पसरू पावला ? जगातल्या अत्यंत दूरदूरच्या कोनाकोपऱ्यांतून काही जिज्ञासू या विचाराचा परिचय करून घेण्यासाठी भारतापर्यंत कसे आले ? येथे एक असा विचार उदयाला आलेला आहे हे त्यांच्या कानापर्यंत कसे पोहोचले ? ज्या वेळी दळण-वळणाची साधनेदेखील नीट उपलब्ध नव्हती त्या वेळी हे लोक गिरिकंदरातून नाना प्रकारची संकटे झेलून भारताची वाट शोधीत शोधीत हा विचार समजून घेण्यासाठी येथे आले. यामागे कोणती प्रेरणा होती ? त्यांना कोणती आस लागली होती ? आणि बौद्ध विचार हा त्यांच्या कोणत्या आकांक्षांची परिपूर्ती करीत होता ?

ज्या विचारामध्ये एवढी शक्ती आहे त्या विचाराचा जनक स्वतः केवढा मोठा असेल ? तो 'किम् प्रभावेत, किम् आसित, व्रजेत किम् ?' आणि शेवटी जो देश एवढी मोठी विभूती निर्माण करू शकला त्या देशाची स्वतःची शक्ती केवढी असेल ?

जो 'विचार' आशियाएवढा एक विस्तीर्ण भूखंड प्रभावित करू शकला त्याचे त्याच्या जन्मभूमीत काय झाले ? ज्या देशात हा विचार जन्माला आला त्या देशात तो कितीसा खोल रुतला ?


तेथे अशा प्रकारचे नाना विचार माझ्या डोक्यात थैमान घालू लागले. विशेषतः शेवटच्या विचाराने मी खिन्न झालो. भारतातून बौद्धधर्म नाहीसा कसा झाला ? बुद्धाला आपण विष्णूचा अवतार मानतो हे खरे आहे. आजदेखील जेव्हा आपण कोणताही संकल्प करतो तेव्हा 'वैवस्वते मन्वंतरे बुद्धावतारे' असे म्हणून चालू अवतार बुद्धाचाच आहे हे मोकळेपणाने कबूल करीत असतो. बौद्धधर्म भारतातून नष्ट झाला नाही, उलट तो धर्म हिन्दू धर्माने आत्मसात करून टाकला असे आपण म्हणत असतो. एका अर्थाने हे खरे आहे. बुद्धापूर्वी जो हिन्दुधर्म प्रचलित होता तो बुद्धानंतर पूर्वीसारखा राहू शकला नाही. तो बदलला – बुद्धमताने संस्कारित झाला – नवा झाला, हे सर्व मला मान्य आहे; तरीही का कुणास ठाऊक, माझे या युक्तिवादाने समाधान होत नाही. बुद्धाची जी निंदा भारताने केली ती काही केल्या मी विसरू शकत नाही. मूर्खाला 'बुद्दू' म्हणजे बुद्ध म्हणण्यापर्यंत आपली मजल गेली होती हे कसे विसरता येईल ?

माझ्या देशाची शक्ती व त्याचे तेवढेच मोठे दौर्बल्य या दोन्हींची जाणीव होताच माझे अंतःकरण एका परीने सद्‌गदित झाले, तर दुसऱ्या परीने विषादाने भरले. माझ्या देशाने बुद्ध निर्माण केला. त्याची उपेक्षाही त्यानेच केली. माझ्या देशाने गांधी निर्माण केला व त्याची हत्याही त्यानेच केली !

'दाइ–बुत्सू 'च्या पाठीमागे एक द्वार होते. तेथे त्याच्या खांद्यावर चढण्यासाठी काही पायऱ्या होत्या. कित्येक लोक त्या पायऱ्या चढून दाइ–बुत्सूच्या खांद्यावर जात होते. इशिवासीसान मला म्हणाले, 'चला, आपणदेखील वर जाऊन येऊ या.'

मला हा अतिक्रम शक्यच नव्हता; नव्हे, आमच्यापैकी कुणालाच तो शक्य नव्हता. मी इशिवासीसानना म्हणालो, 'ज्याची चरणधूलीदेखील डोक्यावर घ्यायची आपली योग्यता नाही त्याच्या खांद्यावर चढायचे ? छेः, हे असह्य आहे.'

इशिवासीसान समजले. त्यांनी तो विचार त्याच क्षणी सोडून दिला.



: २८ :

# क्योतो

जपानच्या संस्कृति-प्रवाहाचे इतके दिवस मनसोक्त निरीक्षण केल्यानंतर माझे मन त्या प्रवाहाच्या उगमाच्या दर्शनासाठी – क्योतोला जाण्यासाठी – आता आतुर झाले. दीड महिन्यापूर्वी हिरोशिमाला जाताना आम्ही क्योतोवरून गेलो होतो, पण तेथे उतरलो नव्हतो. कारण त्या वेळी आमचे मन हिरोशिमामय झाले होते. हिरोशिमाला ज्या ठिकाणी बावीस वर्षांपूर्वी जगातला पहिलावहिला अणुबॉम्ब पडून लाखो लोक मृत्युमुखी पडले होते त्यांच्या स्मरणार्थ त्याच ठिकाणी सहा ऑगस्ट रोजी सकाळी बरोबर सव्वाआठ वाजता सामुदायिक प्रार्थना व्हायची होती. त्या प्रार्थनेला हजर राहण्याची आम्हांला उत्कंठा होती. त्यामुळे क्योतोवरून जाऊनसुद्धा त्या वेळी तेथे न उतरता आम्ही सरळ हिरोशिमाला गेलो होतो.

आता कामाकुरा पाहून झाल्यावर क्योतो बघण्याची माझी उत्कंठा वाढली. खरे म्हणजे, मला तेथे जपानच्या इतिहासप्रसिद्ध तोक्कायदो मार्गानेच जायचे होते. मी तसे जवळजवळ ठरवूनही टाकले होते. आतामीहून हाकोनेला जाताना वाटेत मला या मार्गाच्या एका भागाचे दर्शन घडले होते. त्या वेळीच माझा त्याच्यावर लोभ जडला

होता. त्यानंतर जिप्पेनशाच्या चटकदार प्रवासवर्णनाच्या इंग्रजी अनुवादावरूनही– Shanks' mare वरूनही – मी एक दृष्टी फिरविली व त्याच पुस्तकात हिरोशिगे याने आपल्या रंगरेखेत अंकित करून ठेवलेल्या तोक्कायदोच्या दृश्यांच्या काही प्रतिकृतीही निरखून पाहिल्या. त्यामुळे क्योतोला जायचे तर याच मार्गावरून गेले पाहिजे– त्याच्या त्रेपन्न पडावांवर मुक्काम करीत करीत गेले पाहिजे – असे माझ्या मनाने घेतले.

पण समयदारिद्र्य नडले ! दुसऱ्या कुठल्याही प्रकारच्या दारिद्र्यावर मात करता आली असती; पण या दारिद्र्यापुढे मी हात टेकले. मी क्योतोला आगगाडीने गेलो.

आगगाडी 'स्यूपर एक्स्प्रेस' होती. तासाला २१७ किलोमीटरच्या वेगाने धावणारी होती. ती जसजशी क्योतोच्या दिशेने धावू लागली तसतसा या देशाचा एक हजार वर्षांचा जुना इतिहास माझ्या कानांशी जणू गुजगोष्टी करायला लागला आहे असे वाटायला लागले. मला आता या देशात पावणेदोन महिने होत आले होते. या एवढ्याशा अवधीत मी या समाजात इतका रुळलो होतो की, नारा, फुजिवारा, कामाकुरा, आशिकागा, तोकुगावा वगैरे जपानच्या इतिहासातली कालनिर्देशक नावे जी पूर्वी काही केल्या लक्षातदेखील राहात नव्हती ती आता माझ्याशी बोलायला लागली होती. त्यामुळे क्योतोला जाताना मी आज प्राचीन चीनची वैभवशाली राजधानी च्यांग-आनशी सौंदर्याने व ऐश्वर्याने स्पर्धा करण्याच्या महत्त्वाकांक्षेने भारून जन्माला आलेले एक ऐतिहासिक महत्त्वाचे शहर पाहणार आहे; जपानी संस्कृतीमध्ये जे काही अत्युत्तम व सुंदर आहे त्याचे माहेरघर बघायला जात आहे; नव्हे, जपानी संस्कृतीच्या गंगोत्रीच्या दर्शनाला मी चाललो आहे; जपानच्या जपानीपणाचा जेथे शंभर टक्के आविष्कार झाला आहे असे अभिजात जपान आज मला बघायला मिळणार आहे, अशा प्रकारच्या भावनांनी माझे हृदय भरून आले. दिल्लीला प्रथमच गेलो होतो त्या वेळी जशा माझ्या भावना उचंबळून आल्या होत्या तशाच प्रकारचा अनुभव मला क्योतोला जाताना आला.

सकाळच्या साडेनऊच्या सुमाराला मी तेथे पोहोचलो आणि सरळ सांज्युसांगेंदो मंदिर बघायला गेलो. बौद्ध धर्माचा आपल्या हातून जितका अधिक प्रचार होईल तितकी जगात शान्तता अधिक नांदेल, या श्रद्धेने बाराव्या शतकातल्या एका सम्राटाने बांधलेले हे एक मोठे विस्तृत लाकडी मंदिर आहे. या मंदिराचा जो मुख्य हॉल आहे त्याची लांबीच जवळ जवळ ११९ मीटरची आहे. एवढी लांबी असलेला लाकडी हॉल म्हणे जगात दुसरा नाही. हा हॉल चौतीस स्तंभांवर उभा असून या स्तंभांमधल्या तेहतीस, मोकळ्या जागा असा सांज्युसांगेंदो या शब्दाचा अर्थ आहे. बोधिसत्व म्हणे तेहतीस निरनिराळे अवतार घेऊन जगाला तारत असतो, म्हणून तेहतीस या आकड्याला येथे महत्त्व आहे.

मी आत प्रवेश केला. हॉलच्या मधोमध अवलोकितेश्वराची एक प्रचंड मूर्ती दिसली. तिच्या मुख्य मुखाच्या आजूबाजूला दहा दुसरी मुखे होती, आणि मूर्तीला एक हजार बाहू होते. (एकादशमुख, सहस्रभुज अवलोकितेश्वर) कामाकुरा काळात तांकेई नावाचा एक मोठा शिल्पकार होऊन गेला. त्याने आपले हृदय ओतून बनविलेली ही भव्य मूर्ती आहे. या मूर्तीच्या आजूबाजूला एक हजार अवलोकितेश्वरांची एक प्रचंड सेना उभी आहे.

ही एवढी प्रचंड सेना पाहून माझी दृष्टी भिरभिरू लागली. मी हॉलच्या पाठी-मागच्या बाजूला चक्कर मारायला गेलो. तेथे अवलोकितेश्वराला साहाय्य करणाऱ्या अठ्ठावीस निरनिराळ्या देवता पाहावयास मिळाल्या. त्यांचा परिचय करून घेण्याचा जेव्हा प्रयत्न केला तेव्हा त्या इन्द्र, वरुण, यक्ष, गंधर्व आदी भारतीय पौराणिक देवता असल्याचे आढळून आले. तिबेट, मंगोलिया, चीन, कोरिया वगैरे देशांचा प्रवास करून येथे पोहोचेपर्यंत बिचाऱ्यांच्या नावात व रूपात बराच फरक पडला होता.

हे मंदिर बघण्याजोगे अवश्य होते. पण जपानचे जपानीपण येथे कुठे व्यक्त होते हे काही माझ्या लक्षात आले नाही. येथे धनुर्विद्येची स्पर्धा चालत असते असे मला सांगण्यात आले. पण ज्या जपानीपणाच्या शोधात मी क्योतोला आलो होतो ते मला येथे आढळले नाही. हे पाहून मी जरा खंती झालो. जपानचे जपानीपण 'वाबी' (संपूर्ण शांतता) व 'साबी' (अत्यंत साधेपणा) या दोन तत्त्वांतून व्यक्त होत असते; आणि क्योतोत ते पुष्कळ आढळते असे मी ऐकले होते. पण येथे त्यांचा मागमूसही नव्हता.

अशा थोड्याशा विरस मनःस्थितीत येथून आम्ही कियो-मिझू मंदिर बघायला गेलो. मंदिराकडे जाणारी वाट भर बाजारातून गर्दीत अडखळत जात होती. सांज्युसांगेंदो मंदिर बघून घाबरलेली माझी दृष्टी येथे काही तरी निराळे धुंडाळू लागली. बाजारात टॅक्सी ठेवून एका गल्लीतून पुढे गेलो. कियो-मिझू मंदिराकडे नेणाऱ्या काही पायऱ्या चढून वर गेलो, आणि ज्याच्या शोधात मी येथे आलो होतो ते अंधुकसे गवसल्यासारखे मला वाटले.

मंदिरामागे वनश्रीने नटलेला हिगाशी पर्वत उभा होता, आणि त्याच्या कुशीत आडव्या-उभ्या प्रचंड खांबांच्या एका अजब सांगाड्यावर कियो-मिझू मंदिर उभे असलेले दिसले. एखाद्या वृक्षावर एखादे घरटे दिसावे तसे. ज्या सांगाड्यावर ते उभे होते त्याचा एक एक खांब म्हणजे जणू एक एक गगनभेदी वृक्ष वाटत होता. एकदेखील खिळा न ठोकता म्हणे हा प्रचंड सांगाडा उभा करण्यात आला आहे. मी चढत चढत

मंदिराच्या लाकडी कठड्यावर जाऊन उभा राहिलो. खालच्या खोऱ्यात मेपल वृक्षांचे एक मोठे जंगल पसरलेले दिसले. त्याच जंगलात एका बाजूला हिगाशी पर्वताच्या कुशीतून फुटलेले पाण्याचे तीन झरे वरून खाली उडी घेत होते. या झऱ्याचे पाणी पवित्र मानले गेले आहे म्हणून या मंदिरालादेखील "पवित्र पाण्या"चे मंदिर ( कियो=पवित्र, मिझू=पाणी ) हे नाव पडले आहे.

माझी दृष्टी समोरच्या दृश्यावर पडली. तेथे क्योतो शहराचा विस्तार पसरलेला होता आणि त्याच्यामागे आतागो पर्वत उभा होता. माझी दृष्टी आतागोच्या आकाश-रेषेचा वेध घेत क्योतोच्या विस्तारात येऊन विलीन झाली तेव्हा एकाएकी क्योतोचे वैशिष्ट्य कशात आहे ते मला गवसले.

निसर्ग व मानव यांची विलक्षण संगती हेच क्योतोचे खरे वैशिष्ट्य आहे. मानवाने जे जे काही येथे उभे केले आहे ते इतके नैसर्गिक आहे की, या उभारणीला मानवाचा हात लागला आहे की नाही याचीच आपल्याला शंका यावी. ( अपवाद केवळ सांज्युसांगेंदो मंदिराचा ) अतिशय संवेदनक्षम व अत्यंत कुशल अशा कलाकारालाच ही नैसर्गिकता शक्य आहे. कियो-मिझूला याची आपल्याला थोडी प्रचीती येते. येथे निसर्ग व मंदिर, पर्वत व शहर एकमेकांत ओतप्रोत झाली आहेत असेच वाटते.

कियो-मिझूला म्हणे एक तर एप्रिलमध्ये आले पाहिजे किंवा नोव्हेंबरमध्ये. एप्रिलमध्ये आलो तर साकुरांच्या फुलांचे वैभव अनुभवता येते. नोव्हेंबरमध्ये आलो तर मेपलपर्णांचे ऐश्वर्य पाहावयास मिळते. मी येथे सप्टेंबरमध्ये आलो होतो. तरीही इथल्या गर्द झाडीने मंदिराच्या वातावरणात जे पावित्र्य भरले आहे त्याने माझे मन भरून आल्यावाचून राहिले नाही.

ज्या नैसर्गिकतेची प्रचीती मला कियो-मिझूला आली तिचा उत्कट साक्षात्कार त्यानंतर किंकाकु-जीला झाला. चौदाव्या शतकातल्या योशिमित्सु नावाच्या एका शोगूनने राजकीय उलाढालीपासून निवृत्त जीवन जगण्यासाठी म्हणून या शान्त स्थळाची उभारणी केली. पुढे त्याच्या मृत्यूनंतर त्याचे रूपांतर मंदिरात करण्यात आले. आम्ही या मंदिराच्या सोमोन नावाच्या प्रवेशद्वारातून आत गेलो. आतल्या वृक्षराजीने आमचे मनःपूर्वक स्वागत केले. थोड्या वेळाने चुमोन नावाचे प्रवेशद्वार आले. तेथून आत शिरल्याबरोबर पहाटेला उषेचे दर्शन व्हावे तसे किंकाकुजीच्या सुवर्णमंदिराचे दर्शन घडले.

हे मंदिर म्हणजे एक छोटीशी तीन मजली इमारत आहे. तिच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यांच्या भिंती सोन्याच्या पत्र्याने मढविलेल्या आहेत. मंदिराच्या पाठीमागे एक हिरवीचार टेकडी आहे आणि चहूबाजूंस एक अतिशय सुंदर बाग आहे.

ही बाग पाहताच माझे पाय थबकले. बागेत एक छोटासा तलाव होता. त्यात इतस्ततः काही खडक ठेवण्यात आले होते. जणू छोटी-मोठी बेटेच. मंदिराच्या डाव्या बाजूला एक मोठा खडक होता. तो तर एखाद्या बंदरासारखा शोभत होता. एक छोटासा स्वर्गच जणू येथे अवतरविण्यात आला आहे, अशी या बागेची एकंदर छाप माझ्या मनावर पडली. तलावात मंदिराचे उलटे प्रतिबिंब पडले होते. त्याने तर या बागेची शोभा शतगुणित केली होती.

मंदिराच्या भिंती सोन्याच्या असल्या तरी त्यात भपका नव्हता. उलट त्या हिरव्याचार नंदनवनात हे सुवर्णमंदिरदेखील जणू निसर्गानेच उभे केले आहे.' जणू निसर्गाचेच ते अंग आहे अशी प्रचीती येत होती.

सामान्यपणे सृष्टीचा एखादा रम्य देखावा उभा करणे हाच बागांचा हेतू असतो. पण या बागेत केवळ एक वातावरण उभे करण्यात आले आहे. येथे मानवी हातांचा अधिक्षेप दिसत नाही. उलट मानवाने निसर्गाचेच एक अंग बनून निसर्गाला मदत केल्यासारखे वाटते. निसर्गाचा जो एक निर्हेतुक हेतू असतो त्याच्याशी मानव येथे एकरूप झाला आहे. त्याने इथल्या झाडांना आकार दिला आहे. हवे तसले त्यांना वळण लावले आहे. पण आपला हेतू त्याने येथे कशावरही लादलेला नाही. उलट तो बागेचेच एक अंग असल्यागत वागला आहे. बाग व बागवान यांना निराळे करणे येथे शक्य नाही. नैसर्गिक बनण्याचा प्रयत्न न करता इथला बागवान विलक्षणरीत्या नैसर्गिक राहू शकला आहे. त्याच्या हातून ही बाग ' झाली ' आहे, त्याने ती निर्माण ' केलेली ' नाही. ' Sitting quietly, doing nothing, spring comes and the grass grows by itself ' अशा अर्थाची एक जपानी कविता वाचली होती. या कवितेमध्ये व्यक्त झालेल्या आदर्शाप्रमाणे हा बागवान येथे आला, स्वस्थ बसून राहिला, काही एक ' केले ' नाही, आणि आपोआप ही बाग ' झाली '— असे मला वाटले.

मी बराच वेळ ही बाग पाहात राहिलो. हे सर्व माणसानेच निर्माण केले आहे हे काही केल्या मला पटेना. तळे, टेकडी, दगड, शेवाळ, आणि आजूबाजूची चित्रविचित्र

---

१. क्योतो सोडल्यानंतर मला कुणी तरी सांगितले की, किंकाकुर्जाचे मूळ सुवर्णमंदिर १९५० साली एका वेड्या साधूने आग लावून जाळून टाकले. पण पाच वर्षांच्या आत जपानने मूळच्यासारखे तंतोतंत ते पुन्हा उभे केले. किंकाकुर्जाच्या मंदिराला आग लावणाऱ्या त्या वेड्या साधूच्या जीवनावर जपानचे तरुण लेखक युकिओ मिशिमा यांनी एक कादंबरी लिहिली आहे. तिचा इंग्रजी अनुवाद ' The Temple of Golden Pavillion ' या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

आकारांची झाडे-झुडपे, सर्व काही जणू निसर्गानेच इकडे-तिकडे आणून टाकले आहे असे वाटत होते. दगडांवरचे शेवाळ, झाडांवरची बांडगुळे, फार कशाला – बागेतल्या दगडी कंदिलांच्या ज्या कपच्या उडाल्या आहेत त्यादेखील जणू निसर्गाच्या लहरीतूनच उडाल्या आहेत असे वाटत होते.

क्योतोमध्ये अशा अनेक बागा आहेत. या बागांसाठीच क्योतो प्रख्यात आहे. एका बागेची तुलना दुसऱ्या बागेशी करता यायची नाही, असे प्रत्येक बागेचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे.

पण या सर्व बागांहून लोकविलक्षण अशी एक बाग मी इथल्याच प्रसिद्ध रियोआनजी मंदिरामध्ये बघितली. येथे एखादी बाग असेल असे प्रथम वाटले नव्हते. मंदिराच्या बाहेर किंवा आजूबाजूला बागेचा मागमूसही दिसला नव्हता. मी मंदिरात गेलो आणि तिथली चित्रे बघण्यात दंग झालो. काही जुनी चित्रे तेथे ठेवण्यात आली होती. मला ही चित्रे विचित्र वाटली. विचित्र म्हणण्याचे कारण एवढेच की, असली चित्रे बघण्यास माझे डोळे अजून सरावले नव्हते. या चित्रांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक चित्राच्या आजूबाजूची विस्तृत कोरी जागा. या कोऱ्या जागेत कुठे एखाद्या कोपऱ्यात दोन-चार रेषांच्या द्वारा एखाद्या धबधब्याचे सूचन झालेले असायचे, किंवा झाडाचा एखादा बुंधा, एखादी टेकडी, अथवा उडणाऱ्या एखाद्या पक्ष्याचे सूचन झालेले असायचे. चित्राचे व त्याच्या आजूबाजूच्या विस्तृत कोऱ्या जागेचे इतके सुंदर संतुलन झालेले असायचे की कोरी जागा कोरी न वाटता जणू चित्राचाच तो एक भाग आहे असे वाटायचे. जी वस्तू खरोखर सुंदर असते तिच्या चहूबाजूंस विरलतेचा अवकाश असावा लागतो; तेव्हाच त्या वस्तूचे सौंदर्य खुलून दिसते, याची मला येथे जाणीव झाली. पुष्कळशा सुंदर वस्तू एके ठिकाणी जमवून ठेवणे म्हणजे सौंदर्यरसिकता नव्हे. हा सौंदर्यांचा अपमान आहे. रवीन्द्रनाथांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, सती स्त्रीला सवतीच्या घरी ठेवण्यासारखे आहे.

ही चित्रे पाहून मी सुखावलो आणि डाव्या बाजूच्या व्हरांड्यात गेलो. तेथे मला ती बाग दिसली. बाग कसली? एका प्रशस्त प्रांगणामध्ये पांढरी वाळू पाथरलेली होती, आणि त्या वाळूत पाच कडे लहान-मोठे पंधरा दगड ठेवण्यात आले होते. मला प्रथम हसू आले, पण क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी माझ्या मनावर तिची विलक्षण मोहिनी पडली. प्रशांत महासागराचा एक तुकडाच जणू त्यातल्या काही बेटांसह उचलून येथे आणून ठेवल्यासारखा वाटला. एवढ्याशा प्रांगणात एक महासागर पसरलेला दिसला. केवढा साधेपणा! आणि केवढी समृद्धी!! मी त्या दगडांकडे पाहू लागलो. ते साधे दगड नव्हते. अत्यंत संवेदनक्षम अशा कलाकाराने मोठ्या सायास-प्रयासाने शोधून

आणलेले ते दगड होते. त्यासाठी त्याने उभा जपान पालथा घातला असला पाहिजे. त्यावर अमाप रसिकता खर्च केली असली पाहिजे. वाऱ्याने व पाण्याने या दगडांना जो आकार दिला त्या आकारांच्या जिवंतपणासह त्याने ते अलगद हातांनी उचलून येथे आणून ठेवले. त्यानंतर मात्र त्यांना माणसाचा हात लागलेला नाही. ते येथे अशा प्रकारे ठेवण्यात आले आहेत की ते जणू येथेच 'उगवले' आहेत असे वाटावे.

समोरच्या बाजूला कुंपणवजा एक छोटीशी भिंत आहे. तिच्यामागे हिरवीचार वृक्षराजी आहे. या वृक्षराजीच्या पृष्ठभूमीत ही बाग उठून दिसते. बागेकडे एकटक पाहू लागलो म्हणजे आपल्या चित्तवृत्ती स्थिरावतात, आणि चित्तातून अचानक भूत व भविष्य या दोन कालांचा छेद उडून आपण वर्तमानकाळात जगू लागतो आणि मग हा वर्तमान क्षण आपल्याला अनंतकाळाएवढा विस्तृत वाटायला लागतो.

जपानमध्ये झेन नावाची जी ध्यानमार्गी जीवन-साधना ( झेन = ध्यान ) चालते तिचा उद्देशच आपल्या चित्तातून भूत व भविष्य या दोन कालांचा छेद उडवून देणे हा आहे. आपण भूतकाल विसरत नसतो. भविष्यकालही आपल्या भूतकालाचीच सावली असते. वस्तुतः दोन्ही काल मिथ्या आहेत. एक गेलेला असतो; दुसरा आलेला नसतो. या दोन्ही मिथ्या कालांच्या प्रभावाने वर्तमान क्षण जो वास्तव असतो त्याचा आपल्याला विसर पडतो. जेव्हा या दोन्ही मिथ्या कालांपासून आपले चित्त मुक्त होते तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने सृजनशील जीवन जगू शकतो. वर्तमान क्षण 'जिवंत' बनावा म्हणून ज्या लोकांनी साधना केली त्यांनीच या बागेची निर्मिती केली आहे. बागेचे दर्शन वरवरून साधे दिसते. पण तिच्याकडे एकटक पाहात बसलो म्हणजे तिचे समृद्ध अंतरंग प्रकट होते, आणि मग बागेच्या निर्मात्याची अभिरुची प्राङ्गणात पाथरलेल्या वाळूच्या कणाकणातून व्यक्त झालेली आपल्याला दिसून येते. जपानी कलाभिरुचीचा सर्वोत्कृष्ट आविष्कार या बागेत झाला आहे.

बौद्ध-पंथामधल्या झेनने जपानी मनाची अशी पकड घेतली आहे की, त्यांच्या सांस्कृतिक जीवनातल्या जवळ-जवळ सर्व अंग-प्रत्यंगांवर त्याचा ठसा उमटलेला दिसून येतो. जपानची वास्तुकला झेन परंपरेतली आहे. चित्रकला, हस्तकला, बाग-निर्मिती, पुष्परचनेची कला ( इकेबाना ) या सर्व कलांवर झेनचाच ठसा विशेष आहे. हाइकू पद्धतीची लोकप्रिय जपानी कविता झेन संस्कारातूनच उदयाला आलेली आहे. एवढेच नव्हे तर जपानी सामुराईंनी बुशिदो नावाची जी एक आर्य-जीवन-पद्धती उभी केली तिच्या पायातदेखील झेन संस्कारच आहे. म्हणजे झेनने युद्धकलेवरदेखील आपला ठसा उमटविला असे म्हणावे लागते.

झेनद्वारा संस्कारित या जपानी कलांमध्ये चा-नो-यू नावाची चहापानाची कला

विशेष उल्लेखनीय आहे. अंतहीन वर्तमान क्षणाची जाणीव आपल्याला सर्वांत अधिक या चहापानाच्या विधीत होत असते.

शब्दार्थाच्या दृष्टीने ' चा-नो-यू ' म्हणजे ' चहाचे गरम पाणी. ' बाराव्या शतकातल्या एइसाई नावाच्या एका झेन साधूने हा चा-नो-यू विधी येथे सुरू केला, आणि सोळाव्या शतकात सेन-नो-रिक्यू नावाच्या दुसऱ्या साधूने याला पूर्णत्व आणले. प्रारंभीचे झेन साधू ध्यानात मग्न असताना झोप आली अथवा चित्त अस्वस्थ असले म्हणजे चहा घेत असत. चहा घेतल्याने त्यांची झोप उडून जायची, आणि त्यांची अस्वस्थताही दूर व्हायची. दंतकथा अशी आहे की, झेन संप्रदायाचा संस्थापक बोधिधर्म-जपानी ' दारुमा '– ध्यानाला बसला असता एकदा म्हणे त्याला झोप आली. त्यामुळे चिडून त्याने आपल्या डोळ्यांच्या पापण्या कापून टाकल्या. त्या जमिनीवर पडल्या-बरोबर पहिलीवहिली चहाची रोपटी उगवली. तेव्हापासून चहा हे ध्यान-मार्गी झेनांचे मुख्य पेय बनले. चहामुळे त्यांचे डोके तरतरीत व्हायचे. सुरुवातीला ते म्हणायचे, ' चान ' ( = ध्यान ) व ' चा ' ( = चहा ). दोहोंची चव सारखीच. या अनुभवातून चा-नो-यू विधीचा जन्म झाला.

पूर्वीचे हे झेन साधू एखाद्या रानात गवत व वेळू यांची एक छोटीशी झोपडी उभी करायचे व त्या नितान्त साध्या वातावरणात चा-नो-यू साठी बसायचे. यातूनच चा-नो-यू ची घरे झोपडीवजाच असली पाहिजेत असा एक संकेत निर्माण झाला. या संकेताला अनुसरून किंकाकू-जीचे सुवर्णमंदिर बांधणाऱ्या शोगूनने मंदिराच्या मागील टेकडीवर अशीच एक वेगळी झोपडी बांधली होती. ती अजून तेथे उभी आहे. तोक्योला तर मी एका सहा मजली इमारतीच्या गच्चीवर अशी एक झोपडी बघितली !

ही झोपडी अतिशय साधी असते. जमिनीवर तातामी, वर कौलांऐवजी गवत, आणि आतल्या भिंती कागदाच्या–अशी तिची रचना असते. पण या साधेपणात भिकारपणा किंवा कंजूषपणा नसतो. उच्च प्रकारची अभिरुची यातून व्यक्त होत असते.

आतले वातावरण एकदम शान्त असते. ते इतके शान्त असते की, खरोखर वर्तमान क्षणाला आदी नाही व अंत नाही असेच वाटायला लागते.

चा-नो-यू साठी दोघातिघांनीच बसायचे असते. तिघांहून अधिक लोकांनी बसणे म्हणजे गर्दी करण्यासारखे आहे आणि जसा धावपळीला येथे अवकाश नसतो तसा गर्दीलाही नसतो.

झोपडीच्या आत शिरण्यापूर्वी बाहेर दगडाच्या एका वेड्यावाकड्या भांड्यात ठेवण्यात आलेल्या पाण्याने तोंड व हात धुवून घ्यावे लागतात. मग एका छोट्या

दरवाजातून वाकून आत प्रवेश करावा लागतो. चा-नो-यू साठी येणाऱ्या व्यक्तीला नम्रतेची दीक्षा प्रथम येथेच मिळते.

आपण आत जाऊन स्वस्थ बसतो आणि 'चा-जीन'च्या हालचाली बघत राहतो. चा-जीन म्हणजे या चहापानविधीचा यजमान. जपानच्या सांस्कृतिक जीवनात चा-जीन म्हणजे एक मोठे प्रस्थ आहे. तो जपानी अभिरुचीचा निर्णायक आहे. शतकानुशतकांच्या खोल चिंतनानंतर जपानच्या संवेदनक्षम चिंतकांनी अभिरुचीचे जे मापदंड तयार केले त्यांचा तो जाणकार मानला जातो. जपानचे वास्तुशास्त्रज्ञ, चित्रकार, बागा निर्माण करणारे कलाकार सर्वच जण म्हणे प्रत्येक लहानसहान गोष्टीत त्याचा सल्ला नेहमी घेत असतात. एवढेच नव्हे तर दैनंदिन जीवनातल्या सर्व वस्तू– म्हणजे, स्वयंपाकघरात वापरायची भांडी कोणत्या प्रकारची असावीत, त्यांचा आकार व रंग कसा असावा, भिंतीला लावण्यात येणारा कागद कोणत्या प्रकारचा असावा, त्याच्यावर कोणत्या रंगाची चित्रे असावीत, कप-बशा, चटया, टोपल्या, बाटल्या, ज्या ज्या वस्तूत जपानची विशिष्ट अभिरुची प्रकट होत असते त्या निर्माण करतानादेखील म्हणे या 'चा-जीन'चा सल्ला घेतला जातो. जपानच्या सांस्कृतिक जीवनामध्ये त्याला एवढे मोठे स्थान आहे. अशा व्यक्तीच्या यजमानपणाखाली आपण या चा-नो-यू विधीचा अनुभव घेत असतो.

समारंभाच्या आरंभापासून शेवटपर्यंत चा-जीनच्या हालचाली जणू एखाद्या छंदासारख्या चालतात. शेगडी पेटविणे, आतल्या खोलीत जाऊन चहा बनविण्याची भांडी आणणे, किटलीत पाणी टाकणे, भांडी पुसणे, चहा तयार झाल्यावर तो आपल्यासमोर आणून ठेवणे या सर्व गोष्टी तो इतक्या सावकाश व शानदारपणे करीत असतो की, त्या बघताना धावपळीच्या वातावरणात राहून आलेले आपले मन आपोआप निःस्तब्ध होते, आणि आपण एका वेगळ्याच प्रकारच्या वातावरणात जाऊन पोहोचतो. मन शांत व उप-शांत करणे हा या समारंभाचा हेतू आहे. येथे इतकी शांतता नांदत असते की शेगडीवरचे पाणी उकळू लागले म्हणजे त्याच्या आवाजातदेखील एक प्रकारचे संगीत आपल्याला आढळून येते. येथे सामान्यपणे कुणीही बोलत नसतो आणि कुणाला बोलावेसे वाटले तर तो अत्यंत हळू आवाजात बोलतो. बोलण्याचा विषयदेखील दैनंदिन जीवनाशी संबंध नसलेला असतो. हवेच्या, पाण्याच्या, काव्याच्या, किंवा अशाच प्रकारच्या मनाला वेगळ्या जगात नेणाऱ्या गोष्टी बोलायच्या असा संकेत आहे. पूर्वीचे सामुराई म्हणे या वातावरणात लढाईच्या गोष्टी विसरून जायचे. एवढेच नव्हे तर एखाद्या खुनी इसमालादेखील म्हणे या वातावरणात आपल्याजवळ बसलेल्या इसमाचा आपल्याला खून करायचा आहे याची विस्मृती पडायची.

चा-नो-यू च्या या समारंभात जी भांडी वापरली जातात त्या प्रत्येक भांड्याला नाव असते. इतिहास असतो. ज्या पात्रात आपल्याला चहा दिला जातो त्याचा रंग व आकार यांतदेखील एक प्रकारची नैसर्गिकता असते. क्योतोमधील बागा ज्या नैसर्गिकतेच्या तत्त्वाला अनुसरून निर्माण करण्यात आल्या आहेत त्याच तत्त्वाला अनुसरून या पात्रांचीही निर्मिती झाली आहे असे वाटते. त्यांच्या ओबडधोबडपणात एक प्रकारचे सौंदर्य असते; ते न्याहाळून प्रशंसोद्‌गार काढायचे अशी आपल्याकडून अपेक्षाही बाळगली जाते. या पात्रांची किमतही कल्पना करता यायची नाही इतकी भरमसाट असते. मला असले एक पात्र भेट म्हणून मिळाले होते. त्याची किंमत नऊ हजार येन म्हणजे जवळ जवळ १८० रुपये होती.

चा-नो-यू चा हा विधी म्हणजे जपानची एक प्रकारची राष्ट्रीय साधना आहे. तिचे महत्त्व किंवा तिचा प्रभाव प्रत्यक्ष अनुभव घेतल्यावाचून आपल्याला कळायचा नाही.

क्योतोला आम्ही कोकेदेरा नावाचीही एक बाग बघितली. या बागेत चाळीस-पन्नास जातींचे शेवाळ आणून लावले आहे. तेथे चा-नो-यू ची एक झोपडी आहे. त्या झोपडीच्या खिडक्यांमधून जेव्हा मी ती बाग बघितली तेव्हा चा-नो-यू ला तेथे बसणाऱ्या लोकांना कसे वाटत असेल याची मी कल्पना करू शकलो. जपानी लोकांच्या सौंदर्य-बुद्धीच्या परमोत्कर्षाचा आविष्कार क्योतोमध्ये झालेला आपल्याला पावलोपावली आढळून येतो.

आज क्योतो हे जपानच्या चार मोठ्या शहरांपैकी एक आहे. पण या शहराचे वातावरण जपानच्या इतर सर्व शहरांपेक्षा सर्वस्वी निराळे आहे. जपानच्या इतिहासातला एक कामाकुरा-काळ सोडला तर सन ७९४ पासून १८६८ पर्यंत जपानचे राजकीय व सांस्कृतिक केन्द्र क्योतो हेच होते. त्यामुळे जपानच्या संस्कृतीमध्ये जे जे काही सुरेख व मौलिक आहे ते सर्व आपल्याला येथे पाहावयास मिळते. १८६८ नंतर जपान एक आधुनिक राष्ट्र बनले. पण क्योतोला त्याची बाधा झाली नाही. एवढेच नव्हे तर क्योतो ‘जुनेही’ झाले नाही. क्योतोच्या इतिहासाला ‘अवशेषा’च्या रूपाने वेगळे काढणाऱ्या कोणत्याच तत्त्वाचा येथे प्रवेश होऊ शकला नाही. क्योतो जुनेही आहे, नवेही आहे. जुने व नवे यांचा मधुर संगम येथे जेवढा झाला आहे तेवढा जपानमध्ये इतरत्र कुठे पाहावयास मिळत नाही. जपानने औद्योगिकीकरणाची आघाडी गाठली. पण क्योतोच्या लघु-उद्योगांना त्याची झळ बाधू दिली नाही. आजदेखील येथे निशिजीन रेशमाचे पूर्वीप्रमाणेच उत्पादन होते. अजूनही चिनी मातीची भांडी येथे पूर्वीप्रमाणेच तयार होत असतात. अजूनही इथल्या बाहुल्या गेयशा मुलींइतक्याच आकर्षक वाटतात.


क्योतोला आपली दृष्टी सर्वप्रथम इथल्या स्त्रियांवर खिळते. जपानमधल्या साऱ्या उर्वशी व मेनका जणू येथे येऊन राहिल्या आहेत असा आपल्याला भास होतो. त्यांची मोहक वागणूक त्यांच्या भाषेतूनही प्रतिबिंबित होत असते, आणि त्यांच्या किमोनोच्या अभिरुचीतूनही प्रकट होत असते. जपानी स्त्रियांच्या पोशाखाला आज पाश्चात्त्य वळण लागले आहे; पण क्योतोला किमोनोधारी स्त्रिया मुबलक प्रमाणात पाहावयास मिळतात. त्यांना पाहिल्याबरोबर क्योतोतल्या दुकानातल्या बाहुल्याच जणू जिवंत होऊन चालायला लागल्या आहेत असे वाटायला लागते. क्योतो ही गेयशांची नालंदा आहे; पण गेयशांच्या सौंदर्याचा ठसा इथल्या बहुतेक स्त्रियांवर उमटल्यासारखा दिसतो. येथे जितक्या सुंदर, मोहक व सालस स्त्रिया मी पाहिल्या तशा जपानमध्ये मला इतरत्र कुठे आढळल्या नाहीत.

क्योतो पाहण्याची एक रीत आहे. इतर प्रेक्षणीय स्थळे जशी आपण पाहतो तसे क्योतो बघायचे नसते. क्योतो-दर्शनाचा खराखुरा आनंद अनुभवायचा असल्यास आपण येथे येऊन राहिले पाहिजे. जणू इथलेच आहोत या भावनेने राहिले पाहिजे. क्योतोच्या मेयरने तशी आपल्यासाठी सोय केली आहे. आपण दोन दिवस अगाऊ सूचना दिली पाहिजे. म्हणजे मग क्योतोच्या संस्कृतीत वाढलेल्या एखाद्या कुटुंबामध्ये आपली सोय होते. येथे शुद्ध जपानी पद्धतीची आरामगृहेही आहेत. येथे आपण जपानी बनून राहिलो तरच क्योतो आपले अंतरंग आपल्यासमोर प्रकट करते. मग इथल्या जुन्या गल्ल्यादेखील आपल्यापाशी बोलायला लागतात. इथल्या भाषेचीदेखील लकब चटकन आपल्या लक्षात येते. क्योतोची जपानी ही जपानची प्रमाणभाषा आहे. तिचे स्वतःचे असे एक माधुर्य आहे. जपानी भाषा न समजणाऱ्या इसमालादेखील हे माधुर्य जाणवते.

खरोखर, जपानचे अभिजात जपानीपण अनुभवायचे असल्यास क्योतोलाच आले पाहिजे. क्योतोचे नाव उच्चारल्याबरोबर जपानी माणूस का खुलतो हे तेव्हाच आपल्या लक्षात येईल. येथे जपानी संस्कृतीची सर्व वैशिष्ट्ये-मंदिरे, बागा, नृत्य, नाट्य, संगीत– त्यांच्या अभिजात स्वरूपात आपल्याला पाहावयास मिळतात. जपानी माणसाला आपल्या जपानीपणाचा अभिमान बाळगण्याचा अधिकार आहे असेच आपले मत बनते.

हिमालयातल्या गंगोत्रीहून परतल्यावर जे समाधान मी अनुभवले होते तशाच प्रकारचे समाधान क्योतो पाहिल्यावर मी अनुभवले. आता दुसरे काही बघण्याची आवश्यकता राहिलेली नाही. जपानमध्ये जे जे बघण्याजोगे होते, त्यांतले सर्वांत सुंदर स्थळ मी आज बघितले असे मला आता वाटायला लागले.

थोड्याच दिवसांनंतर मी जपान सोडले.



## : २९ : सत्त्वशील गतिमान संस्कृती

जपानच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये आतापर्यंत तीन मोठ्या उलथापालथी झाल्या. त्यांतल्या एका उलथापालथीची – मेईजी क्रांतीची – थोडीशी माहिती मी पूर्वीच्या एका प्रकरणात दिली आहे. त्या क्रांतीतून जुने, सरंजामशाहीत खितपत पडलेले जपान संपूर्णतः नष्ट होऊन नवीन, महत्त्वाकांक्षी व पुरुषार्थी जपान जन्माला आले. या क्रांतीला नुकतीच शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत.

या क्रांतीपूर्वी जपानच्या जीवनात तेवढीच मोठी दुसरी एक क्रांती सहाव्या शतकात झाली होती. कालक्रमानुसार ती जपानच्या जीवनातली पहिली डोळस क्रांती आहे. त्या क्रांतीचा प्रणेता शोनोकू नावाचा केवळ एकोणीस वर्षे वयाचा एक राजकुमार होता. जपानची शक्ती कुठे आहे, हे समजून घेण्याच्या दृष्टीने या क्रांतीचीसुद्धा थोडीशी माहिती करून घेणे, नितान्त आवश्यक आहे.

जपानमध्ये जो बौद्ध धर्म आला तो प्रथम जपानच्या सम्राटाला दक्षिण कोरियातल्या एका राजाची ‘ भेट ’ म्हणून आला. कोरियाहून त्या वेळी एक शिष्ट-

मंडळ काही बौद्ध भिक्षूंना बरोबर घेऊन जपानला आले. येताना ते बरोबर भगवान बुद्धाची एक मूर्ती व काही बौद्ध धर्मग्रंथ घेऊन आले. या 'भेटी'बरोबर दक्षिण कोरियाच्या राजाचे जपानच्या सम्राटाच्या नावे एक पत्र होते. त्या पत्रात लिहिले होते :

"हा धर्म समजण्यास कठीण आहे. आचरणात आणायला त्याहूनही कठीण आहे. पण तो सर्वोत्तम धर्म आहे. चीनमधल्या मोठमोठ्या विद्वानांनादेखील त्याचे पूर्ण आकलन झालेले नाही. परंतु तो सुदूर भारतातून येथे आलेला आहे; आणि भारत व कोरिया या दोन देशांमधल्या भूखंडात जेवढे देश आहेत त्या देशांतील सर्व लोकांनी या धर्माचा स्वीकार केला आहे. कुणीही त्याच्या प्रभावाच्या बाहेर राहू शकलेला नाही."

जपानी लोकांच्या मनावर या भेटीचा चांगलाच प्रभाव पडला, व ते आश्चर्याने व कुतूहलाने बुद्धाच्या मूर्तीकडे व तिच्या पूजेच्या सोपस्काराकडे पाहू लागले. काही काळानंतर कोरियाहून अनेक धर्मप्रचारक जपानला येऊ लागले. स्वाभाविकपणे प्रारंभी प्रारंभी त्यांना थोडासा विरोध झाला. परंतु धर्माबरोबर चिनी भाषा, चिनी लिपी, साहित्य, वैद्यकी शास्त्रांसारखी काही शास्त्रे पाहून गतानुगतिक लोकदेखील हळूहळू त्यांच्या प्रभावाखाली येऊ लागले. जपानच्या परंपरागत संस्कृतीपेक्षा ही नवी संस्कृती श्रेष्ठ आहे याची उत्कट जाणीव जपानी लोकांना होऊ लागली.

अशा वेळी राजकुमार शोतोकूने जपानची राज्यसूत्रे आपल्या हाती घेतली, आणि त्याने या साऱ्या सांस्कृतिक 'आक्रमणा'ला अत्यंत दूरदर्शित्वाने इष्ट ते वळण लावले.

तो स्वतः वृत्तीने धार्मिक होता. त्यामुळे बौद्धधर्माचा तर त्याने ताबडतोब स्वीकार केलाच; परंतु त्याचबरोबर त्याने या धर्माला आपल्या राज्याचाही पाठिंबा दिला. जपान हे त्या दिवसापासून बौद्ध राष्ट्र बनले. आज जे शहर ओसाका या नावाने ओळखले जाते तेथे त्याने 'तेन्नोजी' नावाचे एक मंदिर उभारले, आणि या मंदिरासभोवती धर्मशाळा, दवाखाना, हॉस्पिटल अशा प्रकारच्या काही संस्थाही चालू केल्या. एवढेच नव्हे तर बौद्ध धर्माचे अध्ययन करणाऱ्यांसाठी एक केन्द्रही उघडले, आणि बौद्ध भिक्षूंना शिक्षण देण्याची व्यवस्थाही केली. ओसाका हे स्थान यासाठी निवडण्याचे मुख्य कारण म्हणजे ते जपानचे त्या वेळचे एक महत्त्वाचे प्रवेशद्वार होते. सारांश, सर्व-प्रथम बौद्धधर्माची त्याने स्वतःही दीक्षा घेतली आणि नंतर राष्ट्रालाही दिली.

एवढे करून तो थांबला नाही. त्याने लगेच चीनशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्याने 'सूर्योदयाच्या देशा'च्या राजाचे 'सूर्यास्ताच्या देशा'च्या राजाला पत्र देऊन आपला एक खास दूत चीनच्या दरबारात पाठवून दिला.

हे संबंध प्रस्थापित करण्यामागे त्याचा हेतू अर्थात एकच होता – चीनकडून जे जे काही शिकण्याजोगे आहे ते सर्व आपल्याला शिकता यावे हाच होय. चीनला शोतोकूची वृत्ती जरा उर्मट वाटली. विशेषतः स्वतःला 'सूर्योदया'च्या देशाचा राजा लेखणे व चीनच्या बादशहाला सूर्यास्ताच्या देशाचा राजा मानणे हे आवडले नाही. चीनच्या बादशहाने शोतोकूला तशाच प्रकारचे उर्मट उत्तर पाठविले.

शोतोकूच्या मनात चीनचा अपमान करण्याचा हेतू मुळीच नव्हता; पण चीन आपल्या शेजाऱ्यांना नेहमीच कमी लेखीत आले आहे हे त्याला ठाऊक होते. त्याचा आग्रह चीनने जपानला समानतेने वागवले पाहिजे हाच होता. चीनकडून शिकण्याजोगे पुष्कळ असले, आणि ते सर्व त्याला विनम्र होऊन शिकून घ्यायचे असले, तरी मिंधेपणा स्वीकारायला तो तयार नव्हता. त्याने समानतेचा अधिकार चीनकडून कबूल करून घेतला आणि राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर ताबडतोब त्याने काही विद्यार्थी चीनला रवाना केले. ते तेथे जे जे काही शिकण्याजोगे होते ते सर्व उत्साहाने शिकू लागले, आणि शिकून झाल्यावर जपानला येऊन तेवढ्याच उत्साहाने जपानच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या कामाला लागले. शोतोकूने काही चिनी विद्वानांनादेखील पाचारण करून आपल्या मदतीला आणले, आणि अशा प्रकारे जपानचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन अल्पावधीत आमूलाग्र बदलून टाकले. जपानने जणू कायाकल्पच करून घेतला. जुन्या सांस्कृतिक आदर्शांना कायमची तिलांजली दिली, आणि नव्या आदर्शांचा स्वीकार करून आपली जीवनयात्रा पुढे चालविली.

जपानमध्ये वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला, साहित्य वगैरे अनेक कलांचा जो विकास झाला तो बहुतेक सर्व शोतोकूच्या या क्रान्तीनंतरचा आहे.

शोतोकूने केवळ तीसच वर्षे राज्य केले. वस्तुतः तो राजा नव्हता. राज्य चालत असे त्याच्या चुलतीच्या नावाने; पण राज्याची सर्व सूत्रे शोतोकूच्या हाती होती. त्याने आपल्या तीस वर्षांच्या कारकीर्दीत सांस्कृतिक पुनरुत्थानाचे एवढे मोठे कार्य केले की तो आज जपानी संस्कृतीचा आद्य संस्थापक मानला जातो.

नाराला मी त्याचे होरियुजी मंदिर बघायला गेलो होतो. तेथूनच तो बहुतेक राज्याची सारी सूत्रे हलवायचा. या होरियुजी मंदिरात युमे-दोनो नावाची एक अष्टकोनी इमारत आहे. या इमारतीत म्हणे तो ध्यानासाठी बसायचा. तेथे जी अवलोकितेश्वराची मूर्ती आहे तीदेखील म्हणे त्याने स्वतःच बनविली होती. त्याने 'सद्धर्म पुंडरिक' ग्रंथावर एक भाष्यही लिहिले आहे. जपानमध्ये लिहिले गेलेले ते बहुधा पहिलेच पुस्तक असावे. आज चौदा शतके लोटली तरी जपानी लोक अजूनही त्याची आठवण काढीत असतात.

ते कसेही असो, शोतोकूच्या या क्रांतीत जपानचे सर्वांत मोठे असे एक वैशिष्ट्य दिसून आले ते हे की, हे राष्ट्र एक प्राणवान राष्ट्र आहे. ते बाहेरून जे जे काही घेण्याजोगे असते ते ते सर्व घेत असते. डोळे उघडे ठेवून आणि अगदी मोकळ्या मनाने घेत असते. पण ते घेतल्यावर ते त्याच्यावर आपले संस्कार करते. त्याला इष्ट ते वळण देऊन त्याचे संपूर्ण जपानीकरण करून टाकते. आज जपानमध्ये जो बौद्धधर्म प्रचलित आहे तो त्याच्या भारतीय किंवा चिनी आवृत्तीहून सर्वस्वी निराळा आहे. तो जपानी बौद्धधर्म आहे. येथे जो ' झेन ' संप्रदाय चालतो तोदेखील मूळ चिनी आहे; पण तो आज चिनी राहिलेला नाही, खास जपानी बनला आहे. जपानने जे जे काही चीनकडून घेतले – मग ती वास्तुकला असो, शिल्पकला असो, चित्रकला असो, किंवा कन्फूशियसचे नीतिशास्त्र असो – त्यांतले आज काही एक चिनी राहिलेले नाही सर्व जपानी बनले आहे. हे राष्ट्र केवळ अनुकरण करणारे नाही. त्याच्यापाशी स्वतःचे असे एक सत्त्व आहे. हे सत्त्व जपानकडे नसते तर ते शोतोकूच्या काळीच चीन बनले असते; जपान राहिले नसते.

जपानची ही शक्ती त्यानंतर अनेक शतकांनी मेइजी क्रान्तीच्या वेळी पुन्हा एकदा प्रत्ययाला आली. या क्रान्तीच्या वेळी जपानने जणू आपला जुना इतिहास, आपली जुनी संस्कृती – सर्व काही सोडून दिले आणि नवजीवन प्राप्त करून एक नवे राष्ट्र म्हणून ते पुढे आले. मेइजी क्रांतीमुळे जुने जपान कालवश झाले आणि नवे जपान जन्माला आले. त्याने आपली जुनी समाजरचना संपूर्णतः बदलून टाकली. बदलू दिला नाही किंवा सोडला नाही तो केवळ आपला प्राण. तो शाबूत ठेवला. जपानच्या सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय इतिहासाचे चिंतन करणारे मनीषी म्हणू लागले की, जपानने केवढाही मोठा कायापालट केला तरी त्याचा प्राण कायमच राहतो. तो काही केल्या नष्ट होत नाही.

आज जपानमध्ये एक तिसरी क्रांती चालू आहे. मेइजी क्रांतीतून सहीसलामत पार पडल्यानंतर जपान एक आधुनिक राष्ट्र बनले. त्यामुळे त्याला जागतिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. या प्रतिष्ठेमुळे जपानचा आत्मविश्वास वाढला व त्याने चीन व रशिया यांच्या विरुद्ध अनुक्रमे सन १८९४ व १९०४ च्या आसपास युद्ध पुकारले. या युद्धात त्याला विजय मिळाला. विजयाच्या उन्मादात ते अंध झाले आणि साऱ्या आशिया खंडावर आपले साम्राज्य पसरविण्याची स्वप्ने पाहू लागले. याच्यातूनच त्याने युरोप व अमेरिका विशेषतः अमेरिका– यांचे शत्रुत्व ओढवून घेतले, आणि दुसऱ्या महायुद्धात पराजयाचा अत्यंत कटू अनुभव पदरी पाडून घेतला.

आतापर्यंत जपानने कधीच दुसऱ्या बलाढ्य राष्ट्रापुढे शरणागती पत्करली नव्हती.

आशिया खंडातले हे एकच राष्ट्र असे आहे की, जे कधी दुसऱ्या राष्ट्राचे गुलाम बनले नव्हते. दुसऱ्या महायुद्धात पराजय प्राप्त केल्यानंतर अमेरिकेची गुलामी पत्करण्याचे त्याच्या नशिबी आले. जणू जपानच्या इतिहासविधात्याने जपानला नव्या 'मिशन'-साठी तयार करण्याच्या इराद्याने त्याच्यावर हे एक नवे संकट पाठवून दिले.

परंतु जपानमध्ये जो एक अदम्य प्राण आहे त्याच्यामुळे एवढे मोठे संकट कोसळलेले असूनदेखील ते निराश किंवा हताश झाले नाही. सहा-सात वर्षांच्या आत स्वतंत्र झाल्याबरोबर त्याने पुन्हा डोके वर केले आणि आपली विजययात्रा पुढे चालविली. त्याने आपली आर्थिक प्रगती इतक्या झपाट्याने करून घेतली की, हां हां म्हणता फ्रान्स, इटाली, इंग्लंड यांसारख्या देशांना त्याने मागे टाकले. अमेरिका, रशिया व पश्चिम जर्मनी हे देश सोडले तर जपान आज जगातल्या इतर कोणत्याही देशापेक्षा औद्योगिक दृष्ट्या मोठा देश आहे. जहाज-बांधणीच्या क्षेत्रात जपानचा हात धरणारा जगात दुसरा देश नाही. जगातले अत्यंत विकसित असे अमेरिका, रशिया व पश्चिम जर्मनी हे तीन देश मिळून जेवढी जहाजे बांधतात त्यांच्याहून अधिक एकटे जपान बांधत असते. टेलेव्हिजन व ट्रांझिस्टर यांच्या उत्पादनाच्या बाबतीत जपानचा क्रमांक जगात पहिला आहे. मोटारगाड्या व ट्रक यांच्या उत्पादनाच्या बाबतीत दुसरा. लोखंडाच्या बाबतीत तिसरा व वीजउत्पादनाच्या बाबतीत चौथा आहे.


आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिका या खंडांतल्या दुसऱ्या अविकसित देशांशी या प्रगतीची तुलना केली तर ती डोळ्यांत अधिक भरते. उत्पादनाच्या बाबतीत चीनचे सत्तर कोटी लोक जेवढे उत्पादन करतात तेवढेच जपानचे केवळ दहा कोटी लोक करीत असतात. दक्षिण अमेरिकेतल्या सर्व राष्ट्रांच्या एकंदर उत्पादनाच्या मानाने जपानचे उत्पादन अधिक आहे; तर आफ्रिकेतल्या सर्व राष्ट्रांच्या तुलनेने दुप्पट आहे. आपल्या भारताच्याही तुलनेने दुप्पट आहे.

जगातली सर्व राष्ट्रे आपल्या प्रगतीचा वेग कसा वाढवावा याची चिंता वाहतात. जपानच्या पुढे आपल्या प्रगतीचा वेग जास्त वाढू न देता स्थिर कसा करावा ही विवंचना आहे.

इतकेही असून किंबहुना असेही म्हणता येईल की, या प्रगतीमुळेच काही जण आता म्हणू लागले आहेत की, जपान आता जपान राहिलेले नाही. जपानमध्ये खेडोपाडी जे नवजीवन आज प्रकट होऊ लागले आहे त्याच्यात केवळ अमेरिकेचे अनुकरणच दिसून येते. जपानी जीवन आता कुठेच दिसत नाही. जपानचे जे सत्त्व होते ते जणू नष्ट झाले आहे. पोशाखापासून जीवनमूल्यांपर्यंत आजच्या जपानपुढे आदर्श अमेरिकेचा आहे.

संगीत, नृत्य, केसांची ठेवण, कौटुंबिक जीवन, सामाजिक किंवा राजकीय आदर्श सर्वच बाबतींत जे जे अमेरिकन आहे ते ते सर्व जणू आदर्श आहे असे येथे मानले जाते आणि त्याचे उत्साहपूर्वक अनुकरण केले जाते. एवढेच नव्हे तर अमेरिकेच्या ज्या काही विकृती आहेत त्यादेखील जपानी जीवनामध्ये घुसल्या आहेत. धर्माच्या बाबतीत आजचा जपानी तरुण संपूर्णतः उपेक्षाधर्मी आहे. वैवाहिक जीवनामध्ये नाही म्हटले तरी थोडे शैथिल्य आलेच आहे. नाइट क्लब, काबारे वगैरेंची संख्या अतोनात वाढली आहे. फार कशाला, अमेरिकन ' हिप्पी 'चीदेखील एक जपानी आवृत्ती निघाली आहे. जपानच्या म्हणता येतील अशा राहिल्या आहेत त्या फक्त तीन गोष्टी – जपानची भूमी, जपानी वंशपरंपरा व जपानी भाषा. बाकी सर्व झपाट्याने नष्ट होत चालले आहे.

हीदेखील एक प्रकारची क्रांतीच आहे. प्रचंड उलथापालथ आहे. शोतोकूच्या वेळी किंवा मेइजी काळात जपानी जीवनामध्ये ज्या प्रकारचे संक्रमण दिसून आले होते त्याच प्रकारचे संक्रमण आजच्या जपानमध्ये दिसून येते. याच्यातून कोणत्या प्रकारचे जपान जन्म घेईल हे आज सांगता यायचे नाही. तरीही काही समाजशास्त्रज्ञ आजच्या जपानी जीवनाचे खोल निरीक्षण करून सांगत असतात की, एवढ्या मोठ्या आमूलाग्र परिवर्तनातदेखील जपानचा प्राण, जपानचा आत्मा, जपानचे सत्त्व कायम आहे. एवढेच नव्हे तर त्याची वाढही होत चालली आहे. मेइजी काळापूर्वीचा जपान पाहिलेला एखादा आत्मा पुन्हा अवतरला तर तो आजचे तोक्यो पाहून कदाचित स्तंभितही होईल. परंतु जपानी लोकांची सौंदर्यबुद्धी – त्यांचा रंगाविषयीचा पक्षपात, सुंदर वस्तूंच्या सभोवतालच्या विरलतेचा त्यांचा आग्रह, बागांविषयीची त्यांची आसक्ती इकेबाना, चा-नो-यु, ओ-नोह किंवा काबुकी नाटके वगैरे पाहून त्याला निराळ्या ठिकाणी पोहोचल्यासारखे वाटायचे नाही. हे सर्व अजून शाबूत आहे. नव्हे, आता विदेशांतील लोकांवरदेखील प्रभाव पाडू लागले आहे. एवढेच की, जपानचे जपानीपण आता भूतकालात स्वतःला बांधून ठेवू शकणार नाही. ते भविष्याची यात्रा करू लागले आहे. ज्याच्यात गती नाही, परिवर्तनाची क्षमता नाही, जे बदलत नाही, वाढत नाही, ते जड आहे. जपान जड नाही. त्याच्यामध्ये पुरुषार्थाचे चैतन्य आहे आणि म्हणूनच इतिहासाच्या प्रारंभकालापासून आतापर्यंत त्याच्या संस्कृतीची धारा आपले सत्त्व सांभाळून अखंड वाहात आली आहे. भूतकालाचा कोणताच बांध तिला थोपवू शकणार नाही; आतापर्यंत थोपवू शकलेला नाही.



## : ३० : सायोनारा

जपान सोडताना जीव जडावला. दोन महिन्यांपूर्वी प्रथमच येथे आलो त्या वेळी नियॉनच्या नाना रंगांच्या झगमगाटाने जरी माझ्या नजरेवर मोहिनी पडली असली तरीही मनात एक प्रकारची हुरहूर वाटली होती. मी एका अज्ञात प्रदेशात प्रवेश करीत आहे याची मला जाणीव होत होती. हा कोणत्या प्रकारचा देश असेल, कोणत्या प्रकारच्या लोकांशी माझी गाठ पडेल, कसलाच परिचय नाही, येथे माझे कसे होईल, अशा प्रकारच्या भीतीने – नाही म्हटले तरी – जीव जरा घाबराघुबरा झाला होता. आज दोन महिन्यांनंतर जेव्हा मी येथून स्वदेशी यायला निघालो तेव्हा जणू जन्मजन्मांतरीच्या इष्ट-मित्रांना, सोयऱ्या-धायऱ्यांना सोडून मी चाललो आहे असे वाटायला लागले! मला पोहोचवायला हानेडा विमानतळावर अनेक मित्र आले होते. त्यांतले एक नरेश मंत्री सोडले तर बाकीचे सर्व दोन महिन्यांपूर्वी अगदीच अपरिचित होते. पण आज ते सर्व माझे आत्मीय बनले होते! मला खात्री आहे की, त्यांचीदेखील

अंतःकरणे माझ्याप्रमाणेच हालली होती. मला 'गीताञ्जली'तली एक कविता आठवली—

'कत अजानारे जानाइले तुमि
कत घरे दिले ठाँइ—
दूरके करिले निकट, बंधु,
परके करिले भाइ।

या सर्वांना जोपर्यंत भेटणे शक्य होते तोपर्यंत भेटलो आणि शेवटी जड अंतःकरणाने सर्वांचा निरोप घेऊन निघालो.

विमान सुटायला अजून दहा मिनिटांचा अवकाश होता. पण या दहा मिनिटांत माझ्या मनात विचारांचे केवढे मोठे काहूर माजले! काही दिवसांपूर्वी मला घरून पत्र आले होते. त्यात लिहिले होते– "येथील वर्तमानपत्रांत वाचले की, तेथे एक मोठे वादळ येऊन अनेक घरे उडून गेली व शेकडो लोक मेले. तेव्हा आता लवकर या."

आणि मी इथल्या वर्तमानपत्रांत काय वाचले होते? "भारतात उपासमारी व बेकारी इतकी वाढली आहे की, लोक आता कंटाळून जीव देऊ लागले आहेत!"

उभय देशांतील लोकांना परस्परांविषयी माहिती असावी ती एवढीच ना?

तोक्योला मला जपानमध्ये पंधरा-पंधरा वर्षे राहिलेले काही भारतीय भेटले. मी त्यांच्यापैकी अनेकांना विचारले, 'तुम्ही देशी भाषेत जपानवर एखादे पुस्तक लिहिले आहे का? एखाद्या जपानी पुस्तकाचा अनुवाद तरी तुम्ही देशी भाषेत केला आहे का?' बहुतेकांनी माझ्याकडे जणू 'आमचे हे कामच नव्हे' अशी मुद्रा करून पाहिले! पण त्यांना तरी दोष का देऊ? तोक्योला जी आपली 'ॲम्बसी' आहे तेथे जपानी भाषेचे जाणकार कितीसे आहेत? आपल्या ॲम्बसीतली माणसे सज्जन आहेत. हुशार आहेत. पण बहुतेकांनी आपली जपानविषयक जिज्ञासा इंग्रजी पुस्तकांद्वारा भागविली आहे! जपानवर इंग्रजीत उत्तम पुस्तके अहेत यात शंकाच नाही. पण ती वाचून माझे स्पष्ट मत बनले आहे की, जपानला नीट समजून घ्यायचे असेल तर इंग्रजी आपल्याला मुळीच उपयोगी पडायचे नाही. त्यासाठी आपल्याला जपानी भाषाच अवगत करून घ्यावी लागेल.

याच्या उलट रशियन ॲम्बसी बघा! तिथला फर्स्ट सेक्रेटरी जपानी भाषेचा उत्तम जाणकार आहे. अमेरिकेचा राजदूत तर स्वतःच जपानीचा तज्ज्ञ आहे. काही वर्षांपूर्वी ॲडविन रैशावर अमेरिकेचे राजदूत म्हणून येथे होते. ते तर अगदी 'जपानी'च मानले जात असत.

मला लगेच प्रो. दोईंची आठवण झाली. भारतीय 'अँबसी'मध्येच त्यांची व माझी भेट झाली होती. केवढे त्यांचे हिन्दीचे ज्ञान! माझी त्यांच्याशी तासभर चर्चा झाली. माझ्या हिन्दीत मधून मधून इंग्रजी शब्द यायचे, पण त्यांच्या हिन्दीत चुकूनदेखील एक इंग्रजी शब्द मला आढळून आला नाही. त्यांची ती शुद्ध हिन्दी ऐकून हे गृहस्थ जपानी आहेत हे काही केल्या मला पटेना. केवळ दोनच वर्षे ते अलाहाबादला राहिले होते. (ते अलाहाबादला चुकूनदेखील अलाहाबाद म्हणत नसत. 'प्रयाग' म्हणत असत.)

ते काकासाहेबांना भेटायला आले त्या दिवशी नारळीपौर्णिमा होती. सरोजबेननी आमच्या सर्वांच्या हाताला राखी बांधली होती. ती पाहून प्रो. दोई विचारू लागले. 'अच्छा! कब रहा रक्षाबन्धन?'

म्हणजे यांना हिन्दी भाषाच नव्हे, हिन्दी संस्कृतीचीही चांगली ओळख आहे म्हणायची! भाषा शिकायची म्हणजे ज्या संस्कृतीवर तिचे पोषण झाले आहे ती संस्कृतीही शिकून घेतली पाहिजे, अशा आग्रहाने त्यांनी हिंदीचे अध्ययन केले आहे. त्यांनी प्रेमचंद यांच्या 'गोदान' या कादंबरीचे जपानीत भाषान्तर केले आहे. किती खपले असेल? तीन लाख प्रती!

त्यांना म्हणे एकदा आपल्या 'साहित्य अकादमी'ने विचारले, 'जपानी भाषेतल्या गेंजी मोनोगातारी या पुस्तकाचे हिन्दीत भाषान्तर करून द्याल का?'

प्रो. दोईंनी उत्तर पाठविले, 'हे माझे काम थोडेच आहे! मी हिन्दीचे जे अध्ययन केले आहे ते हिन्दीतली चांगली पुस्तके जपानीत आणायला. जपानी भाषेतली पुस्तके हिन्दीत यावी असे तुम्हांला वाटत असल्यास तुम्ही जपानी शिकून घ्या.'

हिन्दीची गोष्ट सोडूनच द्या. भारताची राष्ट्रभाषा म्हणून तिला प्रतिष्ठा प्राप्त झालीच आहे. त्या दृष्टीने जपानने हिन्दीचे अध्ययन केले तर ते आपण सहज समजू शकतो, पण जपानने गुजराती किंवा मराठीचे अध्ययन का करावे?

आम्हांला तोक्योला शिदासान नावाचे एक गृहस्थ भेटले होते. त्यांनी गुजरातीचे अध्ययन केले आहे. कविवर्य उमाशंकर जोशी यांचे ते चांगले मित्र आहेत. गांधीजींचे 'मंगल-प्रभात' हे छोटे पुस्तक त्यांचे एक अत्यंत प्रिय पुस्तक आहे. ते आम्हांला म्हणाले, 'या पुस्तकात जो धर्मविचार प्रकट झाला आहे त्यात बौद्ध, खिस्ती, हिन्दू—सगळे धर्म येऊन जातात!'

मी विचार करू लागलो, माझ्या पिढीतील सुशिक्षितांपैकी कितीशा लोकांना 'मंगल-प्रभात'चे असे मूल्यमापन करता आले आहे?

तोक्योला प्रो. नाकामुरा नावाचे एक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्राच्य-विद्या-विशारद आहेत. त्यांनी भारतीय संस्कृती, संस्कृत भाषा, हिन्दुधर्म वगैरे विषयांवर जपानी भाषेत अनेक निबंध-प्रबंध लिहिले आहेत.

पण मला तेथे आणखीन एक प्रो. नाकामुरा भेटले. ते तरुण होते. त्यांनी हिन्दीचे तर अध्ययन केलेच आहे, पण मराठी भाषेचेही करताहेत! मी त्यांना विचारले, 'का बुवा तुम्ही मराठीकडे कसे आकर्षित झालात?'

ते उत्तरले, 'लोकमान्य टिळकांवर मला एक प्रबंध लिहायचा होता. इंग्रजीत प्रसिद्ध झालेली त्यांच्यावरची अनेक पुस्तके मी वाचून काढली. तेव्हा माझ्या लक्षात आले की, लोकमान्यांना समजून घ्यायला मला मराठी शिकावेच लागेल.'

मग हळूच म्हणाले, 'मी मराठीचे अध्ययन सुरू केले. लोकमान्यांमुळे व लोकमान्यांसाठी. पण लोकमान्यांचे चरित्र वाचता-वाचता वासुदेव बळवंत फडक्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षिला गेलो. आता त्यांच्या जीवनावर मला संशोधन करायचे आहे.'

आणि मग मला विचारू लागले – 'वासुदेव बळवंतांविषयी तुम्हांला काही ठाऊक आहे का?'

मी त्यांना काय सांगू? वासुदेव बळवंतांचे नाव सोडून मला काहीच ठाऊक नाही म्हणून सांगू? मी त्यांना म्हणालो, 'तुम्ही आमच्या देशात या. महाराष्ट्रातल्या विद्वानांशी तुमची गाठ घालून देतो.'

पण या झाल्या विद्वानांच्या गोष्टी. तोक्योच्या 'एशिया-आफ्रिका लँग्वेज इन्स्टिट्यूट'मध्ये मला एका मुलीने प्रश्न विचारला, 'भारतीय जीवनमें नारीका क्या स्थान है?'

मी म्हटले, 'इंदिरा गांधीकी ओर देखकर खयाल करो.'

ती म्हणाली, 'मी जैनेन्द्रकुमार यांची 'त्यागपत्र' ही कादंबरी सध्या वाचते. त्यात त्यांनी मृणालचे जे चित्र रेखाटले आहे तशा प्रकारच्या स्त्रीची आम्ही येथे कल्पनादेखील करू शकत नाही.

मग मग भारतीय स्त्री, विधवांचे जीवन, अण्णासाहेब कर्व्यांसारख्या महर्षींचे सुधारणेचे कार्य, गांधींनी स्त्रियांमध्ये निर्माण केलेली जागृती वगैरे सर्व गोष्टी तिला समजावून सांगाव्या लागल्या.

जपानी भाषेतील एखाद्या कादंबरीतल्या नायकाविषयी आपण असा एखादा प्रश्न एखाद्या जपानी इसमाला विचारू शकतो काय? मला तरी जपानला जाण्यापूर्वी

एकाच जपानी लेखकाचे नाव माहीत होते. ते योने नोगुचीचे. तेही त्याने गांधीजींवर काही तरी लिहिले होते म्हणून. याच्यापलीकडे जपानी साहित्याविषयी किंवा लेखकांविषयी मला काहीएक माहिती नव्हती. कुठून असणार? युरोप–अमेरिका सोडून इतर ठिकाणी साहित्य किंवा साहित्यिक असू शकतात हे आपल्याला अजूनपर्यंत कुणी सांगितलेच नाही. आज इंग्रजीतूनच का असेना, पण तानिझाकी कावाबाता, ओसारागी, मिशिमा, दाझाय वगैरे काही जपानी लेखकांच्या रचना मला वाचावयाला मिळाल्या आणि यांतले काही लेखक तर जगातल्या समर्थ लेखकांपैकी आहेत असे माझे मत बनले! भारतात मला यांची माहिती कुणीच कशी सांगितली नाही? आशियातल्या देशांविषयी आपण इतके उदासीन कसे व का झालो? हे औदासीन्य आपण आणखी किती काळपर्यंत उराशी बाळगणार आहोत?

युरोप–अमेरिकेतील देशांविषयी आपल्याला जसे आकर्षण वाटत असते तसे आशिया–आफ्रिका या खंडांतल्या देशांविषयी का वाटत नाही?

ते कसेही असो, आपण आता आपले हे औदासीन्य सोडून दिलेच पाहिजे. आपल्याला ते परवडायचे नाही. जपानशी तर आपले संबंध उत्तरोत्तर वाढतच गेले पाहिजेत. या अद्भुत देशापासून शिकण्याजोग्या पुष्कळ गोष्टी आहेत. विशेषतः आज जेव्हा आपण आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून जात आहोत अशा वेळी जपानचा गेल्या शंभर वर्षांचा अनुभव तरी कमीत कमी आपण जाणून घेतलाच पाहिजे. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत धोके कुठे आहेत, ते कसे टाळायचे, आपले सांस्कृतिक वैशिष्ट्य सांभाळून आधुनिकीकरण करून कसे घ्यायचे वगैरे बाबतींत जपानचा अनुभव जितका आपल्या उपयोगी पडू शकेल तितका युरोप-अमेरिकेचा अनुभव पडायचा नाही. रशियाचाही पडायच नाही. या सर्व देशांच्या प्रगतीचा संदर्भच निराळा आहे. जपानचा अनुभव जर आपण लक्षात घेतला नाही तर आधुनिकीकरण कशाला म्हणायचे आणि पाश्चात्त्यीकरण कशाला म्हणायचे हेही आपल्याला कळायचे नाही. आपण आधुनिकीकरणाच्या नावाखाली आपले आंधळेपणाने पाश्चात्त्यीकरण करून घेऊ आणि हां हां म्हणता आपली मौलिकता हरवून बसू. मग 'यूनानो-मिश्रो-रूमा सब मिट गये जहाँसे, अब तक मगर है बाकी नामोनिशाँ हमारा' असे आपल्याला अभिमानाने गाता यायचे नाही. जपानने आपले आधुनिकीकरण करून घेतले, पण आपले पाश्चात्त्यीकरण होऊ दिले नाही. आधुनिक बनण्यासाठी विज्ञानाची आवश्यकता आहे आणि विज्ञानासाठी इंग्रजी किंवा दुसरी विदेशी भाषा नितान्त आवश्यक आहे असा आग्रह जपानने कधी धरला नाही. सारे विज्ञान त्याने जपानी भाषेत आणले आणि जपानी भाषेच्या द्वाराच ते लोकांना शिकवून आपली प्रगती करून घेतली. जपानचा कोणताच व्यवहार जपानी सोडून दुसऱ्या भाषेतून

चालत नाही. आपल्याकडे सगळे उलटेच चालले आहे. विज्ञानाच्या नावाखाली इंग्रजीचा आग्रह चालला आहे. आणि इंग्रजीच्या द्वारा विज्ञान आत्मसात करण्याऐवजी विज्ञानाच्या द्वारा इंग्रजीवर प्रभुत्व मिळविण्याचा खटाटोप चालला आहे आणि विज्ञानही नाही आणि इंग्रजीही नाही अशी आपण आपली स्थिती करून घेतली आहे. इंग्रजीच्या आंधळ्या आग्रहामुळे आपण आधुनिक बनण्याऐवजी इंग्लंडची किंवा अमेरिकेची सांस्कृतिक वसाहत बनत चाललो आहोत हे आपल्यापैकी कित्येकांच्या लक्षातही येत नाही. जपान आपल्याला याही क्षेत्रात मार्गदर्शन करू शकते. जपान आपल्याला किती तरी गोष्टी शिकवू शकते. या देशाशी आपला सहकार वाढलाच पाहिजे.

या शतकाच्या आरंभी जपानने आपल्या मनामध्ये राष्ट्रवादाची ज्योत प्रज्वलित केली होती. पुढे त्याने आपल्या मनामध्ये भीती उत्पन्न केली. आज जपान विश्वशान्तीचे प्रामाणिक पुरस्कर्ते आहे. या देशाशी आपला सहयोग वाढला पाहिजे.

माझ्या मनामध्ये तेथे बसल्या बसल्या अशा प्रकारचे अनेक विचार येऊ लागले. या दोन महिन्यांत पाहिलेल्या व अनुभवलेल्या सर्व गोष्टी आठवल्या आणि मी तेथेच निर्णय घेतला – भारताला परतल्याबरोबर मी जपानचा स्वयं नियुक्त प्रतिनिधी बनेन आणि माझ्या देशबांधवांच्या मनामध्ये या देशाविषयी जिज्ञासा जागृत करण्याचा प्रयत्न करीन. भारत व जपान या दोन्ही देशांचा सहयोग – केवळ व्यापारी व राजकीय नव्हे, तर सांस्कृतिक सहयोग – उभय देशांतील लोकांच्या फायद्याचाच सिद्ध होईल. एवढेच नव्हे तर आशिया खंडाच्या व जगाच्या दृष्टीनेही कल्याणकारी निवडेल. मी माझ्या परीने जेवढे शक्य असेल तेवढे करीत राहीन...

इतक्यात आवाज कानी पडला, 'मुंबईला जाणारे एअर इन्डियाचे विमान निघायच्या तयारीत आहे.' विचारांच्या तंद्रीतच मी उठलो आणि विमानाच्या दिशेने चालायला लागलो. विमानतळावरील इमारतीच्या गच्चीवर माझे सर्व मित्र उभे होते आणि 'सायोनारा'... 'सायोनारा' करून हात हालवीत होते. काही मित्र चामड्याचा पंखा वाजवून 'नम् म्यो हो रें गेक्यों' या मंत्राचा उद्घोष करीत होते. मी विमानाकडे पोहोचताच मागे वळून त्यांच्याकडे एकदा पाहिले आणि पुन्हा सर्वांना मनःपूर्वक वाकून प्रणाम केला.

विमान आकाशात चढले आणि माझ्यासमोर एखाद्या सुंदर गालिच्याप्रमाणे सारा निप्पोनदेश पसरलेला दिसला. दोन महिन्यांपूर्वी मला हा देश एखाद्या अज्ञात प्रदेशा-सारखा वाटला होता. आज मला तो अज्ञात राहिला नव्हता. त्याची काही रहस्ये आज माझ्या परिचयाची झाली होती. हा देश पाहण्याची—नव्हे, आपलासा करण्याची संधी

मला मिळाली ही ईश्वराची मोठी कृपाच होय असे मला वाटायला लागले. मी डोळे भरून पुन्हा एकदा त्या गालिच्याकडे पाहिले. विमान जसजसे पुढे धावू लागले तसतसा तो गालिच्याही मागे सरकू लागला. होनशू बेट गेले. शिकोकू आले आणि तिथला साकुराजिमा ज्वालामुखी दिसला. इतक्यात तोही मागे सरकला. हां हां म्हणता जपानची सारी भूमी दृष्टीआड झाली.

आणि अचानक मला जाणवले की, मी माझे हृदय तर जपानलाच विसरून आलो आहे !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलमा
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नोंद दि. ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६९२०

REFBK-0018128
REFBK-0018128